**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>वि.स.वि.नियम 289 च्या सूचनेसंबंधी</u>**

**सभापती** : काल सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी व माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये एक सूचना दिली होती. ती मी प्रलंबित ठेवली होती. त्या अनुषंगाने काल श्री. प्रकाश शेंडगे यांच्या लक्षवेधी सूचनेवर दीर्घ चर्चा झालेली आहे. धुळे, नंदूरबार, नाशिक या जिल्हयातील पवन चक्क्यांच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सविस्तर पध्दतीने विषय मांडला होता. या ठिकाणी या विभागाचे सन्माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी काल या बाबतीत सविस्तर उत्तर दिलेले आहे. म्हणून वि.स.वि.नियम 289 च्या अनुषंगाने जो प्रस्ताव मांडला होता त्या प्रस्तावाला मी अनुमती नाकारीत आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**आंतकवादी हल्ल्यानंतर मुंबई विद्यापीठाने एनसीसी**
**सर्व कॉलेजेसला सक्ती करण्याच्या प्रस्ताव**

**(१) * ५०७७० श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री सुभाष चव्हाण , श्री.सय्यद जमा , श्री. चरणसिंग सप्रा , श्रीमती अलका देसाई :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंतकवादी हल्ल्यानंतर मुंबई विद्यापीठाने एनसीसी सर्व कॉलेजला सक्तीचे करण्याच्या प्रस्ताव मांडला असल्याचे माहे जानेवारी, २००९ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रस्तावावर अद्याप कोणतीही कार्यवाही केली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.राजेश टोपे यांच्या करिता**: (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाच्या माध्यमातून एका अत्यंत महत्वाच्या विषयाकडे मला या सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. सध्याच्या काळामध्ये ठिकठिकाणी डिझास्टरचे प्रकार घडत आहेत. मॅनमेड डिझास्टर, नॅचरल डिझास्टरच्या बाबतीत आपण डिझास्टर मॅनेजमेंटवर चर्चा करतो, ती चर्चा फक्त त्या चर्चेपुरती मर्यादित रहाते. म्हणून या प्रश्नाच्या पार्श्वभूमिवर एन.सी.सी.च्या माध्यमातून अशा प्रकारे डिझास्टर मॅनेजमेंटचे ट्रेनिंग प्रत्येक महाविद्यालयामध्ये सक्तीचे करण्याबाबतचा प्रस्ताव आणण्या विषयी शासनाचे धोरण काय आहे? शासन याबाबतीत सकारात्मक भूमिका घेणार आहे काय? या खात्याच्या माननीय राज्यमंत्र्यांकडून आम्हाला जास्त अपेक्षा आहेत कारण ते स्वत: युथ कौन्सिलचे सदस्य असताना त्यांनी ही भूमिका मांडली होती.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50770 ..... श्री. संजय दत्त ...

म्हणून या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय माहिती देतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी मूळ प्रश्न एन.सी.सी. कम्पल्सरी करणार की नाही यासंदर्भात विचारलेला आहे. त्या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपल्या संपूर्ण देशात जेवढी विद्यापीठे आहेत त्या ठिकाणी एन.सी.सी. आणि एन.एस.एस. अशा दोन संघटना आहेत. एन.सी.सी. म्हणजे नॅशनल कॅडेट कोअर हे डिफेन्स मिनिस्ट्रीने स्पॉन्सर केले आहे आणि डिफेन्स मिनिस्ट्रीकडून प्रत्येक विद्यापीठाला पैसे येतात. त्यांचे अधिकारी येऊन प्रशिक्षण देतात. ते कंपल्सरी करण्याबाबतचा विषय हा डिफेन्स मिनिस्ट्रीचा विषय आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी डिझास्टर मॅनेजमेंटच्या संदर्भात प्रश्न विचारला. एन.एस.एस. ही जी संघटना महाराष्ट्रामध्ये आहे त्यामध्ये डिझास्टर मॅनेजमेंटच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये हाती घेतला आहे. कॉन्सेंट्रेटेड एन.सी.सी. आणि एन.एस.एस. या दोन्ही संघटनांना प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत आपण विचार करु शकतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आम्ही शाळा-कॉलेजमध्ये असताना एन.सी.सी. होते तसेच ए.सी.सी. सुध्दा होते. त्यानंतर कॉलेजमध्ये एन.सी.सी. होते. त्यावेळी सी.ई.टी. परीक्षा नव्हती. त्यावेळी ज्यांना इंजिनिअरींगला वगैरे जावयाचे असेल आणि एन.सी.सी. घेतले असेल तर 5 ग्रेस मार्क मिळत होते आणि त्यामुळे विद्यार्थी-विथार्थीनी एन.सी.सी.कडे अधिक प्रमाणात जात असत. सन्माननीय सदस्यांनी 26/11 च्या घटनेचे उदाहरण दिले. जेव्हा प्रसंग येईल तेव्हा कोण धावून येऊ शकतो ? विद्यार्थी-विद्यार्थीनींना प्रशिक्षण असेल तर ते त्यादृष्टीने उत्तम होईल. म्हणून एन.सी.सी. कम्पल्सरी नसले तरी सुरुवात व्हालंटरी म्हणून तरी करावी. त्याचे काही ग्रेस इन्सेन्टिव्ह दिले तर अधिक प्रमाणात विद्यार्थी त्याकडे जातील. एन.सी.सी. महाविद्यालयात तसेच शाळेमध्ये सुध्दा बरेच कमी झाले आहे. म्हणून महाविद्यालयामध्ये शासन ते सुरु करील काय ?

सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एन.सी.सी. आणि एन.एस.एस. यामध्ये जे विद्यार्थी जातात त्यांना आज सुध्दा ग्रेस मार्क दिले जातात. एन.सी.सी. मध्ये, एन.एस.एस. मध्ये गेले तर 10 ग्रेस

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50770 ..... श्री. सुरेश शेट्टी ....

मार्क देतात. पण जेव्हा आपण डिझास्टर मॅनेजमेंटसंबंधी चर्चा करतो तेव्हा मी स्वत: सहा-आठ महिन्यांपूर्वी एन.एस.एस.च्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. आपण सर्व सन्माननीय सदस्य बघतो की, मुंबईमध्ये बॉम्ब स्फोट झाला किंवा अपघात झाला किंवा आग लागली तर स्थानिक लोक, स्थानिक युवक सर्वप्रथम त्या ठिकाणी पोहोचतात. त्यांना प्रशिक्षण नसते पण ते कामाला लागतात. पेशन्ट्सना रिक्षामध्ये, टॅक्सीमध्ये घालून हॉस्पिटलमध्ये नेण्याचे काम करतात. मुंबईमध्ये जेव्हा बॉम्ब स्फोट झाला तेव्हा मी अंधेरीला होतो. अंधेरीवरुन मंत्रालयाकडे येण्यास निघालो त्यावेळी सायंकाळी साडेपाच वाजता जोगेश्वरी येथे बॉम्ब स्फोट झाला होता. बांद्रा येथील पुलाच्या ठिकाणी माझी गाडी थांबली तेव्हा काही युवकांनी माझ्या गाडीला टकटक केले तब मैंने उनमें से एक युवक से पूछा क्या बात है, तो उस युवक ने कहा कि आप सायरन लगाकर गाड़ी जल्दी से आगे ले जाए. फिर मैंने उससे पूछा, क्यों, तो उस युवक ने बताया कि जोगेश्वरी में हुए बम विस्फोट की घटना में घायल एक आदमी रिक्षा में है, उसे तुरंत अस्पताल पहुंचाना है. मैंने उस युवक से पूछा क्या आप उस घायल व्यक्ति को जानते हो, क्या वह आपका मित्र है, क्या वह आपका परिचित है ? तो उसने कहा कि मैं उस व्यक्ति को नहीं जानता. फिर मैंने उस युवक से पूछा कहां से आ रहे हो ? तब उस युवक ने कहा कि मैं जोगेश्वरी से आ रहा हूं और इस घायल व्यक्ति को लीलावती अस्पताल में ले जा रहा हूं. तो मैंने उससे पूछा कि लीलावती अस्पताल यहां से दूर है, आप वहीं क्यों लेकर जा रहे हो ? तब उस युवक ने कहा कि इस घायल व्यक्ति का मोबाईल बज रहा था तब मैंने उसे रिसीव किया और मोबाईल पर बात करने वाले व्यक्ति से कहा कि आपने जिसे फोन किया है वह घायल अवस्था में है और हम उसे अस्पताल में ले जा रहे हैं. तब उस व्यक्ति ने कहा कि उसे आप लीलावती अस्पताल में ले जाओ, हम वहां पहुंच रहे हैं.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50770..... श्री.सुरेश शेट्टी....

असे आमचे युवक आहेत. तो मुलगा त्या माणसाला ओळखत नव्हता. परंतु तो त्यांना रिक्षामध्ये घालून लिलावती हॉस्पिटलमध्ये घेऊन जात होता. ट्रॅफिक जॅम असल्यामुळे मी त्या व्यक्तीला माझ्या गाडीमध्ये घेतले आणि त्यांना लिलावती हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांसाठी जॉईंट प्रोग्रॅम घेऊन डिझास्टर मॅनेजमेंटसाठी स्पेशल ट्रेनिंग प्रोग्रॅम घेऊ. त्यासाठी जो निधी लागेल तो निधी...

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी हा प्रश्न डायव्हर्ट केला आहे. प्रसंग आला तर काय घडू शकते ते त्यांनी सांगितले आहे. डिझास्टर मॅनेजमेंटशी हा प्रश्न निगडित नाही. कोणतेही संकट आले तर काय केले पाहिजे हा विषय आहे. मुलांना कॉलेजमध्ये राष्ट्रभक्तीचे धडे आणि प्रसंग आला तर काय केले पाहिजे त्याचे सातत्याने धडे मिळाले तर त्याचा चांगला उपयोग होईल. परंतु सन्माननीय मंत्रिमहोदय आपण डिझास्टर मॅनेजमेंटकडे आम्हाल घेऊन गेलात. शासन कॉलेजमध्ये पुन्हा एनसीसीचा कोर्स सुरु करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : ओपन फॉर सजेशन.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना मी मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी चांगला प्रश्न विचारला आहे. मला यानिमित्ताने माइक टायसन याची आठवण झाली आहे. अमेरिकेमध्ये प्रत्येक नागरिकाला सैन्याचे ट्रेनिंग घेणे कम्पलसरी आहे. एखाद्याने ते नाकरले तर त्याला तुरुंगात पाठविले जाते. देश अशाप्रकारे उभा राहतो. एनसीसीमार्फत देश उभा करणारी पिढी करणे हा त्यातील मूळ गाभा आहे. युतीच्या शासनाच्या वेळी एमसीसी कम्पलसरी केली होती. माननीय मंत्रिमहोदयांना मी स्पेसिपिक प्रश्न विचारतो. हा मानसिकतेचा आणि राजकीय इच्छाशक्तीचा प्रश्न आहे म्हणून मी आपल्याला विचारतो. मला एनसीसीची कल्पना आहे, कारण आपण सगळेजण एनसीसीमध्ये होतो. त्यासाठी ते त्यांचे ट्रेनर्स पाठवितात. रिटायर्ड सैनिक घेऊन तो कार्यक्रम राबविण्याचा आम्ही प्रयत्न केला होता. निवृत्त अधिका-यांना त्यात सहभागी करुन घेऊन मुलांना 3 महिन्यांचे ट्रेनिंग द्यावयाचे, त्यासाठी 5 लाख रुपयांपर्यंत खर्च येतो, 5 एकर जमीन लागते, त्यानंतर त्या मुलांना सैन्यात भरती करता येते. युती शासनाने एमसीसी जसे कम्प्लसरी केले होते तसे एनसीसी कम्प्लसरी केले पाहिजे, त्यासाठी निवृत्त अधिकारी घेतले आणि

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MAP/

श्री.रावते.. ता.प्र.क्र.50770.....

त्याचा खर्च शासनाने उचलला तर प्रत्येक कॉलेजमधील विद्यार्थ्यांमध्ये या देशासाठी मिलिटण्ट निर्माण होईल. (अडथळा) 'मिलिटण्ट' त्या उद्देशाने मी म्हणत नाही, आपल्या डोक्यामध्ये तेच येते. हेच दुर्दैव आहे. मिलिटन्सी हा शब्दच तसा आहे, मिलिटन्सी म्हणजे अतिरेकी नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, रेकॉर्ड वरुन मिलिटण्ट हा शब्ध्द काढून टाकावा.

**सभापती** : ठीक आहे, मिलिटण्ट हा शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला मिलिटन्सीचा डिक्शनरी मिनिंग बघावा लागेल. राष्ट्रभक्त युवक निर्माण करण्यासाठी शासन तसे पाऊल उचलणार आहे काय, त्याला जो काही खर्च येईल तो राज्य सरकार उचलणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच या प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले आहे की, एनसीसी हा केंद्र सरकारचा कार्यक्रम आहे. संरक्षण मंत्रालयाचा हा कार्यक्रम आहे, राज्य सरकारचा नाही. या कार्यक्रमासाठी लागणारा खर्च आणि प्रशिक्षणाचे आयोजन संरक्षण मंत्रालयाकडून केले जाते. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्यासाठी किती विद्यार्थी आहेत, त्यांना कसे प्रशिक्षण देता येईल, किती खर्च येईल त्यासाठी अभ्यास करावा लागेल, यासाठी शासन इनिशिएटिव्ह घेईल आणि यासाठी हाय लेव्हल टास्क फोर्स निर्माण करुन त्यांना 3 किंवा 6 महिन्यात रिपोर्ट सादर करण्याचे आदेश देण्यात येतील.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, प्रश्न का जो उत्तर दिया गया है, उससे ऐसा लगता है कि कॉलेज और स्कूलों में एन.सी.सी. कम्पलसरी करने के बारे में महाराष्ट्र सरकार गंभीर नहीं है. आज कॉलेज और स्कूलों में एन.सी.सी और एन.एस.एस.का कोर्स आप्शनल है. इसलिए मेरा स्पष्ट प्रश्न है कि कॉलेज और स्कूलों में एन.सी.सी. कम्पलसरी करने के संबंध में क्या महाराष्ट्र सरकार कोई नीति बनाने का निर्णय लेगी ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि डिझास्टर मॅनेजमेंट के संबंध में केन्द्रीय सरकार ने नेशनल डिझास्टर अथॉरिटी बनाई है. उसी के आधार पर राज्य सरकार इसी प्रकार की डिझास्टर अथॉरिटी बनाएगी ? तीसरा मेरा प्रश्न यह है कि, जिस प्रकार से कॉलेज और स्कूलों में एन.सी.सी. अनिवार्य करने की बात है उसी प्रकार से विद्यार्थियों को फर्स्ट एड के संबंध में भी प्रशिक्षण देना चाहिए ताकि कोई दुर्घटना होने पर लाईफ सेविंग के लिए प्रभावित लोगों को मदद की जा सके. क्या सरकार इस बारे में विचार करेगी ?

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:15

(ता.प्र.क्र.50770....)

श्री. सुरेश शेट्टी :सभापति महोदय, मैंने सम्माननीय सदस्य के पहले प्रश्न का उत्तर दो बार दे दिया है. मैं एन.सी.सी. अनिवार्य करने के संबंध में यह बताना चाहता हूं कि यह केन्द्रीय सरकार का कार्यक्रम है. इस में डिझास्टर मॅनेजमेंट के ताल्लुक से राज्य सरकार का कोई योगदान नहीं है. इसलिए स्कूल और कॉलेजों में एन.सी.सी. अनिवार्य करने के संबंध में केन्द्रीय सरकार के एचआरडी को निर्णय लेना होगा. हम केंन्द्रीय सरकार के एचआरडी के पास इस सदन के सदस्यों की इस भावना को पहुंचाएंगे कि इस सदन के सम्माननीय सदस्य एन.सी.सी. को स्कूल और कॉलेजों में अनिवार्य करने के पक्ष में है.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या राज्याचा 50वा सुवर्णमहोत्सव आपण साजरा करीत आहोत. एखाद्या सन्माननीय सदस्यांना मराठी बोलता येत नसेल तर ते आम्ही समजून घेऊ. परंतु सन्माननीय सदस्यांनी हिंदीमध्ये प्रश्न विचारल्यानंतर देखील सरकारने मराठीमध्ये उत्तर द्यावयास पाहिजे...

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी हिंदीमध्ये प्रश्न विचारला म्हणून मी हिंदीमध्ये उत्तर दिले.

श्री. दिवाकर रावते : माझे म्हणणे असे आहे की, सरकारने मराठीमध्ये उत्तर दिले पाहिजे.

श्री. सुरेश शेट्टी : सदनाला अधिकार आहेत...या सदनामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी बोलता येते...

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदयांनी कानडी, मल्ल्याळी, तेलगु अशा कोणत्याही भाषेत बोलावे...

(विरोधी तसेच सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते : सरकारने मराठीमध्ये उत्तर द्यावे असे मी म्हणालो. राज्यमंत्री महोदयांनी कसे बोलावे हे सांगितले नाही. राज्यमंत्री महोदयांनी सांगावे की त्याना मराठी येत नाही. त्यांना मराठी येत असल्यामुळे त्यांनी मराठीत उत्तर द्यावे.

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 50770....

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्री महोदयांना मराठी चांगले येते. किंबहुना सन्माननीय सदस्यांनी हिंदीमध्ये प्रश्न विचारला म्हणून त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी हिंदीमध्ये द्यायला सुरुवात केली. त्यामध्ये गैर असे काही नाही. आधीच्या प्रश्नांना राज्यमंत्री महोदयांनी मराठीमध्ये उत्तरे दिलेली आहेत...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या निर्णयाचा मी नम्रपणे आदर करतो. सरकारने मराठी भाषेमध्ये उत्तर द्यावे एवढेच मी म्हणालो. आपण राज्यमंत्री महोदयांना मराठी येते तर मराठीत उत्तर द्यावे असे सांगू शकला नाहीत. धन्यवाद.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, राज्यमंत्री महोदयांनी आपल्या उत्तराची सुरुवात मराठीत केली होती. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी हिंदीमध्ये प्रश्न विचारला त्यावेळी राज्यमंत्री महोदयांनी हिंदीमध्ये उत्तर द्यायला सुरुवात केली. राज्यमंत्री महोदयांना मराठी चांगले येते आणि ते मराठीमध्ये बोलत असतात.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझे म्हणणे कृपया आपण ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. त्यामागचा हेतू एवढाच होता की, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा साहेबांना मराठी येत नाही म्हणून त्यांनी हिंदीमध्ये प्रश्न विचारला. त्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी कोणतीही हरकत घेतली नाही. मराठी ही राज्याची राजभाष आहे. त्यामुळे सरकारने मराठी भाषेतूनच उत्तर द्यावे असे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50770....

श्री. अरविंद सावंत...

सन्माननीय सदस्यांना मराठीतून उत्तर कळते. त्यांना मराठी भाषेतून फारसे बोलता येत नाही याची आम्हाला जाणीव आहे. सन्माननीय सदस्य श्री. जमा यांनी हिंदी भाषेतून प्रश्न विचारला असला तरी त्या प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र सरकारने मराठीतून दिले पाहिजे अशी माफक अपेक्षा आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेचा या सदनात अवमान करु नये एवढी माफक अपेक्षा आम्ही आपणाकडे व्यक्त करतो.

श्री.सय्यद जमा : सभापति महोदय, मैंने हिन्दी में प्रश्न पूछा था. मैं मराठी भाषा के प्रति पूर्ण आदर रखता हूं. मैं मराठी भाषा सीखने की कोशिश कर रहा हूं और मराठी में बोलने की कोशिश करुंगा. माननीय मंत्री जी ने हिन्दी में जवाब दिया. चूंकि उन्हें मराठी आती है इसलिए मराठी में जवाब देना चाहिए. मराठी में कामकाज होना चाहिए. लेकिन मंत्री जी ने मेरे हिन्दी प्रश्न का जवाब हिन्दी में दिया है, तो हिन्दी हमारी राष्ट्रभाषा है, इसलिए हिन्दी का विरोध नहीं होना चाहिए.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, "हिंदी" ही राष्ट्रभाषा नाही. परंतु आम्ही हिंदी भाषेचा मान राखतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, "हिंदी" ही राष्ट्रभाषा नाही. सन्माननीय सदस्यांनी "हिंदी"ही राष्ट्रभाषा आहे अशा प्रकारचा त्यांनी उल्लेख केलेला आहे तो रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

( गोंधळ )

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, या सभागृहात मराठी भाषेचा आग्रह धरणे हे मी समजू शकतो. परंतु सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्य मराठी भाषेत बोलत असताना इंग्रजी शब्दाचा आधार घेऊन आपले वाक्य पूर्ण करीत असतात त्यांना देखील आपण सूचना देण्याची आवश्यकता आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी मराठी बोलत असताना "मिलिटेंट", "मिलिटेंसी" अशा शब्दाचा वापर केला. या इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द नव्हते काय ?

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50770....

श्री. सुरेश नवले ...

प्रत्येक इंग्रजी शब्दाला पर्यायी मराठी शब्द आहेत. परंतु शिवसेनेच्या प्रत्येक सदस्यांची मराठी भाषणे आपण तपासून पाहिली तर बहुतांशी सदस्यांनी मराठी बोलत असताना इंग्रजी शब्दांचा आधार घेतलेला आहे. मग त्यांनी देखील इंग्रजी शब्दाचा आधार घेऊ नये.

श्री. दिवाकर रावते : सरकारने मराठीतून उत्तर दिले पाहिजे यासाठी आमचा आग्रह आहे. सभापती महोदय, आपण मराठी भाषेला संरक्षण दिले पाहिजे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा नाही. घटने नुसार ती संपर्क भाषा आहे. देशातील दक्षिण राज्यात जाऊन बघितले तर तेथील लोक त्यांच्या भाषेला खूप महत्व देतात.

( गोंधळ )

**सभापती** : या सदनातील दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांना मराठी भाषेबद्दल नितांत आदर आहे. मराठी भाषेचा सातत्याने वापर व्हावा अशी सगळयांचीच अपेक्षा आहे. एखाद्या सन्माननीय सदस्याने त्यांचा प्रश्न हिंदी भाषेत विचारला आणि त्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री वा राज्यमंत्री यांनी हिंदी भाषेत दिले तर ते काही गैर आहे असे मी मानावयास तयार नाही.

श्री. दिवाकर रावते : मराठी भाषेचा अवमान करणा-या सरकारचा निषेध व्यक्त करतो आणि आम्ही सर्व विरोधी पक्षाचे सदस्य सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सदस्य सभात्याग करतात.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या लोकांचा मराठीचा पुळका फक्त राजकारणापूरता आहे. सगळयांची मुले इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत आहेत. तेच या ठिकाणी मराठी भाषेचा आग्रह धरता आहेत, ही गोष्ट बरोबर नाही.

-------------

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक - 51645</u>**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )





**सिंधुदुर्ग जिल्ह्यात उभारण्यात येणारे पवन ऊर्जा प्रकल्प**

**(३) *  ५०८२७     श्री सुभाष चव्हाण , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.सय्यद जमा , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री.विक्रम काळे , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. संजय दत्त :**
सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात महाऊर्जा प्रकल्पांतर्गत मालवण तालुक्यात आडबंदर, धामापूर येथे तर सावंतवाडी तालुक्यात कास व देवगड तालुक्यात मुटाट, किंजवडे या पाच ठिकाणी पवनचक्की प्रकल्प उभारण्यास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तीन तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या पवन ऊर्जा प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त तिन्ही तालुक्यातील पवन ऊर्जा प्रकल्प तातडीने सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने जानेवारी, २००९ अखेर किती रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे व त्यांपैकी किती निधी आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे,

(४) उपरोक्त प्रकल्पाच्या कामास अद्याप सुरुवात झाली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.विनय कोरे** : (१) नाही. तथापि, महाऊर्जा प्रकल्पांतर्गत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आडबंदर, धामापूर (ता.मालवण) मुटाट व किंजवडे (ता.देवगड) व कास (ता.सावंतवाडी) या पाच ठिकाणी पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी महाऊर्जामार्फत वारामापन केंद्रे उभारण्यात आली असून तेथील वाऱ्याचा अभ्यास करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



ता.प्र.क्र.५०८२७ ......

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, पवन ऊर्जा प्रकल्पातून वीज निर्मितीला खास प्राधान्य देण्यात आले आहे. पवन ऊर्जेच्या माध्यमातून जगामध्ये १ लाख मॅ.वॅ.पेक्षा जास्त क्षमतेची ऊर्जा निर्माण होत आहे. मी उप प्रश्न एक विचारला आहे त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात "नाही" असे म्हटले आहे. त्या उत्तरात ते पुढे त्यांनी असे नमूद केले आहे की, महाऊर्जा प्रकल्पांतर्गत सिंधुदूर्ग जिल्हयातील आडबंदर, धामापूर (ता.मालवण) मुटाट व किंजवडे (ता.देवगड) व कास (ता.सावंतवाडी ) या पाच ठिकाणी पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी महाऊर्जा मार्फत वारामापन केंद्र उभारण्यात आली असून तेथील वा-यांचा अभ्यास करण्यात येत आहे. वाऱ्यांचा अभ्यास शासनाने कधी सुरु केला ? तो अभ्यास पूर्ण कधी होणार आहे ? यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करावे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50827.....

श्री.विनय कोरे : सिंधुदुर्ग जिल्हयातील पाच ठिकाणी 2008-09 मध्ये वारा मापन केंद्रांची उभारणी केली आहे. सर्वसाधारणपणे दोन वर्षे सलग तेथील वाऱ्याच्या वेगाचा अभ्यास केल्यानंतर केंद्रीय अपारंपारिक ऊर्जा मंत्रालयाची चेन्नई येथे सीवॅट ही संस्था काम करते, त्यांच्याकडे तो डाटा दिला जातो. त्यांच्याकडून त्याठिकाणी पवनऊर्जा निर्मितीसाठी ते ठिकाण योग्य असल्याचा निष्कर्ष काढून ते ठिकाण डिक्लेअर केले जाते. सिंधुदुर्ग जिल्हयातील पाचही ठिकाणी अशा प्रकारचे वारा मापन केंद्र आस्थापित केले आहे. त्याचा अहवाल शासनाकडे सादर केला. त्याठिकाणी तशा प्रकारचे पोटेन्शियल दिसून आले आहे. हे ठिकाण डिक्लेअर करण्यासाठी दोन वर्षाचा अभ्यास केल्यानंतर सीवॅटची मान्यता आवश्यक आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या सभागृहात दोन-तीन वेळा पवनऊर्जेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. देवगड येथे 1970 पासून पवनऊर्जा प्रकल्प प्रस्तावित असल्याचे सांगितले जात आहे. तो प्रकल्प केव्हा सुरु होणार आहे?

श्री.विनय कोरे : हा प्रश्न वेगळा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाशी निगडित उपप्रश्न विचारावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, पवनऊर्जेचा प्रश्न दोन-तीन वेळा सभागृहात उपस्थित झालेला आहे. देवगड येथील पवनऊर्जा प्रकल्प 1970 सालापासून विचाराधीन आहे.

श्री.विनय कोरे : देवगड येथे 1970 साली पहिल्यांदा प्रायोगिक तत्वावर पवनऊर्जेला सुरुवात केली गेली. ती जागा एमएसईबीच्या मालकीची आहे. त्याठिकाणी एमएसईबीच्या माध्यमातून लवकरच पवनऊर्जा निर्मितीचे काम हाती घेण्यात येणार आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, देवगडच्या पवनऊर्जा प्रकल्पाचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनात उपस्थित होतो. दरवेळेला या प्रश्नाबाबत मंत्रीमहोदय वेगवेगळे उत्तर देत असतात. मागील वेळी मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, ही जागा एमएसईबीची आहे. ती जागा अपारंपारिक ऊर्जा विभागाला देण्याबाबत ऊर्जा विभाग निर्णय घेईल. लवकरच त्या संदर्भात बैठक होणार असून जमीन ताब्यात मिळण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. जमीन ताब्यात केव्हा मिळणार आहे आणि प्रकल्प कधी कार्यान्वित करणार आहात? आता मंत्रीमहोदय सांगत आहेत की, ही

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जमीन एमएसईबीची असल्यामुळे त्यांच्याकडून पवनऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला जाणार आहे. राज्यात अन्य ठिकाणी पवनऊर्जा प्रकल्प राबविले जात असताना देवगड येथील प्रकल्प केव्हा सुरु केला जाणार आहे?

श्री.विनय कोरे : देवगडचा प्रकल्प आस्थापित केला असून ती जमीन एमएसईबीच्या मालकीची आहे. ती जमीन त्यांच्याकडून अपारंपारिक ऊर्जा मंत्रालयाकडे हस्तांतरित व्हावी अशा प्रकारचा पत्रव्यवहार केला. परंतु पवनऊर्जा प्रकल्प अपारंपारिक क्षेत्रात असला पाहिजे अशा प्रकारचे बंधन असल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीने स्वत: पवनऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच त्याठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या माध्यमातून प्रकल्प कार्यान्वित केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल आम्ही दूरदर्शनच्या माध्यमातून मंत्रीमहोदयांचे निवेदन ऐकले. पवनऊर्जा प्रकल्पाबाबत सिंधुदुर्ग जिल्हयासहित महाराष्ट्रामध्ये अनेक जिल्हयात जमिनींचे घोटाळे झाले आहेत. या संदर्भात समिती नेमण्याचे मंत्रीमहोदयांनी जाहीर केले आहे. खालच्या सभागृहात हा निर्णय जाहीर केला. वरच्या सभागृहात हा निर्णय जाहीर केला नाही?

जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50827......

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांना कदाचित माहीत नसेल परंतु समितीची घोषणा मी खालच्या सभागृहात केली नसून याच सभागृहात केली आहे.

श्रीमती अलका देसाई : महोदय, माननीय मंत्री महोदय सभागृहात सांगतात की, आम्ही त्याबातीत विचार करु. माझा प्रश्न असा आहे की, एखाद्या बाबीसंबंधीचा निर्णय घेण्यासाठी सरकारमध्ये संपूर्ण मंत्रिमंडळ असताना इतका विलंब का होतो ?

श्री. विनय कोरे : महोदय, देवगड येथील प्रकल्प सन 1970 मध्ये आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मदतीतून उभाररण्यात आला होता. त्यानंतर या तंत्रज्ञानात प्रचंड सुधारणा झाली आणि देवगड येथील जागेचे पुन्हा वारा मापन करुन घेतले व त्या जागेवर नवीन प्रकल्प एमएसईडीसीएल साकारणार आहे. परंतु वारा मापनासाठी दोन वर्षांचा कालावधी द्यावा लागतो. या दोन वर्षात त्याचा अभ्यास करण्यात येईल व त्यानंतरर सीवॅटची मान्यता घ्यावी लागते. अशा मान्यतेनंतरच अशा प्रकारचा प्रकल्प आस्थापित करु शकतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कालच माननीय मंत्री महोदयांना मी सांगितले की, आपण पॉझिटिव्ह उत्तर देत आहात. परंतु आज उत्तर देताना मात्र त्यांच्यावर दबाव असल्यासारखे दिसत आहे. देवगड तालुक्यात पवनचक्कीचा प्रकल्प उभा करुन बरीच वर्षे झाली. सध्याच्या परिस्थितीत हा प्रकल्प ब्लेडसह तयार असून तो बंद अवस्थेत आहे. त्या प्रकल्पाला फक्त पुनरुज्जीवित करावयाचा आहे. मागील वेळेस जागा अधिगृहित करण्यासंबंधीचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिले होते. आज मात्र एमईआरसीने एमएसईबीला सांगितले आणि ठराविक टक्के वीज अपारंपारिक क्षेत्रातून घेतलीच पाहिजे असे ते सभागृहात सांगत आहेत. माझी विनंती आहे की, सभागृहात माननीय उर्जा मंत्री सुध्दा उपस्थित आहेत. म्हणून दोघांनीही या प्रश्नाचे उत्तर द्यावे की देवगड येथील पवनचक्की प्रकल्प किती दिवसात सुरु करणार ?

श्री. विनय कोरे : महोदय, मी सभागृहात असे आश्वासन दिले होते की, एमएसईबीकडून ही जमीन अपारंपारिक उर्जा मंत्रालयाकडे घेऊन तेथे प्रकल्प उभा करु. तसा पत्रव्यवहार देखील आमच्या विभागाचा झालेला आहे. त्यासंबंधी वाटाघाटीच्या माध्यमातून चर्चा होऊन काही गोष्टी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ ST/

ता. प्र. क्र. 50827...... श्री. विनय कोरे ....

पूर्णत्वाला गेल्या आहेत. मधल्या काळात एमईआरसीने काही ऑर्डर्स काढल्या की, राज्यात जेवढे डिस्ट्रीब्युशन लायसेन्स आहेत त्यांच्यामार्फत जेवढी वीज विकली जाते त्याच्या ठराविक प्रमाणात वीज ही अपारंपारिक उर्जा क्षेत्रातून घेतली पाहिजे. अशा प्रकारे केले नाही तर 5 रुपये युनिटप्रमाणे दंड आकारण्याची देखील तरतूद करण्यात आली होती. अशा ऑर्डर्स झाल्या त्यावेळेस अनेक खाजगी कंपन्या जसे रिलायन्स, टाटा वगैरे सारख्या संस्थांनी अपारंपारिक उर्जा क्षेत्रात आपले प्रकल्प आस्थापित करण्यास सुरुवात केली. या जागेचे पूर्वीचे मालक एमएसईडीसीएल हीच असल्यामुळे त्यांनी अपारंपारिक उर्जा क्षेत्राकडे ती जागा हस्तांतरित करण्याऐवजी स्वत:च त्या ठिकाणी प्रकल्प उभा करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच हा प्रकल्प सुरु करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हा प्रकल्प सुरु करण्यापूर्वी वेलोसिटी मोजणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी किमान दोन वर्षे लागतात. अशी दोन वर्षे कधी पूर्ण होणार आहेत ? तसेच समुद्राच्या लाटांपासून वीजनिर्मिती करण्यासंबंधीचे संशोधन झालेले आहे. म्हणून कोकण किनाऱ्यावर अशा प्रकारचा उर्जा प्रकल्प शासन उभा करणार काय ?

श्री. विनय कोरे : महोदय, समुद्राच्या लाटांपासून वीजनिर्मितीचा प्रमाणे मोठ्या प्रमाणात आपण हातात घेतला आहे. पावसाळ्याचे दिवस पूर्ण होईपर्यंत या दोन तीन महिन्यात त्यासंबंधीचा अभ्यास केला जाणार व त्यातून आपल्या लक्षात येईल की, असा प्रकल्प सुरु करण्यात कोणत्या अडचणी येण्याची शक्यता असते, कशा प्रकारची मशिनरी खवळलेल्या समुद्रात टिकाव धरु शकेल ? त्यानंतर त्या प्रकल्पाच्या एक्स्पांशनसंबंधीचा निर्णय होणार आहे. एवढी टेक्नॉलॉजी सुरु झ ाल्यानंतर संपूर्ण समुद्रकिनाऱ्यावर जेथे जेथे शक्य आहे तेथे एक मोठे उर्जेचे क्षेत्र निर्माण होऊ शकेल यादृष्टीने शासनाने पावले टाकलेली आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:50827....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांनी उत्तर दिले तर अधिक चांगले होईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय अपारंपरिक ऊर्जा मंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे यासंदर्भातील पूर्ण माहिती 1-2 दिवसात विभागाकडून मागवून घेण्यात येईल व हा प्रकल्प कधीपर्यंत सुरु होईल याची माहिती अधिवेशन संपण्याच्या आत दिली जाईल.

--------------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विद्युत बिलाचा भरणा न केल्यामुळे पूर्वसुचना न देता शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचा विद्युत पुरवठा खंडीत केल्याप्रकरणी**

**(४) * ५२४५९ श्री अशोक मानकर , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) तहसील अंतर्गत येणाऱ्या भोरदेव, बोडखीपेठ, खोपना, ठाणा, वेळगाव, सोनेगांव (घटाटे) हरदोली (राजा) इत्यादी गावांमधील कृषी पंपाच्या विद्युत बिलाचा भरणा न केल्यामुळे सदर ठिकाणचा विद्युत पुरवठा माहे मार्च,२००९ च्या सुमारास महावितरण कंपनीने खंडीत केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यापूर्वी तेथील शेतकऱ्यांना नोटीशीद्वारे पूर्व सूचना देण्यात आली होती काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच उपरोक्त ठिकाणचा विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री.सुनील तटकरे यांच्या करिता :** (१) होय, कुही (जि.नागपूर) तहसिल अंतर्गत येणाऱ्या मौजा भोरदेव, बोडखीपेठ, खोबणा, ठाणा, वडेगाव, सोनेगाव (घटाटे), हरदोली (राजा) या गावांतील ११७ ग्राहकांचा, कृषी पंपाचा वीज पुरवठा वीज देयकाचा भरणा न केल्यामुळे मार्च, २००९ च्या आधी खंडीत करण्यात आला होता.

(२) व (३) कुही (जि.नागपूर) तहसिल अंतर्गत येणाऱ्या मौजा भोरदेव, बोडखीपेठ, खोबणा, ठाणा, वडेगाव, सोनेगाव (घटाटे), हरदोली (राजा) या गावातील ज्या ग्राहकांनी कृषीपंपाच्या वीज देयकाचा भरणा केलेला नव्हता अशा कृषी ग्राहकांना महवितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यामार्फत वीज देयके भरण्याबाबत व तसे न केल्यास वीज पुरवठा खंडीत करावा लागेल याबाबतच्या तोंडी तसेच दवंडीद्वारे वारंवार सुचना देण्यात आल्या होत्या.

(४) कृषी पंपाच्या वीज देयकाचा भरणा केलेल्या सर्व ग्राहकांचा विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

श्री. अशोक मानकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर आम्हाला मान्य नाही. "कुही" तालुक्यातील हा प्रश्न आहे. शेतक-यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करुन मृत्युला कवटाळीत आहेत, असे असतांना महावितरण कंपनीच्या अधिका-यांनी 117 शेतक-यांचे वीज कनेक्शन जबरदस्तीने कापलेले आहेत. वीज कनेक्शन कापल्यामुळे शेतक-यांना आपल्या गुराढोरांना पाणी न पाजता आल्यामुळे शेकडो गुरे मृत्युमुखी पडली. नागपूर जिल्हयामध्ये 8242 शेतक-यांची वीज

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर..... ता.प्र.क्र.: ५२४५९ ......

कनेक्शन कापण्यात आली होती त्याचे "कुही" एक चांगले उदाहरण आहे. माझा प्रश्न असा आहे की, या ठिकाणच्या शेतक-यांचे वीज कनेक्शन वितरण कंपनीच्या अधिका-यांनी जबरदस्तीने कट केलेले आहे. शेतक-यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने जबरदस्तीने शेतक-यांची वीज कनेक्शन कट केलेली आहेत, हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, या प्रश्नाच्या संदर्भातील लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "कृषी ग्राहकांना महावितरण कंपनीच्या कर्मचा-यामार्फत वीज देयके भरण्याबाबत व तसे न केल्यास वीज पुरवठा खंडीत करावा लागेल याबाबतच्या तोंडी तसेच दवंडीद्वारे वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या." सभापती महोदय, त्यावेळी अनेक शेतकरी परगावी गेलेले असल्यामुळे त्यांना तोंडी सूचना किंवा दंवडी द्वारे सूचना मिळू शकली नाही, अशी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण काय उपाययोजना करणार आहात ? अनेक शेतक-यांना वीज बील वेळेवर मिळत नाहीत तसेच जी काही वीज बील मिळतात ती अव्वाच्या सव्वा मिळत असतात त्यामुळे महावितरण कंपनीवर आपण कोणती ॲक्शन करणार आहात ? शेतक-यांची आर्थिक क्षमता न राहिल्यामुळे वीज बील थकीत राहिलेले आहे. त्यामुळे शासन शेतक-यांना वीज बिलात काही सवलत देणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापतीत महोदय, "कुही" तालुका जिल्हा नागपूर येथे एकंदर 6700 कृषी पंप आहेत. त्यांची एकूण थकबाकी 12.26 कोटी रुपये होती असे असतांना 135 पैकी केवळ 117 शेतक-यांच्या कृषी पंपांचे वीज कनेक्शन कापण्यात आले होते परंतु ते पुन्हा जोडून देण्यात आलेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, शेतक-यांच्या वीज बिलात काही सवलत दिली जाईल काय, तर त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, साधारणत: विजेचा दर हा अडीच ते तीन रुपये प्रती युनीट असा असतो परंतु शेतक-यांना 1.10 रुपये या प्रमाणे प्रती युनीट दराने वीज उपलब्ध करुन दिली जाते तसेच 1.10 रुपयातील क्रॉस सबसीडी पोटी शासन 90 पैसे भरते व प्रत्यक्षात शेतक-याला 20 पैसे प्रती युनीट इतके पैसे भरावे लागते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, शेतक-यांनी विजेचे बील भरावे असे वीज वितरण कंपनीने तोंडी सूचना दिल्या होत्या. परंतु या ठिकाणी 117

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: ५२४५९ ...

श्री. पांडुरंग फुंडकर...

शेतक-यांची वीज कनेक्शन कट करण्यात आलेले आहे. वीज वितरण कंपनीच्या माध्यमातून शेतक-यांना वेळेवर वीज बील मिळत नाही, त्यातच काही शेतक-यांना अव्वाच्या सव्वा वीज बील पाठविले जाते. मी सांगू इच्छितो की, अकोला जिल्हयातील बाळापूर येथील शेतक-याला 60 हजार रुपयाचे बील पाठविले गेले. हे बील कमी करुन द्यावे यासाठी त्याने अधिका-याकडें खेटे घातले आणि त्याने पूर्ण बील भरले नाही म्हणून त्याचे वीज कनेक्शन कापले गेले. त्यामुळे या शेतक-याच्या रब्बी पिकाचे नुकसान झाले. तरी त्या शेतक-याला त्यासंदर्भातील नुकसान भरपाई देण्यात येईल काय तसेच वीज कार्यालयातील अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ? या ठिकाणी 117 शेतक-याची वीज कनेक्शन कापली गेली आहे, त्यांना वीज बील भरण्याच्या संदर्भात कोणत्याही सूचना देण्यात आल्या नव्हत्या, असे असतांनाही या अधिका-यानी शेतक-यांची वीज कनेक्शन कट केले आहे. शेतक-यांना वेळेवर वीज बीलं मिळत नाही त्यामुळे शेतक-यांची वीज कनेक्शन्स कट केली जाते.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/ 11:40

ता.प्र.क्र. 52459...

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्यामुळे शेतकऱ्यांच्या रब्बी पिकाचे नुकसान झाले आहे. ही नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणार काय? किंवा यामध्ये जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, शेतकऱ्यांना तोंडी सूचना दिल्या ही गोष्ट खरी आहे. परंतु शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बिलाच्या खालच्या बाजूला लाल अक्षरामध्ये टिप्पणी दिलेली असते. त्यामध्ये हे बिल 15 दिवसात भरले नाहीतर...

श्री. पांडुरंग फुंडकर : शेतकऱ्यांना तीन-तीन महिने बिले दिली जात नाहीत....

डॉ. सुनील देशमुख : ज्या भागामध्ये महावितरणकडून व्यवस्थित आणि वेळेवर बिलांचे वितरण केले जात नसेल तेथील महावितरणच्या अधिकाऱ्यांना व्यवस्थित आणि वेळेवर बिल शेतकऱ्यांना देण्याबाबत आदेश देऊ. मी मघाशी सांगत होतो की, बिलाच्या खालच्या बाजूला लाल अक्षरामध्ये नोटीस देण्यात आलेली असून त्यामध्ये हे बिल जर शेतकऱ्यांनी 15 दिवसात भरले नाही तर त्यांचे विजेचे कनेक्शन तोडण्यात येईल असे म्हटलेले असते. अशाप्रकारे तोंडी सूचना दिल्या जात असल्या तरी छापील स्वरुपामध्ये नोटीस देण्यात आलेली असते एवढेच मला सांगावयाचे आहे. तसेच, ज्या 117 शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन तोडण्यात आले होते ते पुन्हा रिस्टोअर करण्यात आले आहेत.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, मंत्री जी ने अभी कुही, जिला नागपुर के बारे में जवाब दिया. इस संबंध में नागपुर के पालक मंत्री ने खरीप के मौसम में बैठक ली थी. उस समय जनप्रतिनिधियों ने यह मांग की थी कि किसानों की बिजली कनेक्शन काटने की मुहिम को स्थगित किया जाए, बंद किया जाए. उस समय पालक मंत्री ने मुख्य अभियंता को इस संबंध में आदेश भी दिया था और वह आदेश उन्होंने स्वीकार किया था. इसलिए मेरा यह प्रश्न है कि एमईआरसी से बात करके किसानों की बिजली कनेक्शन न काटने के संबंध में क्या मंत्री जी ने आदेश दिया है ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ज्याठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असेल त्याठिकाणी टंचाईग्रस्त परिस्थिती आहे अशाप्रकारचे सुस्पष्ट आदेश 7 फेब्रुवारी 2009 रोजी दिले आहेत.

...2

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, शासनाने आपल्या जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांची वीज बिले माफ करु असे सांगितले होते. त्यामुळे शेतकरी गोंधळात पडल्यामुळे त्यांनी लाईटचे बिल भरले नाही. शासनाने एक कार्यक्रम निश्चित केला की, शेतकऱ्यांना नियमितपणे 12 तास वीज दिली नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांना 2 हजारापासून 2 लाखापर्यंत वीजेची बिले आली. आणि म्हणून सर्वच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या विजेच्या बिलाची थकबाकी जाहीरपणे माफ केली आणि शेतकऱ्यांना नवीन कार्यक्रम तयार करुन दिला तर हे शेतकरी वीज बिल भरण्यास तयार आहेत. तशाप्रकारचा निर्णय शासन घेणार आहे काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कृषी संजीवनी नावाची एक योजना तीन वर्षापूर्वी राबविली होती. त्यामध्ये ज्यांच्याकडे थकबाकीचे प्रमाण फार मोठे होते, त्यांना सवलत देण्याचा निर्णय तीन वर्षापूर्वी राज्यभरात घेण्यात आला. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे वेळो वेळी अशा सवलती दिल्यामुळे थकबाकीचे प्रमाण फार मोठे असल्यामुळे शासन त्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आघाडी सरकारने आपल्या जाहीरनाम्यामध्ये 5 एकराच्या खालील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचे धोरण जाहीर केले होते. त्याची अंमलबजावणी हे सरकार करणार आहे काय?

डॉ. सुनील देशमुख : माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वेगळा प्रश्न विचारण्याची आवश्यकता नाही. या आघाडी सरकारने आपल्या जाहीरनाम्यामध्ये स्पष्टपणे आश्वासन दिले होते...

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न नागपूर जिल्हयातील कुही तालुक्यापुरता मर्यादित आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी अन्य आयुधांचा वापर करुन वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने लेखी उत्तरामध्ये "वीज देयकाचा भरणा न केल्यामुळे 117 वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला". माझा प्रश्न असा आहे की,

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 52459...

श्री रामनाथ मोते...

हा विद्युत पुरवठा केव्हा खंडीत करण्यात आला? तो पुन्हा केव्हा जोडून देण्यात आला? खंडीत कालावधी किती दिवसांचा होता? दुसरा प्रश्न असा की, वीजेची पुन्हा जोडणी करुन देत असतांना शेतकऱ्यांकडून काही दंड वसूल करण्यात आला हे खरे आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : विजेची जोडणी पुन्हा करुन देतांना शेतकऱ्यांकडून दंड वसूल करण्यात आलेला नाही. तसेच, या 117 वीज ग्राहकांची वीज केव्हा खंडीत करण्यात आली? तसेच, खंडीत केलेली वीज केव्हा जोडून देण्यात आली? याची तारीखनिहाय यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:45

ता.प्र.क्र.52459 . . . .

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, नागपूर जिल्ह्यातील काही गावांमध्ये विद्युत बिलाचा भरणा न केल्यामुळे वीज खंडित करण्यात आली आहे. आज शेतकरी अडचणीमध्ये आहे. अशा वेळी जर त्यांनी वीज बिलाचा भरणा केला नाही तर वीज पुरवठा खंडित करण्यात येणार नाही अशा प्रकारची भूमिका शासन घेणार आहे काय ? कारण पूर्वी शासनाने असे सांगितले होते की, वीज बिल माफ करण्यात येईल. पण निदान जर शेतकऱ्यांनी वीज बिल भरले नाही तर वीज पुरवठा खंडित करणार नाही अशी शासन भूमिका घेणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितलेले आहे की, ज्याठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे, तेथे दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे असे समजून, तेथे जर वीज बिलाचा भरणा करण्यात आला नाही तर वीज खंडित करण्यात येऊ नये असे आदेश अगोदरच दिलेले आहेत.

----

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार निर्णय न झाल्याने श्री.शिवाजी शिक्षण संस्थेला भेदभावपूर्ण वागणूक दिल्याबाबत

**(५) * ५०१६२ श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्या तालुक्याच्या ठिकाणी काही विद्याशाखांचे पदवी वर्ग अस्तित्वात नाहीत त्या विद्याशाखा १०० टक्के अनुदानावर सुरु करण्यास परवानगी देण्याचा व त्या तालुक्याच्या ठिकाणी एक किंवा दोन विद्याशाखा अनुदान तत्वावर आहेत तेथेच नवी दुसरी अथवा तिसरी विद्याशाखा देण्यास प्राधान्य देण्याचा धोरणात्मक निर्णय दिनांक ४ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास वरील धोरणात्मक निर्णयाशी पूर्णपूणे सुसंगत अशा चार तालुक्याच्या ठिकाणी विज्ञान विद्याशाखा सुरु करण्याबाबत शासनाने मान्यता न दिल्यामुळे संस्थेला भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आली आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन सचिव, श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी दिनांक २४ मार्च, २००९ रोजी किंवा त्या दरम्यान मा.प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना सादर केले, हे खरे आहे काय,

(३) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी दिनांक २८ डिसेंबर, २००८ रोजी किंवा त्यासुमारास एक प्रस्ताव मा.प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना पाठवून या चारही प्रस्तावाबाबत अनुकूल अभिप्राय कळविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(५) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता** : (१) ज्या तालुक्यामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखापैकी कोणतीही एक विद्याशाखा अनुदानित नाही अशा विद्याशाखांना १००% अनुदान मंजूर करणें व ज्या तालुक्यात कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांपैकी कोणतीही एक विद्याशाखा अस्तित्वात नाही अशा विद्याशाखेला पुढील शैक्षणिक वर्षापासून १००% अनुदानावर परवानगी देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने दिनांक ४ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सचिव, श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी त्यांच्या ४ महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विज्ञान विद्याशाखा सुरू करण्याचे प्रस्ताव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामार्फत सादर केले असून सदर प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत त्यांच्या दिनांक २४.३.२००९ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

३) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती या संस्थेचे उपरोक्त प्रस्ताव प्रत्येक तालुक्यात एक अनुदानित विद्याशाखा/ महाविद्यालय सुरू करण्यासंबधीच्या दिनांक ४.२.२००८ च्या शासन निर्णयानुसार नसून ते कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचे सर्वसाधारण प्रस्ताव म्हणून सादर केले आहेत.

४) प्रश्न उद्भवत नाही.

५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, याठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे, ते .....

. . . .जे-3



APR/ SBT/ ST/ 11:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सदनाची अतिशय दिशाभूल करणारे आहे. कारण याठिकाणी श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने दिलेल्या जाहिरातीनुसार आहे आणि यासंबंधात शासनाने दि.4-2-2008 रोजी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दिला आहे. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, सदरहू प्रस्ताव शासन निर्णयानुसार आणि योग्य वेळेमध्ये दिलेला आहे. परंतु याठिकाणी तिसऱ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती या संस्थेचे उपरोक्त प्रस्ताव प्रत्येक तालुक्यात एक अनुदानित विद्याशाखा/महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीच्या दिनांक 4-2-2008 च्या शासन निर्णयानुसार नसून ते कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचे सर्वसाधारण प्रस्ताव म्हणून सादर केले आहेत."परंतु प्रत्यक्षात या संस्थेने अशी मागणी केलेली नाही. माझ्याकडे याचा पुरावा आहे. श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती या संस्थेने शासनाच्या दि.4-2-2008 च्या शासन निर्णयानुसारच प्रस्ताव पाठविलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, या संस्थेने सादर केलेल्या चार महाविद्यालयांना अनुदान देणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये दोन विषय समाविष्ट आहेत. श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांचा प्रस्ताव संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठामार्फत सादर केलेले आहे. या शिक्षण संस्थेच्या चार महाविद्यालयांमध्ये विज्ञान, विद्याशाखा सुरु करावयाची आहे. यामध्ये एक नवीन कॉलेजच्या संबंधीचा प्रस्ताव आणि दुसरा अनुदानाच्या संबंधीचा प्रस्ताव आहे. याठिकाणी नवीन महाविद्यालय देण्यासंबंधीचा जो प्रस्ताव आहे, त्याबाबतीतील टास्क फोर्सचा रिपोर्ट एक-दोन दिवसामध्ये शासनाला प्राप्त होईल, त्यानंतर पुढील सहा दिवसांमध्ये कोणत्या ठिकाणी किती नवीन महाविद्यालये सुरु करण्यासाठी परवानगी द्यावयाची,त्याबाबत निर्णय होणार आहे.याबाबतीत विद्यापीठाकडून पॉझिटीव्ह रिपोर्ट आलेला आहे.श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती त्या विभागामध्ये चांगले काम करीत आहे याची मला माहिती आहे. यामध्ये नवीन महाविद्यालयासाठी आणि नवीन अनुदानासाठी असे दोन मुद्दे आहेत. यामध्ये नवीन महाविद्यालयाच्या संबंधातील बाब कन्सीडर करु. दुसरा मुद्दा अनुदानाबाबत आहे. ज्या तालुक्यामध्ये आर्टस्, कॉमर्स् आणि सायन्स् या फॅकल्टी नाहीत, तेथे अनुदान देणार आहोत असे धोरण आहे. यासाठी टास्क फोर्स नेमण्यात

. . . .जे-4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आला आहे.डॉ.नेमसे व्हॉईस चान्सलर, स्वामी दयानंद विद्यापीठाचे ते चेअरमन आहेत. त्यांच्या कमिटीकडे सदरहू प्रस्ताव पाठविला आहे. त्यांचा रिपोर्ट आल्यानंतर आपण याबाबतीत निर्णय घेऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना, अत्यंत विषारी अशी प्रादेशिक असमतोलाची वागणूक देणारा असा पहिल्या क्रमांकाचा प्रश्न कोणता आहे, ते काढून दाखविण्यात यावे, त्याला बक्षिस द्यावयाचे आहे असे जर कोणी ठरविले तर या प्रश्नाला सर्वोच्य क्रमांक मिळेल, पहिल्या क्रमांकाचे बक्षीस या प्रश्नाला देता येईल. पुणे जिल्ह्यातील एका तालुक्यात विज्ञान महाविद्यालय नाही म्हणून तेथे एक विज्ञान महाविद्यालय अनुदानावर दिले, ही चांगली गोष्ट झाली आहे. पुढे असे सांगितले आहे की,"ज्या तालुक्यात कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांपैकी कोणतीही एक विद्याशाखा अस्तित्वात नाही अशा विद्याशाखेला पुढील शैक्षणिक वर्षापासून 100 टक्के अनुदानावर परवानगी देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने दिनांक 4 फेब्रुवारी 2008 च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे."ही चांगली गोष्ट आहे. त्यानुसार विद्यापीठाने जाहिरातव्दारे अर्ज मागविले. त्यानुसार जे अर्ज आले, ते अर्ज शिफारस करुन पाठविण्यात आले. पण दुर्दैवाने येथे जे उत्तर देण्यात आले आहे, ते अत्यंत असत्य आणि लबाडीचे आहे. याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती या संस्थेचे उपरोक्त प्रस्ताव प्रत्येक तालुक्यात एक अनुदानित विद्याशाखा/महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीच्या दिनांक 4-2-2008 च्या शासन निर्णयानुसार नसून ते कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचे सर्वसाधारण प्रस्ताव म्हणून सादर केले आहेत."

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50162...

प्रा. बी.टी. देशमुख....

असे असताना अत्यंत असत्य उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. विद्यापीठाने दि.28 डिसेंबर, 2008 रोजी शासनाला प्रस्ताव पाठविला. तो शासनाला मिळाला काय? या प्रश्नाला शासनाने 'होय' असे उत्तर दिलेले आहे. दि.28 डिसेबर 2008 रोजी विद्यापीठाने शासनाला पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत माझ्याकडे आहे त्यामध्ये स्पष्टपणे असे म्हटल् आहे की, "However, the proposals received for starting new colleges in the faculties in the talukas identified by the Government in its G.R. No.NGC 2007/(164/07) Mshi-3, dated 4th February,2008, the Council recommended to Government for that particular talukas and faculty/faculties." सभापती महोदय, लॉर्ड डलहौसिला भारतात किती प्रांत आहेत हे माहीत नव्हते. शासनाला किती तालुक्यामध्ये विज्ञान शाखा नाही हे माहीत नव्हते. त्या विद्यापीठाने असे लक्षात आणून दिले की, आमच्या भागामध्ये आणखी दोन तालुक्याच्या ठिकाणी विज्ञान शाखा नाहीत. तेव्हा त्या ठिकाणीही विज्ञान शाखा देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे, असे कळविले होते. हे प्रस्ताव कोणत्या संस्थेचे आहेत? प्रादेशिक असमतोलाचा इतका दुष्टावा मी कधी पाहिला नाही. शंभर टक्के असत्य उत्तर देण्यात आलेले आहे. याठिकाणी टास्क-फोर्स वगैरेच्या बाबतीत सांगू नका. They are your agents. They are your helpers. They are your representatives. त्यांनी यांची विनाअनुदानासाठी शिफारस केलेली आहे,असा टास्कफोर्सचा निर्णय परवा या ठिकाणी सांगण्यात आलेला आहे. तो मी पुन्हा या ठिकाणी वाचून दाखवू काय? आमच्या गळयावर सुरी चालविण्यात येत आहे. सभापती महोदय, माझ्ा पॉईन्टेड म्हणणे असे आहे की, धोरणत्मक निर्णयाप्रमाणे त्यांनी अनुदानितसाठी अर्ज केलेले आहेत. विद्यापीठाने शिफारस अनुदानितसाठी केलेली आहे आणि ती शंभर टक्के शासनाच्या धोरणाप्रमाणे आहे. यामध्ये काहीही अडचण नाही. कारकुनाच्या भोवती लोक फिरविण्याची सुविधा कायम ठेवणे एवढा एक विषय सोडला तर दुसरी कोणतीही अडचण नाही. म्हणून या चारही बाबतीत उद्या आदेश निर्गमित होतील काय?



11-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K-2

SMT/ ST/ SBT/

श्री. सुरेश शेट्टी :सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, या संस्थेचा नवीन महाविद्यालयाचा प्रस्ताव विद्यापीठाकडे आला आणि विद्यापीठाकडून तो शासनाकडे आलेला आहे. दोन प्रस्ताव आले आहेत. एक प्रस्ताव नवीन महाविद्यालयासाठी आहे आणि दुसरा प्रस्ताव अनुदानितसाठी आहे. अनुदान दिले आणि महाविद्यालयाला परवानगी दिली नाही तर फक्त अनुदान घेऊन काय करणार? पहिली प्रोसेस महाविद्यालय सुरु करण्याची आहे. महाविद्यालय असल्यानंतर अनुदान द्यावयाचे आहे. महाविद्यालय नसेल तर अनुदान कसे करणार?

प्रा.बी.टी.देशमुख :शासनाने यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे त्यासंबंधात विद्यापीठाने शिफारस केलेली आहे...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाविद्यालयाची परवानगी मागितली आहे.

प्रा. बी.टी. देशमुख : विद्यापीठाने दुस-या कोणत्या महाविद्यालयाची शिफारस केली आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 'नाही'. मी याठिकाणी पहिल्यादा उत्तर दिले की, शिवाजी संस्थेचे चार नवीन महाविद्यालयासाठी अर्ज आलेले आहेत. त्याबाबतीतील यादी येत्या चार दिवसात जाहीर करण्यात येणार आहे मग तो प्रश्न मिटेल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संत गाडगे महाराज विद्यापीठाने शासनाच्या धोरणाप्रमाणे अनुदानित महाविद्यालये देण्याच्या संबंधात शासनाकडे जी शिफारस केलेली आहे ती महाविद्यालये कोण-कोणती आहेत आणि तालुके कोण-कोणते आहेत ते सांगावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या सभागृहात सांगू इच्छितो की, याबाबतीत शासनाने टास्कफोर्स नेमला होता. डॉ. नेमसे हे या टास्कफोर्सचे अध्यक्ष आहेत. त्यांचा अहवाल शासनाकडे अद्याप आलेला नाही. तो दहा ते पंधरा दिवसात येणार आहे.तो अहवाल आल्यानंतर टास्क-फोर्सने कोणत्या महाविद्यालयाची शिफारस केली आहे ते सांगता येईल.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50162 ..... श्री. सुरेश शेट्टी ....

त्यामुळे टास्क फोर्सने कोणत्या महाविद्यालयाची शिफारस केली आहे हे आता मी सभागृहात कसे सांगणार ?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी याच ठिकाणी हक्कभंग देईन. टास्कफोर्सचा निर्णय झालेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी टास्क फोर्सची जी माहिती दिली ती लबाडीची आहे. काल या ठिकाणी असे निवेदन केले की, "संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शिवाजी शिक्षण संस्था या संस्थेचे उपरोक्त चारही प्रस्ताव तालुक्यात एक अनुदानित विद्याशाखा महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीच्या 4.2.2008 च्या शासन निर्णयानुसार नसून ते कायम विनाअनुदानित तत्वावर मंजुरी देण्याचे सर्वसाधारण प्रस्ताव म्हणून सादर केले असून सदर प्रस्तावाची छाननी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या टाक्स फोर्स समितीने उपरोक्त प्रस्तावाची कायम विनाअनुदान तत्वावर इतरांबरोबर शिफारस केलेली आहे." याचा मी धिक्कार करतो. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, टास्क फोर्सचा निर्णय व्हावयाचा आहे. म्हणजे सभागृहाला नुसते बनवावयाचे, कारकुनाने लिहून दिले तेवढे वाचावयाचे, हे बरोबर नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, नवीन महाविद्यालय देण्यासाठी आपण एक टास्क फोर्स गठीत केलेला आहे आणि अनुदानासंबंधी शिफारस करण्यासाठी दुसरा टास्क फोर्स आहे. या संस्थेला आपण मदत करणार नाही असे मी कोठेही सांगितलेले नाही. हे मी अगोदरच आपल्याला सांगितले. पण आपण जर असे सांगितले की, सभागृहात कमिटमेंट करा तर ते होणार नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, पुढच्या सहा दिवसात नवीन महाविद्यालयाचा आम्ही निर्णय घेणार आहोत.

प्रा. बी. टी. देशमुख : आपला निषेध करुन आम्ही सभात्याग करु.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा अनुदानासंबंधीचा जो प्रश्न आहे त्यासंदर्भात आपण पाहिजे तर आपल्या दालनात बैठक बोलावली तर आम्ही त्या ठिकाणी येऊन चर्चा करुन आपण प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ SBT/ ST/

ता. प्र. क्र. 50162 .....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी अमरावतीच्या या संस्थेच्या अनुदानित कॉलेजसंबंधीचा जो विषय या ठिकाणी मांडलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, ते ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत आणि त्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती ग्राह्य धरुन त्यासंबंधीचा निर्णय मंगळवारच्या आत आपल्याला अनुकूल असा दिला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी जे एक पत्र वाचून दाखविले ते पटलावर आलेले आहे. विद्यापीठाने ते पत्र शासनाला लिहिलेले आहे. विद्यापीठाची भाषा मराठी आहे. विद्यापीठाला असे आदेश निघालेले आहेत की, सर्व व्यवहार मराठीमध्येच व्हावेत. त्यांच्या पाट्यांपासून, क्लासरुम पासून दप्तरापर्यंत सर्व मराठीत लिहावेत. तसेच कंत्राटदाराला धनादेश द्यावयाचे असतील तर ते सुध्दा मराठीतून लिहावेत असे आदेश असताना हे विद्यापीठ शासनाला इंग्रजी भाषेतून पत्र लिहून मराठीचा अवमान करीत आहे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आपण या ठिकाणी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, शासनाचे धोरण, शासनाने दिलेल्या ज्या सूचना आहेत त्या सूचनांचा विचार करुन विद्यापीठाने शासनाकडे किंवा अन्य ठिकाणी जो पत्रव्यवहार केला त्यामध्ये इंग्रजीचा वापर करणे योग्य नाही. यादृष्टीने आपल्या महाराष्ट्राची जी मातृभाषा आहे त्या मराठी भाषेतच त्यांनी अशा पध्दतीचा पत्रव्यवहार राज्यामध्ये करणे गरजेचे आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदारांना नुकसान भरपाई देणेबाबत**

**(६) * ५३०३० श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या द्राक्ष बागांचे मार्च, २००९ मध्ये अवकाळी पाऊस येऊन गारपीटी झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीची पहाणी शासनाकडून करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त द्राक्ष बागाईतदारांना शासनामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे काय ?

**श्री.विनय कोरे** :(१) १४०१.३५ हेक्टर द्राक्ष पिकाचे क्षेत्र ५० टक्केपेक्षा जास्त नुकसानग्रस्त आहे.

(२) होय

(३) होय

(४) नाशिक जिल्हयामध्ये माहे मार्च, २००९ मध्ये गारपीटीमुळे शेतीपिकाचे नुकसान झालेले आहे. नुकसान क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले असून दिंडोरी, नाशिक, कळवण, निफाड या तालुक्यामधील ५४ गावांमधील १०१.७७ हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष पिकांचे ५०% पेक्षा कमी नुकसान झालेले आहे व १४०१.३५ हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष पिकांचे ५०% पेक्षा जास्त नुकसान झाले आहे.

(५) ५०% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, शासनाने प्रश्नाला उत्तर देत असताना हे मान्य केले की, नाशिक जिल्ह्यामध्ये माहे मार्च, 2009 मध्ये गारपिटीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेले आहे. नुकसान क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले असून दिंडोरी, नाशिक, कळवण, निफाड या तालुक्यातील 54 गावांमधील 101.77 हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष पिकांचे 50 टक्के पेक्षा कमी नुसान झालेले आहे व 1401.35 हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष पिकांचे 50 टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. हा अहवाल मार्च, 2009 मध्ये आपल्याला प्राप्त झाला. शासनाने हे मान्य केले त्याबद्दल स्वागत करतो. परंतु हे कळल्यानंतर आजतागायत त्या शंतकऱ्यांना नुकसानभरपाई दिलेली नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/ MAP/ KGS/ यापूर्वी श्री.बरवड 12:00

ता.प्र.क्र.53030... श्री.अरविंद सावंत...

म्हणून माझा स्पेसिपिक प्रश्न असा आहे की, या आपद्ग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई किती व कधी दिली जाणार आहे ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील द्राक्ष बागायतदारांचे नुकसान झाले हे शासनाने मान्य केले आहे. त्याचा पंचनामा करुन त्यांना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादरही केलेला आहे. केंद्र शासनाच्या एप्रिल महिन्यामध्ये मदतीच्या अनुषंगाने नवीन सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्रामुख्याने त्यांना दिली जाणारी मदत ही रोख न देता निविष्टेच्या स्वरुपात द्यावी अशाप्रकारचे नवे धोरण महाराष्ट्र सरकारकडे आले. महाराष्ट्र शासनाचे मदतीचे जे निकष आहेत त्यानुसार दिली जाणारी मदत अत्यंत कमी आहे. म्हणून मंत्रिमंडळासमोर हा विषय चर्चेला येऊन केंद्र सरकारचे निकष स्वीकारावयाचे का की मदतीची आणखी कोणती योजना आणावयाची अशाप्रकारची चर्चा झाली. यावर विचार करण्यासाठी वा निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळाने उपसमितीची स्थापना केली आहे. या शेतक-यांना जास्तीत जास्त मदत देण्याची शासनाची भूमिका असल्यामुळे मंत्रिमंडळ उपसमितीसमोर हा विषय आणलेला आहे. येणा-या 8-10 दिवसामध्ये उपसमितीमध्ये निर्णय घेऊन ही मदत शेतक-यांना दिली जाईल.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, नाशिक जिल्हयात अवकाळी पावसामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. परंतु सरकारचे धोरण असे आहे की, 50 टक्के किंवा 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले तरत मदत दिली जाते. पण 49 टक्के किंवा 48 टक्के नुकसान झ ाले तर मदत दिली जात नाही. ही टक्केवारी कोणी ठरविली आहे, हे मापदंड कोणी ठरविले आहेत ? या नुकसानीचा पंचनामा तेथील तहसीलदार, कृषी अधिकारी करतात आणि त्याबाबतचा आपला अहवाल देतात. ही जी निकष लावण्याची पध्दत आहे ती बदलली पाहिजे. 1 हेक्टर द्राक्षाची बाग लावण्यासाठी सव्वादोन लाख रुपये खर्च येतो. म्हणून कल्टिवेट कॉस्टचा विचार करुन 75 टक्के नुकसान भरपाई शासन देणार आहे काय ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.53030.....

श्री.विनय कोरे : शासन शेतक-यांना नुकसान भरपाई देत नाही. आपद्ग्रस्त शेतक-यांना मदत देण्याच्या भूमिकेतून शासन ही रक्कम देत असते. सध्या 50 टक्क्याचा शासनाचा निकष आहे. त्याबाबत कृषी विभागाचे अधिकारी, संबंधित गावचे ग्रामसेवक, तलाठी आणि संबंधित शेतकरी यांच्यामार्फत संयुक्त पंचनामा करण्याची पध्दत अवलंबिण्यात येते. महाराष्ट्रामध्ये यासंबंधी कधीही मोठया प्रमाणावर तक्रारी आलेल्या नाहीत. यामध्ये सुधारणा करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी सूचना दिल्या तर त्याबाबत शासन सकारात्मक विचार करील आणि जास्तीत जास्त मदत देण्याचा मंत्रिमंडळ उपसमितीद्वारे निर्णय घेतला जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/ MAP/ KGS/

**<u>सभागृहाच्या कामकाजातील बदलाबाबत</u>**

श्री.राणा जगजितसिंह पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी सन 2009-2010 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात असे निदर्शनास आणून दिले आहे की, पुरवणी मागण्यांची संख्या विचारात घेता, त्यांचे संकलन व भाषांतरासाठी लागणारा अवधी विचारात घेता पुरवणी मागण्या आज दिनांक 11 जून, 2009 ऐवजी उद्या, दिनांक 12 जून, 2009 रोजी सादर करण्यात याव्यात. या प्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. सभागृहाने बदलेल्या कार्यक्रमाला मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव संमत करण्यात आला.

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/ MAP/ KGS/

**शुक्रवार, दिनांक 12 व शनिवार, दिनांक 13 जून,2009 च्या कामकाजात झालेल्या बदलासंबंधी**

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मी सभागृहाच्या पुढील दोन दिवसाच्या कामकाजामध्ये बदल करण्याबाबतचा प्रस्ताव मांडू इच्छितो. त्याला सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो.

**शुक्रवार, दिनांक 12 जून, 2009**

1) शासकीय विधेयके
2) अशासकीय कामकाज (ठराव)
3) महाराष्ट्र विनियोजन विधेयक
4) सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्या सादर करणे

**शनिवार, दिनांक 13 जून, 2009**

1) शासकीय विधेयके
2) सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा ( पहिला दिवस )

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव संमत करण्यात आला.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचा सन 1998-1999, 2000-2001 व 2001-2002चा अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2004-2005 चा सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुरेश जेथलिया (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा विसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा विसावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "महाराष्ट्र शासनाने विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील नगररचना योजना क्रमांक 5, सन 1994 मध्ये मंजूर केली असून भूखंड क्रमांक 108 हा मनोरंजनाचे मैदान म्हणून राखून ठेवण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व भगवान साळुंखे यांनी "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात 150 पाणीपुरवठा योजना असून त्यावर 100 कोटी रुपये खर्च होऊन या योजनांपैकी 50 टक्के योजना बंद पडण्याच्या मार्गावर असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे व अशोक मानकर यांनी "राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील अधिष्ठात्यांना रुपये 50 हजार पर्यंतचे प्रशासकीय अधिकार असून या अधिकारात वाढ होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, नितीन गडकरी, विनोद तावडे व प्रकाश शेंडगे यांनी "जेनापूर, जि. कोल्हापूर येथील अंबाई मागासवर्गीय शेतीमाल प्रक्रिया सहकारी संस्था जिल्हा बँकेस तारण देणे, सदर मालमत्ता शासनास तारण देऊन पाच कोटींची उचल करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "अंबरनाथ येथील भोंदूबाबा अशोक जडेजा यांनी जनतेला पैसे दुप्पट, तिप्पट करुन देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची सुमारे 2 कोटी 42 लाख रुपयांची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो

..4..



**(सभापती....**

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, अरविंद सावंत ॲड. अनिल परब, श्री परशुराम उपरकर व डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यात सुमारे 20 ते 25 हजार पतसंस्था अस्तित्वात असून त्यातील सुरक्षा ठेवीला कुठलेही संरक्षण शासनाने दिले न जाणे, या संस्थांद्वारे कर्जवाटप करण्यात येऊन सदर कर्जाच्या वसुलीकरिता पोलिसांकडून होत असलेला जाच" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी " राज्यातील पोलिसांना कर्तव्यावर वेळेत येता यावे याकरिता पोलीस आयुक्तालय अथवा जिल्हा अधीक्षक परिसरातच घरे देण्यात येणे, तथापि सदर घरे वर्षानुवर्षे नादुरुस्त अवस्थेत असल्यामुळे अशी घरे वापराविना पडून असणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकर, केशवराव मानकर व अशोक मानकर यांनी "मौजे शिरपूर, जि. गोंदिया येथे सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्याकरिता नवीन इमारतीच्या बांधकामासाठी तेथील शेतक-यांची सुपीक जमीन संपादित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 12:10

**पृ. शी.** : चिखलदरा तालुक्यातील लोहाना गावाजवळील नाल्यात फेरस सल्फेट ॲण्ड फॉलीक ॲसिड गोळया आढळून येणे

**मु. शी.** : चिखलदरा तालुक्यातील लोहाना गावाजवळील नाल्यात फेरस सल्फेट ॲण्ड फॉलीक ॲसिड गोळया आढळून येणे याबाबत श्री. अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.शोभा बच्छाव ( आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.अरविंद सावंत यांनी "चिखलदरा तालुक्यातील लोहाना गावाजवळील नाल्यात फेरस सल्फेट ॲण्ड फॉलीक ॲसिड गोळया आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कुपोषित बालक आणि गर्भवती माता यांच्या शरीरात लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठी फेरस सल्फेट ॲण्ड फॉलीक ॲसिड या गोळया देत असतो. आदिवासींच्या आरोग्याशी कसा खेळ मांडला जातो, त्याचे हे एक अत्यंत दाहक उदाहरण आहे. या ठिकाणी जे निवेदन देण्यात आले आहे त्यात कोणती औषधे आणि गोळया दिल्या आहेत, त्याचे बॅचेस नंबर दिले आहेत. मी खास करुन विचारले होते त्यासंदर्भात बॅच क्रमांक 80512 याचा टेस्टरिपोर्ट पाहिल्यानंतर मला धक्काच बसला आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, 18 लाख 72 हजार गोळयांचा पुरवठा उप संचालक, आरोग्य सेवा,नागपूर मंडळ, नागपूर यांना केला होता. 3 लाख 28 हजार गोळया कंपनीने कोणास पुरवठा केला याबाबतची माहिती अवगत नाही. कंपनीने सदर गोळया कोणास दिल्या याची आरोग्य विभागाला माहिती नाही. या निवेदनात असेही म्हटले गेले आहे की, या गोळयांचा पुरवठा अमरावती जिल्हयातील रुग्णालये किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राना करण्यात आला नव्हता. सदर बॅच क्रमांकाच्या गोळयांचा पुरवठा उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांना करण्यात आला होता. या बाबतीत प्रश्न असा आहे की, या ज्या गोळया नाल्यात सापडल्या, त्या गोळया नागपूर उपसंचालकांकडे पाठविण्यात आल्या असतील. या गोळया नाल्यात सापडल्या याबद्दल कोणाला दोषी धरण्यात आले असून त्यांचे विरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे ? 3 लाख 28 हजार गोळयांचा पुरवठा कंपनीने कोणास पुरवठा केला याची माहिती आरोग्य विभागास अवगत नाही. यासंबंधीची माहिती घेऊन ती सदनात सादर करण्यात येईल काय ?

श्रीमती शोभा बच्छाव : सभापती महोदय, मेळघाटातील कुपोषित बालक आणि गर्भवती माता यांच्यातील लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठी फेरस सल्फेट ॲण्ड फॉलीक ॲसिडच्या गोळया दिल्या जातात. 1 लाख 26 हजार 50 एवढया गोळया लोहाना, ता.चिखलदरा येथील एका नाल्यात आढळून आल्या ही वस्तुस्थिती खरी आहे. त्या गोळयांची किंमत 13 हजार 336 रुपये एवढी आहे. सापडलेल्या गोळया हिंदुस्थान लॅटेक्स लिमिटेड या केंद्र शासनाच्या अंगीकृत संस्थेच्या असून त्या औषधाचा बॅच क्रमांक 80512 असा आहे. या बॅचच्या 18 लाख 72 हजार गोळया राज्य शासनाने खरेदी केल्या. त्या गोळया जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांना 18 लाख 17 हजार, सिव्हील सर्जन चंद्रपूर यांना 24 हजार आणि जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना 36 हजार गोळया वितरीत

3...



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा बच्छाव....

करण्यासाठी देण्यात आल्या. जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांनी सदर गोळयांचे वाटप 17 प्राथमिक आरोग्य केंद्रांना केले असून 1 लाख 10 हजार गोळयाचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले आहे. 1 लाख 7 हजार गोळयांचा साठा 30 प्राथमिक आरोग्य केंद्रात शिल्लक आहे आणि त्या गोळयांचे वितरण लाभार्थ्यांना वेळोवळी करण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पुरविण्यात आलेल्या 31 हजार गोळयांचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आलेले असून त्या ठिकाणी या गोळयांचा साठा शिल्लक नाही. जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांना पुरवठा करण्यात आलेल्या 24 हजार गोळया उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. त्या गोळयांचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी प्राथमिक चौकशीमध्ये स्पष्ट केले की, 80512 बॅचच्या गोळया अमरावती जिल्हयात पुरविण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे हिंदुस्थान लॅटेक्स लिमिटेड कंपनीतील बॅच क्रमांक 80512 च्या गोळया 22 लाख गोळया पैकी 18 लाख....(अडथळा)

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही तरी आक्षेप घेतला जातो. त्या सविस्तर उत्तर देत आहेत.

श्रीमती शोभा बच्छाव : 3 लाख 28 हजार गोळया कोणाला विकल्या यासंदर्भातील चौकशी शासन स्तरावरुन सुरु आहे. या चौकशीत जे कोणी दोषी आढळून येतील, त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:15

निवेदन क्रमांक-1....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिले. परंतु सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जे प्रश्न विचारले ते बाजूला ठेवून उत्तर दिले गेले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. यापूर्वी देखील मेळघाटमध्ये औषधांचा साठा दरीत सापडला होता. चिखलदरा तालुक्यातील कोहाना येथे नाल्यामध्ये औषधाचा साठा सापडला आहे. मंत्रीमहोदयांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की, नाल्यात आढळलेल्या गोळया या मुदतबाह्य झालेल्या नव्हत्या. मग या गोळया नाल्यात जाण्याची कारणे काय आहेत? शासनाने हिंदुस्थान लॅटेक्स लिमिटेड या केंद्र सरकारच्या कंपनीकडून गोळया घेतल्या. या कंपनीची डिस्ट्रिब्यूटर ही नागपूरची कर्नाटक अँटिबायोटिक्स ही कंपनी आहे. या कंपनीने यापूर्वी अशा प्रकारच्या मुदतबाह्य गोळ्या पाठविल्याचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. या संदर्भात मी देखील पत्र दिले होते. तरी देखील या कंपनीला ब्लकलिस्ट का करण्यात येत नाही?

डॉ.शोभा बच्छाव : सभापती महोदय, 80512 या बॅचच्या गोळ्यांचे एकूण प्रॉडक्शन 22 लाख असून शासनाने 18.72 लाख गोळ्या खरेदी केल्या आहेत. उर्वरित 3.29 लाख गोळया शिल्लक आहेत. कंपनीने त्या गोळया कोणाला विकल्या याची चौकशी सुरु आहे. 3.28 लाख गोळ्या कोणाला दिल्या याची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल. यामध्ये जे कोणी अधिकारी/कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

""""

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील गट सचिवांनी नोकरी व वेतनाची हमी मिळणेबाबत केलेले आंदोलन

**मु. शी.** : राज्यातील गट सचिवांनी नोकरी व वेतनाची हमी मिळणेबाबत केलेले आंदोलन याबाबत श्री सुरेश जेथलिया,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, श्री.सुरेश जेथलिया यांनी "राज्यातील गट सचिवांनी नोकरी व वेतनाची हमी मिळणेबाबत केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी राज्यातील गट सचिवांना न्याय दिला असल्यामुळे माझे समाधान झाले असून मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

-----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी सिध्दबेट या तीर्थक्षेत्राच्या विकास कामास निधी मंजूर होऊनही सुरुवात न होणे

**मु. शी**. : संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी सिध्दबेट या तीर्थक्षेत्राच्या विकास कामास निधी मंजूर होऊनही सुरुवात न होणे याबाबत श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप वळसे पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी "संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी सिध्दबेट या तीर्थक्षेत्राच्या विकास कामास निधी मंजूर होऊनही सुरुवात न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी वितरित केलेल्या निवेदनामुळे माझे समाधान झाले असून मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

-----

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा लागू करणे

**मु. शी.** : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा लागू करणे याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप वळसे पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा लागू करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग केंद्राप्रमाणे लागू करण्याचा हा प्रश्न आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा उद्या राज्यव्यापी संप आहे. उद्या विधानभवनावर त्यांचा मोर्चा येणार आहे. 1 जून रोजी सुध्दा त्यांनी आंदोलन केले होते. केंद्र शासनाने वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वेतन सुधारणा केल्यानंतर त्या वेतन आयोगाच्या शिफारसी जशाच्या तशा राज्यात लागू करण्याबाबत या शासनाचे कमिटमेंट आहे. 1977 मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचा 54 दिवस संप झाला होता. त्यावेळी शासन निर्णय निर्गमित झाला तो आजही लागू आहे. त्याप्रमाणे केंद्राप्रमाणे निर्णय लागू करावयास पाहिजे. परंतु वेतन आयोगाच्या शिफारशीतील बऱ्याच महत्वाच्या बाबी न लागू करण्याबाबत 22 एप्रिल, 2009 रोजी अधिसूचना काढण्यात आली. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांवर फार मोठा अन्याय होणार आहे. शासनाने जो निर्णय निर्गमित केला आहे त्याची अंमलबजावणी शिक्षकांच्या संदर्भात लागू करण्याविषयी अद्याप शासन निर्णय निघालेला नाही. वित्त विभागाने अधिसूचना काढली त्यानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग जुलै महिन्यापासून लागू होणार आहे.

क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे .......

म्हणून शालेय शिक्षण विभागाने सुध्दा 8 दिवसात काढून त्याची अंमलबजावणी करणार काय ? त्याचप्रमाणे शासनाने काढलेल्या जी.आर. मध्ये ज्या त्रुटी आहेत त्यात महत्वाच्या दोन त्रुटी असून त्यानुसार शासनाने असे म्हटले आहे की, केंद्रशासनाप्रमाणे सुधारित घरभाडे भत्ता आणि वाहतूक भत्त्याच्या संदर्भात आर्थिक परिस्थितीप्रमाणे स्वतंत्ररित्या निर्णय घेतला जाईल असे म्हटले आहे. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, घरभाडे भत्ता आणि वाहन भत्ता यासंबंधीचा निर्णय न घेतल्यामुळे राज्यातील 25 लाख कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला आहे. तो दूर करणार काय ? इतर मागण्यांच्या संदर्भात शासनाने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन ठरवावे परंतु ज्या दोन त्रुटी आहेत त्यांच्यासंबंधी शासन योग्य तो निर्णय घेणार काय ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात शासन पॉझिटिव्ह उत्तर देणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी मुख्यत: दोन प्रश्न विचारले असून त्यांचा पहिला प्रश्न म्हणजे दि. 22.4.2009 रोजी जो शासन निर्णय निर्गमित झाला तो शालेय शिक्षण विभागाला लागू झालेला नाही. तो लागू करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येतील. तसेच दुसरा प्रश्न म्हणजे केंद्राप्रमाणे घरभाडे भत्ता व वाहतूक भत्ता यामध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात त्यांनी विचारलेला आहे. त्याबाबत मी असे स्पष्ट करु इच्छितो की, राज्य मंत्रिमंडळाने हकीम समितीच्या अहवालानुसार सहावा वेतन आयोग स्वीकारलेला आहे. ज्यावेळेस राज्यात पाचवा वेतन आयोग जसाच्या तसा लागू केला होता त्यावेळी राज्याला फार मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागला तरी देखील शासनाने पाचवा वेतन आयोग लागू केला होता. त्याप्रमाणे सहावा वेतन आयोगही शासनाने लागू करण्याचा निर्णय घेतलाच आहे. हा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात मला सभागृहाला असे सांगावयाचे आहे की, सध्याच्या वेतनश्रेणीनुसार या राज्यात एकूण अपेक्षित ग्रेड वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वाहतूक भत्ता वगैरेच्या संदर्भात शासनाने मान्यता दिली. केंद्रशासनाने वेतन आणि निवृत्ती वेतन जे लागू केले ते स्वीकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आणि त्यानुसार 1 जानेवारी, 2006 ते 31 मार्च, 2009 पर्यंतची थकबाकी देण्याचे शासनाने मान्य केले. ही रक्कम केंद्रशासनाने रोखीने दोन हप्त्यात दिली असून आपण त्याऐवजी पाच समान हप्त्यात जीपीएफ मध्ये जमा करण्याची भूमिका घेतली. त्यानुसार आपल्या राज्यातील

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

कर्मचाऱ्यांचे पगार व निवृत्तीवेतनावरील अपेक्षित खर्च रु.42,298 कोटीच्या आसपपास होणार आहे. त्यात आपण दोन गोष्टी ज्या डिफर केलेल्या आहेत त्यामध्ये वाहतूक आणि घरभाडे भत्ता अंतर्भुत आहे, तो आपण स्वीकारलेला नाही. त्यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर पुन्हा जाऊन पुनर्विचार करावा लागेल आणि आर्थिक स्थितीनुसार शासन त्याचा विचार करील अशी भूमिका शासनाने घेतलेली आहे. थकबाकीची जी रक्कम आहे ती सुध्दा दोन हप्त्यात देण्याबाबतची कर्मचाऱ्यांची मागणी आहे परंतु ती पाच समान हप्त्यात देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात ज्या त्रुटी असतील त्या दूर करण्यात येतील. परंतु घरभाडे भत्ता आणि वाहन भत्त्याच्या संदर्भात पुन्हा मंत्रिमंडळासमोर जावे लागणार आहे व त्याबाबतचा निर्णय राज्याची आर्थिक स्थिती पाहून घ्यावा लागेल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिले ते मोघम स्वरुपाचे असल्याने शिक्षकांवर दुहेरी अन्याय करणारे आहे. परवा शासनाने जो 6 टक्के महागाई भत्त्यासंबंधीचा जी.आर. काढला त्यात लिहिले आहे की, नवीन पे बँड आणि ग्रेड पे आहे त्यावरच हा 22 टक्के महागाई भत्ता वाढविलेला आहे, वाढीव महागाई भत्ता जुन्याच वेतनश्रेणीवर मिळणार आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले परंतु तसा जी.आर. मात्र अद्याप निघत नाही. अर्थात जो रिपोर्ट आहे त्यात अनेक दोष आहेत, त्याची चर्चा आपण करीत नाही, हकीम समितीची चर्चा करीत नाही. माझे म्हणणे आहे की, मंत्री महोदयांनी दि. 4.2.2009 च्या बैठकीत निर्णय घेतला ....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

सभापती महोदय, सिव्हील सर्व्हीसेस रुल्स तुम्ही प्रसिध्द केलेले आहेत. शासकीय कर्मचा-यांना सुध्दा आपण दोन बाबी लागू केलेल्या नाहीत परंतु यासंदर्भात नंतर विचार करण्यात येईल असे आपण आता सांगत आहात त्यामुळे यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शिक्षकांच्या संदर्भातील जी.आर. न निघाल्यामुळे शिक्षकांना या पुढे वाढीव महागाई भत्ता मिळणार नाही. कारण तो सुधारित संरचनेवरच मिळतो, पे बँड व ग्रेड पे वर मिळतो. खरे म्हणजे शिक्षकांना त्रुटी समिती लागू पडत नाही. त्रुटी समिती समोर जायचे की, न जावयाचे हे त्यांची संघटना ठरवेल. अशा प्रकारचा मोठा अन्याय त्यांच्यावर झालेला आहे त्यामुळे यासंदर्भातील निर्णय ते करतील. आता माझ ो म्हणणे असे आहे की, शिक्षकांच्या बाबतीतील मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतलेला आहे तो दोष पूर्ण आहे. त्या बाबतीतील शासन निर्णय दोन चार दिवसात काढला जाईल काय ? तो किती दिवसात निघेल? शासन निर्णय काढण्याच्या संदर्भात आपल्याला जर अडचणी असतील तर त्या आपण सांगाव्यात.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, याबाबतचा जी.आर. 8 दिवसात काढण्याच्या संदर्भातील सूचना देण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्याचे स्वागत करतो. परंतु शिक्षकांच्या बाबतीतील जी.आर. उशिरा काढला जात असल्यामुळे त्याची अंमलबजावणी उशिरा होते व परिणामी शिक्षकांना त्याचे नुकसान सोसावे लागते. यापुढच्या काळात शिक्षकांच्या संदर्भातील जी.आर. एकाच वेळी काढण्यात येईल व त्याची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने केली जाणार आहे काय ? तसेच पे बँड आणि ग्रेड पे यामध्ये शिक्षकांचे खिसे कापले गेले आहेत हे तुम्ही मान्य केलेले आहे व यासंदर्भात लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "शिक्षकांची पदे महाराष्ट्रात जास्त असल्यामुळे आम्ही त्यांना हा निर्णय लागू करीत नाही." अशा प्रकारचे बेजबाबदार उत्तर देण्यात आलेले आहे. शासनाने समानीकरणाचे तत्व स्वीकारलेले आहे तर मग आपण शिक्षकांच्या संदर्भात अन्याय का करता ? त्यामुळे यासंदर्भातील फेरविचार आपण ताबडतोब करणार आहात काय ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, केंद्रसरकारने वेतन आयोग लागू केल्यानंतर राज्य कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात हकीम समिती नेमली होती व त्या समितीने जो अहवाल राज्यशासनाला दिलेला आहे तो अहवाल राज्य सरकारने जशाच्या तसा स्वीकारला. हकीम समितीने विचार करुन काही वेतनश्रेणीमध्ये बदल करावयाचा निर्णय घेतला आणि तो निर्णय मंत्रिमंडळाने मान्य केला. त्यामुळे मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयामध्ये आता दुरुस्ती करणे शक्य होणार नाही.

( एकाचवेळी काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. कपिल पाटील : शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर तो लागू झाला पाहिजे. पुन्हा हकीम समितीला मध्ये घालून शिक्षकांवर अन्याय करणे हे काही बरोबर नाही. 6 टक्क्याचा जी.आर. काढावयास शासन फार विलंब लावत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील मी आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय,राज्यशासनाने जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे त्याच्या विरोधात हकीम समितीने शिफारसी केलेल्या आहेत. धोरणात्मक निर्णय काय आहे? "राज्यस्तरावर वेतन आयोग नेमला जाणार नाही, केंद्रीय आयोगाच्या शिफारसीवर केंद्रशासनाचे जे काही निर्णय होतील त्यानुसार समतुल्य पदांना महाराष्ट्रात अंमलबजावणी केली जाईल, वेतन निश्चितीचा फॉर्म्यूला देखील तोच असेल" अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासनाने डिसेंबर, 1977 मध्ये घेतला होता. सुकथनकर समितीचा आपण जो उल्लेख करीत आहात त्या सुकथनकर समितीचा निर्णय त्यावेळेला मंत्रिमंडळाने पायदळी तुडवला होता, फेटाळून लावला होता कारण तो निर्णय धोरणात्मक निर्णयाच्या विरुध्द होता म्हणून. परंतु त्या समितीची कार्बन कॉपी हकीम समितीने काढलेली आहे. 1998 सुकथनकर समितीचा निर्णय मंत्रिमंडळाने फेटाळून लावला आणि सांगितले की, आमच्या शिक्षकांना केंद्राने जे काही दिलेले आहे ते आम्ही देऊ. परंतु आता हकीम समितीने सुकथनकर समितीची पुनरावृत्ती केलेली आहे. हकीम समितीने जे ऑर्ग्युमेंट केलेले आहे ते आर्ग्युमेंट हकीम समितीचे ओरीजनल नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

आपण त्या संघटनांशी स्वतंत्रपणे चर्चा करावी व तुमच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे निर्णय घ्यावा आणि या बाबतीत दुरुस्ती करावी. हकीम समितीने पे बँड आणि ग्रेड पे च्या बाबत सर्व स्तरावरील शिक्षकांचे वेतन कापून काढलेले आहे. हे सारे ऑर्ग्युमेंट सुकथनकर समितीने दिले होते त्यामुळे संपूर्ण राज्यात सुकथनकर समितीच्या अहवालाची होळी करण्यात आली होती व शासनाने सुकथनकर समितीचा अहवाल स्वीकारला नाही. त्यामुळे यासंदर्भातील पुनर्विचार आपण करणार आहात काय ?

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या सर्व संबंधित संघटनांशी मी स्वत: चर्चा करुन त्यांचे म्हणणे ऐकून घेईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे शिक्षकांच्या पगारामध्ये जास्तीत जास्त आणि कमीत कमी किती वाढ झाली? घरभाडे भत्ता आणि वाहन भत्ता वगळता त्यांना कमीत कमी किती आणि जास्तीत जास्त किती पगार मिळणार आहे? त्याचवेळी माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे उद्या या संदर्भात एक मोर्चा निघणार आहे. दै. नवाकाळच्या आजच्या अंकामध्ये "सरकार चारसोबीसगिरी करीत आहे" असे छापून आले आहे. त्यामुळे नक्की कोण चारसोबीसगिरी करीत आहे? हा मोर्चा नक्की कशासाठी निघणार आहे?

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे (बसून बोलतात) : तसेच, आय.ए.एस. अधिकाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झाला आहे की नाही हे देखील आपण सांगा.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे शासनाने यामध्ये कोठल्याही प्रकारची चारसोबीसगिरी करण्याचे कारण नाही. वर्तमानपत्रांना त्यांच्या मर्जीप्रमाणे लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे. आपण त्यांचा आदर करु या. एखाद वेळी ते या बाजूने लिहितात तर एखादवेळी ते त्या बाजूने लिहितात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक भूमिकेवर कॉमेंट करणे शक्य नाही आणि ते करु नये. राज्य सरकारने वहातूक भत्ता आणि महागाई भत्ता देण्यासंदर्भातील निर्णय डीफर केला म्हणून उद्या मार्चा येत आहे. आपण पाहिले आहे की, एका बाजूला अर्थसंकल्पावर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्यांनी नॉन प्लॅन एक्सपेंडीचर वाढत चालला आहे, इन्फ्रास्ट्रक्चरवर कमी पैसे खर्च होत आहेत, 40 टक्क्याच्या खाली इन्फ्रास्ट्रक्चरवर खर्च होत आह असे सांगितले आहे. यामुळे राज्याचे उत्पन्न कमी झाल्यामुळे राज्य अडचणीत आहे. राज्याची आर्थिक स्थिती नसतांना मागील वेळी अंतरीम अर्थसंकल्प सादर करतांना मोठया तुटीचा अर्थसंकल्प सादर करावा लागेल असेमी म्हटले होते. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षांचे सदस्य काल सभागृहामध्ये नव्हते. 1977 मध्ये आपल्या पक्षाचे आऊटगोईंग सरकार होते. त्यावेळी माननीय अर्थमंत्री श्री. महादेवराव शिवणकर यांनी केलेले अर्थसंकल्पाचे भाषण आपण पाहिले तर त्यावेळी देखील राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला होता. आणि तो करीत असतांना अर्थसंकल्पामध्ये 6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

श्री. दिलीप वळसे पाटील

हजार कोटीपेक्षा जास्त महसूली तूट होती. आणि आज सुध्दा आपल्याला महसूली तूटीमध्ये हे अंदाजपत्रक सादर करावे लागत आहे. सन 2009-10 मध्ये वेतन आणि महागाई भत्ता या विद्यमान वेतनश्रेणी नुसार अपेक्षित खर्च 24 हजार 992 कोटी वरुन 30 हजार 213 कोटीवर जाणार आहे. म्हणजे 5221 कोटी खर्च वाढणार आहे. घरभाडे भत्ता, वहातूक भत्ता याकरिता आता 2 हजार 838 कोटी रुपये इतका खर्च आहे, तो 7221 कोटीवर जाणार आहे. म्हणजे 4383 कोटी रुपये खर्च वाढणार आहे. निवृत्तीवेतन व अनुषंगिक लाभ देण्यासंदर्भात आता 5928 कोटी खर्च आहे. तो खर्च 8247 कोटीपर्यंत वाढणार आहे. म्हणजे 33 हजार 758 कोटीवरुन 45 हजार 661 कोटी पर्यंत खर्च वाढणार आहे. म्हणजेच या बाबीवर 11 हजार 923 कोटी रुपये अतिरिक्त खर्च  वाढणार आहे. थकबाकीवरील 20 हजार 511 कोटी इतका खर्च लक्षात घेतला तर एकूण 32 हजार 344 कोटी रुपयांवर खर्च वाढणार आहे. राज्यातील बाकीच्या प्रॉयॉरिटीज लक्षात घेऊन राज्य सरकारने 1977 मध्ये निर्णय घेतला त्यावेळी माननीय श्री. शरद पवार साहेब हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी केंद्र सरकारने एकदा श्रेणी लागू केल्यानंतर ती श्रेणी राज्यामध्ये लागू करण्याच्या मागणीकरिता राज्यातील सरकारी कर्मचारी आंदोलन करावयास लागले होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

आता त्या परिस्थितीत केंद्र शासनाच्या बरोबरीने राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना आम्ही वेतनश्रेणी देऊ ही भूमिका त्या काळामध्ये सरकारने घेतली आणि ती बरोबर आहे आणि ती भूमिका पाळली. आता ती भूमिका उद्याच्या काळामध्ये म्हणजे आता आपण 1977-78 पासून 2009 पर्यंत पोहोचलो आहोत. आता आपल्या प्रॅायॅरिटीज्, बाकीच्या गरजा, आपले विचार आणि बाकीच्या सगळया गोष्टी बदललेल्या आहेत. त्यामुळे शेवटी जे लोकनियुक्त सरकार असते, त्या सरकारला,कॅबिनेटला टाईम टू टाईम घेतलेले निर्णय रिव्ह्यु करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे हे अधिकार आहेतच. तरी सुध्दा आज अशा प्रकारचा कोणताही बदल न करता, आपण यासंदर्भात हकीम समिती नेमली त्या समितीने जी शिफारस केली आहे, त्यामध्ये राज्य सरकारने शिफारस केली आणि आज राज्य सरकारवर मोठे बर्डन आलेले आहे.हे बर्डन सहन करीत असताना, शेवटी सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार हे ठराविक तारखेला दिले गेले पाहिजेत. जर ठराविक तारखेला पगार दिले नाहीत तर त्यातून एक नवीन प्रश्न निर्माण होतील. म्हणून यामध्ये केंद्र शासनाने सुध्दा राज्य शासनाला मदत केली पाहिजे अशा प्रकारची भूमिका आम्ही केंद्र शासनाकडे मांडलेली आहे आणि मला असे वाटते की, यामध्ये राज्य शासनाला जे-जे करणे शक्य होते, तेवढे करण्याचा यामध्ये प्रयत्न केलेला आहे.

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, सहावा वेतन आयोग लागू करीत असताना, शिक्षकांचे जेवढे संवर्ग आहेत म्हणजे अनुदानित शाळांमधील, अशंत: अनुदानित शाळांमधील, कायम विना अनुदानित शाळामधील, विना अनुदानित शाळांमधील, माध्यमिक शाळांमधील वगैरे, या शाळांमधील सर्व संवर्गांचा पाचव्या वेतन आयोगाच्या संबंधातील जी.आर.मध्ये उल्लेख नसल्यामुळे महाराष्ट्रातील 25 टक्के शिक्षकांना पाचवा वेतन आयोग मिळू शकला नव्हता. आता तशी त्रुटी राहणार नाही यासाठी सचिवालयामार्फत काही भूमिका घेतली जाणार आहे काय ? असा प्रश्न आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, जेथे-जेथे त्रुटी राहिलेल्या आहेत, त्या दूर करण्यासाठी वेतन त्रुटी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यामुळे ज्या-ज्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील तर त्यांनी आपला प्रश्न वेतन त्रुटी समिती समोर मांडून सोडवून घ्यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,आपण विषय मांडण्याची परवानगी द्यावी अशी विनंती

. . . .टी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. कारण तो या सदनाशी संबंधित आहे. माननीय अर्थमंत्री सदनातून निघून गेल्यानंतर याचे उत्तर मिळणार नाही. हा स्थानिक विकास निधीच्या संदर्भातील विषय आहे. विधानसभेतील सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहे. त्यामुळे त्यांना ठराविक प्रमाणात स्थानिक विकास निधी देण्यात येणार आहे.पण विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत हा मुद्दा नसल्यामुळे, आम्हाला स्थानिक विकास निधी जसा दरवर्षी मिळतो, त्याप्रमाणे उपलब्ध झाला पाहिजे अशा प्रकारची आमची आपल्या माध्यमातून माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे. जर यासंबंधात त्यांनी येथे घोषणा केली तर तो निधी आम्हाला उपयोगात आणता येईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझा याबाबत तात्विक हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये माझी चूक नसताना सुध्दा दिलगिरी व्यक्त करुन मी याठिकाणी विरोधी पक्षाला विनंती केली की, आपण अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये सहभागी व्हावे. तुम्ही तुमच्या भाषणामधून सूचना करा, तुम्ही मार्गदर्शन करा म्हणजे माझ्यासारख्या नवीन माणसाला शिकावयास मिळेल. तरी सुध्दा विरोधी पक्षाने सभात्याग केला आणि चर्चेमध्ये भाग घेतला नाही. मला असे वाटले की, ठीक आहे, अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळेस सभात्याग केला आहे, पण निदान माझे उत्तर ऐकण्यासाठी तरी सभागृहामध्ये उपस्थित राहतील. परंतु माझ्या उत्तराच्या वेळी देखील तसेच झाले. आता या परिस्थितीमध्ये एक तात्विक भूमिका म्हणून अशा प्रकारे निधी वाढवून मागणे हे योग्य आहे काय ? किंवा तो कन्टीन्यू करण्याची मागणी करणे हे तरी योग्य आहे काय ?

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी काल विधानसभेमध्ये जाहीर केले की, जरी विधानसभेची निवडणूक असली तरी सुध्दा दोन क्वॉटरचे पैसे न देता, पूर्ण एक कोटी रुपयांचा निधी आमदारांना दिली जाईल. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, तशाच प्रकारचा माझाही प्रश्न आहे की, विधान परिषदेतील ज्या सन्माननीय सदस्यांची मुदत या वर्षामध्ये संपत असेल, त्यांना सुध्दा पूर्णपणे एक कोटी रुपये रक्कम मिळेल काय ?

(उत्तर नाही)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण संरक्षण द्यावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, नियम 93 अन्वये जी सूचना दिलेली आहे, त्याच्याशी संबंधित हा विषय नाही.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय, विधानसभेत एखादा निर्णय काही विशिष्ट कारणाकरिता घेतो. यावेळी ऑक्टोबर नंतर विधानसभेतील सन्माननीय सदस्यांची मुदत संपणार आहे, ते ठीक आहे. त्याचपध्दतीने विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्य सुध्दा या राज्याचे लोकप्रतीनिधी आहेत. विधानसभेच्या निर्णयाच्या अनुषंगाने विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांना जो फंड मिळतो त्यामध्ये सुध्दा योग्य पध्दतीची वाढ या वर्षीच्या विशिष्ट कारणाकरिता होणे गरजेचे आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या सदनातील सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा शासन नक्की आदर करील.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : माथाडी कामगारांचे भविष्य निर्वाह निधीचे कोटयावधी रुपये अडकून पडणे.

**मु. शी.** : माथाडी कामगारांचे भविष्य निर्वाह निधीचे कोटयावधी रुपये अडकून पडणे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नवाब मलिक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री प्रकाश शेंडगे,पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी माथाडी कामगारांचे भविष्य निर्वाह निधीचे कोटयावधी रुपये अडकून पडणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा आणि गंभीर विषय आहे.या राज्यामध्ये गरीब आणि कष्टकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी कायदे केले त्यामध्ये वेगवेगळया तरतुदी केल्या. अशाच प्रकारचा कायदा माथाडी कामगारांसाठी करण्यात आलेला आहे. 1991-92 मध्ये माथाडी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचे आणि ग्रॅच्युईटी फंडाचे पैसे या महामंडळाच्या माध्यमातून विविध बँकांमध्ये ठेवण्यासंबंधी शासनाकडून वेळोवेळी आदेश निर्गमित केले होते. सभापती महोदय, शासनाने ज्या बँकामध्ये भविष्य निर्वाह निधीचे पैसे ठेवावयास सांगितले होते त्या बँकामध्ये हे पैसे ठेवले गेले नाहीत. त्यमुळे जवळपास बारा कोटी रुपये आणि या बरा कोटी रुपयांचे व्याजासहीत आता 50 ते 60 कोटी रुपये होतील हे पैसे बुडालेले आहेत त्यापैकी या माथाडी कामगारांमध्ये, मुंबई भाजीपाला व बाजार कामगार मंडळाचे दोन कोटी रुपये. खोका मेकिग टिंबर मार्केट लेबर बोर्ड 61 लाख रुपये, किराणा बाजार व दुकाने मंडळ 85 लाख रुपये, कापड बाजार कामगार मंडळ,18 लाख रुपये. धातू व कागद बाजार मंडळ 1 कोटी 22 लाख, कापूस बाजार मंडळ, 1 कोटी 68 लाख. लोखंड पोलाद मंडळ 1 कोटी 65 लाख व सुरक्षा मंडळाचे 4 कोटी 1 लाख रुपये असे एकूण 12 कोटी रुपयाचा भविष्य निर्वाह निधी विविध राष्ट्रीयकृत बँकांमध्ये टाकण्याचे आपण आदेश दिले होते. ते पैसे त्या बँकामध्ये टाकण्यात आले नाहीत. तेथील अध्यक्ष, सचिवांनी शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने बुडीत बँकामध्ये हे पैसे ठेवले आणि या माथडी कामगाराचा कोटयावधी रुपयाचा भविष्यनिर्वाह निधीचा आणि ग्रॅच्युईटीचा फाड बुडीत खात्यात गेलेला आहे.माथाडी कामगारांचे ओझे उचलण्यामध्ये आयुष्य जाते. अशा पध्दतीने सेवानिवृत्तीच्या काळात त्यांचा भविष्यनिर्वाह निधी मिळत नसेल तर त्यांच्यावर अन्याय होणार आहे.

**उपसभापती** : विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात सगळेच प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे या निवेदनावर एकच प्रश्न होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अत्यंत गंभीर आणि महत्वाचा प्रश्न आहे.मुंबईच्या माथाडी कामगारांचा प्रश्न आहे आपण आम्हाला संरक्षण द्यावे. या कामगारांचे 12 कोटी रुपये बुडालले आहेत. या राज्याने पुरोगामित्वाचा वसा घेतलेला आहे. 1100 कोटी रुपये महामंडळाचे कर्ज माफ केलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी थोडयावेळापूर्वीच सांगितले की,सहावा वेतन

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर...

आयोग लागू केल्यामुळे शिक्षकांचे पगार 42000 हजार कोटी रुपयाने वाढले आहेत. बँका बुडालेल्या आहेत. त्यामध्ये या माथाडी कामारांचे 12 कोटी रुपये बुडालेले आहेत.माथाडी कामगांराचे हे पैसे देण्यासाठी विशेष तरतूद करुन या माथाडी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीचे पैसे महाराष्ट्र शासन देणार आहे काय?

श्री. नवाब मलिक :सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निदेश देऊनही या अध्यक्षांनी राष्ट्रीयकृत बँकेत पैसे ठेवले नसल्यामुळे त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई झाली. त्यांना निलंबित करण्यात आले. ही रीतसर कारवाई झाल्यानंतर हायकोर्टामध्ये अपील करण्यात आले. हायकोर्टाने ते अपील फेटाळले आणि हा सगळा प्रकार घडलेला आहे. तरी या कामगारांचे दहा कोटी रुपयापेक्षा जास्त पैसे विविध बँकामध्ये बुडालेले आहेत हे खरे आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक ....

काही बँकांच्या विरोधात आपण डिक्री घेतलेली आहे. दादर जनता सहकारी बँक वन टाईम सेटलमेंटसाठी तयार आहे. हे सगळे पैसे बुडित असताना प्रत्यक्ष कामगारांचे देणे खुंटलेले नाही तरी वन टाईम सेटलमेंट आणि डिक्री हे सगळी कारवाई करुन उरलेले जे पैसे असतील, जसे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब यांनी सांगितले की, शासनाने ते पैसे दिले पाहिजेत. त्या अंतर्गत निश्चितपणे....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण झाले नसताना सन्माननीय सदस्य हरकत घेत आहेत. माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. वन टाईम सेटलमेंट डिपॉझीटवर करता येत नाही. वन टाईम सेटलीमेंट लोनवर करता येते. हे आपले डिपॉझीट आहे.

श्री. नवाब मलिक : आम्ही करतो असे मी सांगितलेले नाही. त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : तो प्रस्तावच होऊ शकत नाही.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, मी माहिती देऊ इच्छितो की, हा जो प्रस्ताव आलेला आहे तो आम्ही स्वीकृत केलेला नाही. त्यांनी 87 टक्के देण्याची आमची तयारी आहे असा प्रस्ताव दिलेला आहे. पण तो प्रस्ताव आम्ही स्वीकृत केलेला नाही. निश्चितपणे माथाडी कामगारांचे जे पैसे बुडीत झालेले आहेत ते पैसे वसूल करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करीत आहे. एक कालबध्द कार्यक्रम तयार करुन म्हणजे सहा महिन्यांच्या आत हे पैसे वसूल झाले पाहिजे. वसूल झाले नाही तर शासनामार्फत याची भरपाई करावी अशी मागणी असेल तर त्यावर शासन सहानुभूतीपूर्वक विचार करील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शिक्षा दिलेल्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात शासनाने अपील केलेले नाही. दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, हे जे लुटमार करणारे अधिकारी आहेत त्यांना शिक्षा दिली. ती शिक्षा प्राधिकरणाने रद्द केली. शासन हायकोर्टात गेले. शासन सुप्रीम कोर्टात का गेले नाही ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, हे जे अधिकारी होते त्यांना निलंबित करण्यात आले. त्यांना शिक्षा देण्यात आली. ती शिक्षा दिल्यानंतर ते अधिकारी मॅटमध्ये गेले. मॅटने ती शिक्षा रद्द केली. त्याच्या विरोधात शासन हायकोर्टात गेले.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे मॅटचे प्रकरण फार झाले आहे. हे मॅट काय आहे ? भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी मॅट आहे काय ? मॅट बंद करा.

श्री. नवाब मलिक : हायकोर्टाने शासनाचे अपील रद्द केल्यामुळे ते अधिकारी पुन्हा कामावर आले आणि हा सगळा प्रकार..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मॅट रद्द करावा. मॅटमध्ये भ्रष्टाचार चालू आहे.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. 1995 साली त्यांचे निलंबन झाले. 1996 साली युतीचे शासन असताना यांनी त्यांना कामावर रुजू करुन घेतले.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एखाद्या अधिकाऱ्यावर कारवाई केली, एखाद्याची बदली केली, एखादे काही झाले की, आम्ही नंतर असे वाचतो की, जो भ्रष्टाचार करतो तो मॅटकडे जातो आणि मॅट स्थगिती देते. मॅटवर कोणते अधिकारी आहेत ? निवृत्त झालेल्या आय.ए.एस. अधिकाऱ्याला त्या ठिकाणी शासनाकडून नेमले जाते असे मी ऐकले आहे, मला नक्की माहीत नाही. ते जुमानत नाहीत. हे काय चालले आहे ? म्हणजे भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी मॅट निर्माण झाले आहे काय ? बदली केली असेल तर सरकारचा बदली करण्याचा अधिकारी आहे की नाही ? मग त्या ठिकाणी सरकारी अधिकारी असताना आपण केलेली बदली योग्य आहे असे शासन दाखवत नाही काय ? प्रत्येक ठिकाणी असे घडत चालले आहे. कधी पहावे तर असेच वाचावयास मिळते की, अमूक केले त्याला मॅटने संरक्षण दिले. मॅट हे संरक्षण देण्याकरिता निर्माण केलेले कवच आहे काय ? मॅट रद्द करा.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. मधुकर चव्हाण : मॅट रद्द करा. मॅटबद्दल आमचे म्हणणे ऐकून घ्यावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय गृह राज्यमंत्री श्री. राऊत साहेब यांना सांगू इच्छितो की, मी काल अशाच एका प्रश्नावर मॅटच्या संदर्भात बोललो होतो. ते माझे कालचे भाष्य होते. आज या ठिकाणी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. नवाब मलिक साहेब नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात उत्तर देत असताना यासंदर्भात तसाच प्रश्न निर्माण झालेला आहे की, मॅट ही संस्था नेमकी काय आहे ? हा एक महत्वाचा भाग आहे. शेवटी राज्याचे प्रशासन शासन चालविणार आहे की, मॅट चालविणार आहे हा महत्वाचा प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मॅट हे अशासाठी आहे की, एखाद्या अधिकाऱ्यावर आकसाने जर कोणतीही कारवाई झाली, अन्यायकारक कारवाई झाली, पूर्वग्रहदुषितपणाने कारवाई झाली, किंवा चूक नसताना एखादा सूड घेण्यासाठी कारवाई झाली

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ यापूर्वी श्री.बरवड 12:50

श्री.मधुकर चव्हाण....

तर त्या व्यक्तीला न्याय मिळण्यासाठी मॅट आहे. परंतु भ्रष्टाचारी अधिका-याविरुध्द शासनाने कारवाई केली असेल तर त्यांना संरक्षण देण्यासाठी मॅटची निर्मिती केलेली नाही. या अधिका-यांनी माथाडी कामगारांचे 10 कोटी रुपये बुडविले नाहीत या निष्कर्षाप्रत मॅट आले आहे काय, त्यांची शिक्षा रद्द करताना कोणत्या निष्कर्षाच्या आधारावर त्यांनी निर्णय घेतला आहे. त्या अधिका-याची त्यामध्ये चूक नाही असा मॅटचा निष्कर्ष आहे काय हे मॅटला विचारले पाहिजे. मॅट ही संस्था अन्याय करण्यासाठी नाही तर न्याय देण्यासाठी निर्माण केली आहे. अनेक वेळा असे लक्षात येत आहे की, भ्रष्टाचारी अधिका-याची बदली केली तर तो अधिकारी मॅटमध्ये जातो आणि बदलीच्या ऑर्डरला स्टे मिळवितो. म्हणून मॅटची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. माथाडी कामगारांचे त्यांनी पैसे खाल्ले नाहीत असे मॅटचे निष्कर्ष आहेत काय ?

श्री.नवाब मलिक : त्या अधिका-यांना शासनाने शिक्षा निश्चित केली होती. त्या शिक्षेविरुध्द त्यांनी मॅटमध्ये अपील केले होते. मॅटने त्यांची शिक्षा रद्द केली आहे. त्यानंतर मॅटच्या निर्णयाविरुध्द शासनाने हायकोर्टात अपील केले होते, परंतु हायकोर्टाने दिनांक 2.5.2006 रोजी शासनाचे अपील फेटाळलेले आहे. (अडथळा)

श्री.दिवाकर रावते : या अधिका-यांनी माथाडी कामगारांच्या 10 कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. याबाबत मॅटची भूमिका काय आहे ते विचारले आहे. मॅट म्हणजे कोण आहे ?

श्री.नवाब मलिक : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. मॅट ही संस्था कायद्याद्वारे स्थापित करण्यात आलेली आहे. ही संस्था म्हणजे क्वॉसी ज्युडिशिअल ॲथोरिटी आहे. त्या संस्थेला रद्द करावयाचे असेल तर त्याबाबत असलेला कायदा तपासून पहावा लागेल, ही बाब शासनाच्या अधिकारात आहे की नाही हे तपासल्याशिवाय येथे बोलता येत नाही.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारला की, या केसमध्ये मॅटने काय निष्कर्ष काढला आहे, त्या अधिका-यांना कोणत्या निष्कर्षाच्या आधारावर निर्दोष ठरविले आहे.

2...

11-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक : शासनाने त्यांची वेतनवाढ थांबविण्याची व अन्य शिक्षा दिली होती. ती सर्व शिक्षा मॅटने रद्द केली आहे. ही शिक्षा योग्य नाही असा त्यांनी निकाल दिला आहे.

श्री.दिवाकर रावते : अशाप्रकारे एखादी संस्था शासनाच्या निर्णयाविरुध्द निर्णय देत असेल तर सरकार कसे चालणार ? त्यांनी कशाच्या आधारे त्यांना निर्दोष ठरविले ते सभागृहाला सामजले पाहिजे. माथाडी कामगारांचे 10 कोटी रुपये खाणा-या अधिका-यांना तेथे संरक्षण दिले जाते म्हणजे या राज्यात काय चालले आहे ?

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, लोकशाही चालवित असताना जसे विधिमंडळाचे अधिकार आहेत तसेच न्यायालयाचेही अधिकार आहेत. न्यायालय आदेश का देतात, कसे देतात यावर शासनाला टिप्पणी करता येत नाही. शासनाला न्यायालयाचा एखादा निर्णय मान्य नसेल तर त्याच्या विरोधात वरच्या न्यायालयात अपील करता येते. त्याप्रमाणे मॅटच्या निकालाविरुध्द शासनाने उच्च न्यायालयात अपील केलेले होते. परंतु उच्च न्यायालयाने अपील फेटाळलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आम्हाला न्यायालयाच्या गप्पा सांगू नयेत. न्यायालयामध्ये एखादा गुन्हेगार दोषी ठरला तर वरचे न्यायालय त्याला निर्दोष ठरविते. हा न्यायालयाचा अधिकार आहे. पण दोषी ठरविणा-या न्यायाधीशांनी चुकीच्या मार्गाने त्याला दोषी ठरविले असेल तर त्या न्यायधीशांवर काही कारवाई करावयाची नाही ? म्हणजे न्यायाधीश चुकले तर त्यांच्यावर कारवाई करता येत नाही, ही कसली आली लोकशाही आणि न्यायव्यवस्था ? एखादा माणूस चुकला असेल तर त्याला शिक्षा देता येते. ही सर्व अशी लिंक सुरु आहे. कुठले आले मॅट ? कामगार विभागाच्या अधिका-यांनी माथाडी कामगारांचे 10 कोटी रुपये खाल्ले असल्याचे सिध्द झ ाले आहे. त्याबद्दल शासनाने त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे. मॅटला त्यांना निर्दोष सोडावयाचे असेल तर सरकारची कारवाई अयोग्य आहे अशाप्रकारचे निष्कर्ष समोर आले पाहिजेत. ती संस्था क्वॉसी ज्युडिशिअल असेल तर त्यांचे निष्कर्ष सभागृहासमोर आले पाहिजेत.

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, या अधिका-यांना 1996 साली पुन्हा सेवेमध्ये घेण्यात आले होते. युतीच्या काळात तत्कालीन कामगार मंत्री श्री.साबीर शेख यांनी निर्णय घेऊन त्यांना पुन्हा कामावर सामावून घेतलेले आहे.

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मॅटने कशाच्या आधारावर त्यांना केलेली शिक्षा रद्द केली आहे ? या अधिका-यांनी कामगारांचे 12 कोटी रुपये डुबविले आहेत हे मॅटला मान्य नाही काय ? मॅटला हे खोटे वाटते काय ? महाराष्ट्र सरकारचे असे निर्देश होते की, हा पैसा राष्ट्रीयकृत बॅंकेत ठेवावेत. पण त्यांनी सरकारचे निर्देश बाजूला सारुन बुडित बॅंकेत हा पैसा ठेवला. हे खोटे आहे काय, तरी सुध्दा मॅट शिक्षेला कसा काय स्टे देते ?

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, ज्युडिशिअल प्राधिकरणाबाबत शासनाला बोलता येत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:55

(श्री. नवाब मलिक....)

न्याय व्यवस्था चुकीची आहे ही भूमिका आम्हाला घेता येत नाही. न्याय व्यवस्था बदलली पाहिजे असे सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर ती बाब या शासनाच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मॅट कोणत्या निष्कर्षाला आले आहे हे समजणे आवश्यक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मॅटने कोणत्या निकषावर न्याय दिलेला आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायिक प्राधिकरण हे क्वासी ज्युडिशियरी आहे काय ?याबाबतीत ॲडव्होकेट जनरल यांना बोलावून त्यांचे मत घ्यावे.

**उपसभापती** : मंत्री महोदयांनी 93च्या निवेदनासंदर्भात उत्तर दिलेले आहे. यातून दुसरा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांना जबाबदार धरता येणार नाही. मॅटच्या संदर्भातील बाब माननीय मंत्री महोदयांच्या अधिकारात नाही. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर योग्य आहे. मी या चर्चेवर आता पडदा टाकतो...

श्री. पांडुरंग फुंडकर : माथाडी कामगारांचे पैसे मिळायला पाहिजे.

**उपसभापती** : मॅटच्या संदर्भात एक गोष्ट निश्चित की, मॅट हे प्राधिकरण आहे. त्याला केन्द्र शासनाने मान्यता दिलेली आहे, हे बरोबर. परंतु ज्या एका हेतूने आपण मॅट निर्माण केले ते मॅट क्वासी ज्युडिशियल आहे असे येथे सांगण्यात आले. या मॅटच्या स्वत:च्या कामकाजाच्या कक्षा आहेत. त्या मॅटचे कामकाज मी ऐकतो, वाचतो आणि जे प्रत्यक्षात प्रशासनात पहातो त्या संदर्भात मी देखील जबाबदारीने बोलतो की, शासनातील वरिष्ठ अधिकारी जे आपल्या खात्यामध्ये चांगली शिस्त आणू इच्छितात ते अधिकारी सुध्दा या मॅटला वैतागलेले आहेत, कंटाळलेले आहेत. मी यासंदर्भात उदाहरणे देखील देईन. हे मॅट रद्द करावे अशी सरसकट बहुतेक लोकांची मागणी आहे. माझे असे म्हणणे आहे की, मॅट रद्द करणे ही बाब शासनाच्या कक्षेत येत नसली तरी राज्य शासनाने केन्द्र शासनाला तसे सांगावे. शेवटी असे आहे की, एखादे प्राधिकरण त्यांना नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे करीत नसेल तर अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. हे प्राधिकरण योग्य प्रकारे काम करीत नाही हे अशा प्रकारच्या उदाहरणांवरुन सिध्द झालेले आहे. .(अडथळा)...सरसकट काही झाले तरी, एखादी ऑर्डर गृह मंत्रालयाकडून जावो, पोलीस

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती....)

आयुक्तांकडून जावो किंवा पोलीस अधीक्षकांकडून जावो, पोलीस ठाण्यामध्ये काम करणा-या पोलीस निरीक्षकाची दादागिरी वाढलेली आहे. एखाद्याची बदली केली की ती बदली मॅटमध्ये जाऊन रद्द करुन घेतली जाते. हा अनुभव आहे. मॅट हे प्रशासकीय प्राधिकरण आहे. प्रशासकीय कामी चूक झाल्यानंतर केलेल्या बदल्यांमध्ये मॅटकडून सरसकट ढवळाढवळ केली जाते. बदल्यांना स्टे देणे हे प्राधिकरणाचे काम नाही. तेव्हा मॅट ठेवावे की नाही याचा विचार करावा लागेल. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने जी काही कार्यवाही करणे आवश्यक आहे ती सुरु करावी.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, या सभागृहाच्या भावना केन्द्राच्या विधी व न्याय विभागाला कळविण्यात येतील. एकाही माथाडी कामगाराचे पैसे देणे बाकी नाही. इतर सहकारी बँकातील जे पैसे बुडित गेले त्यासंदर्भात डिक्री घेऊन पैसे वसूल करण्यात येतील. 6 महिन्याच्या आत जितके पैसे वसूल होतील तेवढे ते शासनातर्फे महामंडळाला देण्यात येतील.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कर्जावर वन टाईम सेटलमेंट होते. डिपॉझीटवर वन टाईम सेटलमेंट होत नाही. 87 टक्के रक्कम दादर जनता सहकारी बँक का देणार ? 100 टक्के रक्कम का परत देणार नाही ? दादर सहकारी बँकेने जो प्रस्ताव दिलेला आहे तो शासनाने स्वीकारलेला आहे काय ?

श्री. नवाब मलिक : दादर सहकारी बँकेने प्रस्ताव दिलेला आहे. तो प्रस्ताव शासनाने स्वीकारलेला नाही.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे.

-------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागात कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामात झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : अकोला जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागात कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामात झालेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री गोपिकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, सुरेश जेथलिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात ( जलसंधारण मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री गोपिकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, सुरेश जेथलिया यांनी "अकोला जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागात कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामात झालेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ SBT/ ST/ MAP/ प्रथम श्री. शिगम 13:00

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, निवेदनात असे म्हटले आहे की, 38 कामपैकी 14 कामांची चौकशी करण्यात आली आहे. या 14 पैकी 9 कामांमध्ये भ्रष्टाचार आढळून आला आहे. या 9 कामांवर किती रक्कमेचा भ्रष्टाचार झाला आहे ? या सर्व कामांची चौकशी सबंधित विभागामार्फत करण्यात आली आहे. या कामांची विशेष यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अकोला जिल्हा परिषदेमध्ये ही कामे झालेली आहेत. या कामांमध्ये मोठी तफावत आढळून आलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. या 9 कामांवर 1 कोटी 27 लाख रुपयांचा फरक आढळून आलेला आहे. या प्रकरणी कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे. ठेकेदारांना व संबंधित अधिकाऱ्यांवर एकत्रितपणे फौजदारी खटले दाखल केलेले आहेत. मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, इतर कामांची चौकशी करण्यासाठी अत्यंत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल. या चौकशीमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर देखील पूर्वी ज्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे, त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कामठी शहरात गौतम बुध्दाच्या मूर्तीची झालेली विटंबना

**मु. शी.** :कामठी शहरात गौतम बुध्दाच्या मूर्तीची झालेली विटंबना याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नितीन राऊत ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "कामठी शहरात गौतम बुध्दाच्या मूर्तीची झालेली विटंबना"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अतिशय संवेदनशील विषयाच्या बाबतीतील हे निवेदन आहे. नागपूर येथे बुध्दमूर्तीची विटंबना झाली. या प्रकरणी जे आरोपी पकडले गेले आहेत. त्या आरोपींच्या समाजाचा या निवेदनात उल्लेख केला नसला तरी निवेदनावरुन स्पष्ट दिसून येते की, सोनू आणि शाहबाज अशी आरोपींची नावे आहेत. नागपूर तसेच इतर मोठया शहरांमध्ये अशा प्रकारच्या घटना सातत्याने होत आहेत. सामान्य माणसे पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यासाठी जातात. त्यांच्या तक्रारी नोंदवून घेतल्या जात नाहीत. पोलीस स्टेशनशी संबंधित दक्षता समित्या,शांतता समित्या, मोहल्ला समित्या, महिला दक्षता समित्या या प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत अस्तित्वातच नाहीत. या समितीच्या वर्षभर बैठका देखील होत नाहीत. माझा असा प्रश्न आहे की, कामठी पोलीस स्टेशनला लोकांनी घेराव घातला होता काय? अशा पध्दतीचे तणावाचे प्रसंग येऊ नयेत यासाठी नागपूर शहरात कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत ?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, कामठी पोलीस स्टेशनला लोकांनी घेराव घातला नव्हता. त्या ठिकाणी शांतता समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीअंती त्या परिसरात शांतता ठेवण्यासंबंधी लोकांना आवाहन करण्यात आले होते. आता कामठी शहरात शांतता आहे. पोलीस स्टेशनशी संबंधीत असलेल्या समित्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केला. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, सर्वच पोलीस स्टेशनमध्ये शांतता समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. महिला समित्यांच्या रचनेमध्ये काही काही ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्या अडचणी लवकरच दूर करण्यात येतील.

-----

6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्वीकृत झालेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या कार्यालयामार्फत आमच्या विधिमंडळ सदस्यांना त्यांची लक्षवेधी सूचना स्वीकृत झाली तर त्या अनुषंगाने पत्र दिले जाते. सभापती महोदय, अशाच प्रकारचे पत्र मला आलेले आहे. त्यात म्हटले आहे की, "तुमची सूचना मान्य केली आहे. दिनांक 11.6.2009 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविलेली असून या लक्षवेधी सूचनेवर संबंधीत मंत्री महोदयांनी करावयाच्या निवेदनाच्या प्रती वितरीत करण्यात येतील असे मला कळविलेले आहे." ही एक लक्षवेधी आहे आणि दुसरी लक्षवेधी सूचना ओ.बी.सी.घटका संबंधीची आहे. ओ.बी.सी.घटकासंबंधी मी नियम 289 चा प्रस्ताव माननीय सभापतींकडे सादर केला होता. त्याबाबतीत माननीय सभापती महोदयांनी मला सांगितले की, तुमची ओ.बी.सी.घटकासंबंधीची लक्षवेधी सूचना मी स्वीकृत करतो. लक्षवेधी सूचना स्वीकारण्यासंबंधीचे दुसरे पत्र मला आलेले आहे. परंतु मला माननीय मंत्री महोदयांचे पत्र देण्यात आले आहे. वरील विषयाबाबत दिनांक 5.6.09 रोजी विधान परिषदेत निवेदन करण्याबाबत विधिमंडळ सचिवालयाकडून कळविण्यात आले आहे असे माननीय मंत्री महोदय म्हणतात. या विषयाबाबत "विधान सभेत" असाही पत्रात उल्लेख करण्यात आला आहे. विधानसभेचा काय संबंध आहे? आमची लक्षवेधी सूचना मंजूर झाली. त्या लक्षवेधी सूचनेसंबंधीची तारीख ठरली. तारीख ठरल्याच्या दिवशी सकाळी माननीय मंत्री महोदयांकडून असे पत्र येते की, विधानसभेत या विषयावर चर्चा झालेली आहे. विधानसभेत माननीय मुख्यमंत्र्यांनी असे असे उत्तर दिले आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचना घेण्याची गरज नाही....

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ SBT/ 13:05

श्री.पांडुरंग फुंडकर....

असे जे लिहिले ते संयुक्तिक नाही. आमच्या सभागृहाचा बिझिनेस आमच्या सभागृहामध्ये झाला पाहिजे. विधानसभेचा रेफरन्स देऊन आमची लक्षवेधी सूचना फेटाळणे बरोबर नाही. लक्षवेधी सूचनेची वेळ ठरल्यानंतर, दिवस ठरल्यानंतर ऐनवेळी ती रद्द करणे त्याचप्रमाणे लक्षवेधी सूचनेसंबंधी काही कारण नसताना मला जे पत्र आले त्यानुसार यामध्ये कुठेतरी पाणी मुरते आहे. माझी लक्षवेधी सूचना भ्रष्टाचारासंबंधीची आहे. भ्रष्टाचाऱ्यांचे हात विधीमंडळापर्यंत पोहोचले आहेत. म्हणून अशा प्रकारचे प्रश्न आणि लक्षवेधी सूचना रद्द केल्या जात असतील तर या लक्षवेधी सूचनेच्या कामकाजाला आम्ही उपस्थित राहू इच्छित नाही. म्हणून आम्ही बहिर्गमन करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

-------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : अमरावती येथील पोलीस शिपायाने एका महिलेवर केलेला सशस्त्र हल्ला

**मु. शी**. : अमरावती येथील पोलीस शिपायाने एका महिलेवर केलेला सशस्त्र हल्ला यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती येथील महिला आघाडी प्रमुख मीना मानकर यांच्या घरी जाऊन अशोक रेवसकर या पोलीस शिपायाने दिनांक १९ एप्रिल, २००९ रोजी अथवा त्या सुमारास केलेला खूनी हल्ला, सदर हल्ल्यात श्रीमती मानकर गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीच्या उपचारासाठी तेथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येणे, सदर जीवघेणा हल्ला करणारा आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध घेऊन त्याला अटक करण्याबाबत पोलीसांनी दाखविलेली अक्षम्य दिरंगाई व बेपर्वाई, आरोपी फरार असल्याने जनतेत निर्माण झालेले दहशतीचे व चिंतेचे वातावरण लक्षात घेता संबंधित आरोपीला तातडीने अटक करुन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यास पोलीसांना आलेले अपयश परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.जयंत पाटील (गृहमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री.अशोक रेवसकर हा पोलीस हवालदार असून त्याचा स्वत:चा खाजगी वाहतुकीचा व्यवसाय आहे. एमडब्ल्यू.2793 ही 35 सिटर, एमडब्ल्यू.9797 ही 12 सिटर, एमएच.5314 आणि अशा अनेक खाजगी गाड्या त्याच्याकडे आहेत. अशा प्रकारे खाजगी ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करुन गडगंज श्रीमंत झालेला हा पोलीस हवालदार आहे. त्याने या वाहनांसाठी कोणत्याही प्रकारचा वाहतूक परवाना घेतलेला नाही. केवळ दादागिरी करुन अवैध धंदे करतो. याने प्रचंड पैसा कमावला आहे. श्री.अशोक रेवसकर या हवालदाराने राजकारणामध्ये उडी घेतली. आपल्या पत्नीला निवडणूक लढवावयास लावली. परंतु त्याची पत्नी निवडणुकीमध्ये पराभूत झाली म्हणून अमरावती शिवसेना महिला संघटक श्रीमती मीना मानकर यांच्या घरामध्ये घुसून त्याने हल्ला केला. तलवार घेऊन घुसला आणि तलवारीने मारहाण करुन वार केले. या हवालदाराला आवर घालावी असे सांगूनही लक्ष दिले गेले नाही. त्यानंतर फिर्याद दाखल झ ाल्यामुळे त्याला पकडण्याकरीता पोलीस गेले असता तो फरार असल्याचे सांगण्यात आले. मी दुसऱ्या दिवशी अमरावती येथे गेलो. श्रीमती मीना मानकर यांच्यावर तलवारीने हल्ला केल्यामुळे तिला 32 टाके घालावे लागले. एक डोळा सुध्दा निकामी झाला, 4 दात पडले. तलवारीने मोठा वार करण्यात आला. अशा प्रकारे एका हवालदाराने एका महिलेवर हल्ला केला म्हणून मी पोलीस आयुक्तांना भेटलो. तो स्वत: तेथे रहात असून गाडीतून फिरतो. तरी सुध्दा तो फरार असल्याचे दाखविले. मी गेल्यानंतर त्याला पकडण्यात आले. लगेच त्याने छातीत दुखते म्हणून तक्रार केली. मी आयर्विन रुग्णालयात गेलो. तेथील डीनना भेटलो. त्यांनी सांगितले की, या हवालदाराला नागपूरला पाठविले आहे. काय झाले ते सांगा म्हणून मी विनंती केल्यानंतर त्यांनी सांगितले की, छातीत दुखते म्हणून त्यानी तक्रार केली होती. वास्तविक त्याला काहीही झालेले नव्हते. असे असताना तुम्ही नागपूरला का पाठविले? त्यांनी उत्तर दिले की, प्रिकॉशन म्हणून, आणखी काही होऊ नये म्हणून नागपूरला पाठविले. माझ्याकडे मेडिकल रिपोर्टची कॉपी आहे. त्याचा ईसीजी काढला नाही, आणखी कोणतीही तपासणी केली नाही. तलवारीने घाव घालतो, हल्ला करतो त्याला मेडिकल प्रोफेशनकडून अशी मदत दिली गेली. खासदार डॉ.पद्मसिंह पाटील यांना सीबीआयने अटक केल्यानंतर त्यांनी रक्तदाब वाढल्याची तक्रार केली. त्यांना रुग्णालयात तपासणीसाठी पाठविल्यानंतर त्यांना काहीही झालेले नसल्यामुळे परत पाठविण्यात आले. एका बाजूला खासदारांबाबत वैद्यकीय अधिकारी असे वागतात आणि आयर्विन

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुग्णालयाचे डीन गुन्हेगाराला नागपूरला पाठवितात. याबाबत मी नागपूर रुग्णालयाच्या डीनना भेटलो. त्यांच्याकडे विचारपूस केली असता शासकीय रुग्णालयात तो कुठेच ॲडमिट नव्हता अशी माहिती मिळाली. खाजगी रुग्णालयात गेला, तेथे ॲडमिट झाला. मी आरडाओरड केल्यानंतर, आमचे त्या भागातील खासदार तेथे आल्यानंतर त्याला आणून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

2ए.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ ST/ पूर्वी श्री. भोगले.... 13:10

श्री. दिवाकर रावते .......

म्हणजे अशा प्रकारे छातीत दुखण्याचा त्रास होत असल्याचे सांगून गुन्हेगारांना सवलत देण्यात येते. याप्रकरणी ज्यांनी हलगर्जीपणा केला त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. त्यानंतर मी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्याशी चर्चा सुध्दा केली की कार्डियाक प्रॉब्लेम असेल तर त्या पेशंटला साध्या गाडीतून नेता येते काय ? अशा पेशंटला ॲम्बुलन्समधूनच नेणे आवश्यक असते. असे असताना ज्या खाजगी गाडीतून नेण्यात आले ती एमएच-27/सी-5776 या नंबरची तवेरा गाडी असून त्याच गाडीने गुन्हेगाराला दवाखान्यात नेण्यात आले. तसेच त्याच्या बरोबर जे हवालदार होते त्यांनी कामात हलगर्जीपणा केला, गुन्हेगाराला अशा प्रकारे खाजगी वाहनातून नेणे चूक असताना देखील तसे जाण्याची परवानगी दिली त्याबद्दल त्यांना सस्पेंड करण्याबाबत मी पोलीस अधीक्षक, अमरावती यांच्याशी बोललो. मी माहितीच्या अधिकारानुसार माहिती मागविली असता मला मात्र जे हवालदार प्रत्यक्ष त्याच्या सोबत होते त्यांची नावे बदलून दिली. अर्थात कोणाला बळी द्यावयाचे हा आपला प्रश्न आहे. मला जे उत्तर देण्यात आले त्यात या रेवसकर बरोबर असलेल्या हवालदारांमध्ये पी.सी.वारीस, बक्कल नं. 39, पी.सी. संजय, बक्कल नं.207 हे होते. तसेच सामान्य रुग्णालय, अमरावती येथून नागपूर येथे नेत असताना त्याच्या बरोबर गार्ड म्हणून पी.सी.पंधरे, पी.सी. राजेश बक्कल नं. 78, पी.सी. नाना, बक्कल नं. 1010, पी.सी. विनोद, बक्कल नं. 1106 असे तैनात केले होते. मी स्वत: नागपूर येथील डीनशी बोलला त्यावेळेस त्यांनी देखील सांगितले की, सरकारी रुग्णालयांमध्ये कुठेही आरोपी सापडत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, यासंदर्भात जो गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे त्यात खुनाचा प्रयत्न करणे वगैरे कलम आहे आणि त्याला "आय विटनेस" सुध्दा आहे. त्यासंबंधीची न्यायालयीन प्रक्रिया जी असेल ती होईल परंतु अशा प्रकारे गुन्हेगारांना सहकार्य करणारे वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस शिपाई असतील त्यांनी कामकाजात हलगर्जीपणा केला म्हणून त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी चांगली माहिती घेतलेली आहे आणि त्यातील बरीचशी खरी आहे, याबद्दल शंका नाही. त्यामुळे या सर्व घटनाक्रमाचा मी पुन्हा उल्लेख करीत नाही. परंतु या सर्व कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासाठी विशेष अधिकाऱ्याची नेमणूक केली जाईल व त्यात ज्यांचा निष्काळजीपणा समोर येईल त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

11-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) AA-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ ST/

**पृ. शी.** : नंदुरबार जिल्ह्यातील राजकीय नेत्याला देण्यात आलेल्या धमक्या

**मु. शी.** : "नंदुरबार जिल्ह्यातील राजकीय नेत्याला देण्यात आलेल्या धमक्या" यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, चरणसिंग सप्रा, रमेश शेंडगे, एस.क्यू.जामा, सुरेश नवले, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नंदुरबार जिल्ह्यातील एका राजकीय संघटनेचे व राज्याचे सरचिटणीस दिलीप नाईक यांना भ्रमणध्वनी, दूरध्वनी आणि भ्रमणध्वनीवरुन संदेश(एस.एम.एस.)द्वारे ठार मारण्याची दिनांक १७ मे, २००९ रोजी वा त्यापूर्वी अनोळखी व्यक्तिंकडून सतत धमकी देण्यात येणे, याबाबत नाईक यांनी नवापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणे, काही संशयित व्यक्तींबद्दल पोलीसांना माहिती देण्यात येऊनही पोलीसांकडून अद्याप कोणतीही कारवाई न होणे, याप्रकरणी राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : लोकसभेच्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार केला म्हणून राष्ट्रवादीचे राज्याचे सरचिटणीस यांना एसएमएसच्या माध्यमातून आणि फोनवर खुनाच्या धमक्या देण्यात आल्या. ही लक्षवेधी सूचना ज्यावेळेस लागली त्यानंतर या गोष्टीच्या तपासाला सुरुवात झाली. कारण यापूर्वी या घटनेची तक्रार पोलिसांत केल्यानंतर त्याची दखल घेतली गेली नव्हती, चौकशी सुध्दा केली नव्हती परंतु लक्षवेधी सूचना स्वीकृत झाल्यानंतर मात्र ही चौकशी सुरु झाली. त्या चौकशीत नवीनच प्रश्न उघडकीस आला तो म्हणजे ज्या मोबाईलवरुन धमक्या देण्यात येत होत्या तो मोबाईल जळगांव येथील एका 65 वयाचे ज्येष्ठ नागरिक श्री. मोरे यांचा होता व तो मारुतीच्या मंदिरातून चोरीला गेला होता. हा चोरीचा मोबाईल नंदुरबार जिल्ह्यात कसा आला ? तसेच अशा प्रकारच्या धमक्या दिल्या म्हणून याप्रकरणी सीआयडी अथवा क्राईम ब्रँचमार्फत चौकशी करणार काय ? आणि श्री. दिलीप नाईक हे राष्ट्रवादीचे सरचिटणीस असून त्यांना चौकशी सुरु असेपर्यंत पोलीस संरक्षण देणार काय ?

श्री. नितीन राऊत : होय, श्री. दिलीप नाईक यांना पोलीस संरक्षण देण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मी आणि श्री. दिलीप नाईक आम्ही दोघे धानोरा येथील प्रचार सभा आटोपून गाडीत बसत असतांना श्री. दिलीप नाईक यांच्याशी 3-4 आदिवासी लोकांनी काही तरी बोलण्यास सुरुवात केली. त्यानंतर ते जेव्हा माझ्या बरोबर गाडीत बसले त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, हे लोक मला शिवीगाळ करीत होते. श्री. नाईक यांना ज्यांनी शिव्या दिल्या त्यांची नावे सुध्दा त्यांनी फिर्यादी दिलेली आहेत. परंतु त्यापैकी एकाही गुन्हेगाराला साध्या चौकशीसाठी बोलावण्यात आले नाही. म्हणून माझी आपल्याला पुनःश्च एकदा विनंती आहे की, या प्रकरणाच्या संदर्भात आपण एक तर क्राईम ब्रँच कडून किंवा सीआयडी कडून सखोल चौकशी करण्यात यावी तसेच श्री. दिलीप नाईक यांना तात्काळ पोलीस संरक्षण दिले जावे अशी माझी मागणी करतो.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, श्री. दिलीप नाईक यांना क्राईम ब्रँचकडून पूर्ण संरक्षण दिले जाईल. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. एका लोकसेवकाला मोबाईलवरुन अशा प्रकारे धमकी देणे योग्य नाही. या प्रकरणात क्राईम ब्रँचकडून पूर्ण चौकशी करण्यात येईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपल्या राज्यातील पोलीस प्रशासनाची जेवढी कीव करु तेवढी ती थोडीच आहे. खुनाच्या धमक्यांची तक्रार झालेली आहे, त्यासंदर्भात 292, 504 आणि 506 या कलमांखी गुन्हयाची नोंद देखील झालेली आहे.निवेदनामध्ये म्हटले आहे की, "पोलीस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन तपास सुरु केला परंतु सदरचा गुन्हा तांत्रिक स्वरुपाचा असल्याने यातील पुरावे प्राप्त होण्यास विलंब लागत आहे." राज्यपातळीवर काम करणा-या एका राष्ट्रीय पक्षाच्या पदाधिका-याच्या बाबतीत हा प्रकार होत आहे. त्यामुळे या प्रकरणात विलंब का लागला तसेच ज्या अधिका-याकडून विलंब लागला गेला त्या अधिका-यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सदर गुन्हा हा तांत्रिक स्वरुपाचा आहे. या प्रकरणात पोलिसांनी कोणत्याही प्रकारची कुचराई केली नाही. पोलिसांनी आरोपीला शोधण्याचा देखील प्रयत्न केलेला आहे. आरोपी निवृत्त सरकारी वकील असून या घटनेच्यावेळी या निवृत्त सरकारी वकिलाचा मोबाईल चोरीला गेला होता त्यामुळे या व्यक्तीने नवीन सीम कार्ड घेतले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत ....

त्यामुळे जुने सीमकार्ड कोणी वापरले याचा तपास करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे यासंदर्भात क्राईम ब्रॅंचकडून चौकशी करण्यात येईल असे मी अगोदर सुध्दा सांगितलेले आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, श्री.शरद गावित हे श्री. माणिकराव गावित यांचे बंधु आहेत काय ? त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, श्री. शरद गावित यांच्या समर्थकांची चौकशी करण्यात येईल काय ? तसेच श्री. दिलीप नाईक यांना जी धमकी देण्यात आली होती त्या धमकीच्या मागचे सूत्रधार कोण आहेत याचा शासन शोध घेणार आहात काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, चौकशीमध्ये ज्यांची नावे येतील त्या सर्वांची चौकशी करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एसएमएस द्वारे धमकी देण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. दादोजी कोंडदेव प्रकरण झाल्यानंतर "या सभागृहातील सदस्यांना ठेचून मारा" अशा प्रकारचे एसएमएस पाठविण्यात आले होते तसेच तसेच अजून जे काही एसएमएस पाठविण्यात आले ते मी वाचून दाखवतो. "शिवप्रेमी मावळयांनो, सावधान. दादा कोंडदेव चौथीतून हद्दपार. हा रामदास, हा दादू कोंडदेव, हा पुरंदरे हे सर्व जेम्स लेनवर प्रेम करणा-यांची औलाद आहे. ही पिल्लावळ जागीच ठेचून काढा." अशा प्रकारचा एसएमएस 7 जून, 2009 रोजी पाठविण्यात आलेले आहेत. आज सकाळी महाराष्ट्रातील पक्षाच्या प्रमुखांच्या नावाने सगळीकडे एसएमएस पाठविण्यात आलेले आहेत की, " तुम्ही ए.के. 47 च्या सुरक्षेमध्ये फिरता, आम्ही मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते आपले आव्हान स्वीकारावयास तयार आहोत, ही प्रवृत्ती आम्ही ठेचून काढू, आता लढाईस सुरुवात झालेली आहे." अशा पध्दतीने महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रातील वातावरण बिघडवले जात आहे. हा एसएमएस बुलढाण्यामधून मराठा सेवासंघाकडून आलेला आहे. त्यामुळे शासन या प्रकरणाची गंभीर नोंद घेणार आहे की, नाही ?

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

त्याचप्रमाणे सभागृहामध्ये लोकप्रतिनिधी बोलले तर त्यांना रस्त्यावर ठेचण्याची भाषा कोणी करीत असेल तर सबंधित व्यक्तिविरुध्द माननीय गृहमंत्री कोणती कारवाई करणार आहेत ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सध्या ज्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा चालू आहे त्यासंबंधी जरी हा प्रश्न नसला तरीसुध्दा सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासून पाहण्यात येईल आणि अशा प्रकारचे एसएमएस जर कोणी पाठविले असतील तर त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या हातात जो कागद आहे तो त्यांनी माझ्याकडे पाठवावा त्याचप्रमाणे् त्यांच्या मोबाईलवर जो मेसेज पाठविण्यात आलेला आहे तोसुध्दा त्यांनी माझ्याकडे फॉरवर्ड करावा..

श्री.मधुकर चव्हाण : मी आपल्याकडे मेसेज फॉरवर्ड करतो. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचा जातीयवाद निर्माण करुन विधान सभेच्या पुढील निवडणुकीमध्ये भयानक स्थिती मराठा सेवा संघाला निर्माण करावयाची आहे याची माननीय गृहमंत्री गंभीरपणे दखल घेणार आहेत काय ? जो एसएमएस पाठविलेला आहे तो मी वाचून दाखवत नाही.

श्री.जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे मेसेज फॉरवर्ड करावा.

--------

**पृ.शी** : राज्यात बारावी नंतर घेण्यात येणा-या सीईटीच्या परीक्षेतील त्रुटी

मु.शी : राज्यात बारावी नंतर घेण्यात येणा-या सीईटीच्या परीक्षेतील त्रुटीसबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते पाटील , जितेंद्र आव्हाड,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांताक्रुझ विमानतळाच्या कार्गो परिसरात सोन्या चांदीची झालेली चोरी

**मु. शी.** :सांताक्रुझ विमानतळाच्या कार्गो परिसरात सोन्या चांदीची झालेली चोरी या विषया संबंधी सर्वश्री किरण पावसकर, दिवाकर रावते डॉ.दीपक सावंत,सर्वश्री अरविंद सावंत,अनिल परब,नितीन गडकरी,विनोद तावडे, मधुकर चव्हाण,संजय केळकर,रामनाथ मोते,चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे.,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. किरण पावसकर ( विधान सभेने निवडलेले ) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सांताक्रुझ विमानतळ परिसरातील कार्गो विभागात दिनांक 25 मे 2009 रोजी सुमारे 100 किलो सोने व 40 किलो चांदीची राजरोसपणे चोरी होणे, मुंबई विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी मुंबई पोलिसांची असतांना प्रत्यक्षात दरोडेखोर कार्गो परिसरात घुसून सोन्या चांदीची खोके गाडीत ठेवणे व त्याच गाडीने सुरक्षा यंत्रणा भेदून पळून जाणे,या प्रकारामुळे संपूर्ण विमानतळ परिसराची सुरक्षेसंबंधीची विश्वासार्हता धोक्यात आल्याबाबतचा संदेश जगभर पसरणे, परिणामी मुंबईला येणा-या प्रवाशांमध्ये घट होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत सांताक्रुझ विमानतळ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुनही पोलिसांकडून होत असलेली अक्षम्य दिरंगाई, यामुळे पोलीस आणि सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रवाशांच्या मनात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना,याबाबत शासनाने अग्रक्रमाने विमानतळ आणि मुंबई पोलिसांची सुरक्षा अद्ययावत आणि सक्षम करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. जयंत पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



VTG/ SBT/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मुंबईतील विमानतळावर निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या प्रश्नासंबंधी मला पाच मिनिटे बोलावयाचे आहे. सांताक्रुझ विमानतळावरील कार्गो परिसरात सोने चांदीची जी चोरी झाली होती त्यासंबंधी या निवेदनात उत्तर देण्यात आलेले आहे.परंतु त्या व्यतिरिक्त अनेक गंभीर घटना त्या ठिकाणी घडलेल्या आहेत. हाव वे पासून विमानतळावर जात असताना प्रत्येक प्रवाशांची कसून तपासणी केल्यानंतरच त्याला विमानतळावर जाता येते.असे असताना सोने चांदीची चोरी करणारी गाडी शस्त्रास्त्रांसह आतमध्ये गेलेली आहे. निवेदनामध्ये असे सांगण्यात आले होते की, यासंबंधीची सुरक्षा व्यवस्था एअर इंडियाकडून केली जाते. याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की त्या ठिकाणी एअर इंडियाची सुरक्षा व्यवस्था नव्हती त्यांची सुरक्षा व्यवस्थां आतल्या बाजूला असते. बाहेरुन आतमध्ये जाणा-या प्रत्येक व्यक्तिची कसून तपासणी केल्यानंतरच त्याला आतमध्ये सोडण्यात येते . असे असतांना शस्त्रास्त्रसह एक गाडी आतमध्ये गेली आणि त्या गाडीतील व्यक्ती मोठया प्रमाणावर सोने चांदीची नाणी घेऊन ते बाहेर पडलेली आहे. त्या ठिकाणापासून दोन मिनिटाच्या अंतरावर असलेल्या विमानतळ पोलीस स्टेशनमधील अधिका-यांना व एसीपीच्या कार्यालयातील अधिका-यांना काहीही माहिती कळू शकत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे त्याचबरोबर 26.11.2008 रोजी जी घटना मुंबईमध्ये घडली होती त्यानंतर शासनाची झोप उडाली होती . त्यावेळी ज्याप्रमाणे दहशतवादी हल्ला झाला होता त्याप्रमाणे विमानतळाच्या आजूबाजूला त्याच पध्दतीचा एखादी घटना होऊ शकेल. सुरक्षेच्या संदर्भात दोन तीन बाबी मी आपल्या निदर्शनास आणून देणार आहे . दिनांक 3 मे 2008 रोजी श्री.अनिल अंबानी यांच्या हेलीकॉप्टरमध्ये दगड आणि माती टाकण्याचा प्रकार घडला होता. श्री.अंबानी ही मोठी व्यक्ती असल्यामुळे त्या बातमीला मोठी प्रसिध्दी मिळाली होती त्याचबरोबर क्राईम ब्रॅचकडून संबंधितावर कारवाई करण्यात आली होती. दिनांक 27 ऑगस्ट 2008 रोजी एका हेलीकॉप्टरच्या खाली विटांचे तुकडे फेकण्यात आले आणि फटाके वाजविण्यात आले होते. यासंबंधी कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये दखल घेण्यात आली नाही. त्याचबरोबर दिनांक 3 जून 2008 रोजी याच कंपनीच्या मेन इलेक्ट्रीकल सप्लायमध्ये आग लागली होती व स्फोट झाला होता त्या संदर्भात सुध्दा

सांताक्रुझ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली नव्हती. त्याचबरोबर दिनांक 6 मार्च 2009रोजी कंपनीच्या कार्यालातील कपाटात सुतळी बॉम्बचे स्फोट झाले होते आणि पेट्रोलचा कॅन जवळच असल्यामुळे तेथे आग लागली होती तरी त्याबाबातीत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. मी हेलीकॉप्टरच्या संदर्भात मुद्दाम हे सांगू इच्छितो की, या हेलीकॉप्टरमधून अनेक मंत्री प्रवास करीत असतात. या विमान तळाच्या परिसरात 4-5 प्रकार घडून सुध्दा संबंधित सांताक्रुझ पोलीस स्टेशन कोणत्याही प्रकारची खबरदारी घेणार नसेल आणि कोणातीही कारवाई जर त्यांच्यावर केली जात नसेल तर भविष्यात हेलीकॉप्टरमधून प्रवास करणा-यांना सुध्दा धोक्याचा प्रवास करावा लागणार आहे. या विमानतळाच्या कार्गो विभागात सोने चांदीची चोरी झालेली आहे. विमानतळाच्या आतील परिसराच्या सिक्युरिटी संबंधी निवेदनात माहिती देण्यात आलेली आहे.की "ही सिक्युरिटी एअर इंडियाने द्यावयास पाहिजे होती. त्यांनी गाडी तपासून पहावयास पाहिजे होती." परंतु दिनांक 30 मार्च 2008 रोजी जो प्रकार घडला तो मी आपल्याला सांगू इच्छितो श्री. ज्ञानेश्वर कुंटे हा ड्रायव्हर विमानतळावर काम करीत असतांना एअर इंडियाच्या एका बसने त्याला चिरडून टाकले होते...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावस्कर...

आजही तो ड्रायव्हर मिळालेला नाही. सहार पोलीस स्टेशनला त्या गुन्हयाची नोंद झाली. त्याबाबत पोलिसांकडे चौकशी केली असता ते म्हणतात की, ती गाडी आम्हाला समजली नाही आणि ड्रायव्हरला सुध्दा अटक झालेली नाही. सभापती महोदय, एअरपोर्टमध्ये सामान्य माणूस जाऊ शकत नाही, त्याकरिता पासची आवश्यकता असते. अशा हायली सिक्युअर्ड एरीयामधील माणूस जीवंत बाहेर येतो की मेलेल्या अवस्थेत बाहेर येतो हे जर पोलिसांना माहीत नसेल तर हा प्रकार भयानक आहे. मी या ठिकाणी सहार पोलीस स्टेशन, सांताक्रुझ पोलीस स्टेशन आणि अे.सी.पी. चे ऑफिस यांच्या संदर्भातील तीन-चार मुद्दे उपस्थित केले. त्या ठिकाणाहून सोन्याची व चांदीची नाणी बाहेर गेली. आपल्या विधानभवनच्या गेटपासून आपण बसलेल्या सभागृहामधील जागेएवढया अंतरावर अे.सी.पी. यांचे पोलीस स्टेशन आहे हें मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. त्याठिकाणी बसलेले अे.सी.पी. हे तेथील सिक्युरिटीचे इनचार्ज आहेत. एवढे प्रकार झाल्यानंतर त्यांचा तपास होणे आवश्यक होते. ते अेव्हिकॉन एव्हिएशन लिमिटेड कंपनीचे मालक असून त्यांनी आपल्याच वर्दीचा रोख दाखवून एअरलाईन्सच्या सर्व कर्मचाऱ्यांना आपल्या ऑफिसमध्ये बोलावून बिझनेस चालविला जात आहे. आपल्या वर्दीचा रोख दाखवून जर अशापध्दतीचा बिझनेस होणार असेल तर त्याची शासनाने नोंद घेतली पाहिजे. याठिकाणी आपण केवळ घडलेल्या प्रकाराबाबत तपास करीत आहोत असे जर सांगणार असाल तर अशापध्दतीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना आपण कोणत्या पध्दतीने सन्मानित करणार आहात, आणि त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अे.सी.पीं. बाबत आपण जी माहिती दिली आहे त्याबाबत चौकशी करण्यात येईल. गेले काही दिवस अशाप्रकारच्या चौकशीसाठी किती लोकांना बोलाविण्यात आले? कुणाकुणाला बोलाविण्यात आले? त्यांच्या चौकशीमध्ये काय सबस्टन्स रजिस्टर करण्यात आले. आणि त्याचबरोबर तेथील कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बोलावून जी ट्रिटमेंट देण्यात आली व त्यांची इन्क्वायरी करण्यात आली त्यांचे अे.सी.पी.बाबत काय अनुभव आहेत यासाठी डी.सी.पी. किंवा वरिष्ठ स्तरावरील अधिकारी नेमून स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावस्कर : सभापती महोदय, त्याठिकाणी पोलिसांच्या बॅरिकेड्स लावलेल्या असल्यामुळे सामान्य माणूस तिथपर्यंत पोहोचू शकत नाही अशा ठिकाणाहून हे लोक 10 ते 11 वाजता 50 आणि 25 किलो वजनाचे सोने आणि चांदी बाहेर घेऊन जातात. याबाबतीत आपण कोणती चौकशी करणार आहात?

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, अजून किती दिवस असे प्रकार व्हावयास पाहिजेत म्हणजे आपण याची चौकशी करणार आहात? जो माणूस मेला तो पवईला राहणारा एक गरीब कर्मचारी आहे. त्याला कुणी चिरडले याचा अजून शोध लागत नाही. तर मग मुंबई शहरातील सामान्य माणसाचे जीणे किती हलाखीचे झाले आहे हे आपण बघितले पाहिजे. दुसरा प्रश्न असा की, गृह मंत्रालयासाठी तीन-तीन मंत्री आहेत. यामध्ये शहरासाठी एक व ग्रामीण भागासाठी एक व राज्याचे प्रमुख एक आहेत. तर मग मुंबई शहराचा कार्यभार ज्या माननीय गृह राज्यमंत्र्यांकडे आहे त्यांना बोलावून मुंबई शहरामध्ये काय चालले आहे हे त्यांना विचारणार काय?

श्री. जयंत पाटील : मुंबई शहराचा कार्यभार ज्या माननीय राज्यमंत्र्यांकडे आहे त्यांना बोलाविण्याची जबाबदारी माझी आहे. ते मला मदत करण्यासाठी आहेत. त्यामुळे त्यांना बोलाविण्याची गरज नाही. याबाबतीत ज्या पध्दतीने तपास सुरु आहे त्यावरुन माझी खात्री आहे की, आपण लवकरात लवकर तिथपर्यंत पोहोचू.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. किरण पावस्कर यांनी प्रश्न विचारण्यापूर्वी अनेक घटनांचा क्रम नमूद केला. मंत्रिमहोदयांनी शेवटचा विषय फक्त ए.सी.पी. व्यवसाय करतात, त्यांची स्वत:ची कंपनी आहे याबद्दल बोलले. माझी अशी मागणी आहे की, अंबानी सोडून हेलिकॉप्टरच्या बाबतीत इतर चार घटना झाल्या त्याची नोंद सुध्दा सांताक्रुझ पोलीस स्टेशनला नाही. त्या विमानतळाच्या आतील प्रांगणामध्ये एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

ज्या गाडीने चिरडून मारले, ती गाडी कोणती आहे ? त्या गाडीचा ड्रायव्हर कोण आहे ? ते कळलेले नाही. तेव्हा या चारही घटनांची चौकशी सी.आय.डी.मार्फत करणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सर्व घटना सांगितलेली असून, त्या सर्व घटनेच्या संदर्भात चौकशी करण्यात येईल. परंत त्या कंपनीतील युनियनमध्ये वाद आहे. श्री.अनिल अंबानी यांच्या हेलिकॉप्टरमध्ये रेती आणि दगड ठेवण्यात आला होता. त्याबाबत चौकशी केली, तेव्हा असे निष्पन्न झाले की, युनियनमध्ये अंतर्गत मोठा वाद आहे. त्यामुळे त्या कंपनीमध्ये या घटना होत आहेत. सन्माननीय सदस्यांनी नवीन ज्या तीन-चार घटना सांगितलेल्या आहेत, त्यातील काही घटनांच्या बाबतीत तक्रार नोंदविण्यात आलेली आहे आणि बऱ्याचशा घटनांची तक्रार नोंदविण्यात आलेली नसली तरी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याप्रमाणे या चारही घटनांच्या बाबतीत आणि आतमध्ये कर्मचाऱ्यांचा जो मृत्यू झ ाला त्याबाबतीत सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे आपण सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार आहात. ते सगळे बरोबर आहे. पण संबंधित अधिकाऱ्यांना तातपुरते सस्पेंड करुन ही चौकशी करणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला या विषयाच्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांना एवढेच विचारावयाचे आहे की, हा हाय सिक्युरिटी एरिया आहे. विशेषत: एअरपोर्टचा सी.आय.एस. एफ.कडे हेलिकॉप्टर आणि त्या गेटचा हमला असतो. त्यांची सिक्युरिटी असते आणि माझ्या माहितीप्रमाणे आत जाणारी व्यक्ती आणि बाहेर येणारी व्यक्ती यांची तपासणी करणे हे त्यांचे काम आहे. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी युनियनमधील वादाच्या बाबतीत उल्लेख केला. अनेक वेळा घातपाताच्या घटना घडतात आणि आपल्याला पंतप्रधान कै.इंदिरा गांधी यांच्यापासूनची प्रकरणे माहिती आहेत. त्यामध्ये आतील सिस्टीमलाच करप्ट करुन घातपात केले जातात.पण आज सी.आय.एस.एफ.कडे आतील जो इंटीलिजन्स आहे,त्याच्यामध्ये भांडणे वगैरे आहेत काय? याबाबत माहिती मिळविण्याच्यादृष्टीने काही व्यवस्था नाही. जर अशा हाय सिक्युरिटी एरियामध्ये इंटीलिजन्स नसेल तर त्या लोकांना करप्ट करुन असे धातपाताचे प्रकार घडविणे हे अधिक सोपे होऊ शकते.

. . . .2 ई-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

सी.आय.एस.एफ.हे फक्त मॅनिंग ऑन द गेट हे काम करते. परंतु आतमध्ये इंटेलिजन्स नसल्यामुळे अशा परिस्थितीत या गोष्टी थांबविणे हे खूप अवघड असते. त्यामुळे आपल्या राज्याची सुरक्षा करावयाची आहे, तो आपल्या राज्यातील भाग आहे हे लक्षात घेऊन आपण काही याबाबत ठोस विचार करणार आहोत काय ? तसेच त्याप्रमाणे काही कृती केली पाहिजे असे आपल्याला वाटते काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, होय.

-----

**(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.हेमंत टकले)**

. . . .2 ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ ST/ 13:30

## <u>विशेष औचित्याच्या मुद्याबाबत</u>

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी काल सभागृहामध्ये 93 च्या सूचनेच्या माध्यमातून जी.टी.हॉस्पिटल मधील डॉक्टरांच्या तक्रारीबाबत प्रश्न उपस्थित केला होता. माननीय वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टीसाहेब यांनी त्यावर अतिशय समाधानकारक उत्तरही दिले आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवादही दिले आहेत. माझ्याजवळ त्याचे प्रोसीडींग देखील आहे. परंतु ही चर्चा ऐकण्यासाठी येथे जे अधीक्षक हजर होते,

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

माझा विशेष औचित्याचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : माननीय सभापतींनी सन्माननीय सदस्यांना विशेष औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा विशेष औचित्याचा मुद्दा आहे. ही अतिशय गंभीर घटना आहे. काल सभागृहामध्ये मी नियम 93 अन्वये मांडलेल्या सूचनेच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगले निवेदन केले की, ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना निवासस्थाने मिळालेली नाही, त्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल आणि जे मुख्य तक्रारदार होते, त्यांना ताबडतोब दोन निवासस्थाने देखील दिली. त्यावर मी माननीय राज्यमंत्र्यांचे आभार देखील मानलेले आहेत. हे झाल्यानंतर संध्याकाळी जी.टी.हॉस्पिटलचे डीन डॉ.कुलकर्णी यांनी डॉ.राहुल घोले, जे मुख्य तक्रारदार होते, त्यांना पत्र दिले की, "विधान परिषदेत झालेल्या ठरावानुसार तुम्हाला कार्यमुक्त करण्यात येत आहे."सभापती महोदय, या सभागृहाची इतकी अप्रतिष्ठा, इतका अवमान झाला असून, इतके हे अधिकारी बेजबाबदारपणे वागू शकतात याचे आश्चर्य वाटते. सभापती महोदय, खरे म्हणजे हा तर हक्कभंगाचा विषय आहे.आम्ही सभागृहामध्ये लोकांसाठी न्याय मागण्यासाठी येतो आणि जो न्याय मागण्यासाठी येईल, त्याला जर तुम्ही संध्याकाळी सस्पेंड करणार असाल तर उद्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांकडे कोणीही तक्रार घेऊन देखील येणार नाही. या विषयाच्या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी अतिशय पॉझिटीव्ह उत्तर दिलेले आहे. परंतु त्याचा विपर्यास करुन, सभागृहाची अप्रतिष्ठा करुन, अवमान करुन, सदनामध्ये प्रत्यक्षात जी चर्चा झालेली नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/ प्रथम सौ. रणदिवे.... 13:35

श्री. कपिल पाटील ...

जो ठराव सभागृहात आलेला नाही, त्याची कोणतीही चर्चा नाही, असा लेखी दाखला देऊन त्याच संध्याकाळी डीन त्या डॉक्टरला सांगतात की, तुला सस्पेंड करण्यात येत आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी आठ डॉक्टर्स आहेत. अडीच वर्षापासून कोणालाही शासकीय निवासस्थाने मिळालेली नाहीत. हा डॉक्टर नवीन आहे. याने हिंमत केली आणि तक्रार केली म्हणून त्याला ही शिक्षा देण्यात आलेली आहे. मग तक्रार कोणी करायची?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधिमंडळाच्या कामकाजाच्या निर्णयावरुन जर एखादी घटना घडत असेल तर हा विषय गंभीर आहे. आपण तालिका सभापती असल्यामुळे आपल्याला याबाबत निर्णय देणे अवघड आहे, याची मला कल्पना आहे. विधिमंडळाची स्थापना झाल्यानंतर आतापर्यंत अशा प्रकारची घटना घडलेली नाही. पहिल्यांदाच ही घटना घडत आहे. यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांचा दोष नाही. त्यांनी याबाबतीतील सगळा चांगला निर्णय घेतलेला आहे. पण हा पूर्ण मंत्रिमंडळाचा अपमान आहे. विधिमंडळाचा अपमान आहे. विधानपरिषदेचा अपमान आहे. म्हणून माननीय सभापती, पीठासीन अधिकारी असतील त्यावेळी हा विषय घेण्यात येईल अशा प्रकारचा निर्णय दिला तर बरे होईल.

श्री. पांडुरुग फुंडकर : सभापती महोदय, आता हा विषय स्थगित ठेवण्यात यावा आणि माननीय सभापती सभापतीस्थानी आल्यानंतर या विषयावर चर्चा घेण्यात यावी.

**तालिका सभापती ( श्री. हेमंत टकले )** : हा विषय आता स्थगित ठेवण्यात येत आहे.

---

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे, तशाच पध्दतीचा हा मुद्दा आहे. सभापती महोदय, काही दिवसापूर्वी भुसावळच्या प्रकरणामध्ये 37 माणसे मरण पावली. या विषयात माननीय मंत्री श्री. नवाब मलिक साहेबांनी अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि ज्युडिशिअल चौकशीची घोषणा केली आहे. पण गेले दोन-तीन दिवसात ज्या हालचाली चालल्या आहेत आणि या कॅरिडॉरमध्ये ज्या पध्दतीने लोक फिरत आहेत आणि तो निर्णय विभागीय चौकशीकडे नेण्याची सगळी कागदपत्रे तयार झाली आहेत. म्हणजे सभागृहात दिलेले आश्वासन बदलण्याची हिंमत अधिकाऱ्यांची होते. मला खालच्या सभागृहातील विधिमंडळ गटनेते सन्माननीय श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील यांनी

..2..

SMT/ SBT/ ST/

श्री. विनोद तावडे....

सांगितले की, ही सगळी कागदपत्रे तयार झालेली आहेत. सदस्यांनी योग्य पध्दतीने विषय मांडल्यानंतर त्या दबावाखाली मंत्री उत्तरे देतात अशा पध्दतीची कारणे देऊन तो निर्णय फिरविण्याचा प्रयत्न चालला आहे. त्यामुळे त्याचप्रकारचे हे देखील प्रकरण आहे. हे सुध्दा गांभीर्याने घेतले पाहिजे. आणि त्याची चौकशी केली पाहिजे.

---

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : आचरा ता.मालवण जि.सिंधुदुर्ग येथे अत्याधुनिक शवविच्छेदन गृह बांधून अतिक्रमण हटविणे.

**मु. शी.** : आचरा ता.मालवण जि.सिंधुदुर्ग येथे अत्याधुनिक शवविच्छेदन गृह बांधून अतिक्रमण हटविणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.किरण पावसकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. किरण पावसकर ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"आचरा तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग या गावातंर्गत 41 महसुली गावे आणि 13 ग्रामपंचायती आहे. येथील एकूण लोकसंख्या सुमारे 21 हजार आहे. या गावांना प्राथमिक आरोग्य उपक्रमकेंद्रामार्फत आरोग्य सोवा पुरविण्यात येते. आचरा पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या शवविच्छेन गृहाच्या 18 गुंठे मोकळया जागेवर अतिक्रमण झाल्याने केवळ शवविच्छेदन गृहाची जागा शिल्लक राहणे, या शवविच्छेदन गृहाची 7/12 वर कुठेही शवविच्छेदन गृह अशी नोंद नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या नावे ही जागा दाखल करण्यात आलेली नाही. जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीने जाणीवपूर्वक केलेल्या दुर्लक्षामुळे रस्ता, पाणी आणि वीज यांची वानवा आहे. अपमृत्यू किंवा आकस्मिक मृत्यू घडल्यास आचारा येथील शव शवविच्छेदनास मालवण येथे नेण्यात येते. परिणामी आचरा वासियांची तारांबळ होत आहे. याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून अत्याधुनिक सुविधायुक्त शवविच्छेदन गृह बांधण्याची व अतिक्रमणे हळविण्याची आवश्यकता आहे. या सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. कृपया स्वीकृत व्हावी.

---

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/

**पृ. शी.** : नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना आखण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना आखण्याची आवश्यकता याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"आज दिनांक 10 जून,2009 रोजी दृष्टीदान दिन साजरा केला जातो. परंतु भारतातील सुमारे चार लाख अंधांसाठी नेत्ररोपणाची गरज असताना फक्त नेत्रदानाच्या अल्प प्रमाणामुळे त्यापैकी केवळ सहा टक्के म्हणजे फक्त पंचवीस हजार जणांच्याच जीवनात पुन्हा प्रकाश निर्माण होतो. महाराष्ट्रात तर निम्म्यापेक्षा अधिक अंधाच्या जीवनात अजूनही अंधार आहे. जगात श्रीलंकेमध्ये नेत्रदानाचे सर्वाधिक प्रमाण असून तेथील सरकारने मृत्यूनंतर नेत्रदान करणे कायद्याने बंधनकारक केले आहे. अमेरिका, इंग्लड, जर्मनी, जपान सारख्या विकसित देशात कायद्याचे कोणतेही बंधन नसले तरी तेथील समाजात जागरुकता आहे. कायद्याचे बंधन घालण्यापेक्षा भावनिक जागरुकतेने शासनाने नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. राज्य शासन नेत्रदानाकरिता कोणत्या नव्या योजना आखणार आहे याचा खुलासा आजच्या दृष्टीदान दिनी शासनाने करावा."

सभापती महोदय, दिनांक 10 जून हा दिवस दृष्टीदान दिवस म्हणून साजरा केला जातो.जागतिक आरोग्य बँकेच्या अहवालानुसार 2007 मध्ये जगातील पाच पैकी एक अंधव्यक्ती भारतातील होती. जगातील नेत्रदानाची गरज पाहिली तर भारतामध्ये सुमारे चार लाख अंधाना नेत्र रोपनाची गरज आहे. परंतु अतिशय अल्प प्रमाणामध्ये म्हणजे फक्त 6 टक्के या प्रमाणात नेत्रदान होते. म्हणून या प्रश्नावर राज्यातील अरोगय विभागामार्फत संपूर्ण राज्यात मोठया प्रमाणात जागृती निर्माण करण्यात यावी. नेत्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी लोकांच्या मनात भिती किंवा गैरसमज असतात ते दूर करण्याचा प्रयत्न व्हावा याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधीत आहे.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**मु. शी.** : सिंधुदुर्ग किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराच्या दुरुस्तीसाइी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले )** : मा□□य सदस्य श्री. परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदुर्ग किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर असून हे मंदिर जगातील एकमेव महाराजांचे मंदिर या जिल्ह्यात असणे, हे मंदिर जीर्ण झाल्याने गळती सुरु झाली आहे. सदर मदिर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. या मंदिराच्या दुरुस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. शिवाजी महाराजांचे हे मंदिर तीर्थक्षेत्रामध्ये सामावून घेऊन या मंदिराला तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा. सध्या पाऊस सुरु झाला असल्याने सध्या दुरुस्ती शक्य होणार नसल्याने तात्पुरत्या स्वरुपाची दुरुस्ती करुन व भविष्यात या मंदिराची पूर्णपणे दुरुस्ती करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याकरिता विशेष उललेखाव्दारे सूचित करीत आहे. यावर शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदुर्ग किल्ल्यातील देशातील एकमेव असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर जीर्ण झालेले असून गळती सुरु आहे. ते मंदिर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. त्या ठिकाणी तीर्थक्षेत्राप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. त्या मंदिराची दुरुस्ती करण्याकरिता तसेच आता पावसाळा असल्यामुळे तातडीने दुरुस्ती करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पर्यटन विभागाकडून निधी वर्ग करावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत येणाऱ्या एन.आर.आय व मोरा या दोन सागरी पोलीस ठाण्याकडे असलेल्या गस्ती नौका दुरुस्तीअभावी बंद असणे

**मु. शी.** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत येणाऱ्या एन.आर.आय व मोरा या दोन सागरी पोलीस ठाण्याकडे असलेल्या गस्ती नौका दुरुस्तीअभावी बंद असणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत येणाऱ्या एन.आर.आय. व मोरा ही दोन सागरी पोलीस ठाणी असून यापैकी मोरा पोलीस ठाण्याकडे जुनाट बांधणीची यशवंती गस्ती नौका कार्यरत असून एन.आर.आय. पोलीस ठाण्यात एकही गस्ती नौका नाही. प्राणहिता व इंद्रायणी या दोन्ही गस्ती नौका दुरुस्तीअभावी बंद असणे, तसेच सीमाशुल्क विभागाच्या पार्वतीप्रसाद व नारायणप्रसाद या दोन्ही गस्ती नौका मागील सुमारे चार वर्षापासून नादुरुस्त असणे, सद्य:स्थितीत मोरा सीमा शुल्क विभागाकडे एक फायबरची वेगवान गस्ती नौका उपलब्ध असून त्यावरच सागर सुरक्षेची भिस्त असणे, परंतु सदर नौकेस दोन तासासाठी 3 हजार रुपयाचे इंधन लागणे व एकाच नौकेस ताण पडणे, त्यामुळे सागर किनारा परिसरात निर्माण झालेली असुरक्षितता व जनमानसात निर्माण झालेली भीती व चीड, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

---

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परळी नगरपालिकेला विविध मशिनरी खर्च करण्यासाठी मिळालेल्या निधीत झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : परळी नगरपालिकेला विविध मशिनरी खर्च करण्यासाठी मिळालेल्या निधीत झालेला भ्रष्टाचार याबाबत ॲड. उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" महाराष्ट्र शासनाने नगरविकास खात्यामार्फत राज्यातील बहुतांश शहरातील वाढत्या टाकावू कचऱ्यापासून सेंदिय खत निर्मिती करुन शेती व बागबगीच्यांना विक्री करुन नगरपरिषदेला मोठा महसूल निर्माण करुन देण्यास व शहरातील कचरा समस्या कमी करण्याच्या उद्देशाने महानगरपालिका, नगरपालिका असलेल्या शहरामध्ये कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करुन टाकावू कचऱ्यातून ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा करुन याव्दारे सेंद्रिय खत तयार करण्याची अभिनव कल्पना पुढे येणे, त्यानुसार परळी ( जि.बीड ) नगरपालिकेला मागील वर्षी विविध मशिनरी खर्च करण्यासाठी 74 लाख रुपये मंजूर करण्यात येणे, मात्र नगरपालिकेने कंपनीच्या मशिनरी खरेदी न करता अहमदनगर येथील एका खाजगी फब्रीकेटर कडून हलक्या दर्जाची निकृष्ट मशिन खरेदी करुन लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे मशिनच्या दर्जावरुन दिसून येणे, तसेच प्रकल्प उभारणीसाठी मंजूर असलेल्या 24 लाख रुपयाचा खर्च कागदोपत्री दाखविण्यात येणे, सद्य:स्थितीत प्रकल्प बंद असल्याने या प्रकारात भ्रष्टाचार झाल्याचे उघड होणे, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुण्यातील कमिन्स इंडिया कंपनीने 80 टक्के भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याच्या आदेशाचे पालन न करणे

**मु. शी.** : पुण्यातील कमिन्स इंडिया कंपनीने 80 टक्के भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याच्या आदेशाचे पालन न करणे याबाबत श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दिनांक 5 जून, 2009 रोजी विधान परिषदेत माझी लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुण्यातील कोथरुड येथील कमिन्स इंडिया या कंपनीने 25 वर्षे सेवा केलेल्या कामगारांना क्षुल्लक कारणावरुन कमी केले, 80 टक्के भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याच्या शासनाच्या आदेशाचे पालन केले नाही, 1800 कामगारांच्या भरतीत मराठी तरुणांना डावलण्यात येणे, ज्या आठ कामगारांनी कंपनीच्या कामगार विरोधी धोरणाचा निषेध करण्यासाठी कंपनीच्या गेटसमोर कोर्टाच्या परवानगीने निदर्शने केली त्यांच्यावरही कारवाई केली तसेच सदर कंपनीने सन 2006 ते 2008 या कालावधीत नवीन 1489 कामगार भरले. त्यात फक्त 55 टक्के भूमिपुत्र व 45 टक्के परप्रांतीयांची भरती करण्यात आली आहे. दिनांक 5 जून, 2009 रोजी माझ्या लक्षवेधीला शासनाने दिलेल्या उत्तरात 90 टक्के स्थानिक तरुणांना रोजगार दिल्याचे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात फक्त 55 टक्के भूमिपुत्रांना रोजगार दिला असून 45 टक्के परप्रांतीयांना घेण्यात आले आहे. ही माहिती मी तेथील कामगार संघटनेकडून घेतली असून कमिन्स इंडिया कंपनी, कोथरुड, पुणे यांच्या व्यवस्थापनाने शासनाला असत्य माहिती पुरविली आहे. सदर माहितीची शहानिशा न करता सभागृहाला तीच माहिती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व कमिन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांवर शासनाने तात्काळ कडक कारवाई करुन तसे निवेदन सभागृहात करावे, ही विनंती."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT

श्री. अरविंद सावंत .....

सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्यांनी अत्यंत विषण्ण मनाने विषय मांडला त्याच पध्दतीने मी हा विशेष उल्लेख करीत आहे. पुण्यातील कमिन्स कंपनीने शासनाने काढलेल्या 80 टक्के स्थानिकांना नोकरभरतीत प्राधान्य देण्याबाबतच्या निर्णयाची धज्जी उडवून स्थानिकांवर अन्याय केल्याच्या संदर्भात मी या सदनामध्ये लक्षवेधी सूचना मांडली होती. त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदयांनी या कारखान्यात 1489 पैकी 90 टक्के कर्मचारी हे भूमिपुत्र असून स्थानिक असल्याबाबतचे निवेदन सदनामध्ये सादर केले. मी त्यावेळी सुध्दा सांगितले होते की, ही माहिती असत्य आहे. मी माननीय सभापतींना भेटलो आणि सांगितले की, यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने काढलेल्या निर्णयाचे उल्लंघन कोणत्या पध्दतीने बेदरकारपणे केले जाते आणि तेही पुण्यासारख्या शहरामध्ये केले जाते आणि शासन कोणतीही कार्यवाही किंवा कारवाई करीत नाही त्यामुळे कृपया आपण याकडे लक्ष द्यावे. आम्हाला अशा प्रकारे सदनामध्ये उत्तर दिल्यानंतर मी जाणीवपूर्वक हा विशेष उल्लेख या ठिकाणी मांडत आहे. त्या नोकरभरतीची संपूर्ण यादी मी प्राप्त केली असून मी विनंती करतो की, आपल्यामार्फत ही यादी माननीय कामगार मंत्र्यांना द्यावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

त्यामध्ये 80 टक्के मराठी माणसे नाहीत हे मी पुराव्यासहित सिध्द केले आहे. म्हणून मी मागणी करतो की, लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ज्या अधिका-यांनी सभागृहाला असत्य माहिती दिली त्या अधिका-यांवर शासनाने कारवाई करावी. त्याचबरोबर त्या कारखान्याने शासनाच्या निर्णयाची धज्जी उडवून परप्रांतीय नोकर भरती केली आहे. त्यामुळे या कंपनीविरुध्द सुध्दा कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला विनंती करीत आहे. सभापती महोदय, सभागृहाला असत्य माहिती देणा-या अधिका-यांविरुध्द व कंपनीविरुध्द केलेल्या कारवाईबाबत निवेदन करण्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती ( श्री.हेमंत टकले )** : शासनाने निवेदन करावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिध्देश्वर निवासी विद्यालय,वरवंटी,ता.जि.उस्मानाबाद या शाळेचे वादळी वा-यामुळे झालेले नुकसान

**मु. शी.** : सिध्देश्वर निवासी विद्यालय,वरवंटी,ता.जि.उस्मानाबाद या शाळेचे वादळी वा-यामुळे झालेले नुकसान याबाबत श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, माझ्या मतदार संघातील उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, उस्मानाबाद येथील स्वातंत्र्य सैनिकांनी एकत्र येऊन सिध्देश्वर निवासी विद्यालय, वरवंटी, ता.जि.उस्मानाबाद येथे स्थापन केलेले हे निवासी विद्यालय आहे. दि.19.5.2009 रोजी सायंकाळी 4.30 ते 5.30 वाजण्याच्या दरम्यान वरवंटी गाव व परिसरात मोठया वाऱ्यावादळीसह जोरदार पाऊस झाला. या वादळामुळे त्या शाळेवरील छतासह पत्रे उखडून पडले आहेत. त्यामुळे 4-5 लाखांचे नुकसान झाले आहे. स्वातंत्र्य सैनिकांनी समर्पित भावनेतून, समाजसेवेच्या दृष्टीकोनातून त्याठिकाणी ही शाळा स्थापन केली आहे. या शाळेचा पुन्हा वापर होण्यासाठी शासनाने या शाळेला आर्थिक मदत करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे."

-----

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन्हा भरेल.

( दुपारी 1.48 ते 2.15 पर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : सभागृहामध्ये गणपूर्ती नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटे तहकूब करीत आहे.

(दुपारी 2.15 ते 2.30 वा. पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली.)

----

.....नंतर श्री. गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 14:30

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मघाशी मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. परंतु सभागृहात आपली उपस्थिती आवश्यक आहे असे सांगून सभागृहाने हा विषय स्थगित ठेवावयास सांगितला आहे. सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर तो विषय पुन्हा मांडतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये जी.टी.हॉस्पीटलच्या आठ निवासी डॉक्टरांना निवासस्थाने न दिल्याबद्दल मी नियम 93 अन्वये सभागृहात सूचना मांडली होती. त्याबाबतीत माननीय वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी अतिशय समाधानकारक उत्तर दिले. त्या ठिकाणच्या दोन निवासी डॉक्टरांना ताबडतोब निवासस्थाने देण्याबद्दल आणि इतर डॉक्टरांना निवासस्थाने का दिली गेली नाहीत त्याबद्दल चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन माननीय मंत्र्यांनी दिले आहे. ज्या डॉक्टरने ही तक्रार माझ्यापर्यंत आणली होती, त्या डॉ. राहुल घुले यांना जी.टी.हॉस्पीटलचे डीन डॉ.कुलकर्णी यांनी विधानपरिषदेमध्ये झ ालेल्या ठरावानुसार तुम्हाला तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे असे पत्र डॉ.राहुल घुले यांच्या हातात सायंकाळी 6.00 वाजता दिले. सभापती महोदय, ज्या विषयाची चर्चा या सभागृहात झाली नाही, जो विषय या ठिकाणी छेडला गेला नाही, त्यासंबंधी सभागृहात कोणताही ठराव आणला गेला नाही. अशा प्रकारचा विधानपरिषदेत ठराव झाल्याचे बेमालुम, असत्य कथन करुन या सभागृहाचाच अवमान करण्यात आलेला नसून त्यांनी तुमच्या आमच्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण त्यांनी केलेले आहे. सभापती महोदय, या डीन बाबतीत काय करावयाचे याबाबतचा निर्णय सभागृहाने घेतला पाहिजे. या सभागृहात आम्ही प्रश्न मांडतो. न्याय प्रस्तापिथ करण्यासाठी उभे

.2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 14:30

श्री.कपिल पाटील...

राहतो, यापुढे सन्माननीय सदस्यांकडे बाहेरुन तक्रारी घेऊन येणार नाहीत. सन्माननीय सदस्यांकडे तक्रार घेऊन गेले तर त्या व्यक्तीस सायंकाळपर्यंत सस्पेंड केले जाईल अशा पध्दतीचा धाक देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आलेला आहे. आठ वैद्यकीय अधिका-यांना गेली अडीच वर्षे निवासस्थाने देण्यात आलेली नाहीत. यासंदर्भात काल माननीय वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी कार्यवाही करण्यासबंधी आश्वासन दिल्याबरोबर ज्या डॉक्टरांनी माझ्याकडे तक्रार केली, त्या डॉक्टरला विधानपरिषदेचा हवाला देऊन कार्यमुक्त करण्याचे आदेश दिले गेले. इतका खोटारडेपणा तोही सभागृहाच्या नावावर होतो आहे, तो सभागृहाचा अवमान आहे. सभागृहाच्या अधिकारावर हे अतिक्रमण आहे. सभापती महोदय, माझी मागणी आहे की, या गोष्टीची गंभीर दखल घेतली पाहिजे. या विषयाबाबतचे सविस्तर पत्र मी माननीय सभापती आणि उपसभापती यांना सादर केलेले आहे. ते पत्र त्यांच्यापर्यंत पोहोचलेले आहे. माझी मागणी आहे कृी डॉ.राहूल घुले यांना ताबडतोबीने रिइस्टेट करावे. या हॉस्पीटलचे जे डीन आहेत, त्यांनी आपल्या स्वार्थासाठी या सभागृहास वेठीस धरलेले आहे, सुडबुध्दीने वागण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. त्यांचे विरुध्द ताबडतोबीने कारवाई केली गेली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो मुद्दा याठिकाणी मांडला, त्याबाबत त्यांनी असे सांगितले की सभागृहाच्या कामकाजाचा उल्लेख करुन आदेश काढण्यात आले आहेत. या सभागृहामध्ये जी चर्चा झाली, ठराव झाला त्यानुसार तुम्हाला काढून टाकले आहे असा त्या पत्रात उल्लेख आहे का?

श्री.कपिल पाटील : 'विधानपरिषदेच्या ठरावान्वये' असे पत्रात म्हटले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना प्राप्त झालेल्या पत्राची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. मी सभागृहाच्या माहितीसाठी ते पत्र वाचून दाखवितो. "गोकूळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई-400 001. ग्रँट मेडिकल कॉलेज संलग्न, महाराष्ट्र शासन. या पत्रामध्ये विषय आहे कार्यमुक्त करण्याविषयी. डॉ.राहुल घुले, गोकूळदास तेजपाल रुग्णालय. संदर्भ : दिनांक 10.6.2009 रोजी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य व माननीय राज्यमंत्री यांच्या विधानपरिषदेतील ठरावान्वये म्हणजे काल जी चर्चा घडली त्याचा संदर्भ आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेनुसार दिनांक 10.6.2009 रोजी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य व माननीय राज्यमंत्री यांच्या चर्चेमध्ये झालेल्या ठरावानुसार डॉ.राहुल घुले, वैद्यकीय अधिकारी, गोकूळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई यांना 10.6.2009 (म.उ.) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. डॉ.राहुल घुले यांनी पुढील कार्यवाहीसाठी माननीय उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांच्याशी संपर्क साधावा."

सभापती महोदय, चर्चा काय झाली? त्यांनी असे निदर्शनास आणले की, तेथे जे निवासी डॉक्टर्स आहेत त्यांना निवासाची व्यवस्था नाही. ती व्यवस्था करण्याचे आदेश माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिले. ते आदेश ताबडतोब अंमलात आले. तक्रार कोणाच्या विरुध्द नाही. निवासी डॉक्टरांना राहण्याची सोय नाही. ही बाब डॉ.राहुल घुले यांनी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या निदर्शनास आणली आणि त्यांनी हा विषय सभागृहात मांडल्यामुळे डॉक्टरांची निवासाची व्यवस्था झाली. परंतु सभागृहात विषय मांडण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना उद्युक्त केल्यामुळे डॉ.घुले यांना कार्यमुक्त करण्यात आले. इतक्या गांभीर्याने सदनाचा वापर गोकूळदास तेजपाल रुग्णालयाच्या अधीक्षकांनी केला आहे. खरे म्हणजे हा हक्कभंगाचा विषय आहे. मी सन्माननीय सदस्यांना विनंती केली की, आपण हक्कभंगाची सूचना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आजच्या आज दाखल करावी. दाखल केली असेल तर आनंद आहे. आपण या संदर्भात निर्देश द्यावेत हा एक भाग झाला. संबंधित मंत्रीमहोदयांनी या अधीक्षकांची बडतर्फी करावी हा एक विषय झाला.

परंतु हक्कभंगाची सूचना विशेष हक्क समितीचे माननीय समिती प्रमुख ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांच्या माध्यमातून तातडीने बैठक घेऊन स्वीकृत करावी. या सभागृहाचा अधिक्षेप केल्यानंतर काय घडते याची संबंधितांना समज आली पाहिजे अशा प्रकारचा निर्णय घ्यावा अशी मी आपल्या माध्यमातून विशेष हक्क समितीच्या समिती प्रमुखांना विनंती करतो. आपण हक्कभंगाची सूचना स्वीकृत करावी. या संदर्भात केवळ दखल नव्हे तर गंभीर दखल घेतली नाही तर भविष्यात अशी प्रकरणे वाढण्याची शक्यता आहे. या सभागृहाच्या प्रतिष्ठेसाठी आपण निर्णय घ्यावा अशा प्रकारची विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रकरण अगदी स्वयंस्पष्ट आहे. आम्हाला लोकप्रतिनिधी म्हणून कोणी भेटले, त्यांनी प्रश्न आणि समस्या सांगितल्या तर त्यांना अशी शिक्षा मिळणार असेल तर या राज्यामध्ये आम्हाला कोणी भेटू नये अशी शासनाची इच्छा आहे का? त्यांनी मांडलेल्या विषय अगदी योग्य आहे. या सभागृहाच्या प्रतिष्ठेसाठी आपण ताबडतोब निर्णय जाहीर करावा. जी.टी.रुग्णालयाच्या डीननी जो निर्णय घेतला तो त्वरित रद्द करुन डॉ.घुले यांना कामावर घेण्याची सूचना द्यावी. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला विषय योग्य आहे. हक्कभंगाची सूचना समितीकडे पाठविण्याची प्रोसीजर वेगळी आहे. प्रथम हक्कभंगाची सूचना आपल्याकडे दाखल करावी लागते. आपण त्याची छाननी करुन नंतर समिती पाठविण्याबाबत निर्णय जाहीर करता. जी.टी. रुग्णालयाचे डीन यांच्याबाबत कोणती कारवाई केली पाहिजे याचा निर्णय आपण, मंत्रीमहोदय, हक्कभंग समिती असेल.......

2एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .......

त्यांनी याबाबतीत दखल घेण्याची गरज आहे, अन्यथा "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो" अशा प्रकारे या सभागृहाची, सन्माननीय सदस्यांची प्रतिष्ठा होणार असेल तर लोक आम्हाला येऊन भेटणार नाहीत. म्हणून यासंबंधीचा निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, हे तर अत्यंत गंभीर आहे की, विधानपरिषदेत ठराव झाला असा उल्लेख केला जातो. वास्तविक शासनाचा निर्णय झाल्यानंतर देखील मुख्यमंत्री अथवा संबंधित मंत्र्यांच्या नावाने आदेश निघत नाही तर तो माननीय राज्यपालांच्या नावाने आदेश अथवा जी.आर. काढले जातात. परंतु जी.टी. हॉस्पिटलमध्ये मात्र अशा प्रकारे विधानपरिषदेत झालेल्या ठरावाचा संदर्भ देऊन जी कृती या डीनने केली त्याबद्दल त्यांना आजच्या आज आणि अगोदर सक्तीच्या रजेवर पाठवावे आणि डॉ. घुले यांना ताबडतोब कामावर घ्यावे.

**उपसभापती** : औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जी.टी. रुग्णालयातील डॉ. घुले यांना कार्यमुक्त केल्याच्या संदर्भात त्याच रुग्णालयाचे डीन श्री. कुलकर्णी यांनी आदेश काढले. त्या अनुषंगाने असलेली कागदपत्रे सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे सुपूर्द केली. त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, श्री. नितीन गडकरी आणि श्री. मधुकर चव्हाण यांनी देखील आपली भूमिका मांडली. उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता त्यांना कार्यमुक्त केल्याबद्दलचे जे आदेश दिले आहेत त्यात त्यांनी विधानपरिषदेचा उल्लेख केला आहे, ही निश्चितपणे गंभीर स्वरुपाची गोष्ट आहे. सभागृहात जे कामकाज चालते त्यानुसार राज्यशासनाचे संबंधित खात्याचे जे मंत्री असतील त्यांनी तसे आदेश वगैरे दिले असतील तर त्या आदेशांचा उल्लेख करणे एक वेळ संयुक्तिक ठरले असते परंतु विधानपरिषदेचा उल्लेख करुन अशा प्रकारचे आदेश काढणे हे अत्यंत गैरलागू आहे. तसेच ही कृती अत्यंत अन्यायकारक, अयोग्य व बेकायदेशीर आहे म्हणून डॉ. राहुल घुले यांना कार्यमुक्त काढल्यासंबंधीचे जे आदेश काढण्यात आले आहेत ते याक्षणी रद्द करण्यात यावेत आणि त्यांना पुन्हा सन्मानाने आपल्या कामावर रुजू करुन घ्यावे. तसेच या आदेशांची अंमलबजावणी झालीच नाही असे समजून आणि त्यांची सेवा खंडित वगैरे न करता त्यांना कामावर रुजू करावे. तसेच दुसरे म्हणजे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/

**उपसभापती** .......

विधानपरिषदेचा दाखला देऊन ज्या अधिकाऱ्याने असे आदेश काढले आहेत त्यांच्यावर योग्य ती कारवाई ताबडतोब करावी असे मी निदेश देत आहे. तसेच डॉ. राहुल घुले यांना सेवेत घेतल्याचे आदेश आजच निर्गमित करावेत असेही मी निदेश देत आहे.

श्री. हसन मुश्रीफ : होय, असे आदेश काढण्यात येतील.

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पंढरपूर विकास प्राधिकरण विधेयक

**L. C. BILL NO. V OF 2009**

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE PANDHARPUR DEVELOPMENT AUTHORITY; FOR PREPARING PLAN FOR THE PANDHARPUR DEVELOPMENT AREA; FOR ENSURING TIMELY IMPLEMENTATION OF VARIOUS DEVELOPMENT WORKS IN THE SAID AREA AS PER THE SAID PLAN AND FOR THAT PURPOSE TO ENSURE CO-ORDINATION BETWEEN THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES; GIVING DIRECTIONS FOR PREPARING PLANS AND ESTIMATES OF THE WORKS CONTAINED IN THE SAID PLAN, TO GRANT ADMINISTRATIVE APPROVAL TO THE PROPOSALS OF DEVELOPMENT WORKS AND PLANS AND ESTIMATES, TO GIVE APPROVAL TO TENDERS FOR WORKS INVITED BY THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES; TO RECEIVE AND RELEASE GOVERNMENT GRANTS TO THE CONCERNED AGENCIES AFTER APPROVAL OF TENDERS AND TO MONITOR IMPLEMENTATION OF DEVELOPMENT WORKS BY THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES; AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 5 - पंढरपूर विकास क्षेत्रासाठी योजना तयार करणे, उक्त योजनेनुसार उक्त क्षेत्रात करावयाच्या विविध विकासविषयक कामांची वेळेत अंमलबजावणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांदरम्यान समन्वय राखणे, उक्त योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्याकामांचे नकाशे व अंदाज तयार करण्यासाठी निदेश देणे, विकासविषयक कामांचे पाच प्रस्ताव आणि नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्यता देणे, संबंधित शासकीय व नियम शासकीय अभिकरणांनी

4......

श्री. हसन मुश्रीफ .....

कामासाठी मागविलेल्या निविदांना मान्यता देणे, निविदांच्या मान्यतेनंतर संबंधित अभिकरणांना शासकीय अनुदाने देणे व संबंधित शासकीय व निम शासकीय अभिकरणांद्वारे करण्यात येणाऱ्या कामांचे संनियंत्रण करणे इ. कामासाठी पंढरपूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधी किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

महोदय, नागपूर अधिवेशनात ज्या पध्दतीने शासनाने तुळजापूर शहरासाठी तुळजापूर शहर आणि 10 किलोमीटरच्या परिसरात विकासासाठी प्राधिकरण स्थापन केले त्याच पध्दतीने पंढरपूर हे देखील राज्यातील अतिशय महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे. पंढरपूर येथे विठ्ठल-रखुमाईचे मंदिर आणि इतर छोटी छोटी मंदिरे व मठ आहेत. आषाढी एकादशी, माघी एकादशी आणि चैत्र महिन्यातील एकादशीच्या निमित्ताने लाखोच्या संख्येने भाविकांची गर्दी होत असते. आषाढी एकादशीला तर अधिक प्रमाणात लोक जमतात. हे भाविक गेल्यानंतर एक-एक, दोन-दोन महिने सुध्दा या शहरात अस्वच्छता असते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ...

अशा प्रकारे यात्रेच्या काळात फार मोठा त्रास पंढरपुरच्या रहिवाशांना सहन करावा लागतो. या ठिकाणची नगरपालिका एवढा मोठया तीर्थक्षेत्राचा विकास करु शकत नाही. विठ्ठलाच्या दर्शनासाठी जे लाखो भावीक पंढरपुरात येतात त्यांची सुव्यवस्था ठेवणे त्यांना नागरी सुविधा पुरवणे यामध्ये शासनाने मदत केल्याशिवाय हे प्रश्न संपणार नाहीत आणि म्हणून पंढरपूर शहर आणि त्या नगरपालिकेच्या हद्दीपासून 10 कि.मी. च्या परिसरात मुलभूत सुविधा, विकास कामे सुनियोजित पध्दतीने करण्यासाठी या योजनेचा बृहत आराखडा तयार करणे, त्यास शासनाची मंजूरी मिळवणे आणि पंढरपूर शहराचा विकास करणे तसेच भाविकांच्या समस्या सोडविणे या एका चांगल्या उद्देशाने पंढरपुर विकास प्राधिकरणाची स्थापना हे शासन करीत आहे. गेल्या वर्षी तुळजापूर विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले होते त्यावेळी या प्रधिकरण समितीचा अध्यक्ष जिल्हाधिकारीच का ? अशा प्रकारच्या भावना सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व्यक्त केल्या होत्या. आता यामध्ये बदल केला असून त्या जिल्हयाच्या पालकमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली, लोकप्रतिनिधींच्या सदस्यत्वाखाली आणि संबंधित अधिका-यांची समिती नियुक्त केली जाणार आहे. त्यामुळे ही समिती नियुक्त करुन लवकरात लवकर प्राधिकरण तयार केले जाईल. तुळजापुरच्या विकासाठी आपण 70 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामुळे पंढरपुर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी जे भाविक दर्शनासाठी येतात त्यांची चांगली सोय करु शकू आणि त्या शहराचा विकास करु शकू. त्यामुळे पंढरपुर विकास प्राधिकरण तयार करीत आहोत. सदर विधेयक विचारार्थ मांडले आहे तरी पंढरपूर विकास प्राधिकरण तयार करण्यात यशस्वी होण्यामध्ये आपण सर्वानी सहकार्य करावे व हे विधेयक मंजूर करण्यास सहकार्य करावे अशी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 5 मांडतो.

**उपसभापती** :विधेयक मांडण्यात आले आहे.

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. हसन मुश्रीफ यांनी पंढरपूर विकास प्राधिकरणाच्या संदर्भात जे विधेयक मांडले आहे त्याचे आम्ही स्वागत करीत आहोत. पंढरपूर हे महाराष्ट्राचे दैवत आहे त्यामुळे पंढरपुर येथे येणा-या भाविकांना सोयी, सुविधा, स्वच्छता व पयाभूत सुविधा चांगल्या मिळाव्यात यासाठी चांगल्या उद्देशाने हे विधेयक मांडलेले आहे त्यामुळे आम्ही या विधेयकाचे स्वागत करतो तसेच समर्थन देखील करतो. प्राधिकरण तयार करण्यापूर्वी माझी एकच विनंती राहणार आहे की, लहान-सहान कामांसाठी या प्राधिकरणाला मुंबईच्या खेपा माराव्या लागणार नाहीत याची काळजी घ्यावी तसेच या प्राधिकरणाला पर्याप्त अधिकार द्यावेत, या प्राधिकरणाला प्रत्येक टेंडर पास होण्यासाठी मुंबईला चकरा मारु देऊ नका अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) MM-3

SGJ/ KGS/ MAP/ 14:45

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माझा जन्मच पंढरपुरात झ ाालेला असल्यामुळे पंढरपुरशी माझे जन्माचे नाते आहे. गेल्या 30-35 वर्षापासून पंढरपुरच्या संदर्भात आपण पाहत आलेलो आहे की, हे सरकार पंढरपुरच्या दर वारीच्या वेळेस जाहीर करते की, आम्ही एवढा एवढा निधी दिलेला आहे परंतु बहुतेक वेळा संपूर्ण निधी खर्च होत नाही. संपूर्ण पैसा खर्च न झाल्यामुळे बहुतेक कामे अर्धवट पडून राहतात, गटारे उघडी पडतात बहुतेक कामे अर्धवट राहतात आणि त्याचा त्रास भाविकांना तसेच तेथील रहिवाश्यांना सोसावा लागतो. याचा अनुभव आपण सगळयांनी घेतलेला असेलच त्यामुळे यासंदर्भात अधिक काही सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. हे चित्र आपल्याला अनेक वर्षापासून बघावयास मिळते आहे. भाविकांना आणि पंढरपुर वासीयांच्या ज्या काही अपेक्षा आहेत त्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी शासनाने जे पाऊल उचलले आहे त्याचे मी स्वागत करते. पंढरपुर शहराचे वेगळे व्यक्तिमत्व आहे. पंढरपुरात शेकडो वर्षापासून वारकरी येत असतात. त्यामुळे गोपाळपुर चंद्र भागेचा काठ, त्याच ठिकाणी महात्मा फले यांचे अनुयायी श्री. नवरंगे यांनी केलेला मोठा बालिकाश्रम, तनपुरे महाराजांचा मठ, कैकाडी महाराजांचा मठ आहे. या ठिकाणी ज्या दिंडया येतात त्या आपली व्यवस्था करीत असतात.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे......

त्याचबरोबर या शहरात राहणारे मूळ लोक आणि शैक्षणिक संस्था असे अनेक घटक या ऐतिहासिक शहराशी सबंधित आहेत. चंद्रभागा नदी पंढरपूर शहराला वळसा घालून जाते. ज्यावेळी या नदीला मोठा पूर येतो त्यावेळी पंढरपूर शहराचा संपूर्ण राज्याशी संपर्क तुटतो. त्याचप्रमाणे गेल्या काही दिवसापासून या ठिकाणची पूर रेषा बदलत चालली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन या शहराचा विकास केला गेला पाहिजे. पंढरपूर शहराचे व्यक्तिमत्व आणि ओळख याबद्दल संवेदनशीलता ठेवूनच विकासाची कामे झाली पाहिजेत असे मला वाटते.

सभापती महोदय, पंढरपूरच्या विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे. या प्राधिकरणावर सोलापूरमधील विधान सभेच्या लोकप्रतिनिधीना घेण्यात आलेले आहे ही स्वागतार्ह बाब आहे परंतु विधान परिषदेच्या सदस्यांना त्यामधून का डावलण्यात आलेले आहे हे समजत नाही तेव्हा सोलापूर जिल्हयातून विधान परिषदेवर जे सन्माननीय सदस्य निवडून आलेले आहेत त्यांचाही समावेश या प्राधिकरणामध्ये करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे.

ज्या प्रमाणे विधान सभेच्या सन्माननीय सदस्यांना अधिकार आहेत त्याप्रमाणें विधान परिषदेच्या सदस्यांनासुध्दा अधिकार आहेत.तसेच ज्या प्रमाणे विधानसभेच्या सदस्यांचे त्यामध्ये योगदान असते त्याप्रमाणे विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांचे देखील योगदान असू शकते.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. नगरपरिषदे मार्फत आणि प्राधिकरणा मार्फत आराखडे तयार करीत असतांना त्यांच्यामध्ये जर समन्वय साधण्यात आला नाही तर सध्या मुंबई महानगरपालिका आणि एम.एम.आर.डी.ए. यांच्यामध्ये ज्या प्रमाणे वाद होत असतात तशाच प्रकार वाद त्या ठिकाणीसुध्दा निर्माण होऊ शकतो. पंढरपूर शहरासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करीत असातंना तीर्थ क्षेत्राचे पावित्र्य ठेवले गेले पाहिजे. त्याचबरोबर ज्या ज्यावेळी तीर्थक्षेत्राचा विकास करण्याचे विचार मी ऐकते त्या वेळी तिरुपतीच्या धर्तीवर विकास करण्यात येईल असे सांगण्यात येत असते .तिरुपती देवस्थानचा परिसर अत्यंत सुंदर आणि स्वच्छ आहे. परंतु तिरुपतीचा विकास करण्यासंबंधी जे काही निर्णय घ्यावयाचे असतात ते घेण्याचे अधिकार देवस्थान समितीला आहेत. पंढरपूरची परिस्थिती पाहिली तर तेथे अनेक धार्मिक श्रध्दांबरोबर अनेक प्रकारच्या रीतीभाती पाळल्या जातात त्यामुळे लोकांच्या धार्मिक भावना

2

डॉ.नीलम गो-हे......

दुखावल्या जाणार नाहीत हे सुध्दा पाहणे आवश्यक आहे. पढरपूरच्या विकासाकरिता प्राधिकरण स्थापन करण्यात आलेले आहे आणि या प्राधिकरणाच्या माध्यमातून पंढरपूर शहराचा विकास करीत असतांना तेथील स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन प्राधिकरणाने काम केले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.या विधेयकाचे स्वागत करुन मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, पंढरपूर विकास प्राधिकरण विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, उशिरा का होईना शासनाच्या वतीने पंढरपूर विकासासाठी हे प्राधिकरण स्थापन करण्यासाठी शासनाने हे विधेयक आणलेले आहे त्याचे मी स्वागत करीत आहे. मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, प्राधिकरण स्थापन करण्यामध्ये उशीर झालेला आहे. ज्यावेळी शासनाने पंढरपूरचा विकास करण्याचे ठरविले होते त्यावेळी शासनाने जो काही निधी मंजूर केला होता तो निधी प्राधिकरणाच्या मार्फत खर्च करावयास पाहिजे होता परंतु प्राधिकरण स्थापन करण्यास उशीर झाला आहे. हे प्राधिकरण स्थापन करण्यामध्ये तेथील काही लोकांचा विरोध होता. त्यांनी विरोध कशासाठी केला होता याची कारणे समजू शकलेली नाही. परंतु प्राधिकरण होता कामा नये यासाठी काही लोकांचा व्हेस्टेड इंटरेस्ट होता . सभापती महोदय, या ठिकाणी मी मुद्दाम नमूद करु इच्छितो की, या प्राधिकरणाला तेथील नगरपालिकेचा विरोध होता, काही लोकप्रतिनिधींचा विरोध होता. नगरपालिकेच्या माध्यमातूनच शासनाचे पैसे खर्च झाले पाहिजेत अशी भूमिका काही लोकांनी मांडली होती. त्यामुळे प्राधिकरण स्थापन करण्यास शासनाने काही प्रमाणात उशीरच केला होता. दरम्यानच्या काळात पंढरपूर शहरासाठी जे पैसे देण्यात आले होते ते पैसे नगरपालिकेच्या माध्यमातूनच खर्च करण्यात आले होते. शासनाने पंढरपूर शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे पैसे दिलेले होते परंतु हे पैसे खर्च करीत असतांना कोणत्याही प्रकारची पारदर्शकता नव्हती. ही कामे करणारी जी मंडळी होती त्यांनी हे पैसे लाटले आणि विकासाची कामे करण्याचा फक्त देखावा निर्माण केला होता. या कामामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. म्हणूनच पंढरपूरचे प्राधिकरण स्थापन करण्यात यावे यासाठी आम्ही सभागृहात सातत्याने मागणी करीत होतो.

सभापती महोदय, हे प्राधिकरण स्थापन करण्याच्या विधेयकावर बोलत असतांना सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी अशी मागणी केली आहे की , नगरपालिका, पंढरपूर विकास प्राधिकरण, स्थानिक मंडळी, देवस्थान समिती यांच्यामध्ये योग्य प्रकारचा समन्वय राखण्यात आला पाहिजे. त्यांच्यामध्ये जर योग्य प्रकारचा समन्वय नसेल तर त्यांच्यात वाद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे नगरपालिका वेगळा आराखडा तयार करणार, देवस्थान वेगळा प्रस्ताव तयार करणार आणि प्राधिकरण वेगळा आराखडा तयार करणार. आपण याठिकाणी जी समिती नेमली आहे त्यामध्ये नगरपरिषदेचा एक प्रतिनिधी, देवस्थानचा एक प्रतिनिधी यांना प्रतिनिधीत्व दिल्यामुळे निश्चितपणे कायम समन्वय राहील. परंतु काही गोष्टींची आपण दखल घेतली पाहिजे. हे जे प्राधिकरण स्थापन झाले आहे त्याचे सर्व अधिकार राज्य सरकारने आपल्या ताब्यात घेतले आहेत. मी वैधानिक अधिकाराचे ज्ञापन वाचले त्यामध्ये पहिला खंड सोडला तर खंड 3 पासून खंड 17 पर्यंत सर्व अधिकार शासनाने ताब्यात घेतले आहेत. त्यामुळे हे प्राधिकरण नीटपणे काम करणार आहे की नाही? या प्राधिकरणामार्फत ज्या आवश्यक सेवा दिल्या जाणार आहेत. उदा. आरोग्य विभागाला अधिकार दिले आहेत, पी.डब्लू.डी.ला अधिकार दिले आहेत, विविध खात्यांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे प्रश्न असा आहे की, ज्यावेळी प्राधिकरणाचे काम सुरु होईल त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग असेल, वीज वितरण कंपनी असेल, आरोग्य विभाग असेल, नगर रचना विभाग असेल, जिल्हाधिकारी कार्यालय असेल, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती असेल, किंवा नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील, ज्या ज्या विभागांची कामे असतील त्याकरिता त्या विभागांची सेवा घ्यावयाची असेल तर त्यासाठी प्राधिकरण एखादा प्रस्ताव तयार करील आणि मग आमच्या खात्यामार्फत काही विशिष्ट कामे त्याठिकाणी करावयाची आहेत म्हणून आम्ही आमची सेवा या प्राधिकरणाला देवू शकणार नाही असे हे कर्मचारी सांगतील. त्यावेळी असा प्रश्न निर्माण होईल की, नगरपालिकेला चंद्रभागा नदीवर उड्डाण पूल बांधावयाचा असेल त्यावेळी त्यांना विचार करावा लागेल. ज्याप्रमाणे पंढरपूरच्या विकासाचा विचार करीत असतांना पंढरपूरच्या स्थानिक रहिवाश्यांचा विचार सुध्दा प्राधिकरणाने केला पाहिजे. हे करीत असतांना स्थानिक नागरीक, विविध सामाजिक व राजकीय संघटनांची मते आपण जाणून घेतली पाहिजेत. आज सद्यस्थितीत आषाढी एकदशीचे नियोजन करण्यासाठी घ्यावयाच्या बैठकीला सत्ताधारी पक्षाच्या लोकांना बोलाविले जाते. फक्त सत्ताधारी पक्षाचे लोक आषाढी एकादशी साजरी करणार आहेत काय? महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक लोक पंढरपूरमध्ये येतात. केवळ आपल्याच भागामधून येत नाहीत तर विदर्भ, मराठवाडयातील भाविक लोक सुध्दा जातात. शेवटी पंढरपूरचा पांडुरंग हा तिरुपतीसारखा श्रीमंत देव नाही. जो फाटका-तुटका, रंजला-गांजलेला आहे,ज्याच्या पायामध्ये चप्पल नाही असा वारकरी 300 ते 400 कि.मी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/ SBT/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर...

अंतरावरुन दिंडया घेऊन एक महिना अगोदर गावामधून निघून पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी येतो. रोज 20 ते 25 किलोमीटर चालत येऊन पंढरपूरला पोहोचल्यानंतर मात्र त्याची ससेहोलपट होते. त्याला प्यायला पाणी मिळत नाही, त्याच्याकरिता शौचालयाची, आंघोळीची, रहाण्याची नीट व्यवस्था नसते. सभापती महोदय, मी गेली बारा वर्षे आषाढीची वारी करीत असल्यामुळे मी तेथील चित्र पाहिले आहे.दिंडया घेऊन आलेले भाविक वारकरी शेतामध्ये, रस्त्यावर झोपलेले असतात. दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, एकदा विठ्ठलाचे दर्शन झाल्यानंतर वहातुकीचा खोळंबा होतो, चार-चार तास ट्रॅफिक जाम होते. त्याबाबत मला जाणीवपूर्वक सांगितले पाहिजे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महापूजा झाल्यानंतर तेथील जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, उप विभागीय अधिकारी यापैकी कोणत्याही अधिकाऱ्यांना तेथील निर्माण झालेल्या अव्यवस्थेबाबत फोन केल्यास त्यांचे फोन स्वीच ऑफ केलेले असतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MAP/KGS/ST पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:00

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

म्हणजे फक्त माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जी महापूजा केली जाते, तेवढया कालावधी पुरतेच या अधिकाऱ्यांचा उपयोग तेथे केला जातो काय ? त्याठिकाणी यात्रेच्या वेळी 8 लाख, 9 लाख, 10 लाखापर्यंत भाविक येतात आणि ते 3-4 दिवस पंढरपूरमध्ये रहातात. पण त्यांच्याबाबतीत कोणतीही व्यवस्था नीट होत नाही. या भाविकांना जर काही गोष्टींची गरज भासली तर तेथे कोणताही अधिकारी उपलब्ध तेथे उपलब्ध होऊ शकत नाही अशी स्थिती आहे. मग यात्रेच्या अगोदर नियोजनाकरता कशासाठी बैठका घेतल्या जातात. परंतु थातूर-मातूर नियोजनाच्या बैठका घेऊन आणि याबाबतीत वर्तमानपत्रांमध्ये योग्य ती प्रसिध्दी दिली जाते की, आम्ही पंढरपूरच्या वारीसाठी चांगले नियोजन केलेले आहे, चांगली तयारी केलेली आहे. पण प्रत्यक्षात मात्र तेथे कोणत्याही वारकऱ्यांची किंवा दिंडी घेऊन येणाऱ्या लोकांची व्यवस्था होत नाही. म्हणून या प्राधिकरणाची व्याप्ती थोडी वाढविली पाहिजे. आपण त्याठिकाणी सोयी-सवलती निर्माण करण्यासाठी प्राधिकरण निर्माण केले. पण आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशीच्या वेळेस येणाऱ्या भाविकांसाठी योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्याची जी बाब आहे, त्याचा अंतर्भाव या प्राधिकरणामध्ये असावयास पाहिजे. अशा प्रकारची माझी मागणी आहे. एकंदर या प्राधिकरणाने रस्ते बांधणे, पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे किंवा दोन दिवसापुरती आरोग्याची व्यवस्था करुन चालणार नाही, तर आषाढी व कार्तिकी एकादशीच्या वारीचे संपूर्ण नियोजन, तेथे येणाऱ्या प्रत्येक भाविकांची व्यवस्था, दिंडीची व्यवस्था केली पाहिजे. तेथे वारीच्या पूर्वी हजारो दिंड्या येत असतात. त्या लोकांच्या रहाण्याची सुध्दा प्राधिकरणाने केली पाहिजे. यादृष्टीने आपण या प्राधिकरणाची व्याप्ती वाढवावी एवढी मागणी करतो आणि माझे बोलणे संपवितो.

-----

. . . .2 पी-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला एकच सूचना करावयाची आहे की, ज्याप्रमाणे जम्मू-काश्मिर येथील माननीय राज्यपाल श्री.जगमोहन यांनी वैष्णवदेवीला जाण्यासाठी जो रस्ता आहे, तेथील 12 कि.मी.रस्त्यावर भाविकांसाठी वेगवेगळया सुविधा निर्माण केलेल्या आहेत. याठिकाणी पान नं.2 वर आपण हे पैसे कशासाठी खर्च केले जाणार आहेत ? तर याबाबतीत येथे असे म्हटलेले आहे की, "सोयीसुविधा" यामध्ये मार्ग, रस्ता, पूल, दळणवळणाची इतर कोणतीही साधने, खुली जागा, उद्यान, मनोरंजन, मैदान, क्रिडांगण, बाग बाजार इ. या गोष्टी कायम स्वरुपी असल्या तरी आषाढी व कार्तिकी एकादशीच्या वेळेस पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी त्याचा थोडाबहुत प्रमाणात उपयोग होईल आणि या गोष्टी केल्याच पाहिजेत. सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, तेथे जाणाऱ्या लोकांना दोन-चार दिवसांच्या कालावधीसाठी रहाण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. म्हणून तेथे लोकांसाठी धर्मशाळेच्या धर्तीवर जेवढी शक्य असतील तेवढी निवासस्थाने बांधता येतील काय ? याचा विचार झाला पाहिजे. तसेच त्याठिकाणी स्वच्छतेच्या बाबतीत देखील अधिक प्रकर्षाने लक्ष देण्याची गरज आहे. तेथे स्थानिक हॉटेल्स् किंवा लॉज असतात, पण ती यात्रेच्या वेळेस अपूरी पडतात. म्हणून तात्पुरत्या स्वरुपामध्ये तंबू बांधून लोकांच्या निवासाची तात्पुरती व्यवस्था करता येईल अशी मला येथे सूचना करावयाची आहे.

-----

. . . .2 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सदनासमोर पंढरपूर विकास प्राधिकरणाच्या संदर्भात विधेयक मांडण्यात आले आहे. संभाजी महाराजांच्या काळामध्ये या दिंडया सुरु झालेल्या आहेत आणि पांडुरंगाच्या दर्शनाकरता शेकडो वर्षे वारकरी येत आहेत. अशा प्रकारे शेकडो वर्षे चालणाऱ्या या गोष्टींबाबत शासनाला नियंत्रण करावेसे वाटत आहे. याचाच अर्थ असा की, सध्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या लोकांचा ओढा, ही संख्या वाढलेली आहे. सभागृहातील आमच्या आदरणीय रुक्मिणीला वंदन करुन मी माझे पुढील मत मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. सभापती महोदय, काही मुलभूत मुद्दे . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब जे बोलले, त्याला माझी हरकत आहे. "आदरणीय" असे म्हटले की प्रॉब्लेम येतो. "आदरणीय" असे बोलू नका, बाकी काहीही बोलावे अशी माझी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांना नम्र विनंती आहे.

**उपसभापती** : आदरणीय श्री.जयंत पाटील . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला त्यांना म्हणावयाचे नव्हते, परंतु ते जातात आणि ते ज्या पध्दतीने वागतात, ते आदरणीय आहेत का ? असा माझ्यापुढे प्रश्न उपस्थित झालेला आहे म्हणून तशी सुरुवात होती.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये हे सरकार आल्यानंतर पांडुरंगाची वाटणी कशी करतात, हे मी पाहिलेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

पंढरपूरच्या पांडुरंगाची मुख्यमंत्र्यांनी पूजा केली पाहिजे की, उपमुख्यमंत्र्यांनी पूजा केली पाहिजे.(अडथळा) ठीक आहे पण मग आमच्या चांगल्या गोष्टी कां घेत नाही? करायचेच असेल तर विकासाचे अनुकरण करावे. सभापती महोदय, आम्ही इतके आदर्श राज्यकर्ते होतो की, या शासनाला आमचा आदर्श पुढे चालवावा लागला. ज्या चुका केल्या आहेत त्याची नोंद घेऊन भविष्यात, हे आदर्श पाळताना जनतेने आता आबांना पुन्हा तेथे आणयचा विचार करावा, असे आपण सांगितल्या बद्दल मनापासून धन्यवाद देतो. 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल.'

सभापती महोदय, श्री. दिग्विजय सिंग हे सत्तेत असोत अथवा नसोत न चुकता गेले कित्येक दिवस पंढरपूरला येतात. कारण मी ज्या ज्या वेळी त्या ठिकाणी गेलो त्या त्यावेळी पुण्याचे रेस्टहाऊन त्यांच्यासाठी कायम बुक असलेले मी पाहिलेले आहे.पांडुरंगाचा राजकारणातील खरा सेवक मी श्री. दिग्विजय सिंगाच्या निमित्ताने निश्चित अनुभवला आहे. माझा मुद्दा असा आहे की, प्राधिकरण निर्माण झाले. या प्राधिकरणाला अध्यक्ष असलेच पाहिजेत. सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री हे या प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. पंढरपूरचा संबंध सोहळा पहाटे टी.व्ही.वर दाखवतात. विठ्ठल रखुमाईची पूर्ण पूजा दाखवितात. माननीय मुख्यमंत्री सपत्नीक त्या ठिकाणी हजर असतात. तुळशीचे दोन मोठे हार घालताना आम्ही त्यांना टी.व्ही.वर बघतो.

श्री. नितीन गडकरी (बसून) : उल्हास दादा त्या ठिकाणी असतात. आता श्री. विलासराव देशमुख केंद्रात गेल्यामुळे ते यावेळी पंढरपूरला रहातील की नाही माहीत नाही. कारण त्यांचा विठ्टल आता केंद्रात गेला आहे.

श्री. दिवाकर रावते : आम्ही आरतीमध्ये 'नारदतुंबरु' म्हणतो तसे ते सगळे असतात. श्री. उल्हासदादा पवार यांच्या शिवाय माननीय मुख्यमंत्र्यांना पांडुरंग भेटूच शकत नाही. सभापती महोदय, पंढरपूरच्या विठ्ठलाच्या पूजेचे दृश्य टी.व्ही.वर बघत असताना पांडुरंगा ऐवजी त्या ठिकाणी उभे असलेल्या लोकांचे हावभाव बघण्यासारखे असतात. ते चेहऱ्यावर हावभाव काय दाखवतात, जीभ बाहेर काय काढतात. पांडुरंगाची सजावट जशी होते तसे यांचे हावभाव बघायला मिळतात. आपण ते सर्व दश्य टी.व्ही.वर बघतो. अनुभवतो. आता प्रश्न असा आहे की,पांडुरंगाच्या आद्य पुजेचा पहिला मान कोणाचा? तो माननीय मुख्यमंत्र्यांनाच का असावा?असा माझा प्रश्न आहे. पांडुरंगाची पहिली पूजा माननीय मुख्यमंत्र्यांनीच का करायची? राज्याचे प्रमुख म्हणून त्यांनी नक्की दर्शन घ्यावे.परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

पिढया-न-पिढया वर्षा-नु-वर्षे ज्यांचा तो मान असेल त्यांनाच तो मान मिळाला पाहिजे या मताचा मी आहे.वारकरी त्या ठिकाणी उपस्थित असतात आणि पहिले दर्शन घेणाऱ्या पती पत्नीला माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येते. पांडुरंगाची पूजा होते त्यावेळी लोकांच्या भावना पांडुरंगाकडे एकरुप झालेल्या असतात. शरीरापेक्षा मोठा तुळशीचा हार माननीय मुख्यमंत्री सपत्नीक पांडुरंगाला घालताना टी.व्ही.वर दाखविण्यात येते. (अडथळा) तो लोकांच्या भावनेचा विषय आहे त्याबद्दल मला काहीच म्हणावयाचे नाही. प्रश्न असा आहे की, पहिल्यांदा माननीय मुख्यमंत्र्यांनीच का पूजा करायची? आषाढी एकादशीला माननीय मुख्यमंत्री पहिली पूजा करतात म्हणून कार्तिकी एकादशीला उपमुख्यमंत्री पूजा करतात. यातील विभत्सता माझ्या लक्षात आली आहे. हे थांबायला पहिजे असे माझे मत आहे. तुकोबांच्या भूमिमध्ये जो प्रकल्प आणण्यात येत होता त्याबद्‌ल काल-परवा बंडू तात्यांनी आंदोलन केले.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यांनी डाऊ कंपनीच्या विरोधात आंदोलन केले. त्यानंतर त्यांनी सांगितले की, आम्ही माननीय उपमुख्यमंत्र्यांना पूजेला येऊ देणार नाही. त्यांना येऊ दिले नाही. जर आपला अधिकार होता तर ते अडविणारे कोण आणि त्यांनी अडविले तर आपण थांबणारे कोण हे मला कळले नाही. या महाराष्ट्रामध्ये आम्ही गेल्या कार्तिकीला अशा प्रकारे पांडुरंगाच्या पूजेची उपेक्षा पाहिली. मग कधी तरी बंडू तात्यांना एकदम गहिवर आला. त्यांच्यामध्ये पांडुरंगाच्याप्रती असलेल्या भक्तीमुळे त्यांच्या कोठे तरी लक्षात आले की, आपण काही तरी चुकत आहोत. मी त्यावेळी असे म्हणालो होतो की, दया आणि क्षमा हा वसा जिथून मिळालेला आहे ते असे आक्रमक होतात आणि जाळपोळ करावयास निघतात ते योग्य आहे काय हा प्रश्न होता. आमच्या नागपूरचे प्रा. राम शेवाळकर आता हयात नाहीत. फक्त प्रा. राम शेवाळकर हे एकच असे प्रतिभासंपन्न लेखक निघाले की, ज्यांनी त्याबाबत आपली स्पष्ट भूमिका मांडली. बाकीच्यांनी भूमिका का मांडली नाही हा त्यांचा विषय आहे. कारण ते सारस्वतपुत्र आहेत. प्रतिभेचा अविष्कार कदाचित त्यावेळी त्यांच्यामध्ये झालेला नसेल. पण प्रा. राम शेवाळकरांनी ती भूमिका मांडली. माझा प्रश्न असा आहे की, त्यावेळी त्या पूजेच्या संदर्भात बंडू तात्यांनी अडवले.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बिलावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : मी विधेयकावरच बोलत आहे. पांडुरंगाच्या मानसन्मानाचा हा विषय आहे. पांडुरंग परत परत येत नसतो. तो आपल्याकडे कधी तरी एकदाच अवतरतो. विधान भवनात तो आताच अवतरला आहे तो परत येणार नाही. या ठिकाणी रुक्मिणी कायम आहे. सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. एकदा त्यांनी पूजा केली तर एकदा यांनी पूजा करावयाची याबाबत मला असे वाटते की, त्या क्षेत्रातील व्यक्तीने पहिली पूजा करावी. पाहिजे तर आमच्या उल्हासदादांना सल्ला देण्याचा अधिकार आहे, पण त्या क्षेत्रातील व्यक्तीने पहिली पूजा करावी. पहिला दर्शनाचा मान माननीय मुख्यमंत्र्यांना जरुर मिळावा. मग ही जी वाटणी आहे त्या वाटणीतून झालेला हा संघर्ष आहे. त्याच्यातून निर्माण झालेली ती दर्शनाची वाताहत आहे. मला हे सांगावे की, अधिकाराने जर कार्तिकीची पूजा आमच्या उपमुख्यमंत्र्यांनी करावयाची असताना त्यांना करु दिली नाही मग ती पूजा कोणी केली ? मग बंडू तात्यांना वाटले की, त्यांनी आता दर्शनाला यावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST

श्री. दिवाकर रावते .....

मग हे दर्शनाला गेले. दर्शनाच्या बाबतीत हे जे काही वातावरण निर्माण झाले त्यामध्ये आता प्राधिकरणाचे जे अध्यक्ष आहेत त्यांचा मान काय राहणार आहे ? पहिली पूजा ते करणार काय ? मग बाकीचे सदस्य सुध्दा आहेत. ते रांगेत उभे राहणार आणि पांडुरंगाचा जो खरा भक्त आहे, ज्याने पांडुरंग तुमच्या आमच्यासाठी भक्तीभावाने जपून ठेवला आहे त्या वारकऱ्याचा जो मान आहे तो मागे राहणार आणि यांची रांग पुढे असणार काय असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारतो की, कधी तरी हा गुंता सोडवावा आणि ज्येष्ठ वारकऱ्याला पूजेचा मान द्यावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी मात्र आदराने पहिले दर्शन घेतले तर हरकत नाही. परंतु अशा प्रकारे आपल्या पदाकरिता पांडुरंगाला वेठीस धरणे बरोबर आहे, असे मला वाटत नाही. हा विषय कधी कोणी मांडला नसता. आज आपण, हा विषय आणला म्हणून हे मी मांडत आहे. जाता जाता एकच सांगतो की, माननीय मंत्रिमहोदय श्री. हसन मुश्रीफ यांच्याकडे हे खाते आल्यापासून आमच्या हिंदू भक्तांची आणि संतांची फार चंगळ चालू झालेली आहे, त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. तुळजापूर झाले आता पांडुरंग झाला पुढचे एक एक आणू नका एवढेच सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 17 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 5 संमत करावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न एकमताने संमत झाला

**उपसभापती** : सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 5 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: देशाची आर्थिक राजधानी व राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची विविध समस्यांमुळे झालेली दुरावस्था

**मु.शी.**: देशाची आर्थिक राजधानी व राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची विविध समस्यांमुळे झालेली दुरावस्था या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, अरविंद सावंत, विनोद तावडे, अनिल परब, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, श्री. प्रकाश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय केळकर, किरण पावसकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"देशाची आर्थिक राजधानी व राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची विविध समस्यांमुळे दुरावस्था होणे, अनधिकृत झोपडपट्टयांना वारंवार संरक्षण देत गेल्यामुळे मुंबईत येणाऱ्या लोंढ्यात वाढ होणे, शहरात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशीय नागरिकांविरोधात शासनातर्फे कोणतीही कारवाई न होणे, सागरी किनारपट्टीच्या संरक्षणासाठी निश्चित स्वरुपाच्या उपाययोजना नसणे, मोठ्या प्रमाणात बोगस शिधापत्रिका देण्यात येणे, वाढत्या लोंढ्यांचा मुंबईतील नागरी सुविधांवर अतिशय विपरित परिणाम होणे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम्.एम्.आर.डी.ए) यांचे अनेक प्रकल्प रेंगाळल्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबण्याची समस्या गंभीर होण्याची शक्यता तसेच स्कायवॉकच्या वाढत्या संख्येमुळे जनतेत तीव्र नाराजी पसरणे, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीचे प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित राहणे, गिरण्यांच्या जमिनीवर मॉल उभे राहिले तरी तेथील गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काची घरे व देणी अद्याप न मिळणे, वाहनांची वाढती संख्या, उड्डाणपुलांचे दीर्घ कालावधीपासून सुरु असलेले बांधकाम, तसेच रस्ता रुंदीकरणाची कामे वेळेवर न झाल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होणे, प्रदुषण वाढणे, मुंबईतील वाहतुकीची जटील समस्या सोडविण्यासाठी मुंबईतील रेल्वे, मोनोरेल, मेट्रो, बसेस आदी वाहतूक सेवासाठी राज्य शासनाच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ SBT/

श्री.नितीन गडकरी...

कक्षेतील महामंडळ स्थापन करुन त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक नफ्याचा वापर मुंबई व राज्यातील पायाभूत सुविधांसाठी करण्याची आवश्यकता, तथापि, सादर केलेल्या अर्थसंकल्पात मुंबईतील सुविधांसाठी आवश्यक ती तरतूद नसणे, त्यामुळे समस्या सोडविण्यात शासनास आलेले अपयश व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, मुंबई ही देशाची व्यावसायिक व औद्योगिक राजधानी आहे. जगामध्ये कोठेही गेले तरी भारत (इंडिया) या शब्दाबरोबर मुंबईचा उल्लेख केला जातो. कारण मुंबई हे जगप्रसिध्द शहर आहे. राष्ट्राला अभिमान वाटेल असे हे शहर आहे. येथे करोडो लोक गुण्यागोविंदाने राहतात. करोडोच्या संख्येने लोकवस्ती असलेल्या शहराला सर्व प्रकारच्या सुविधा देऊन सर्व व्यवस्था अतिशय कठीण परिस्थितीमध्ये सुरळीतपणे चालू ठेवणारे जगातील आदर्श शहर आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने मुंबई हे अतिशय महत्वाचे शहर आहे. या शहराचे वैशिष्टय असे आहे की, हे नॅचरल हब आहे. एका बाजूला समुद्र आहे. दुसरीकडे रस्ता वाहतूक आहे तिसरीकडे रेल्वे वाहतूक, असा येथे संगम झालेला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, आंतरराष्ट्रीय पोर्ट, भारताला जोडणारे रेल्वे जंक्शन हे या शहराचे वैशिष्टय आहे. रात्री 12 वाजता महिला बाहेर पडली तरी तिला कोणताही धोका होणार नाही असा या शहराचा लौकिक आहे. आता थोडया अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी हा लौकिक कायम आहे. मी लहानपणी मुंबईला येत असे त्यावेळी लोक बेस्टच्या लाईनमध्ये उभे असल्याचे मी पहात असे. परंतु या मुंबईमध्ये परप्रांतियांचे लोंढे येऊ लागले आहेत त्यामुळे आजकाल लोक रांगा सोडत असल्याचे चित्र पहावयास मिळू लागले आहे.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती अलका देसाई )**

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी....)

म्हणजे कायदा मानणारी आणि कायद्यावर विश्वास ठेवणारी येथील जनता होती. शैक्षणिक, आरोग्य आणि सांस्कृतिक या तिन्ही क्षेत्रातील सर्व प्रकारच्या सुविधा या शहरामध्ये उपलब्ध आहेत. मुंबईचे क्षेत्र 437.71 कि.मी.आहे. मेट्रोपोलिटन एरिया 4355 चौ.कि.मी. आहे. मला मिळालेल्या माहितीनुसार मुंबईची एकूण लोकसंख्या 1 कोटी 77 लाख 27 हजार 61 इतकी होती. ही माझी माहिती काही दिवसापूर्वीची आहे. परंतु आता कदाचित ही लोकसंख्या 2 कोटीवर जाण्याची शक्यता आहे. पॉप्युलेशन डेन्सिटी 45 हजार 949 इतकी आहे. मुंबईतील सर्वात महत्वाचा प्रश्न हा आहे की, मुंबईच्या चारही बाजूला समुद्र आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्था हेवीली लोडेड आहे. मला पाच वर्षापूर्वी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्समध्ये रेल्वे अधिकाऱ्याच्या कॉन्फरन्सचे उद्घाटन करण्याची संधी मिळली. कॉन्फरन्सच्या अध्यक्षस्थानी ज्यांनी कोकण रेल्वे केली ते श्रीधर उपस्थित होते. मी उद्घाटनाच्या भाषणात असे म्हटले की, रेल्वेने एकच गोष्ट करावी आणि ती म्हणजे व्ही.टी.च्या परिसरात असलेल्या ऑफिसर्स क्वार्टर्स मधील राहाणा-या रेल्वेच्या अधिका-यांसाठी कल्याण, डोंबिवलीमध्ये क्वार्टर्स बांधून त्यांना तेथे राहावयास पाठवावे. त्या अधिका-यांनी रोज रेल्वेने जाणे-येणे केले, धक्के खाल्ले की त्यांना लोकल रेल्वेच्या गर्दीची त्यांना कल्पना येईल. त्या शिवाय त्यांना रेल्वेने प्रवास करणा-या माणसाचे दुःख समजणार नाही. या अधिका-यांचे डोके ठिकाणावर आहे काय ? असे मी त्यावेळी नाराजीने म्हटले होते.

सभापती महोदय, पहिली गोष्ट मला सांगावयाची आहे आणि ती म्हणजे दिल्लीमध्ये मेट्रो आहे. मुंबईकरिता लोकल रेल्वे आहे. मग ती एलआरटी असेल किंवा मेट्रोरेल असेल किंवा ब्रॉडगेजवर चालणारी मुंबईची लोकल असेल. मला स्पष्टपणे सांगावयाचे आहे की, सेंट्रल रेल्वे, दक्षिण रल्वे, पूर्व-मध्य रेल्वे यांची टर्मिनल्स मुंबईमध्ये आहेत. मुंबईमध्ये होणारी एलआरटीअसेल, स्काय बस असेल, ब्रॉड गेज आणि मिटर गेज रेल्वे असेल, या सर्व व्यवस्थ्ेसाठी मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन तयार केले पाहिजे अशी माझी सूचना आहे. त्यामध्ये केन्द्र शासन आणि महाराष्ट्र शासनाची हिस्सेदारी ठेवावी. अशा प्रकारचा माझा प्रयत्न होता. परंतु बीजेपीच्या राज्यात काही झाले नाही. मी नेहमी असे म्हणतो की, गडचिरोली जिल्हयातील प्रश्न हे मंत्रालयामध्ये बसलेल्या अधिका-याच्या लक्षात येत नाही. त्या प्रमाणे मुंबईच्या रेल्वेचे प्रश्न हे दिल्लीच्या संसदेत बसलेल्या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....

लोकप्रतिनिधींच्या लक्षात येत नाही. मुंबईची एलआरटी, एमआरटी, मोनोरेल किंवा स्काय बस, ब्रॉडगेजवर चालणारी लोकल रेल्वेची स्टेशन्स या सर्वांचे उत्पन्न विचारात घेऊन मेट्रोरेल कार्पोरेशन तयार करावे. त्यामध्ये 51 टक्के इक्विटी राज्य सरकारची आणि 49 टक्के इक्विटी केन्द्र सरकारची असावी. बाहेरच्या लोकांना देखील 10-10 टक्के इक्विटी द्यावी आणि प्रोफेशनल कार्पोरेशन करण्याचा विचार करावा. ही पहिली गोष्ट जोपर्यन्त करणार नाही तोपर्यन्त मुंबईच्या समस्या सुटू शकणार नाहीत. माझ्याकडे आकडेवारी आहे. मुंबईच्या सबर्बन ट्रेनने दररोज 75 ते 80 लाख लोक प्रवास करतात, बसेस मधून 60 लाख लोक प्रवास करतात. टॅक्सी आणि ऑटोरिक्षातून 10 लाख लोक प्रवास करतात, खाजगी वाहनातून 12-15 लाख लोक प्रवास करतात. तसेच मुंबईबाहेरचीही वाहने ये-जा करीत असतात. या सगळया गोष्टी लक्षात घेता मुंबईची सगळयात मोठी समस्या ही वाहतुकीची आहे. मला सरकारला विनंती करावयाची आहे की, केन्द्र सरकारने मुंबईतील रेल्वेकडे दुर्लक्ष केले. दिल्लीला मेट्रोकरिता केन्द्र सरकारने साडेनऊ हजार कोटी रुपये दिलेले आहेत. दिल्ली देशाची राजधानी आहे. तेथील मेट्रोकरिता साडेनऊ हजार कोटी रुपये अनुदान दिले जात असेल तर मुंबईच्या मेट्रोकरिता किती पैसे द्यायला पाहिजेत ?

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आज रिलायन्सचे प्रोजेक्ट सुरु आहेत, त्याबद्दलचे इन्टीग्रेटेड एम.एम.आर.डी.ए.ने प्लॅनिंग केले असले तरी त्याची कॉस्ट किती आहे ? आपण ट्रेनचे डबे आणि इतर गोष्टी बाहेरुन आणतो आहोत. त्यामुळे या वस्तुंची कॉस्ट वाढते. ती कॉस्ट पे करण्याची ताकत आपल्या जनतेची आहे काय ? ही सगळी टेक्नॉलॉजी आणून कन्स्ट्रक्शन आणि मॅन्युफॅक्चरीगंचे काम इंडियात केले असते आणि त्याची कॉस्ट कमी केली असती तर ते अधिक सोईचे झाले असते. खरे तर ही गोष्ट करण्याची निंतांत आवश्यकता आहे. आज जगात सात ते आठ कॉर्पोरेशन्स आहेत. चायना, सिंगापूर, जर्मनी येथील कॉर्पोरेशन्स बघितली आहेत. तुम्हाला जी टेक्नॉलॉजी आवडेल ती आपण या ठिकाणी आणावी आणि एकदा एकाच प्रकारचे रेल्वेचे डबे, एकाच प्रकारची सिस्टीम स्वीकारा. तुम्ही तज्ज्ञांची मते जाणून घेऊन व तुम्हाला आवडेल अशी सिस्टीम तुम्ही स्वीकारा. ते जर मल्टिप्लाय करीत गेलो तर कॉस्टींग कमी होईल, पर्यायाने रेल्वेची तिकीटे स्वस्त होतील. उद्या 100 रुपये तिकीट आकारले गेले तर तेवढे महाग तिकीट कोण घेईल ? मुंबईचा आम माणूस एवढे महाग तिकीट घेऊ शकतो काय ? त्यामुळे मुंबईच्या माणसाला प्रवासाची तिकीटे स्वस्त असतील तरच ती पडवडणार आहे. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, मेट्रो कॉर्पोरेशन ताबडतोबीने निर्माण करावे. हे कॉर्पोरेशन निर्माण केले तर मुंबई शहरातील एक मोठा प्रश्न सुटू शकेल.

सभापती महोदय, मुंबई शहरात वॉटर ट्रान्सपोर्टची तिसरी महत्वाची समस्या आहे. मी मंत्री होतो, तेव्हापासून वॉटर ट्रान्सपोर्टच्या बाबतीतील चर्चा सुरु आहे. कै.शंकरराव चव्हाण या राज्याचे मुख्यमंत्री होते. तेव्हा श्री.नितीन जोशी यांची हिमगिरी वॉटर ट्रान्सपोर्टची कंपनी होती. त्या कंपनीबरोबर वॉटर ट्रान्सपोर्टच्या बाबतीत एक करार झाला होता. 1975-76 या कालावधीत कै.शंकरराव चव्हाण या राज्यात मुख्यमंत्री होते. त्या कराराची अंमलबजावणी कोणत्याही प्रकारे झ ााली नाही. हे का झाले नाही याबाबतील विषय मी सभागृहात अनेक वेळेला मांडलेला आहे. मी परवा आस्ट्रेलिया व सिंगापूर येथे गेलो होतो. मला आवड आहे म्हणून तेथे हॉवरक्रॉप्टच्या संदर्भातील माहिती घेतली. बोरिवली पासून ते गेट-वे-ऑफ इंडिया येथपर्यंत हॉवरक्रॉप्टने प्रवास करावयाचा ठरविला तर त्याचे डॉलरमध्ये भाडे 200 रुपये एवढे होते. एवढया किंमतीचे तिकीट घेऊन प्रवासी जलप्रवास करु शकतात काय ? ती गोष्ट शक्य नाही. मी सरकारला त्यावेळी असे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

सुचविले होते की, मुंबई शहरात वॉटर ट्रान्सपोर्ट निर्माण करावयाचे असेल तर तुम्ही प्रायव्हेट जेट्टीच्या माध्यमातून हे ट्रान्सपोर्ट कमर्शियल करा. बी.ओ.टी.तत्वावर त्या जेट्टी डेव्हलप करा. आपण करु शकतो पण एवढा आपल्याकडे पैसा नाही. यासंदर्भात दरम्यानच्या कालावधीत प्रस्ताव आला होता. तो प्रस्ताव सध्या एम.एस.आर.डी.सी.कडे आहे. मुंबई शहराच्या बाबतीत असे शब्द वापरु नये. परंतु दुर्दैवाने ते शब्द वापरावे लागत आहे. पत्नी एक आहे आणि पती चार आहेत अशी या मुबई शहराची अवस्था आहे. एम.एम.आर.डी.ए.वेगळे, एम.एस.आर.डी.सी.वेगळे, मुंबई महापालिका वेगळी, राज्य शासन वेगळे आणि नगरविकास विभागाच्या परवानगीशिवाय काहीही कामे करता येत नाहीत. मुंबई शहराची द्रौपदीसारखी अवस्था आहे. मुंबई शहराच्या विकासासाठी वेगवेगळी प्राधिकरणे कार्यान्वित असल्यामुळे विकास कामांसंबंधी निर्णय होत नाहीत. वॉटर ट्रान्सपोर्टच्या बाबतीत सरकारला विनंती करतो की, तुम्ही 10 टक्के एम.आय.डी.सी.चे शेअर्स घ्या. 10 टक्के सिकॉमचे घ्या, 10 टक्के एम.एम.आर.डी.ए.चे घ्या. 10 टक्के शेअर्स सरकारने टाकावेत असे एकूण 49 टक्के शेअर्स गोळा करा. शासनाने प्रथम या ठिकाणी सांगितले पाहिजे की, 1 हजार शेअर्स हॉव्हरक्राफ्ट विकत घेणार आहे. ऑटोमोबाईलमधील नामवंत कंपन्या मग त्यात टाटा असेल, महिंद्र असेल कोणीही पुढे येईल. हॉव्हरक्राफ्टचे इंजिन इंडियात मॅन्युफॅक्चर करा. कन्सल्टंट विदेशी घ्या. डिझायनर आणि ऑर्किटेक्ट बाहेरच्या देशातील घ्या. पण त्या वस्तू हिंदुस्थानमध्ये तयार करा. जी वस्तू बाहेरच्या देशांच्या किंमतींचा विचार करुन 70 कोटी किंमतीची असेल ती वस्तू तुम्हाला 30 ते 35 कोटी रुपयांत तयार होऊ शकते. सभापती महोदया, एका हॉव्हरक्राफ्टमध्ये 200 व्यक्ती प्रवास करु शकतात. हॉव्हरक्राफ्ट तीन मजली वा चार मजली करता येते. लोकल रेल्वेमधून किड्या-मुंग्या सारखी जनता प्रवास करीत आहे. मला विश्वास आहे की, जलवाहतुकीसाठी हॉव्हरक्राफ्ट सेवा सुरु केली तर नरिमन पॉईंट पासून ते बोरिवलीपर्यंत 25 मिनिटांमध्ये पोहोचू. त्या हॉव्हरक्राफ्ट नरिमन पॉईंटला आणल्या तर पार्किंगची अडचण निर्माण होईल. सर्व हॉव्हरक्राफ्ट ऑबेरॉय हॉटेलच्या समोर आल्या तर काय करणार ? यासाठी तुम्हाला इंटरनॅशनल कन्सल्टंट बोलावून समुद्राच्या खाली आठ मजली, दहा मजली पार्किंग स्पेसेस करावे लागतील. जगात अनेक ठिकाणी अशी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली

....3

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आहे. या सर्व गोष्टी करणे शक्य आहे. परंतु या गोष्टीचे अनुभव असेलेले तज्ज्ञ इंडियामध्ये नाहीत. टेक्निकल कन्सल्टंट परदेशातून आणा. व्हेंन्डर्स आणि कॉन्ट्रॅक्टर इंडियन डेव्हलप करा. मॅनिफॅक्चरींग कॉस्ट रिडयूस करा. कॅपीटल कॉस्ट रिडयूस होईल. कॅपीटल कॉस्ट रिडयूस झाली तर आपल्या ग्राहकांना स्वस्तात प्रवास करता येईल. नरिमन पॉईंट ते बोरिवली पर्यंत जलप्रवासाचे तिकीट जास्तीत जास्त 30 रुपये असले पाहिजे. ही गोष्ट होऊ शकते. यासंदर्भात केंद्र शासनाकडे मागणी केली पाहिजे की, अशा प्रकारचे हॉव्हरक्राफ्ट तयार होणार आहेत, त्यासाठी ज्या मशिन्स लागणार आहेत, जे पार्टस् लागणार आहेत ते "They all should be exempted from all the types of taxes of Central as well as State Government. You reduce the cost also "

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

म्हणजे गरीब माणसाला जाणे शक्य होणार आहे. मी उद्योगपतींना सवलती द्या म्हणून बोलत नाही. सामान्य गरीब माणसाला प्रवास करायचा आहे त्याला परवडणारे रेट असले पाहिजेत, अशा प्रकारची वॉटर ट्रान्सपोर्ट तयार केली पाहिजे. रेल्वेची ट्रान्सपोर्ट करणारी कॉर्पोरेशन, मेट्रोसारखी कॉर्पोरेशन आणि वॉटर ट्रान्सपोर्टसाठी एक कॉर्पोरेशन अशी स्वतंत्र कॉर्पोरेशन्स तयार केली पाहिजेत. रोप वे सारखी पध्दत सुध्दा अंमलात आणता येईल. ती अगदी स्वस्त आहे. लिफ्ट असते, त्यामध्ये 7 ते 8 लोक बसून प्रवास करु शकतात. समुद्राच्या परिसरात ही व्यवस्था करता येईल. बोरीवली ते नरिमन पॉईंट या मार्गावर ये-जा करण्यासाठी अशी व्यवस्था केली तर त्याची कॉस्ट देखील कमी असेल आणि पावसाळ्यात देखील ही व्यवस्था सुरु ठेवता येईल. वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या मार्गावर वरच्या बाजूला सिमेंटचा पिलर उभा करुन त्याला लिफ्ट हँग करायची आणि राऊंड द क्लॉक पध्दतीने रोप वे सुरु करता येईल. मी स्वित्झर्लंडमध्ये अशा प्रकारची व्यवस्था पाहिली आहे. सभापती महोदय, we need best of the technology from the world. जगात जी चांगली टेक्नॉलॉजी आहे ती आणा. परंतु जे कन्स्ट्रक्शनचे काम आहे, मॅन्युफॅक्चरिंगचे काम आहे ते टाटा, बिर्ला, गोदरेज यांना करु द्या. भारतामध्ये हे काम केले तर याची कॉस्ट कमी होईल. मी लंडनमध्ये गेलो असताना ज्या हॉटेलमध्ये थांबलो होतो तिथे एक बाई मर्सिडिज गाडीमधून उतरली आणि माझ्या रुममध्ये आली. मी तिला विचारले काय काम आहे? तिने सांगितले मी संडास साफ करायला आली आहे. म्हणजे संडास साफ करायला येणारी बाई मर्सिडिज गाडी वापरते. मी तिला विचारले, तुला पगार किती मिळतो? तिने पौंडमध्ये मिळणारी पगाराची रक्कम सांगितली. हिशोब केल्यानंतर असे लक्षात आले की, तिला 3.60 लाख रुपये इतका पगार मिळतो. ज्या ठिकाणी बिसलेरी पाण्याची एक बाटली 300 रुपयांना मिळते तिथे कॉस्ट ही जास्तच राहणार. तुम्हाला भारतात 10 हजार रुपये महिना पगारावर काम करणारी माणसे मिळतील. 50 हजार रुपये पगारावर काम करणारे इंजिनिअर्स तयार आहेत. मला सभागृहाला एवढेच सांगायचे आहे की, जगातील कोणत्याही देशामध्ये जी कॉस्ट आहे ती त्यांच्या पर कॅपिटा इन्कमनुसार आपल्यापेक्षा कितीतरी जास्त येते. त्यामुळे त्यांचे लिव्हींग स्टॅण्डर्ड जास्त आहे. वॉटर ट्रान्सपोर्टची सुविधा ही भारतीय लोकांकडून भारतीय रुपयामध्ये केली तरच ती





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

व्हायबल होईल. अन्यथा व्हायबल होणार नाही. एमएमआरडीएने याचा अभ्यास करावा. मुंबईच्या ट्रान्सपोर्ट व्यवस्थेच्या संदर्भात बोलत असताना असे दिसून येते की, लोकांची डोकी भडकली आहेत. प्रत्येक जिल्हयात विमानतळ झाले पाहिजे असे म्हटले तर वृत्तपत्रात लिहितात, हे उद्योगपतींच्या बाजूने आहेत. म्हणून विमानतळ व्हायची मागणी करतात. विमानतळ यासाठी झाले पाहिजे की, गडचिरोली जिल्हयात विमानतळ झाले तर 50 कोटी रुपये गुंतवणूक करणारी सगळी माणसे मुंबईत राहतात त्यांना सुविधा उपलब्ध होईल. येथील माणसाला गडचिरोली जायचे असेल तर त्याला रेल्वे सुविधा पाहिजे, रस्त्याची सुविधा पाहिजे, विमानाची सुविधा पाहिजे. जमशेदजी टाटा चंद्रपूरला सुरजागडला आले होते. त्यांनी आयर्न ओरसाठी जागा पसंत केली होती. परंतु दळणवळणाची सुविधा नसल्यामुळे त्यांनी बिहारला पसंत केले. एमएमआरडीएने कफ परेड येथे हेलिपॅड उभारले आहे. परंतु सिक्युरिटीवाले किती झाले? कोणी व्हीआयपी आला तर रस्ता बंद करा, पोलीस उभे करा. बॅरिकेड उभे करा. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी विधानभवनाच्या बाहेर दरवर्षी तात्पुरते कंपाऊंड वॉल बांधले जाते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दरवर्षी असे काम करुन पैसे खातात. एकदा कॉंक्रिटची वॉल करुन टाका. पैसे वाचवा. तुम्ही अमेरिकेचे राष्ट्रपती मुंबईत येतात तेव्हा रस्त्यावर हात हलवित, शिट्टया वाजवून रस्ते बंद करता. मुंबईमध्ये त्वरित हेलिकॉप्टर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन तयार करा. खाजगी विकासक पुढे येतील त्यांना सर्व सुविधा द्या. वरळी, रेसकोर्सवर, कफ परेड येथे स्टेशन करा.

2डब्ल्यू.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

अशा प्रकारची 25 स्टेशन्स करावीत. मंत्री व त्यांच्या गाड्या येतात त्यावेळेस त्यांच्यासोबत त्यांचे चमचे, सिक्युरिटी व कार्यकर्ते यांच्या मिळून अनेक गाड्या असतात. मी वरळीला राहतो त्या ठिकाणी देखील रात्री-अपरात्री गाड्या चालूच राहतात व त्याचा लोकांना त्रास होतो म्हणून ते शिव्या सुध्दा देतात. मी मंत्री असतांनाचा हा अनुभव आहे. मी आता सुध्दा ट्राफिक सिग्नलवर थांबतो. म्हणून जेवढे व्हीआयपी येतील त्यांना सरळ सांताक्रुझ विमानतळावरुन मंत्रालयाच्या गच्चीवर आणावे आणि मंत्रालयाच्या गच्चीवरुन सांताक्रुझ अथवा सहारा विमानतळावर नेऊन ठेवायचे. मंत्रालयावर तशी जागा ॲव्हेलेबल आहे. तशी हेलिपॅडची मान्यता सुध्दा दिलेली आहे. असे केले तर मुंबईत आल्यानंतर मंत्रालयापर्यंत येण्यासाठी 1000-1000, 1500-1500 गाड्यांची गर्दी होणार नाही. कारण गर्दी कोणालाच आवडत नाही. माजी पंतप्रधान माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी एकदा माझ्यासमोरच सांगितले होते की, एवढी सिक्युरिटी मला नको. काही वेळा आवश्यक असते परंतु काही वेळा त्या सिक्युरिटीचा जनतेला त्रास होतो. म्हणून माझी विनंती आहे की, वॉटर ट्रान्सपोर्ट, रेल्वे ट्रान्सपोर्ट आणि हेलिकॅप्टर ट्रान्सपोर्ट इ. सुविधा निर्माण केल्या तर रस्त्यावरील ताण देखील कमी होईल आणि सुविधाही निर्माण होईल.

महोदय, मुंबईत सीएनजीच्या बसेस चालू आहेत. Even though, there is air pollution in the city of Mumbai. Sir, a World Bank Study Reports that 40,000 premature deaths and 1.7 crores respiratory hospital admissions occur in India due to air pollution. Around 20 lakhs people are affected every year due to air pollution in India and Rs. 4,500 cores are spent to diagnose those affected people. मुंबईत 2.2 करोड लाकांचे वर्किंग डेज पोल्यूशन रिलेटेड डिसीजमुळे खराब होतात. 9.1 लाख लोक पोल्यूशनमुळे अस्थमामध्ये आहेत. 5800 लोक हॉस्पिटलमध्ये पोल्यूशनमुळे ॲडमिट होतात. 24 हजार प्रौढ आणि 2.20 लाख मुले एवढ्या लोकांना पोल्युशनमुळे ब्रॉंकॉयटिस झालेला आहे. एव्हरी सेकंड चाईल्ड बिलो थ्री इयर्स हे लेड पोल्यूशनमुळे अफेक्टेड आहेत आणि 4863.31 हेल्थ डॅमेजेस कॉज्ड आहेत. याचा विचार करुन जरी मुंबईमध्ये सरकारने सीएनजी बसेस ॲव्हेलेबल केल्या, मंत्र्यांच्या गाड्या पेट्रोलऐवजी

.....2

श्री. नितीन गडकरी .....

सीएनजीवर केल्या तसेच सर्वसमावेशक असा निर्णय घेतला तरी पोल्यूशनमध्ये फरक पडू शकतो. मी मंत्री असताना मंत्रालयातील तसेच शासनातील सर्व ॲम्बेसेडर गाड्या सीएनजीवर कराव्यात म्हणून ऑर्डर्स काढून गेलो होतो. आज त्याला 9 वर्षे झाली परंतु तसा निर्णय मात्र होत नाही. सध्या तर ज्या गाड्या आहेत त्यांची स्थिती पाहिली तर हॉर्न सोडून त्या गाड्यांचे सर्वच पार्ट वाजतात. त्यामुळे पाठीचे आजार उद्‌भवतात. माझे देखील अशाच प्रकारे ॲक्सीडेंटमुळे साडेचार वर्षे वाया गेली. तसेच शासनाच्या गाड्या पेट्रोलवर चालतात आणि त्यातील पेट्रोल मोठ्या प्रमाणात विकले जाते. म्हणून या सर्व गाड्या सीएनजीमध्ये कन्व्हर्ट कराव्यात आणि पोल्यूशन कमी करण्यास मदत करावी. कारण शेवटी पोल्यूशन कमी करण्याची नितांत गरज आहे. मंत्रालयाला येणारे महत्वाचे रस्ते म्हणजे इस्टर्न एक्सप्रेस हायवे, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सायन-पनवेल आणि एल.बी.एस. मार्ग असे चार मुख्य मार्ग असून त्या रस्त्यावरुन दररोज 4 लाख गाड्यांची ये-जा होत असते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, मुंबईमध्ये वरळी-बांद्रा सी-लिंक प्रोजेक्ट होत आहे ही चांगली गोष्ट आहे. खरे म्हणजे हा प्रोजेक्ट बांद्रयापासून वसईपर्यंत आणि बांद्रा ते नरिमन पाईंटपर्यंत जोडावयास पाहिजे. नरिमन पॉईंटपासून अंडरग्राऊंड टनेल करुन न्हावा-शेवा ते शिवडी रस्त्याला जोडावयास पाहिजे व समुद्रातील संपूर्ण लिंक केली पाहिजे. हे जर झाले तर मुंबईच्या बाहेरच्या बाहेर ट्राफिक फिरली तर मुंबईमध्ये पोल्यूशन होणार नाही. जे.जे. हॉस्पीटलच्या फ्लायओव्हर ब्रिजचे काम माझ्या काळात झाले होते त्यावेळेस फ्लायओव्हर ब्रिजच्या संदर्भात खूप टीका झाली होती. व्ही.टी. पासून जे.जे. हॉस्पीटल पर्यंत जाण्यासाठी अगोदर 35 मिनिटे लागायची परंतु हा ओव्हर ब्रिज झाल्यामुळे आता केवळ 3 मिनिटच लागतात. आज एअरपोर्टचा रोड एलिव्हेटेड झालेला आहे. तुम्ही एलिव्हेटेड रोड तयार करीत आहात परंतु आज जगामध्ये रस्त्यात टनेल्स केले जात आहे. माहीम जंक्शन मध्ये ट्रॅफिक नेहमी जाम होत असते. अनेक चौकात आता अंडरग्राऊंड टनेल्स करण्याची आवश्यकता आहे. मला कधी कधी वाटते की, आपण चूक केली. आम्ही मुंबईतील बहुतेक रस्त्यावर पूल बांधले. आपल्याजवळ पैसे येतील परंतु मुंबईत जागा मिळणार नाही. मुंबईच्या तिन्ही बाजूने समुद्र असल्यामुळे जागा मिळणार नाही. माझे मन असे सांगते की, मुंबईमध्ये जागा कमी असल्यामुळे पैसे जास्त जरी लागले तरी ठिकठिकाणी अंडर ग्राऊंडस् टनेल्स तयार केले पाहिजे. मी पॅरीस मध्ये फिरत होतो तेव्हा एका टनेल मध्ये शिरलो परंतु त्या टनेलच्यावर फूटबॉल मॅच सुरु होती. Sir, you can donate an eye but you cannot donate a vision. मी जे चांगले पाहतो ते चांगले पाहण्याची आणि त्यातून काही शिकण्याची दृष्टी न मिळाल्यामुळे ज्यांना निर्णय घेण्याची संधी मिळाली आहे त्यांना विकासाची दृष्टी न मिळाल्यामुळे, मुंबईतील जनता सडत पडलेली आहे. खरे म्हणजे आमदारांना परदेशात चांगले शिकण्यासाठी पाठविले पाहिजे. मी कोकण रेल्वेच्या इंजिनिअर्सना एमएसआरडीसीच्या पैशाने हॉंगकॉंगला पाठविले होते. ते इंजिनिअर हॉंगकॉंगमध्ये गेले नसते तर मुंबई-पुणे हायवेचे एवढे चांगले टनेल्स तयार होणे शक्य नव्हते. टेक्नॉलॉजी आता खूप मोठया प्रमाणात बदलत आहे. गाडीच्या वेगाने वरचे पंखे फिरतात व पंखे फिरल्यामुळे वीज जनरेट होते व त्यातून लाईट लागतात एवढया पुढे आता टेक्नॉलॉजी गेलेली आहे. जगात जे चांगले आहे ते बघितल्याशिवाय

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ ST/

श्री. नितीन गडकरी .......

तुम्हाला चांगल्या गोष्टी करता येत नाहीत. मुंबईत नतद्रष्ट लोक आहेत, माइक्रोस्पीक मायनोरीटीचे काही लोक राहतात. ओव्हल मैदानाच्या 10 मजले खाली 60 ते 70 हजार गाडया राहू शकतील असे पार्कींगचे प्रपोजल आहे. एक पैसा सरकारकडून न मागता व्ही.टी. पासून ते कफ परेड पर्यंत मी एलआरटी चालवतो. मी जे प्रपोजल दिले होते त्या प्रपोजलमध्ये लोकांना टॅक्सीने जाण्याची गरजच पडणार नाही. लोक एलआरटीमध्ये बसतील आणि आपल्या ऑफिसजवळ उतरतील. सिंगापूर मध्ये सुध्दा एलआरटी प्रोजेक्ट आहे. ऑस्ट्रेलियामध्ये तर एका इमारतीला लागून एक अशा 20-20 कि.मी. लांबीच्या इमारती बांधलेल्या आहेत. त्यामुळे कोणी रस्त्यावर दिसतच नाही. जगातील चांगले बघितल्याशिवाय मुंबई कशी सुधारावयाची ते यांना काही सुचणार नाही. त्यामुळे माझी विंनती आहे की, याबाबतीत अंडरग्राऊंड टनेल करण्याची आवश्यकता आहे. मलबार हिल या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या रस्त्यावर रात्री मोठ मोठया गाडया उभ्या असतात, दादर, शिवाजी पार्क येथे सुध्दा रस्त्यावर गाडया उभ्या असतात. तेथे जे गार्डन्स आहेत मैदान आहेत त्याच्या खाली 10-20 हजार पार्कींगची सोय करा लोक पैसे देण्यास तयार आहेत. जसे परिवार नियोजन आहे तसे गाडयांचे नियोजन करावे लागणार आहे. 750 फुटाच्या घरात राहणा-या लोकांकडे 4-4 गाडया आहेत. मुलाची गाडी, मुलीची गाडी, वडिलांची, आईची गाडी आणि कुत्र्यालाही गाडी आहे. सिंगापूरमध्ये जर नवीन गाडी घ्यावयाची असेल तर जुनी गाडी भंगारमध्ये काढल्याशिवाय नवीन गाडी मिळत नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 15.45

श्री.नितीन गडकरी...

आज मुंबई शहरामध्ये ज्या टॅक्सीज आहेत त्या अत्यंत वाईट अवस्थेत आहेत. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असल्यामुळे येथील जुन्या व नादुरुस्त टॅक्सीज त्वरित बदलण्याची आवश्यकता आहे परंतु त्या बदलू नयेत यासाठी टॅक्सी युनियनचे पदाधिकारी कोर्टात गेलेले आहेत. ज्या जुन्या व नादुरुस्त टॅक्सीज आहेत त्या ऐवजी नवीन व चांगल्या टॅक्सीज घेण्यात आल्या पाहिजेत .त्याचबरोबर फियाट टॅक्सीज बंद करावयास पाहिजे.नवीन टॅक्सीज घेण्याकरिता त्यांना कमी व्याजाने पैसे दिले गेले पाहिजेत. मुंबई शहरातील काही जुन्या टॅक्सीज बदलण्यात आल्या असून नवीन टॅक्सीज आलेल्या आहेत. परंतु सगळयाच जुन्या टॅक्सीज बदलण्यात आल्या नाहीत. जुन्या फियाट गाडयामुळे मोठया प्रमाणावर प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण वाढू नये यासाठी सर्व टॅक्सीज आणि ॲटो रिक्शा सीएनजीवर चालविण्यात आल्या पाहिजेत. लेड पोल्युशन आणि सल्फर पोल्युशन मोठया प्रमाणावर वाढत असल्यामुळे माणसाच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असतो म्हणूनच विजेवर` किंवा सीएनजीवर चालणा-या गाडया असल्या पाहिजेत त्यामुळे लेड पोल्युशन आणि सल्फर पोल्युशन टाळता येऊ शकेल.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, या निमित्ताने मला शासनाला एक विनंती करावयाची आहे. वरळी बांद्रा सी लींक प्रकल्प तयार झालेला आहे परंतु तो प्रकल्प तयार करण्यामध्ये सरकारची कार्यक्षमता किती आहे ? सभापती महोदया, हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीला 420 कोटी रुपयांचे काम मंत्री असतांना मी दिले होते व या कामाचा कालावधी अडीच वर्षाचा ठरविण्यात आला होता . परंतु आपले सरकार सत्तेवर आल्यानंतर या कामाचा कालावधी साडेनऊ वर्षाचा करण्यात आला असून कामाची किंमत 1680 कोटी रुपये ठरविण्यात आली आहे. अशा प्रकारे आपण लोकांच्या पैशाचा अपव्यय करीत आहात आणि लोंकांची फसवणूक करीत आहात. मुंबईच्या उड्डाण पुलाच्या कामाची किंमत 1800 कोटी रुपयांची ठरविण्यात आली होती. युती शासनाच्या काळात आम्ही एक हजार कोटी रुपयामध्ये उड्डाण पूले बांधली असून 800 कोटी रुपयांची बचत केली होती. मुंबई - पुणे हाय वेच्या कामाचे लोएस्ट टेन्डर 3600 कोटी रुपयांचे होते ते रिजेक्ट करण्यात आले परंतु हा रस्ता 1650 कोटी रुपयामध्ये बांधून पूर्ण झाला आहे. बांद्रा - वरळी सी लिंकचे .420 कोटी रुपयाचे जे काम मी दिले होते ते काम आपल्या शासनाने 1680 कोटी रुपयामध्ये नेले आहे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

तेव्हा आपल्याला जनतेच्या पैशाची काहीच किंमत नाही काय ?

सभापती महोदया, नरिमन पॉईन्ट ते वसई पर्यन्त समुद्रावरुन रस्ता करण्याची आज गरज आहे. आपल्या पैकी कोण कोणते सन्माननीय सदस्य मालाड वा बोरिवली येथे राहतात हे मला माहीत नाही. पंरतु हा रस्ता झाला तर बोरिवलीहून 22 मिनिटामध्ये नरिमन पाईन्टला पोहोचता येईल. वरळी - बांद्रा सी लिंक आता तयार झाला आहे . मी वरळीला राहतो आणि माहीम पासून विमानतळावर जाण्यासाठी मला सात मिनिटे लागतात परंतु हा रस्ता झाल्यामुळे वरळीहून मी पाच मिनिटात माहीमला पोहोचेल आणि तेथून सात मिनिटात एअर पोर्टवर पोहोचेल म्हणजे वरळीवरुन एअरपोर्टला जाण्यासाठी मला फक्त बारा मिनिटे लागणार आहेत. त्याचबरोबर व्ही.टी.वरुन एअरपोर्टला जाण्यासाठी 35 मिनिटे लागतील. त्यामुळे गाडया कमी धावतील, पेट्रोल - डिझेलची बचत होईल आणि प्रदूषणसुध्दा कमी होईल.

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. कर्नाटक हे देशातील पहिले राज्य असे आहे की, ज्या राज्याने स्टेट ट्रान्सपोर्टच्या गाडया इथेनॉल मिश्रीत डिझेलवर चालविल्या आहेत. त्यामुळे लिटर मागे एक रुपया वाचतो. सभापती महोदया, इथेनॉल बेस डिझेल पंपाचे उदघाटन माझ्या कारखान्यावर परवा होणार आहे. इथेनॉल बेस्ड डिझेलमुळे लेड पोल्युशन कमी होणार आहे . आपल्या राज्यातील एस.टी.ने तसेच ट्रक्सने जर इथेनॉल बेस्ड डिझेल वापरले तर ते एक रुपयाने स्वस्त पडेल आणि प्रदूषणसुध्दा कमी होईल. एमएमआरडीए आणि नगरविकास विभागाने प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या पाहिजेत. इथेनॉल हे ग्रीन फयुएल असून ते शेतकरी तयार करतात. दरवर्षी 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे क्रूड ऑईल इम्पोर्ट केले जाते . त्याऐवजी कोल्हापूर, सांगली,सातारा भागातील शेतकरी इथेनॉल तयार करु शकतील व ते इथेनॉल पंपाव्दारे वापरण्यात आले तर फॉरिन एक्सचेंजची मोठया प्रमाणावर बचत होईल त्याचबरोबर शेतक-यांना पैसे मिळतील व प्रदूषणही कमी होईल. परंतु हे काम करण्यासाठी सरकारने इच्छा शक्ती दाखवली पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. श्री.शरद पवार यांच्या रुपाने एक चांगले नेते आपल्याला

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

लाभले आहेत त्यांना ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲबिलीटी आहे. त्यांच्यामधील काही गोष्टीसंबंधी मला नितांत आदर आहे परंतु त्यांच्या शिष्यांनी मात्र त्याच्या तोंडाला काळे फासले आहे ही दुर्देवाची गोष्ट आहे. या ठिकाणी मी ही गोष्ट आपल्याला अत्यंत स्पष्टपणे सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री .गुरुनाथ कुलकर्णी यांना मंत्री पदावर काम करण्याची संधी मिळाली नाही परंतु ज्यांना ही संधी मिळाली होती त्यांनी वाटोळे केले होते. वरळी - बांद्रा सी लिंक सारखे मोठे प्रकल्प शहरात राबविण्यात आले. बांधकाम विभागाचा मंत्री राष्ट्रवादी पक्षाचा आहे परंतु राज्यामध्ये रस्त्यांचा विकास झालेला नाही, राज्यामध्ये सहा हजार मेगॅवॅटस विजेची कमतरता आहे आणि उर्जा विभाग राष्ट्रवादी कॉग्रेसकडे आहे, गृह विभागाचा मंत्रीसुध्दा राष्ट्रवादी पक्षाचा आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना मांडत असतात आणि नाशिक मध्ये असे घडले , पुण्यामध्ये तसे घडले याबाबतीत येथे चर्चा घडवून आणत असतात. त्यांच्याकडून सतत ओरड होत असल्यामुळे आम्हाला त्याबाबतीत ओरडयाची काहीही गरज नाही. त्यांच्या कडूनच सरकारचे कपडे उतरविले जातात. श्री.शरद पवार यांच्याबद्दल मला आदर आहे. एम.एस.आर.डी.सी.मध्ये श्री. बापू करंदीकर नावाचे एमडी होते.

नंतर श्री.सरफरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

त्यांना माननीय श्री. शरद पवार साहेबांनी माझ्याकडे पाठविले. ते माझ्याकडे अडीच तास बसले आणि मला आपली मदत पाहिजे असे म्हणाले. हे आपले अपत्य असल्यामुळे हे वाचले पाहिजे. त्यावेळी मुंबई-पूना हायवे हा लॉस मेकींग झाला म्हणून या जुन्या रस्त्याचे खाजगीकरण करावयाचे आणि त्याला टोल लावून हा रस्ता व्हायेबल करावयाचा हे मी त्यांना सुचविले. त्यांना पटल्यानंतर मी आणि माननीय श्री. पवार साहेबांनी त्यांना मदत केली. आज तो प्रोजेक्ट व्हायेबल झाला. माननीय श्री. पवार साहेबांच्या हे मनात आहे. परंतु त्यांच्या शिष्यांना लक्ष्मीदर्शनाशिवाय काही घेणे देणे नाही. त्यामुळे काही लोकांची सुट्टी झाली. अशाप्रकारे ही वरळी-बांद्रा पूलाची ट्रॅजेडी झाली. केवळ राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षामध्ये लक्ष्मीदर्शन होते असे माझे म्हणणे नाही तर सर्वच सरकारमध्ये लक्ष्मीप्रती सहानुभूतीचा दृष्टीकोन आहे. तेही करा परंतु पैसे खाण्याची आचारसंहिता तयार करा. क्वॉलिटी वर्क केल्यानंतर टक्केवारी घ्या. लोकांना तेही चालेल परंतु काम खराब करु नका. दोन-चार टक्के घ्यायचे ते घ्या, परंतु काम चांगले करा. दुसरी गोष्ट म्हणजे काम करुन पैसे खा. काम न करता पैसे खावू नका. एकीकडे एस्टिमेट कॉस्ट वाटेल तशी वाढवायची, परंतु काम करावयाचे नाही. सभापती महोदय, प्रोजेक्टला डिले झाल्यामुळे पैसा कुणाचा गेला? मी आचारसंहिता यासाठी सांगतो की, हे 400 कोटींचे काम आपण तीन वर्षात 700 कोटींमध्ये पूर्ण केले असते तर त्यामुळे जनतेचे कमीत कमी 900 कोटी रुपये वाचले असते. तुम्ही या ठिकाणी 400 कोटींचे एस्टिमेट 1650 कोटींवर नेले. यामुळे संपूर्ण राज्य आपण खड्डयामध्ये घातले. शेवटी चांगले काम करणाऱ्या माणसाला सन्मान नाही. आणि वाईट काम करणाऱ्या माणसाला शिक्षा नाही.

सभापती महोदय,मंत्रिमहोदयांना मी एक गोष्ट सांगतो. आपल्याकडे श्री. मोमीन नावाचे एक अधिकारी आहेत ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेक्रेटरी होते. त्याचप्रमाण् श्री. फकीर नावाचे चिफ इंजिनिअर होते, ते अजूनही आहेत. दोघेही मुसलमान आहेत. हे दोन्ही अधिकारी माझे फेव्हरेट अधिकारी आहेत. त्यांना आपण विचारावे की, श्री.नितीन गडकरी यांनी तुम्हाला त्यांना टेंडर द्यायला सांगितले काय? काम करणाऱ्या माणसाच्या पाठीमागे मी हिंमतीने उभा राहिलो. त्याची भाषा, जात, धर्म, पंथ पाहिला नाही. जो काम करतो त्याचा गौरव केला आणि जो करीत नाही त्याला ठोकण्यास मी मागे पुढे पाहिले नाही तेव्हा हे काम झाले. तुमचा स्टाफ आपल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. नितीन गडकरी..

जातीचा असला पाहिजे, तुम्हाला सेक्रेटरी आपल्या जातीचे पाहिजेत. तो आपल्या जातीचा नाही म्हणून त्याला नेमू नका असे धंदे आपण कशासाठी सुरु केले? आणि पुन्हा आम्हाला सांगता की, आमचा महाराष्ट्र बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांचा आहे. श्री. धवड हे मराठा आहेत म्हणून त्यांना पी.डब्लू.डी. चे सेक्रेटरी करीत नाहीत. हा चांगला माणूस आपल्याकडे असतांना चिफ इंजिनिअरकडे सेक्रेटरीचा चार्ज कां दिला? पी.डब्लू.डी. साठी चांगला मराठा अधिकारी असतांना त्याच्या नियुक्तीमध्ये ओ.बी.सी. आणि मराठा हे जातीचे राजकारण कशासाठी आणता? राजकारणाच्या ठिकाणी राजकारण करा. तुम्ही असे जर केले तर काम कसे होईल? तुम्ही ड्रायव्हर कधीही स्वस्त्यात ठेवू नका. त्याला दहा हजार रुपये पगार द्या. ड्रायव्हर तीन हजार पगारात स्वस्त्यात मिळाला फार चांगले झाले असे म्हणून त्याने गाडी खड्डयात घातली तर तुमच्यासहीत तो गेला तर काय फायदा? ही काम करणारी माणसे आहेत. त्यांच्या बाबतीत जात, पंथ, भाषा या आधारावर निर्णय घेऊ नका. म्हणून तुम्ही काम करणाऱ्या माणसाच्या पाठीवरुन हात फिरवा. जो काम करीत नाही त्याच्या पाठीवरुन हात फिरविण्याऐवजी त्याला दुसरे काही तरी लावा. सभापती महोदय, एकच अडचण आहे. If there is a will, there is a way. If there is no will then there is only a survey, discussion, and seminar, Committee and Sub-Committee, Research and so on. सगळा वेळ वाया जातो, मुंबई बकाल झाली. गर्दी असल्यामुळे रस्त्यावरुन चालता येत नाही. पोल्युशन वाढले, ट्रान्सपोर्ट सिस्टीम नाही. सभापती महोदय, ज्या लोकांनी जुन्या काळी मुंबईची पाणी व्यवस्था आणि इलेक्ट्रिक व्यवस्था केली आहे त्यांना मी सॅल्युट मारतो. मला कळत नाही ते जादूगार होते? कुणी पाईप फोडतात, कुणी पाईपलाईन फोडतात एवढे करुनही घरी पाणी व लाईट मिळते हा चमत्कार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

अहो, मुंबई कार्यरत आहे आणि माझा परमेश्वराच्या अस्तित्वावर एवढ्यासाठीच विश्वास आहे. तुम्ही कधीतरी लोकल मधून प्रवास करावा. आपल्याला लाज वाटते. मी विरोधी पक्षनेता असताना मला डोंबिवलीला जावयाचे होते, म्हणून फर्स्ट क्लासमध्ये बसलो. खरेच माननीय मंत्री महोदयांनी एकदा लोकलने प्रवास करावा. आपल्याला लाज वाटते. मला डब्यातील लोकांकडे बघतानाही लाज वाटते. बायका-माणसे एकमेकांना धक्के मारत आतमध्ये कसे जातात, कसे उतरतात ? हे सर्व पहात असताना मला लोकप्रतिनिधी म्हणून लाज वाटते. मला व्ही.आय.पी.ट्रिटमेंट मिळते, तुम्हाला देखील चांगली ट्रिटमेंट मिळते, आपण ए.सी.गाडयांमधून फिरतो. पण या लोकांची काय अवस्था आहे ? कोण मंत्री ? काय ही रेल्वे ? मग लोक का नक्षलवादी बनणार नाहीत ? हे लोक व्यवस्थेच्या बाबतीत का प्रतिकार करतात ? कारण याबाबतीत अतिरेक झालेला आहे. मुंबईतून गोळा झालेला पैसा दिल्लीमध्ये जातो, ते त्याचा फायदा घेतात आणि मुंबईसाठी काही देत नाहीत. या राज्यातील रेल्वे लाईनचे वाईंडींग करण्यासाठी 8-9 वर्षे लागतात काय ? त्याठिकाणी जर झोपडपट्टया असतील तर तेथील लोकांचे पुनर्वसन करण्याच्या बाबतीत आपलेच लोक कोर्टामध्ये जाऊन स्टे घेतात. सभापती महोदय, मला आपल्यामार्फत एक गोष्ट सभागृहाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचवावयाची आहे. मुंबई शहरामध्ये चांगले काम करीत असताना मला एक पोस्ट कार्ड देखील मिळाले नाही की, तुम्ही चांगले काम करीत आहात. पण कोर्टामध्ये 125 रिट पिटीशन दाखल झाली की, काम थांबवावे. वरळी-बांद्रा येथील काम थांबवावे, हे बंद करा, ते बंद करा. काय सुरु आहे ? आपण कुठे चाललो आहोत ? आपले कसे होणार आहे ? मला एक विनंती करावयाची आहे की, मुंबईचे प्रश्न हे भाषिक नाहीत, धार्मिक नाहीत, सांप्रदायिक नाहीत. मुंबई चारही बाजूनी समुद्रांनी वेढलेली आहे म्हणजे एक्सपान्शनला वाव नाही. आज अशी स्थिती आहे की, मुंबईमध्ये फक्त बाहेरच्या लोकांनी संतती वाढवावी आणि त्यांना मुंबईमध्ये पाठवावे. ते मत देतात म्हणून आव, आव, हे काय सुरु आहे ? मुंबईतील मराठी टक्का घसरला असे म्हटले जाते. पण मुंबईतील मराठी टक्का घसरला नाही तर मुंबईतील मराठी संस्कृती लोप पावत आहे. मी परवा इंटरनेटवर पाहिले की तामिळनाडू मध्ये तामिल भाषेचे मंत्रालय आहे, कर्नाटकमध्ये कन्नड भाषेचे मंत्रालय आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की, आज घरी जाऊन वेबसाईट उघडून पहा. त्या राज्यांमध्ये त्यांनी आपापल्या भाषेसाठी कोणकोणत्या गोष्टी केलेल्या आहेत ते पहावे. आज महाराष्ट्रामध्ये ...

. . . .3 ए-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

ज्ञानेश्वर, तुकाराम, विठ्ठल यांची नावे घेतली जातात, मराठी माणसांचा महाराष्ट्र असे म्हटले जाते आणि आमच्या मुंबईमध्ये विदेशी लोक येतात.ते बसतात, क्रिमिनल्स् येतात,रेड लाईट एरिया वाढत आहे. तरुण मुले तिकडे जात आहेत आणि अनेक रोगांचा प्रसार होत आहे. त्यांची आयुष्ये बरबाद होत आहेत पण कोणालाही कशाचे काही देणे-घेणे नाही. मागे एकदा माजी माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुखसाहेब यांनी मान्य केले होते की, मुंबईतील फ्लो थांबविला पाहिजे.मुंबईच्या प्रश्नाकडे पहाताना मराठी,हिंदी,गुजराथी इ.कोणत्याही गोष्टी न पाहता इन्फ्रास्ट्रक्चरल लिमिटेशन लक्षात घेता,वीज,पाणी व रस्ते यांची मर्यादा लक्षात घेता मुंबईत येणाऱ्या लोकांचा प्रवाह थांबविण्यासाठी सर्वपक्षीय एकमत केले पाहिजे. हे जर करणार नसाल तर ते बरोबर होणार नाही. हा एक हॉल आहे आणि यामध्ये 100-150 लोक बसलेले आहेत.पण तुम्ही सांगितले की,नाही, कोणीही यावे. मग येथे 20 हजार लोक बसू शकतात का ? नाही. सगळयांना अधिकार आहे.पण प्रत्यक्षात बसू शकतात काय ? सगळयांना अधिकार आहे ? घटनेने दिलेल्या अधिकारानुसार कोणी कुठेही जावे, कुठेही रहावे. हे मान्य आहे. याला आमचा विरोध नाही. पण एका खोलीमध्ये किती लोकांना कोंबावयाचे ? याला काही मर्यादा आहे की नाही ? एवढी सहिष्णुता आहे तर मग आपल्या घरामध्ये 100 लोक का कोंबत नाही. पण ते शक्य नाही.म्हणून मुंबई हे आपले घर समजले पाहिजे. महाराष्ट्राची संस्कृती, मराठी संस्कृती, इतिहास ही आपली विरासत आणि आई समजली पाहिजे. ही संस्कृती टिकविली पाहिजे. हे कल्चर भारतीय जनता पक्षाचे नाही. यावर शिवसेनेची मक्तेदारी नाही, यावर कॉंग्रेसची मक्तेदारी नाही, यावर मनसेची मक्तेदारी नाही. यावर महाराष्ट्राच्या भूमीमध्ये रहाणाऱ्या प्रत्येक माणसाची मक्तेदारी,त्याची संस्कृती,त्याचा इतिहास आहे. हा राजकीय विषय नाही. कारण कुठेतरी "नाही" म्हणावयास शिकले पाहिजे.कुठे तरी हे होणार नाही असे म्हणावयास शिकले पाहिजे. काही गोष्टी स्पष्टपणे सांगितल्या पाहिजेत. प्रत्येक गोष्ट ही व्होट बँक पॉलिटीक्सशी जोडावयाची असे करु नका आणि काही बाबतीत एकमताने निर्णय घेऊ.सगळयाच पक्षांनी मिळून एक निर्णय घेतला तर काय अडचण येणार आहे.

सभापती महोदय मुंबईतील गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.आज आतंकवाद्यांनी मुंबईला टारगेट बनविलेले आहे.समुद्राकडील सीमा असुरक्षित झालेल्या आहेत.आय.ए.एस.पासून लष्कर-ए-तोयबापासून अनेक बॉम्बस्फोटाच्या घटना घडविलेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती चिंताजनक आहे. वीज, पाणी, रस्ते याच्याबाबतीत मर्यादा केव्हाच संपलेली आहे. रस्ते रुंद करण्यास जागा नाही. लोकांना घरे देण्यास जागा नाही. नवीन इमारत बांधण्यास जागा नाही. येथील जो गिरणी कामगारांसारखा भूमिपुत्र आहे त्यांच्यासाठी आम्ही प्रत्येक अधिवेशनात लढतो. त्या ठिकाणी मॉल उभे राहिले. या गिरणी कामगारांच्या मुली आज लेडीज बारमध्ये जाऊन शेंगदाण्याच्या आणि काजूच्या बशा आणि दारुच्या बाटल्या उचलण्याचं काम करु लागल्या आहेत. त्यांना रोजगार नाही. त्यांनी एवढे मॉल उभे केले त्यामध्ये गिरणी कामगारांची मुले पोतेरे पुसण्याच्या लायकीची सुध्दा नाहीत काय ? त्या प्रत्येक घरातील एका मुलाला रोजगार मिळू शकला नसता काय ? सेक्शन टू सेक्शन प्रत्येक केसमध्ये मिल मालकाच्या बाबतीत आपण बदल केला. त्यांनी फक्त चिमण्या ठेवल्या. फसवणुकीला सुध्दा मर्यादा आहेत. त्या ठिकाणी जुन्या स्ट्रक्चरच्या चिमण्या दाखवल्या आणि आत एअरकंडिशन मार्केट उभे केले. हे सगळे सुरु आहे. पार्किन्ससाठी जागा केल्या. त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा धंदा सुरु आहे पण त्या ठिकाणी काम करणारा गिरणी कामगार मात्र भीक मागत फिरत आहे. 67 हजार कामगार होते. आज मुंबईमध्ये फक्त 33 हजार कामगार आहेत. अनेक कामगार मयत झाले. त्यांच्या कुटुंबाला 225 चौरस फुटाचे घर देण्याचे मान्य केले पण ते दिले नाही. त्यांच्या वारसांना प्रशिक्षण देण्याचे मान्य केले पण ते दिले नाही. हायकोर्टात जनहित याचिका दाखल झाली. न्यायमूर्ती जयनारायण पटेल साहेबांनी सरकारला निर्देश दिले त्याचे पालन होत नाही. नगरविकास विभागाने सेक्शन टू सेक्शन दुरुस्त्या करावयाच्या, लक्ष्मीदर्शन घ्यावयाचे, दणादण काम मंजूर करावयाचे, मग कोणीही मुख्यमंत्री होवोत, हे काम चालू आहे. बाहेर आल्यावर कामगारांच्या गोष्टी करावयाच्या आणि मंत्रालयात बसले की, त्यांची कामे करुन द्यावयाची असे चालले आहे. आपण कोठे चाललो आहोत ? या कामगारांमध्ये हिंदू आहेत, मुसलमान आहेत, बौध्द आहेत, सगळे लोक आहेत. हे मुंबईचे जुने रहिवाशी आहेत. माझा कोणालाही विरोध नाही. जे मुंबईमध्ये अनेक वर्षापासून राहात आहेत ते मुंबईकर आहेत. ही मी नव्हे तर श्री. उद्धव ठाकरे यांनी सांगितलेली व्याख्या आहे. पण त्याला आता मर्यादा आहे. 50 वर्षापूर्वी राहणारे असतील तर ठीक आहे पण पलीकडे भविष्यात

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/ KGS/ MAP

श्री. नितीन गडकरी .....

काय होणार ? सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब एकदा माझ्यावर चिडले होते. मी तिसऱ्या मुंबईचा प्रस्ताव दिला होता. मी असे म्हटले होते की, अर्बनायझेशन ही प्रोसेस आहे. आज महाराष्ट्रातील 35 विधानसभा मतदारसंघ कमी झाले. माझे म्हणणे नीट ऐकून घ्यावे. मी आपल्याला सांगतो की, पुढच्या दहा वर्षात आणखी 50 मतदारसंघ कमी होणार. शहरी लोकसंख्या आणि ग्रामीण लोकसंख्या पन्नास पन्नास टक्क्यावर आलेली आहे. हे असेच सुरु राहिले तर पुढच्या दहा वर्षात शहरी लोकसंख्या 70 टक्के आणि ग्रामीण लोकसंख्या 30 टक्के होईल आणि त्यामुळे पुन्हा जागा कमी होणार. गावे ओस पडत चाललेली आहेत. मुबई, पुणे शहरामध्ये बकालवस्ती वाढत चालली आहे. झोपडपट्टया वाढत चालल्या आहेत. याचा संबंध आमच्या चुकीच्या आर्थिक धोरणाशी आहे. आम्हाला निर्णय घ्यावयाचा असेल तर परिस्थिती बघून याबद्दलचा व्यावहारिक निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. आज मुंबईचा गिरणी कामगार असो, मुंबईमध्ये कोकणातून आलेले मच्छिमार असोत, आज कोठे मासे आहेत हे मला सांगावे. गटारामध्ये कधी मासे येतात का ? समुद्राचे सगळे गटार करुन टाकले आहे. मी रोज रात्री वरळी सी फेसवर बसतो. परवा रात्री साडेबारा वाजता मला माननीय मुख्यमंत्र्यांचा फोन आला. मी वरळी सी फेसवर बसलो होतो. त्यांनी विचारले की, नितीनजी, आपण कोठे आहात ? मी सांगितले की, वरळी सी फेसवर हवा खात आहे. त्यांना निवडणुकीच्या संदर्भात माझ्याशी बोलावयाचे होते. मी त्यांना म्हणालो की, आपण सुध्दा हवा खायला या. ते म्हणाले की, इकडे उद्याच्या निवडणुकीची दुसरी हवा सुरु आहे. मी त्यांना म्हणालो की, मी आता आपलीच आठवण काढत होतो. मी या ठिकाणी बसलो आहे आणि येथे फार घाणेरडा वास येत आहे, वरळी सी फेसवर बसण्याची सोय नाही. कुठला समुद्र ? समुद्राचे गटार झाले आहे. मुंबईचे सगळे घाणेरडे पाणी समुद्रात सोडतात. सभापती महोदया, माझी आपल्याला तसेच सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांना पुन्हा विनंती आहे. आपण जगातील समुद्र बघावेत. आपण मॉरिशसचा समुद्र बघावा. त्या ठिकाणी बघितल्यानंतर समुद्राचा तळ दिसतो. या ठिकाणी समुद्राचे गटार करुन टाकले आहे. मिठी नदी घुसवली. केमिकल्स घुसवले. ड्रेनेज घुसवले. जे आले ते समुद्रात टाकणे सुरु आहे. नागपूर महानगपालिका ही देशातील पहिली अश्ी महानगरपालिका आहे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/ KGS/ MAP

श्री. नितीन गडकरी ......

की ज्या महानगरपालिकेने आपले ड्रेनेजचे पाणी शुध्द करुन 15 लाख रुपयात राज्य वीज मंडळाला वीज निर्मितीकरिता दिले आणि आता आम्ही 100 कोटी रुपयांचे पाणी विकणार आहोत. आपल्या जवळ मुंबई शहरातील जेवढे घाण पाणी आहे ते 40 हजार मेगावॅट वीज निर्माण करील एवढे पाणी आहे. ते अहमदाबाद आणि नाशिककडे जाऊन शुध्द करुन जर ते पाणी वीज निर्मितीकरिता वापरले तर धरणातील पाणी वीज निर्मितीकरिता कशाला द्यावे लागेल ? विजेचा एक नवीन झोन तयार होईल. सभापती महोदया, माझी आपल्याला विनंती आहे. आपले सगळे किऑस झालेले आहे. काहीही वाचलेले नाही. आशेचा अंकूर म्हणून कोणी तरी यातून मार्ग काढावा. माझी एकच विनंती आहे. हा समुद्र आम्ही स्वच्छ करु. आम्ही प्रदूषण थांबवू. समुद्रातील पाण्याचे जे प्रदूषण आहे ते आम्ही कमी करु

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

त्याचबरोबर मुंबईच्या भागासाठी हाफिज कॉन्ट्रॅक्टर कमिटी होती. त्या कमिटीमार्फत आम्ही ग्रिन बेल्ट तयार करण्याची योजना आखली होती. या चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाला पुन्हा विनंती आहे. मुंबईची स्ट्रेन्थ काय आहे, विकनेसेस काय आहे त्याचा विचार करावा. एमएमआरडीएला 2025 पर्यंतचा मुंबईच्या विकासाचा इंटिग्रेटेड आराखडा तयार करण्यास सांगावे. केवळ मुंबई महानगरपालिकेचे काम आहे किंवा एमएसआरडीसीचे आहे असे शासनाने सांगू नये. यासाठी जागतिक स्तरावरील अत्याधुनिक सल्लागार येथे आणावेत. मुंबईतील जलवाहतूक, रेल्वे वाहतूक, बस वाहतूक या सेवांसाठी आंतरराष्ट्रीय सल्लागारांकडून प्लॅन तयार करुन घ्यावा. तुमच्याजवळ खोलीभर प्लॅन आहेत ते डिस्कार्ड करावेत. रद्दीमध्ये विकावेत आणि वर्तमान काळातील प्लॅन तयार करावेत. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अनिस अहमद यांना मी सांगतो की, या मुंबईतील भायखळयाची मस्जिदची जागा सुध्दा 26 रुपये चौ.फू.या दराने विकल्याचे निदर्शनास आले आहे. यामधून कोणालाही सोडत नाही. वक्फ बोर्डाची जमीन मंत्रिमहोदय वाचवित होते. परंतु ते स्वत:च त्यामध्ये अडचणीत आले. You can donate an eye, but you cannot donate avision.
विकासाची दृष्टी ठेवून कामे करावीत. मुंबई ही आमची आहे. महाराष्ट्राच्या मराठीच्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी आहे, मराठी म्हणजे केवळ मराठी भाषा बोलणारी नाही. गेल्या अनेक वर्षापासून जे मुंबईत जन्माला आले ते आमचे आहेत. मुंबई ही आमचे संस्कृती आहे, विरासत आहे. ती टिकली पाहिजे, मुंबईवर असलेल्या मर्यादा लक्षात घेता बाहेरुन येणा-या लोकसंख्येवर प्रतिबंध टाकला पाहिजे. शासनाने पर्यावरणासह एक चांगला प्लॅन तयार केला पाहिजे. तो कार्यक्रम सरकारने राबवावा. वरळी-वांद्रे सेतू मार्गासारखा असू नये. वरळी-वांद्रे सागरी सेतू 420 कोटींचा होता तो 1680 कोटींचा झाला. शासनाने जनतेचे दिवाळे वाजवू नये. या कार्यक्रमासाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी. या शहराला येत्या 10 वर्षामध्ये आम्ही बदलून टाकू असा निर्धार त्यात असेल तर काही होईल. अर्थात सरकारकडे कमी अवधी राहिला आहे. कारण 15 ऑगस्टपासून आचारसंहिता लागू होईल. पण साडेनऊ वर्षात शासनाने जो राज्य कारभार केला तो जनतेसमोर जाणार आहे. त्यामुळे जाता जाता का होईना मुंबईसाठी चांगले जरुर करुन जावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:10

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, देशाचे आदरणीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी या मुंबईचे शांघाय करण्याची घोषणा केली. ते शांघाय कसे असावे, त्याची व्हिजन कशी असावी हे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले. हे सांगताना त्यांनी भरपूर गमती केल्या. आपणही गमतीने हसत होतो. मला असे गमतीने वाटले की, पंतप्रधान कार्यालयामध्ये मुंबईसाठी एखादे खाते उघडले तर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना तेथे नेमण्यास हरकत नसावी. कारण एक प्रचंड व्हिजन या मुंबईकरिता त्यांनी दाखविलेली आहे.आमच्या व्यथा वेगळया आहेत. पिढयान पिढया या मुंबईमध्ये राहाणा-या लोकांच्या व्यथा वेगळया आहेत. त्यांची मुंबई त्यांना श्वास का घेऊ देत नाही ही त्यांची व्यथा आहे, त्यांची मुंबई त्यांना नीट जगू का देत नाही, ही त्यांची व्यथा आहे. या मुंबईमध्ये त्यांची पिढी कसे भविष्य घडविणार आहे, ही त्यांची व्यथा आहे. त्यावेळी बोगद्यामधून काय येणार, टनेलमधून काय जाणार, समुद्राच्याखाली 100 कि.मी.वर किती पार्किंग येणार, वर काय उडणार हा नंतरचा विकासाचा भाग आहे. पण हे सगळे झेलण्याकरिता मूळ मुंबईकर हा जर अस्तित्वात राहिला तर त्याला किंमत आहे. नाही तर आम्ही येतो आणि तुम्ही मरा असे सांगणा-यासाठी हा विकास होणार असेल तर त्याची आम्हाला काही गरज नाही आणि किंमतही नाही.

सभापती महोदय, या मुंबईच्या नेमक्या कोणत्या प्रश्नाबद्दल बोलावे असा प्रश्न पडावा इतकी प्रश्नांची भिषण मालिका आहे. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांनी आम्हाला लंडन ते पॅरिस फिरवून आणले. त्याबाबतीत त्यांनी मला अशी विनंती केली होती की, हे सर्व आपण बघितले पाहिजे. पहिल्यांदा पॅरिस आणि लंडनला जोडणारा टनेल जेव्हा सुरु झाला त्यासंबंधीची चर्चा झाली.ज्यावेळी लंडनच्या बाजूने पहिले बोअरिंग सुरु झाले त्यावेळी मुंबईचा महापौर म्हणून मी तेथे हजर होतो आणि त्याची चित्रफित माझ्याकडे आहे. लंडन ते पॅरिस टनेल केल्यानंतर तेथे जी रेल्वे तयार करण्यात आलेली आहे त्या रेल्वेतून मी प्रवासही करुन आलो आहे. तुमच्या गाडया घेऊन यायचे, गाडी रेल्वेत ठेवायची, आपणही रेल्वेत बसायचे पॅरिसला

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

उतरल्यानंतर पुन्हा गाडीने बाहेर पडायचे आणि संध्याकाळी पुन्हा त्या रेल्वेत बसायचे अशी ड्राईव्ह इन रेल्वे तेथे आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी टर्मिनल, ते डोंबिवली पर्यन्त जो कामगार वर्ग आहे तसा कामगार वर्ग त्याठिकाणी टनेलच्या विकासातून निर्माण झाला. समुद्राच्या पाण्याचा तळ देखील मी पाहून आलो आहे. ब्लू लागून येथे मनाला थक्क करणारा समुद्र पहायला मिळतो आणि तोही समुद्र मी पाहिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यानीं काय पाहिले आणि मी काय पाहून आलो एवढ्याकरिता मी हे सांगत नाही. तर परदेश फिरल्यानंतर अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात आणि आपल्याला त्यातून विकासाची दृष्टी मिळते. परंतु ज्या गावामध्ये जी परिस्थिती असते त्याप्रमाणे विकासात्मक प्रवृत्ती निर्माण होते आणि ती समाज कसा राहातो यावर अवलंबून असते. मुंबईच्या समस्या वेगळया आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी भाषण संपविताना जी समस्या सांगितली ती मुंबईतील सर्वात मोठी समस्या आहे. मुंबई शहराचे प्रतिदिन वाढणारे लोकसंख्येचे प्रमाण हे फारच दुर्दैवी असून ते महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये आलेले आहे. सर्व वर्तमानपत्रांनी देखील याची दखल घेतली आणि ही समस्या मांडली त्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. मुंबईमध्ये वाढणारी लोकसंख्या ही "not by bus,but by migration." बाहेरुन येणा-या लोकांच्या लोंढयामुळे मुंबईची लोकसंख्या वाढत आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ही लोकसंख्या वाढत असताना 21.05 पेक्षाही आज मुंबईची लोकसंख्या 22.07 एवढया प्रचंड वेगाने वाढते आहे. सभापती महोदया, या मुंबई शहरावर अधिकार कोणाचा आहे हे माझ्या भाषणाच्या शेवटी बोलणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी यासंदर्भात भाष्य केलेले आहे. ते अनाकलनीय नाही. अप्रस्तुत तर नाहीच नाही, पण यासंदर्भात मी शेवटी माझे भाष्य करणार आहे. मात्रुभाषेनुसार राज्याच्या लोकसंख्येची जी टक्केवारी आहे या टक्केवारीत गेल्या तीन दशकामध्ये मराठी भाषिकांची टक्केवारी 76.05 वरुन 68.08 पर्यंत आलेली आहे. मराठी माणसांची टक्केवारी मुंबईत घसरली आहे. ही आमची मूळ व्यथा आहे. मुंबई मराठी माणसांची आहे किंवा नाही यासंदर्भात मी बोलणारच आहे. मराठी माणसांची टक्केवारी घसरली आहे असे आर्थिक पाहणी अहवाल सांगतो आहे. स्थलांतराच्या बाबतीत गंभीर भूमिका आहे, ती भूमिका आमच्याकडून या सदनासमोर मांडली गेली पाहिजे. स्थलांतराच्या बाबतीत या सभागृहात बोलले गेले पाहिजे. त्यासंबंधी सांगितले गेले पाहिजे. मुंबईत 1991 ते 2001 या दशकामध्ये राज्यात एकूण 32.80 लक्ष लोकसंख्या बाहेरुन स्थलांतरित झाली आहे. त्यापैकी 32.32 लक्ष लोक इतर राज्यातून स्थलांतरीत होऊन या ठिकाणी आलेले आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनतेचा मुंबई शहरावर हक्क आहे त्यात स्थलांतरित होऊन आलेल्या लोकांची संख्या अतिशय कमी आहे. 0.48 लक्ष लोक ग्रामीण भागातून या शहरात स्थलांतरित होऊन आलेले आहेत. ग्रामीण भागातील नाममात्र लोक या शहरात आलेले आहेत. बाकी सगळे परप्रांतातून आले असे आर्थिक पाहणी अहवाल सांगतो आहे. या शहरात स्थलांतरित होऊन कोण आलेले आहेत ? देशाच्या राजकारणाच्या राजनितीमध्ये सत्तेला घोर लागलेल्या अशा सत्तेकडे जाण्याच्या मार्ग धरणा-या प्रवृत्तीचा हा वाढलेला रोग आहे. तो या शहरात आलेला आहे. मी या ठिकाणी वेदनामय होऊन सांगतो आहे की, माननीय श्री. शिवराज पाटील चाकुरकर केंद्रात गृहमंत्री असताना त्यांनी आमच्या खासदारांना लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले की, देशामध्ये एकूण साडेतीन कोटी बांगला देशीय नागरिकांनी घुसखोरी केली आहे. त्यातील 75 लाख बांगला देशीय नवी मुंबई आणि ठाणे परिसरात आहेत. मुंबई जवळच्या भागात एवढया मोठया संख्येने बांगला

2....

श्री.दिवाकर रावते....

देशीय नागरिकांचे वास्तव्य असेल तर भविष्यात आपली परिस्थिती काय होईल ? हे बांगला देशीय लोक बकालतेचा वेगळा अविष्कार दाखवतीलच. या महाराष्ट्रात आणि मुंबई शहरात येणा-यांच्या संदर्भात 2007-08 मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय नमुना पाहणीत रोजगार व बेरोजगारांचा तपशील दिला आहे. तो तपशील डोळयात अंजन घालणारा आहे. या राज्यात गेल्या पाच वर्षात 12.39 लक्ष व्यक्ती इतर राज्यातून आल्या आहेत. त्या व्यक्ती कोणकोणत्या राज्यातून आल्या आहेत ते मी या ठिकाणी नमूद करतो. त्यात 4.23 लक्ष व्यक्ती उत्तर प्रदेशातील आहेत. 1.35 लक्ष व्यक्ती कर्नाटक राज्यातील आहेत. 1.19 लक्ष व्यक्ती गुजरात राज्यातील आहे. 82 हजार व्यक्ती राजस्थान राज्यातील आहेत. बिहारमधील फक्त 51 हजार आणि पश्चिम बंगाल मधील 49 हजार, केरळ राज्यातील 21 हजार, आंध्र प्रदेशातील 32 हजार व्यक्ती या ठिकाणी स्थलांतरीत होऊन आलेल्या आहेत. श्री.कृपाशंकर सिंह यांच्या आशिर्वादाने आम्हाला दम देण्याची ताकत निर्माण करुन देणारे उत्तर भारतीयांचे लोंढे आपल्याकडे मोठया प्रमाणात असल्याचे आर्थिक पाहणी सांगते आहे. सभापती महोदया, 10.74 लक्ष लोकसंख्या शहरी भागात मोठया प्रमाणात झाली आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वाचल्यानंतर भविष्यात मुंबई शहराची काय अवस्था होणार आहे हा मोठा चिंतेचा प्रश्न आमच्या समोर निर्माण झालेला आहे. समोर येणाऱ्या धक्कादायक बाबी आहेत त्या अतिशय विचित्र आहेत. हात का वाळू नये? मुठी का आवळल्या जाऊ नये ? या धोरणांना गदागदा हलवून जमीनदोस्त का करु नये ? अशी भूमिका का घेऊ नये ? असे वेगवेगळे प्रश्न आज निर्माण झालेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी रेड एरियाचा उल्लेख केला. मुंबई शहर म्हणजे ही काय बाजारवस्ती आहे काय ? लोक मजा करण्यासाठी मुंबई शहरात येतात.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 16:20

श्री.दिवाकर रावते.....

परंतु जागतिक बँकेने काय सांगितले? कोणाची आहे ही मुंबई? का आम्ही हातात शस्त्रे घ्यायची नाही? का यांना पायदळी तुडवायचे नाही? कोणत्या अधिकारात तुम्ही मुंबईवर अतिक्रमण करायला निघाले आहात? जागतिक बँक म्हणते चलो मुंबई. मुंबई शहरामध्ये सर्व विभागातून मोठया प्रमाणात इन्फ्रास्ट्रक्चर तयार करा. घरे बांधा. जागा नसतील तर चटई क्षेत्र वाढवा आणि मुंबईमध्ये मोठया प्रमाणात बाहेरुन येणाऱ्या लोकांना अडवू नका, अन्यथा आम्ही तुम्हाला पैसे देणार नाही असे जागतिक बँकेने सांगितले. आमचे राज्यकर्ते भिकेचा कटोरा घेऊन त्यांच्यापुढे उभे आहेत. मुंबईच का? या देशामध्ये इतर विकसित होणारी केंद्रे नाहीत? इतर राज्यातील राजधान्या नाहीत? त्या राज्यांमध्ये बंदरे नाहीत? त्यांच्या भागात इन्फ्रास्ट्रक्चर तयार करुन जागतिक बाजारपेठ उभी करावी असे का वाटत नाही? आमचे राज्यकर्ते डब्ल्यूटीओच्या नादी लागल्यामुळे शेतकऱ्यांचे वाटोळे झाले. आत्महत्या वाढल्या. त्याच पध्दतीने जागतिक बँकेच्या पुढाकाराने मुंबई शहराचा घास घेण्यासाठी राष्ट्रीय धोरण बदलून मुंबईवर अतिक्रमण करण्यासाठी अशाच पध्दतीने वागणार असाल तर मुंबईचे भवितव्य काय हा प्रश्न उभा राहतो.

अत्यंत दुर्दैवाने सांगावे लागते. ज्यांनी मुंबई घडविली, ज्यांनी मुंबईसाठी बलिदान दिले, पिढ्यानपिढ्या आपल्या एका खोलीमध्ये राहून अनेक पिढ्या, अनेक भावंडांनी आपले संसार उभे केले, मुंबईशी असलेले आपल्या रक्तामासाचे नाते कधी तोडले नाही, कधी तक्रार केली नाही अशा या मुंबईकरांच्या चाळीमध्ये राहणाऱ्या एकूण 19642 जुन्या चाळी आहेत त्या चाळीतील भाडेकरुंच्या घराचा प्रश्न आहे. या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण अत्यंत तळमळीने म्हाडाचे माजी अध्यक्ष या नात्याने बोलत असतात. केवळ मुंबईमध्ये जुन्या चाळीचा विषय आहे का? बीपीटीच्या चाळी आहेत. कोळीवाड्यांचा विषय आहे. महानगरपालिकेच्या असंख्य जुन्या इमारतींचा प्रश्न आहे. म्हाडाच्या माध्यमातून मुंबई शहरात उभारलेल्या वसाहतींचा प्रश्न निर्माण झाला आहे. सभापती महोदया, आपण स्वत: राहता त्या वसाहतीमध्ये मी जाऊन आलो आहे. म्हाडा म्हटले की, केवळ जुन्या चाळीचा हा विषय नाही तर या सगळ्या वसाहतींमधून कोण राहतात? मूळ मुंबईकर या वसाहतींमधून राहतो आहे. या सगळ्या विषयाला बगल देऊन नको ते करणारे अधिकारी या मुंबईला लाभले हे या शहराचे दुर्दैव आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी या अधिकाऱ्यांवर नेहमी आसूड ओढतात. ते कमी आसूड ओढतात असे मला वाटते. एवढया

..2..

श्री.दिवाकर रावते.....

बेदरकारपणे या मुंबईशी खेळ खेळला जात आहे. मुंबईतील जुन्या इमारतींबाबत सापत्नभावाची वागणूक देत असताना फाईल कशी रखडून राहते? मुंबईतील बिल्डरांचा म्हणावा तेवढा फायदा नाही. डीसी रुल्स 33(7) मध्ये फायदा नाही. परंतु 33(9) मध्ये फायदा असल्यामुळे या प्रकरणाला गती येत आहे. 4 च्या पुढे एफएसआय देत आहात. एखादा कोणता प्रकल्प असेल म्हणून 33(9) चे प्रकरण पुढे आणले असे माझे मत आहे. 100-100 वर्षे जुन्या चाळीत राहणारे भाडेकरु, त्यांना 350 ते 400 चौ.फूट जागा मिळत असेल तर आम्ही दु:ख का बाळगावे? प्रत्येक वेळी टिकेची झोड उठविण्यापेक्षा मुंबई शहरातील मूळ नागरिक त्याच जागेवर वसणार असेल तर आनंद व्यक्त केला पाहिजे. मुंबईतील मिलच्या जागांचा विकास होत असताना 33 टक्के म्हाडा, 33 टक्के महापालिका आणि 33 टक्के शासनाला जागा मिळणार होती. परंतु प्रत्यक्षात काय घडले? म्हाडाला मुंबईच्या मिल्सच्या माध्यमातून 600 ते 700 एकर जागा मिळणार होती. या जागेमध्ये 19 हजार जुन्या चाळीत राहणा-या 33 हजार भाडेकरुंना 2 रुम, 1 रुमचे 350 चौ.फुटाच्या जागा बांधून दिल्या असत्या आणि सगळ्या जुन्या इमारतींच्या जागा मोकळया करता आल्या असत्या. यासाठी कंपनी फॉर्म करावी. एमएसआरडीसी सारखी कंपनी तुम्ही करा. या सगळ्या जागा ताब्यात घ्या.

3जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

51 टक्के सरकार आणि 49 टक्के मालक अशा प्रकारे सगळ्या जुन्या जागांवर आपण कमर्शियल बांधकाम करावे आणि मुळ भाडेकरुंना त्यांच्या मुळच्याच जागांवर राहण्यासाठी घरे द्यावीत अशी मी सूचना करतो. असे सरकारने अगोदरच केले असते तर मुंबईतील भाडेकरु हे मुंबईतच राहिले असते. पण सरकारच्या कर्मदरिद्रीपणामुळे नवनवीन योजना केल्या त्यामुळे या भाडेकरुंचे वाटोळे झाले. त्यामुळे आज मिल कामगार आणि भाडेकरु हा उद्ध्वस्त झालेला आहे. सभागृहात ही व्यथा मांडत असताना अनेक चांगल्या चांगल्या योजना रसातळाला गेल्या आणि आता चांगली कल्पनाच राहिली नाही. आता शासनाने "अ" "ब" "क" आणि "ड" अशा प्रकारचे वर्गीकरण करुन ठेवलेले आहे त्याप्रमाणे वाढीव चटई क्षेत्र दिले जाते. गिरगांवसारख्या ठिकाणी निमुळत्या जागा आहेत त्या भागातील जागांचा विकास कसा होणार आहे आणि त्यात अडकलेल्या मुंबईकरांचे भवितव्य काय आहे, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी म्हणाले ते बरोबर आहे की, या सरकारचे महिना, दोन महिने शिल्लक राहिले. हे आम्ही केवळ टीकेसाठीच बोलत नसून आम्हाला खात्री आहे की, विकासाचा ठोस कार्यक्रम घेऊन गेलो तर या परिस्थितीला गती येऊ शकते. अशा प्रकारचा विकासात्मक दृष्टीकोन ठेवून काम करावे लागेल आणि आम्ही ते करणार आहोत, असा विश्वास निर्माण करावा लागेल.

महोदय, माझ्याकडे महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वृत्तपत्राचे एक कात्रण आहे त्यात म्हटले आहे की, आतापर्यंत हे सरकार "वन-डे" खेळत होते ते आता 20-20 खेळू लागले आहे. हे सर्व करीत असताना कोळीवाड्याचा प्रश्न कसा सोडविणार हा महत्वाचा मुद्दा आहे. मुंबईच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री झोपडपट्टयांच्या संदर्भात या सभागृहातच बोलले होते. माननीय मुख्यमंत्र्यांना कल्पना नसेल तर त्यांनी कृपया माहिती करुन घ्यावी, मुख्यमंत्री म्हणून उभे राहून बोलत असताना अशा प्रकारे अज्ञान प्रकट करणार असाल तर मुख्यमंत्री का झालात असा प्रश्न देखील जनतेला पडल्याशिवाय राहणार नाही. काल मी या सभागृहात उपस्थित नव्हतो परंतु मला माहिती मिळाली की झोपडपट्टी योजनेच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, "लोंढेच्या लोंढे येथे कोसळतात व लोकांना पक्की घरे मिळायला लागल्यापासून अशा बेकायदेशीर झोपड्या वाढत आहेत" असे असेल तर मग सरकार काय करीत आहे ? हा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. याच

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/

श्री. दिवाकर रावते .....

जागेवर माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख उभे राहिले होते त्यावेळेस त्यांना प्रश्न विचारला होता त्यावेळेस त्यांनी सांगितले ते रेकॉर्डवर आहे. ते म्हणाले होते की, "मुंबईतील बेकायदेशीर झोपड्या आम्ही ताबडतोब पाडू, ज्या भागातील झोपड्या पाडल्या नाहीत त्या विभाग अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई होईल." आजही बोरिवलीला गेले तर पहायला मिळते की, बांबू टाकून दररोज 200-300 झोपड्या वाढत आहेत, महानगरपालिका अशा झोपड्या तोडण्यास तयार नाहीत. महापालिकेत शिवसेनेची सत्ता आहे परंतु कोणीच नगरसेवक तेथे जाण्यास तयार नाही. कारण झोपड्या पाडत असताना कोणी नगरसेवक तेथे गेला तरी त्याचे नगरसेवक पद रद्द होणार असा कायदा शासनाने केलेला आहे, म्हणून कोणीच उभे राहू शकत नाही आणि झोपड्या पाडण्याला विरोध करु शकत नाही. मग हे काम महापालिकेचेच आहे. यासंदर्भात शासनाने सभागृहात एक विधेयक मान्यतेसाठी आणले होते व त्यानुसार महापालिकेचे पूर्ण अधिकार शासनाला घ्यावयाचे आहेत. त्यात महानगरपालिकेने केलेला ठराव सकारात्मक असेल तर तो नकारात्मक करण्याचा अधिकार शासनाला असेल. अशा प्रकारे 520 (सी) या कलमात बदल करुन स्टँडिंग कमिटी आणि कलम 520 (डी) नुसार जो प्रस्ताव आणला जातो तो देखील थांबविता येतो असे अधिकार शासन हातात घेत आहे. अशा प्रकारे महापालिकेची सत्ताच आपल्या हातात घ्यायची. मुंबईत अस्तित्वात असलेली एक संस्था म्हणजे एमएमआरडीए, त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत बोलणार असल्याने मी बोलणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, झोपडपट्टया वाढत आहेत असे बोलणे माननीय मुख्यमंत्री महोदयांना शोभते का? तुम्हाला जर झोपडया वाढतांना दिसत आहेत तर त्या झोपडपट्टया तुम्ही का तोडत नाहीत? 1995 सालच्या झोपडयांना संरक्षण देण्यात आले परंतु नंतर 2000 सालापर्यंतच्या झ ोपडयांना संरक्षण दिले गेले. 2000 पर्यंतच्या झोपडयांना कोर्टाने सुध्दा अद्याप मान्यता दिलेली नाही. तुम्हीच स्वत:च अधिकारी झाला आहात. दिल्लीवरुन फोन येतो, कृपाचा फोन येतो आणि सांगतात की, या झोपडया पाडू नका आणि त्या प्रमाणे हे शासन मुकाट निर्णय घेते. सभापती महोदय, 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना तुम्ही संरक्षण द्या परंतु 2000-2009 पर्यंत ज्या झोपडया उभ्या राहिलेल्या आहेत त्या तुम्ही का पाडत नाही ? या ज्या बेकायदेशीर झोपडया आहेत त्या तुम्ही का पाडत नाही ? झोपडया पाडतांना तुमचे हात कोणी धरतात काय? आपण कर्तव्य शून्य आहात. यासंदर्भात मला एक म्हण आठवते परंतु ती म्हण मी या ठिकाणी बोलत नाही. परंतु एवढेच सांगतो की, xxxx पुढे गायली गीता आणि कालचा गोंधळ बरा होता असे म्हणावे लागेल. 2000 सालाच्या पुढे ज्या झोपडपट्टया उभ्या राहिलेल्या आहेत त्या पाडण्यास आपल्याला कोणी नाही म्हणते काय ?

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेला अगोदर झोपडपट्टी पाडण्यास पोलीस मिळत होते, मुंबई महानगरपालिका या सर्व पोलिसांचे आणि अधिका-यांचे पैसे देत होती. पोलीस बंदोबस्तात झोपडपट्टया पाडल्या जायच्या परंतु आता शासनाने मुंबई महानगरपालिकेला पोलीस देणे बंद केलेले आहे. पोलीस बंदोबस्त न देण्याच्या संदर्भात कोणी ऑर्डर दिल्या, का दिल्या, कोणी राजकीय हस्तक्षेप केला याची माहिती या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे. मुंबईचा खेळखंडोबा हे शासन करीत आहे. मुंबईमध्ये आज कोणत्याही प्रकारे इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहत नाही. मुंबईच्या सिव्हरेजसाठी 6 हजार कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. 2-3 टनेल्स बांधलेल्या आहेत. सिव्हरेज चांगल्या प्रकारचे बांधलेले आहे. हेरीटेज लगून बांधलेले आहेत.गटार समुद्रात सोडता येत नाही म्हणून विक्रोळी येथे प्लँट केलेला असून त्यासाठी 25 कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. मुंबईमध्ये कितीही गटारे बांधा, कितीही पाण्याच्या पाईप लाईन्स तयार

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

केल्या तरी त्या कमी पडतात. जोपर्यंत बाहेरुन येणारे लोंढे थांबवले जात नाही तोपर्यंत महानगरपालिकेने काहीही कामे केली तरी ती कमीच पडतील. आता तुम्ही सांगता की, आम्हाला लोकांनी निवडून लोकसभेत पाठविले आहे, अब हमको कोई रोकनेवाला नही है. सभी उत्तर भारतीयों को बोल रहा हूँ, आप आजाओ, हम चुनकर आगए है. असा प्रकार आज चालला आहे.

**तालिका सभापती** (श्रीमती अलका देसाई ) : या प्रस्तावासाठी 3.15 ते 5.45 एवढी वेळ देण्यात आली होती. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात संपवावे अशी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मुंबईच्या संदर्भातील प्रस्ताव असल्यामुळे तसेच हे शेवटचे अधिवेशन असल्यामुळे या प्रस्तावावर मला अधिक विचार मांडण्याची संधी द्यावी.

सभापती महोदया, मुंबईसाठी या शासनाने पिण्याच्या पाईप लाईन्स आणल्या आहेत काय ? गटारांची व्यवस्था केली आहे काय ? आपण फक्त आम्हाला 19 कलम सांगतात. 19 कलमान्वये भारतातील कोणत्याही व्यक्तीला कोठेही जाता येते व राहता येते परंतु मला सांगा ज्यांना येथे व्यवसाय नाही, धर नाही त्यांनीही येथे बेकायदेशीरपणे यावे का ? बेकायदेशीर पणे येऊन येथे झ ाोपडपट्टया बांधाव्यात काय? कायद्यातील 19 मलम हे उद्योगधंद्यासाठी, शिकण्यासाठी आहे. त्यासाठी कोणाला अडवता येत नाही परंतु 19 कलमाचा आधार घेऊन तुम्हाला काहीही करता येईल असे तुम्हाला वाटते काय ?

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 16.35

श्री.दिवाकर रावते ..

परंतु 19 (क) कलमामध्ये असेही सांगण्यात आलेले आहे की, भूमिपुत्रांनासुध्दा न्याय मिळाला पाहिजे आणि त्यांच्या हक्कावर गदा येणारे कोणते कृत्य घडत असेल तर त्यासंबंधीचा कायदा सरकारने करावयास पाहिजे. अशा प्रकारे 19(क) कलमान्वये आम्हाला संरक्षण देण्यात आलेले आहे. केवळ बाहेरच्या लोकांना येथे येण्यास घटनेने मुक्तव्दार दिलेले नाही. तर 19(क) कलमान्वये असे संरक्षण दिलेले आहे की, घटनेच्या अंतर्गत राहून सर्वानी येथे यावे परंतु येथे येत असतांना काम धंदा असेल तरच यावे, राहण्यासाठी येथे जागा असेल तरच यावे. कामधंदा नसतांना वा राहण्याची सोय नसतांना कोणीही येथे यावे आणि फुटपाथवर पथारी पसरता कामा नये तसेच फुटपाथवर वा पाईप लाईनच्या बाजूला झोपडया बांधता कामा नये.पाईप लाइनच्या बाजूला बांधण्यात येणा-या झोपडया पाडण्यात याव्यात यासबंधी कोर्टाने राज्य सरकारला चार वेळा सांगितले होते. परंतु राज्य सरकारला अजूनही या झोपडया पाडता येत नाहीत. राज्य सरकार मात्र हे आमचे काम नसून महानगरपालिकेचे काम आहे वा अन्य दुस-याचे काम आहे असे सांगून सतत दुस-याकडे बोट दाखविते. राज्यकर्त्यानी अशा प्रकारे दुस-यांकडे बोट दाखविता कामा नये

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे.एमएमआरडीएचे श्री.गायकवाड यांनी असे सांगितले की , पाच हजार घरे आम्ही बांधणार असून ती भाडयाने देण्यात येणार आहेत व सर्वांना ते घेण्याचा अधिकार आहे.परप्रांतातील व्यक्तीविषयी त्यांना एवढे प्रेम असेल तर त्यांना उत्तर प्रदेशामध्ये श्रीमती मायावती यांच्याकडे पाठवून देण्यात यावे. श्री.गायकवाड हे कोण आहेत ? एमएमआरडीएच्या मार्फत रस्त्याचे बांधकाम करीत असतांना 2008साली वा 2009 साली झोपडया पाडण्यात आल्या असतील तरी त्या सर्वाना पर्यायी घरे देण्यात आली होती. त्यावेळी या झोपडया कोणत्या साली बांधण्यात आलेल्या आहेत हे पाहिले गेले नाही. 1995 सालानंतर ज्यांच्या झोपडया बांधण्यात आल्या आहेत त्या पाडून का टाकल्या नाहीत. सभापती महोदया, बॅरिस्टर अंतुले यांची आम्हाला अजूनही आठवण येते. ते मर्द आहेत. त्यांनी परराज्यातून येथे अनधिकृतपणे राहणारे जे लोक होते त्यांचे सर्व सामान एस.टी.मध्ये भरले आणि त्यांना राज्याच्या हद्दी बाहेर पाठवून दिले होते. त्याला मर्दपणा म्हणता येईल. परंतु बॅ.अंतुले यांच्या ताकदीसारखा एकही मुख्यमंत्री अजून राज्याला मिळत नाही हेच आमचे दुर्देव आहे.परराज्यातून येणा-या सर्वानाच काढले गेले नाही परंतु राज्यकर्त्याची बोलण्याची अशी भाषा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

असली पाहिजे की, यापुढे जर आमच्या राज्यात याल तर तुमचीसुध्दा अशीच परिस्थिती होईल. त्यामुळे महाराष्ट्रातून सपूर्ण देशभर संदेश जाईल. त्यामुळे येथे येण्याची कोणीही हिंमत करणार नाही. परतु तसे सांगण्याचीसुध्दा राज्य सरकारमध्ये धमक नाही. ती धमक बॅरिस्टर अंतुले यांच्यामध्ये होती. त्यामुळेच माननीय शिवसेना प्रमुखांनी त्यांना जाहीरपणें शाबासकी देतांना असे सागितले की, अशाच प्रकारचा राज्याला मुख्यमंत्री असला पाहिजे. परंतु आता मुंबईत झोपडया येत आहेत एवढेच सत्ताधारी पक्षाकडून सांगितले जात आहे परतु त्या बाबतीत नेमकी कोणती कार्यवाही केली जाते. ? केवळ अधिका-यांच्या नावाने बोटे मोडले जात आहेत. भ्रष्टाचार होतो असे संागितले जात आहे परंतु फाईल्सवर सहया कोण करतो ? अधिका-यांच्या भ्रष्टाचाराच्या बाबतीत जेव्हा तुम्ही ओरड करता तेव्हा त्या अधिका-यांना भ्रष्टाचार करण्यास हातभर वाव कोण देतो आणि . मंत्रालयामध्ये बसून फाईल्सवर कोण सहया करतो हासुध्दा प्रश्न आहे . यासबंधीचे सगळे अनुभव सांगण्यासाठी मी येथे उभा नाही. त्यातून मुंबई बुडणार आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. या पावसाळयामध्ये काय स्थिती निर्माण होईल हे आपण पाहणार आहोतच

सभापती महोदया, मध्यंतरी माननीय श्री.उध्दव ठाकरे माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते ते कशासाठी भेटले होते? त्यांचा वेळ जात नव्हता म्हणून वा गप्पा मारण्यासाठी वा राजकारण करण्यासाठी ते आलेले नव्हते. मुबईच्या प्रश्नासबंधी एक वाद निर्माण झाला होता. मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापौराना अधिकृतपणे बोलण्याचा अधिकार असतो आणि मुंबईच्या प्रश्नासंबंधी जनतेच्या भावना त्यातून व्यक्त होत असतात. परतु श्री.गायकवाड नावाच्या अधिका-यांनी महापौरांना आव्हान दिले होते . ते कोण आहेत ? ते एक सनदी अधिकारी आहेत तरी सुध्दा ते महापौरांबरोबर " तू तू मै. मै " करावयास लागले होते. महापौर हे लोकप्रतिनिधी असून त्यांना लोकांना जाब द्यावा लागतो . तुम्हाला कोण्ीही विचारत नाही. गलेलठ्ठ पगार घेऊन तुमच्याकडून दादागिरी केली जाते कारण तुम्हाला अधिकार प्राप्त झालेले आहेत. सहाव्या वेतन आयोगाचा पहिला लाभ तुम्हाला मिळालेला आहे. मुंबईतील लोक घरे मिळण्यासाठी तडफडत आहेत. मात्र अधिका-यांच्या सोसायटया उभ्या राहिल्या आहेत. अधिका-यांची दोन दोन ठिकाणी घरे आहेत. जे अधिकारी परप्रांतातील आहेत परंतु या ठिकाणी सेटल झालेले आहेत त्याबाबतीत

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

मला काही तक्रार करावयाची नाही परंतु जो महाराष्ट्राची सेवा करतो- त्याला एक हजार फुटाचे वा दोन हजार फुटाचे घर दिले तर माझी त्याला काही हरकत नाही. परंतु त्याला एक घर दिल्यानंतर सरकारी घर तरी त्याने रिकामे केले पाहिजे. परंतु त्याने दोन्ही ठिकाणची घरे अडवली आहेत. दुसरे घर भाडयाने देऊन तो त्याचे भाडेसुध्दा मिळवत आहेत त्याचबरोबर गलेल्ठ पगारही घे्त आहेत. महाराष्ट्राच्या अस्मितेला डिवचण्याचेसुध्दा तो काम करतो म्हणून त्यांचा आम्हाला राग येतो.

सभापती महोदया, फेरीवाल्याच्या संदर्भात मला एक गोष्ट सांगावयाची आहे. सन्माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांना मी सांगतो की, तुमच्या अगोदरच्या राज्य मंत्र्यांनी जे उत्तर दिले होते त्यामुळे मी अत्यंत व्यथित झालो होतो व त्या दिवशी माझा तोल गेला होता. ही मुंबई नेमकी कोणाची आहे? फेरीवाल्याच्या संदर्भात आम्हाला डेमो दाखविण्यात आला होता पत्रकारांना मला हे सांगावयासचे आहे की, हा डेमो आपणसुध्दा पहावा . तुम्ही जर अस्सल मराठी बाण्याचे असाल तर तुमचा हात उचलला गेल्याशिवाय राहणार नाही.

. नंतर श्री सरपरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

फेरीवाल्यांचे पुनर्वसन कसे करणार? त्यांना एफएसआय वाढवून देणार. त्यांच्या जुन्या चाळींना एफएसआय वाढवून देणार. एसआरए योजनेमध्ये एफएसआय वाढवून सर्व परप्रांतीय फेरीवाल्यांना कायम स्वरुपी वसविणार. या फेरीवाल्यांमध्ये कोण आहेत? या फेरीवाल्यांची कॅटॅगरी काय? ते भाजी, फळे विकणारे आहेत, लहानसहान नाहीत. त्यामध्ये इस्त्रीवाला, धोबी हे आहेत. हे मुंबईतील फेरीवाले आहेत काय? श्री. मनुकुमार श्रीवास्तव नावाचे एक संकट या खात्यामध्ये घोंघावत आहे ते मुंबईला विकायला निघाले आहे हे मी याठिकाणी अधिकृतपणे सांगतो. आपण त्यांना कायम स्वरुपी दुकाने कशासाठी द्यावयास निघाला आहात? आपण नो फेरीवाला झोन बनवा. याबाबत सुप्रिम कोर्टाने फेरीवाल्यांची व्याख्या ठरवून दिली आहे. ती म्हणजे लोकसंख्येच्या 3 ते 5 टक्के असेल, म्हणजे मुंबईची लोकसंख्या 1 कोटी असेल तर 3 लाख फेरीवाले पाहिजेत. आज मुंबईमध्ये 10 लाख फेरीवाले आहेत. त्यांना आपल्याला कायम स्वरुपी वसवायचे आहे. त्यामध्ये अधिकृतपणे 90 टक्के फेरीवाले परप्रांतीय आहेत. त्यांच्या भवितव्याचा विचार करावयाचा आहे काय? अशाप्रकारे आपल्याला मुंबईमध्ये प्रकल्प आणावयाचे आहेत. सभापती महोदय, हे डेमोचे पुस्तक मला दिलेले नाही, आणि त्याचे नावही काढत नाही. त्यांनीच समिती नेमून कधी मंजूर केले हे माहीत नाही. आणि त्याबाबत विचारले तर सांगावयास तयार नाही. त्याबाबत अजूनही सूतोवाच नाही. कधी तर ते गपचूप गुंडाळतील. जर कां ते चुकून आमच्या हाती लागले तर मात्र बचणार नाही असे मी आजच सांगून ठेवतो. आम्ही जर तिकडे बसलो तर एकही त्यामध्ये वाचणार नाही, म्हणजे आम्ही त्यांना मारणार नाही. हे मुंबई विकायला निघाले आहेत काय? सभापती महोदया, फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर असतांना आमचा श्वास कोंडत आहे तो कोण मोकळा करणार

? ही आमच्या मुंबईकरांची व्यथा आहे. मोनोरेल, मेट्रो रेल करुन ही मुंबई विकायला काढली आहे. याठिकाणी आम्हाला रहावयास देणार आहात काय? हा खरा प्रश्न आहे. मी परवा याठिकाणी बोललो होतो की, माझ्या मुलाचे भवितव्य काय? हा प्रश्न मला भेडसावतो त्यावेळी आमची ही पिढी याठिकाणी टिकणार नाही अशाप्रकारची परिस्थिती निर्माण होत आहे.

सभापती महोदया,हे सर्व याठिक्काणी मांडीत असतांना जुन्या घरांच्या संदर्भात विनंती केली तरी अजून फायनल होत नाही. आपण झोपडपट्टीमधील लोकांना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामध्ये 180 चौ.फूटाऐवजी 225 चौ.फूट क्षेत्रफळ केले . त्यांना त्यानंतर 269 चौ.फूट जागा दिल्याबद्दल आम्हाला आनंद आहे. गरीब लोक चांगल्या घरामध्ये राहतील, ती रहात आहेत. त्याठिकाणी किती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

वर्षापासून रहात असली पाहिजेत यासाठी बारलाईन ठरविली आहे. त्याचे व्यवस्थापन ठरविले आहे. त्याची तपासणी होते, त्यामध्ये पात्र आणि अपात्रतेचे निकष लावले आहेत. त्यामुळे त्यामध्ये मला काहीही गैर वाटत नाही. हे सर्व करीत असतांना जे लोक मुंबईमध्ये पिढयान् पिढया राहिले आहेत. त्यांना 400 चौ.फूट जागा देण्याची मागणी केली असतांना तुम्ही 300 चौ.फूटाची जागा देण्यास तयार झालात. मागील अधिवेशनात आपण कायदा केला त्यावेळी मी एफएसआय वाढविण्याची मागणी केली. त्यांचा एफएसआय ताबडतोब वाढवून आपण तो 3 केल्याबद्दल मला दुःख वाटत नाही आणि माझी तक्रार सुध्दा नाही. परंतु या इमारतींच्या बाबतीत सुकथनकर समितीच्या शिफारशीप्रमाणे 180 चौ.फूटाच्या इमारतीकरिता 2 एफएसआय होता, तो 225 चौ.फूट केल्यानंतर 2.5 इतका एफएसआय केला. आता तुम्ही 3 एफएआय केल्यानंतर सुकथनकर समितीच्या शिफारशीप्रमाणे 3.33 एफएसआय झाला पाहिजे. झोपडपट्टीच्या ठिकाणी प्रचंड आकाराचा भूखंड असतो, त्यावर दोन टॉवर उभे राहू शकतात. याठिकाणी ही परिस्थिती नाही. त्यामध्ये पुन्हा आपल्या गाडयांच्या पार्कींगचे प्रॉब्लेम आहेत. हे सर्व करण्याकरिता त्याचा अजून निर्णय लागत नाही. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये आपण हा कायदा मंजूर केला. आता जून महिना उजाडला तरी यासाठी आपल्याला सहा महिन्यांचा कालावधी लागतो काय? आणि मग आमच्या जुन्या चाळीत राहणाऱ्या लोकांच्या विकासाची कामे थांबण्याची प्रक्रिया सुरु होते. त्यामध्ये हे काम खोळंबून राहते, पावसाळयामध्ये त्यातील चार चाळी पडतात, त्यामध्ये लोक मरतात, त्यांच्याकरिता आपण रडतो. आणि मग "येरे माझ्या मागल्या, पहिले पाढे पंचावन्न". आणि म्हणून या बाबतीत माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी त्यावेळी उत्तर देतांना सांगितले होते की, एफएसआय वाढविण्याची प्रक्रिया आम्ही तातडीने पूर्ण करु. जुन्या मोडकळीस आलेल्या चाळीतील लोकांकरिता आपण आज धोरणात्मक निर्णय जाहीर केला तर मला आनंद वाटेल. कारण ती प्रक्रिया आता जवळ जवळपूर्ण होत आली आहे. तेव्हा आपण ती जाहीर करावी अशी मी आपणास नम्रपणे विनंती करतो.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले)**

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, दुसरा एक अत्यंत गंभीर विषय आहे आणि तो दोन शब्दांमध्ये सांगणार आहे. या शहरात कोणीही येतात, रहातात आणि शिधापत्रिका घेऊन जातात. हया शिधापत्रिका कोण देतात ? तर ही आपल्याच रक्तामासाची मराठी अवलाद आहे आणि ती कारकुनाच्या रुपाने, कर्मचाऱ्यांच्या रुपाने पैशाच्या लालसेने काम करीत आहे. हे लोक ही मुंबई विकून रोज घरामध्ये पैसे घेऊन जातात, कोऱ्या नोटा घेऊन जातात. परंतु मला स्वत:च्या घरातील रेशन कार्ड तीन वर्षे झाली तरी दिले जात नाही. त्यांच्याकडे लाचारीसारखे जाऊन किती वेळा विचारावयाचे ? मी एक आमदार असून सुध्दा सतत त्यांना जाऊन सांगावे लागते. मी आता कंटाळलो आहे, खरे बोलतो. नालायक लोक आहेत. अजूनही रेशन कार्ड देत नाहीत. अनेक गोष्टींची माहिती विचारतात. मग इतर लोकांना रेशन कार्ड कशी मिळतात ? याचे आम्हाला उत्तर हवे आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळामध्ये मुंबई व ठाणे येथे जवळजवळ 1 लाख बोगस रेशनकार्ड जप्त करण्यात आली. याबाबतीत कोणत्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली आहे ? परंतु आता विधान परिषदेमध्ये एखाद्याने प्रश्न उपस्थित केला म्हणून त्याला निलंबित वगैरे काही नाही तर एकदम घरीच पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, म्हणजे निलंबन नाही, चौकशी नाही तर संबंधितांना डायरेक्ट घरीच पाठवून दिले आहे. का ? तर त्याने विधान परिषदेमध्ये प्रश्न मांडला म्हणून. मग आज आम्ही तुम्हाला विचारीत आहोत की, या खात्यामधून बोगस रेशन कार्ड दिली जातात त्यांच्याबाबतीत, बनावट नोटा छापणाऱ्यांच्या बाबतीत रोज टी.व्ही.वर नवीन-नवीन बातम्या दिसत आहेत. रोज 500 रुपयांच्या बनावट नोटा छापणारे दिसून येत आहेत. रोज एक नवीन लफडे सापडत आहे. हे सर्वकाही बकाल आहे, सगळीकडे हे प्रकार बोकाळलेले आहेत. हे कशा मुळे झाले आहे ? तर आपली प्रशासनावर काहीच पकड राहिलेली नाही. अधिकारी ऐकत नाहीत, मंत्र्यांना जुमानत नाहीत, आमदारांना जुमानत नाहीत, कोणालाच जुमानत नाहीत. सगळीकडे मनमानी सुरु आहे. अधिकारीच दादागिरी करतात. मला देखील एका जिल्हाधिकाऱ्यांना सांगावे लागले की, अरे, दिवाकर रावते, ही एक व्यक्ती म्हणून सोडून द्या, पण या महाराष्ट्र राज्याचा कोणताही आमदार तुमच्यासमोर आल्यानंतर किमान उभे रहावे. त्याचे स्वागत करावे. हा प्रोटोकॉल आहे. पण अधिकारी आमदार आल्यानंतर उभेच रहात नाहीत. आमच्या भागातील जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्यानंतर देखील ते उभे रहात नाहीत. परंतु रोज कुठे भांडण करणार असा

प्रश्न आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : आमदार आल्यानंतर एकही अधिकारी उभा रहात नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिकाऱ्यांसमोर आमदार आल्यानंतर ते उभेच रहात नाहीत. मग कधीतरी आमचे सटकल्यानंतर काही केले की, मग सरकारी अधिकाऱ्यावर हल्ला म्हणून लगेच गुन्हा दाखल होतो. पण तुमया गुन्ह्यांना कोण विचारतो " पण हे असेच गुन्हे करीत आमच्यावर फिरण्याची वेळ आणणार आहात काय ? अशी या शासनाची प्रशासनावर पकड आहे हे दुर्दैव आहे. हा अधिकाऱ्यांचा दोष नाही तर तो राज्यकर्त्यांचा असतो. म्हणून शिधापत्रिकांच्या शोध मोहितेचा विषय आहे. हा विषय महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीमध्ये आलेला आहे. तुम्ही किती बोगस रेशनपत्रिका दिलेल्या आहेत, त्याचा येथे आकडा दिलेला आहे. 218 लाख बोगस शिधावाटप पत्रिका मुंबई, ठाणे परिसरात देण्यात आल्या आहेत. एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून आपण आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे ? आतापर्यंत किती अधिकाऱ्यांना घरी पाठविले ? हे जाणुन घेण्यास मी उत्सुक आहे. माननीय मंत्री महोदयांनी ही माहिती दिली तर समजू शकेल की, आम्ही सदनामध्ये बोलतो आणि जे वर्तमानपत्रातून जाहीर होते, ते खरे असते. म्हणून याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, शेवटच्या दोन गोष्टी सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. कारण अजून बऱ्याच वक्त्यांना बोलावयाचे आहे. कारण हा मुंबईचा विषय असून अनेक जणांना यावर भाषण करण्याची इच्छा आहे. हा सगळयांच्या तळमळीचा विषय आहे. पहिली गोष्ट म्हणजे मराठी भाषेचा वापर सतत आणि सातत्याने करणार आहात काय ? असे विचारले जाते. बघा, आमच्यावर काय परिस्थिती आली आहे ? कधी-कधी या मनगटाची देखील लाज वाटते. कारण ज्या मनगटामध्ये दट्टा देण्याची ताकद आहे, ते नुसते वापर न करता नुसते बसवून ठेवावे लागते. रोज विचारावयाचे की, मराठी भाषेच्या वापराबाबत काय ? ज्यांच्याकडे याबाबत जबाबदारी दिलेली आहे, ते सामान्य प्रशासन विभागाचे आय.ए.एस. अधिकारी कोण आहेत ? परंतु मराठी भाषेचा वापर का होत नाही ? त्यांना सस्पेंड करा, घरी पाठवून द्यावे. मला माहिती आहे की, तुमच्याकडे तसा अधिकार नाही. मग माननीय राष्ट्रपतींकडे ही बाब पाठवावी, एक पत्र पाठवावे की, संबंधितांकडून राज्यभाषेचा अवमान करण्याची कृती घडत आहे म्हणून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी परवानगी द्यावी. आपण टी.व्ही.पाहिले तर असे दिसेल की, तेथे एकही मराठी अधिकारी नाही. सगळयांची नावे इंग्रजी अद्याक्षराने लिहीलेली असतात. ही बाब बदलण्याच्या .....

. . . .3 के-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

संबंधातील जी.आर.1963 मध्ये निघाला. त्यावर सदनामध्ये पाच दिवस चर्चा झाली होती. मी रोज सांगत आहे, पण त्याकडे लक्ष दिले जात नाही. माझ्याकडे एक पेपर असून त्यामध्ये जाहीरात आलेली आहे. ही जाहीरात मुंबई हौसिंग ॲण्ड एरिया डेव्हल्पमेंट, म्हाडा, यांची आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

यामध्ये "Results of the Lottery Draw conducted by the Mumbai Housing and Area Development Board on 19th May, 2009" अशी इंग्रजीत जाहिरात आलेली आहे. आज विद्यापीठाच्या जाहिराती आलेल्या आहेत. मान्यताप्राप्त जाहिराती आलेल्या आहेत. अनुदान घेणाऱ्यांच्या जाहिराती आलेल्या आहेत. मराठी वर्तमानपत्रात इंग्रजीमध्ये जाहिराती आलेल्या आहेत. हे मी आपल्या निदर्शनास आणून देतो. याबाबत शासन काय कारवाई करणार आहे हे कळले पाहिजे. माझ्याकडे एवढी मोठी फाईल झालेली आहे. असे काही आले की, मी त्याचे कात्रण जोडून संबंधितांना पत्र लिहितो. एवढा एकच धंदा झालेला आहे. लाज नाही, लज्जा नाही, निर्ढावलेल्या मनाला काय सांगावे ते मला कळत नाही. माझ्याकडे श्री. प्र. ल. दराडे, कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी विद्यापीठाला लिहिलेले एक पत्र आहे. सर्व संचालक, कुलसचिव, सर्व कृषी विद्यापीठे यांना शासन व्यवहारामध्ये मराठीचा वापर यासंदर्भात त्यांनी पत्र लिहिले आहे. त्यांनी स्पष्ट शब्दात असे लिहिले आहे की, शासनाच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश सूचना, जाहिराती, परीक्षा, अर्ज, प्रवेश अर्ज, वेळापत्रके, निर्यात सूचना, पात्रता प्रमाणपत्रे, गुणपत्रिका, अभ्यासक्रम पूर्तता प्रमाणपत्रे, भरतीच्या व निविदा जाहिराती, विविध कागदपत्रे, धनादेश, पत्रके, सूचना फलक इत्यादी लोकांच्या माहितीसाठी मराठीत प्रसिध्द होण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, ते दुसऱ्या भाषेत असू नये. आपण राज्य स्थापनेचे पन्नासावे वर्ष साजरे करीत आहोत. आम्हाला ते साजरे करावयाचे आहे म्हणून कौतुकाने कार्यक्रम आखावयास घेतले आहेत आणि साधी मराठी मातृभाषा त्यांना सांभाळता येत नाही मग काय कर्माचा सुवर्ण महोत्सव साजरा करणार आहात ? आपल्या आईला पायाखाली तुडवून तिच्या छाताडावर उभे राहून मी किती मोठा झालो हे दाखविणार काय ? मराठीसाठी या सदनामध्ये किती आक्रोश करावयाचा ? माझ्याकडे शासनाचे सगळे आदेश आहेत. शासन निर्णय सामान्य प्रशासन क्रमांक अमूक अमूक मधील आदेशात सुधारणा करुन शासन असे आदेश देत आहे की, यापुढे शासनाकडे किंवा शासनाच्या दुय्यम अधिकाऱ्याकडे आलेल्या पत्रांना, अर्जांना म्हणजेच जनतेला मराठीतून उत्तरे द्यावीत. आज सकाळी सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे विद्यापीठाने शासनाला इंग्रजीतून लिहिलेले पत्र वाचत होते. हे

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपले 1962 चे आदेश आहेत. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, पत्रांना, अर्जांना मराठीतून उत्तरे द्यावीत मात्र पत्र अथवा अर्ज मराठीखेरीज अन्य भाषेत असल्यास मराठी उत्तरासोबत भाषांतर द्यावे. मी सकाळी बोललो. मला वाईट वाटले. मी खेद व्यक्त केला. सरकारने मराठीत बोलावे एवढाच माझा आग्रह होता. विचारणारा सदस्य कोणत्या भाषेत विचारत आहे त्याबाबत माझा आग्रह नव्हता. त्यांनी जर सांगितले असते की, आपण जे मराठीत बोलतात ते मला समजले नाही तर त्याचे काय करावयाचे हे आम्ही नंतर बघितले असते. पण सरकारने मराठीत बोलावे असे मी सांगत होतो. त्यावर हिंदीमध्ये बोललो तर चालेल काय असे विचारतात. मग आम्ही आपल्याला चलेजाव म्हटले तर चालेल काय ? माननीय सभापतींचा अवमान होईल. सभापती महोदय, वृत्तपत्र जाहिरातीबाबत असेच आदेश काढलेले आहेत. सर्वात महत्वाची बाब अशी आहे की, कोणत्याही खात्याने इंग्रजी जाहिरात ड्राफ्ट केली तर ती मराठीत करण्याचा अधिकार भाषा संचालनालयाकडे आहे. ती जाहिरात भाषा संचालनालयाकडे जाते आणि त्यांनी मंजूर केल्यानंतर वर्तमानपत्रात येते. जर ही पध्दत असेल तर, मुळात इंग्रजीमध्ये जाहिराती येतातच कशा ? मुख्य संचालक, प्रसिध्दी संचालनालय यांचे आदेश आहेत. त्यामध्ये असे म्हटले आहे की, शासनाची अशी इच्छा आहे की, सर्वांनी यासंबंधी योग्य ती दक्षता घ्यावी. म्हणजे मराठी जाहिरातीच्या संदर्भात दक्षता घ्यावी. यामध्ये असे म्हटले आहे की, शासनाच्या निदर्शनास असे आले आहे की, मराठी वृत्तपत्रामध्ये दिल्या जाणाऱ्या शासकीय, अर्धशासकीय व महामंडळाच्या जाहिराती अजूनही इंग्रजीमध्ये दिल्या जातात. राजभाषा वर्षात हे असे घडावे हे निश्चितच खटकणारे आहे. तेव्हा हे टाळणे आवश्यक असल्याने शासनाच्या सर्व कार्यालय प्रमुखांना अशी विनंती करण्यात येत आहे की, मराठी भाषिक पत्रात द्यावयाच्या सर्व जाहिराती केवळ मराठीतूनच असावयात. मराठी वर्तमानपत्रात ज्या इंग्रजी जाहिराती आल्या त्याचे एवढे मोठे बाड मी आपल्याला आणून दाखवीन.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ MAP/ ST/ यापूर्वी श्री.बरवड 16:55

श्री.दिवाकर रावते.....

महानगरपालिका, नगरपालिका साध्यासाध्या गल्लीतील नगरपालिका आहेत. या नगरपालिकांचे वार्षिक उत्पन्न दीड ते पावणे दोन लाखाच्या आसपास आहे. परंतु अशा नगरपालिका सुध्दा इंग्रजीतून जाहिराती देत आहेत. हे कोण थांबविणार आहे ? शासनाचे शासकीय जाहिराती देण्याबाबतचे जे धोरण आहे ते वाचून दाखविण्यामध्ये मी वेळ घालवित नाही. राज्यातील शासकीय कर्मचा-यांच्या विभागीय परीक्षा मराठीतून घेतल्या जातात. परंतु काही कर्मचारी नापास होतात. अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढी थांबविल्या जातात. मंत्रालयतील बिगर मराठी अधिकारी मराठी विषयाच्या परीक्षेत सतत नापास झाले असतील तर अशा अधिका-यांची वेतनवाढ थांबविली असेल तर त्याची मला यादी द्यावी. पण अशी कारवाई करण्यासाठी मानसिकता लागते. ही भाषा रुजली पाहिजे. त्यासाठी शासनाने कायदे केलेले आहेत, नियम केलेले आहेत, त्या नियमांचे तुम्ही पालन करणार नसाल तर आमच्या राज्यातील कर्मचारी म्हणून तुम्हाला येथे बसण्याचा अधिकार नाही. तुम्ही कोणत्याही प्रांताचे असाल, तुमची कोणतीही मातृभाषा असो. पण या राज्याची भाषा तुम्हाला आली पाहिजे. हे घडले असेल तर ठीक आहे,परंतु असे घडविले जात नाही. ही वेदना आमची आहे.

सभापती महोदय, शासनामार्फत आता अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधले जाणार आहे. त्यासाठी 50 कोटींची तरतूद केली आहे. हे स्मारक मुंबईच्या समुद्रात होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज कोठे बसणार आहेत त्याची जागा बघण्यासाठी जे गेले होते त्याचे वृत्त टी.व्ही.वर दाखविले गेले होते. त्यात माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री इतर सर्वजण हवा खात जागेची पाहणी करीत होते. हे सर्व रोज टी.व्ही.वर दाखविले जाते. पण छत्रपती कोठे आहेत ते दाखविले जात नाही. त्या पाण्यात कोणाला काय कळणार आहे ? त्याबाबत आर्किटेक्टने आराखडा आखला असेल त्याची कॉम्प्युटरवर पाहणी करता येते, त्याद्वारे प्रत्येक इंचाची माहिती मिळते, अगदी मायक्रॉनपर्यंत समजते. पण हे सर्वजण समुद्रात पाहणी करण्यासाठी जातात, त्यांना हौस आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, ज्या राज्यात छत्रपती शिवाजी महाराज मुक्त नाहीत, ज्या राज्यात छत्रपतींना मोकळीक नाही, ज्या राज्यात छत्रपतींचा पुतळा सुरक्षित नाही, त्या राज्यात छत्रपतींचा पुतळा उभारण्याचा कोणता अधिकार आहे असा माझा प्रश्न आहे. हा पुतळा उभारण्यापूर्वीच स्मारक समितीमध्ये हे असतील तर पुतळा तोडून टाकू, तमूक असतील तर तोडून टाकू अशा अनेकांनी शासनाला धमक्या दिल्या आहेत. म्हणजे शिवाजी महाराजांचे स्मारक तोडण्याची भाषा आतापासूनच चालू झाली आहे. परंतु त्यांना दम देण्याची शासनामध्ये हिंमत नाही. याद राखा, तुम्हाला अशी भाषा करता येणार नाही, सभापती महोदय, मला आठवते की, मंत्रालयामध्ये जिजाऊंच्या फोटोला मान्यता घेण्यासाठी 7-8 वर्षे लागली. जिजाऊंचे योग्य चित्र ठरविण्यासाठी इतका काळ गेला. ते चित्र युतीच्या काळात मंत्रालयात लावले गेले, हे युतीच्या शासनाचे कर्तृत्व नाही. अनेक वर्षापासून मंत्रालयात ते चित्र लावण्याचा विचार सुरु होता. सध्या जे चित्र आहे ते योग्य असल्याचे निश्चित झाल्यावर ते चित्र तेथे लावले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांचे जे मूळ चित्र आहे ते लंडनच्या म्युझियममध्ये आहे. ते चित्र आपल्याकडेही आलेले आहे.

सभापती महोदय, माझ्याजवळ छत्रपतींचे पुतळे पिंज-यात असल्याचे काही फोटो आहेत. हे काल परवा काढलेले फोटो आहेत. या महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या पुतळयांना संरक्षण नाही. महाराजांचा पुतळा कधी बिभत्स केला जाईल याची खात्री नसल्यामुळे लोकांनी पुतळयांना पिंज-यात उभे केले आहे. अलिबागचा फोटो सुध्दा माझ्याजवळ आहे. नांदेडचा फोटो आहे. ज्या छत्रपतींना आपण सन्मानाने पुतळयाच्या स्वरुपात सुध्दा उभे राहू देत नाही. शासन कसला स्वाभिमान सांगत आहे ? अशाप्रकारचे माझ्याजवळ 15 फोटो आहेत. छत्रपतींच्या पुतळयाची विटंबना होईल म्हणून ही सुरक्षितता अवलंबिण्यात आली आहे. औरंगजेबाच्या कैदेत सुध्दा महाराजांना वाटले नसेल इतकी वाईट स्थिती त्यांच्या पुतळयांची झाली आहे. ते पाहून आम्हाला लाज वाटते. शासन या समुद्रात कसला पुतळा उभा करीत आहे ? कशासाठी उभा करीत आहात, ज्या छत्रपतींच्या पुतळयाचे संरक्षण करता येत नाही, जिजाऊंची विटंबना करणा-या अलिबागच्या एका कॉलेजमध्ये एका प्राध्यापकाला एका विद्यार्थ्याने उभे राहून सुनावले की, सर, आपण आता जे

3...

श्री.दिवाकर रावते....

काही बोलत आहात ते मी ऐकून घेणार नाही, आपण आपले बोलणे ताबडतोब थांबवा. त्यासाठी तेथील आमच्या उप जिल्हा प्रमुखांवर खटला दाखल करण्यात आला. ते त्या प्राध्यापकाला जाब विचारण्यासाठी गेले म्हणून त्यांच्याविरुध्द खटला दाखल केला. 'राजा शिव छत्रपती' नावाची टी.व्ही.वर सिरियल चालू आहे, त्यामध्ये शिवाजी महाराज अफझल खानाचा कोथळा काढत असल्याचे सुरुवातीला रोज दाखविले जाते त्याबद्दल मी श्री.नितीन देसाई यांचे मनापासून अभिनंदन करतो. पण येथे जिल्हाधिकारी आमच्या उपजिल्हाप्रमुखांविरुध्द नोटीस काढतात. त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करतात. अफझल खानाचा कोथळा काढल्याचे पोर्ट्रेट लावले म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करतात. अफझल खानाचा कोथळा काढल्याचे कॅलेण्डर छापले म्हणून साता-यातील सर्व कॅलेण्डर जप्त होतात आणि साता-याच्या आमच्या जिल्हा प्रमुखांवर खटला दाखल होतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ SBT/ KGS/ ST/ प्रथम श्री.खंदारे 17:00

श्री. दिवाकर रावते....

ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा मान, सन्मान राखता येत नाही त्यांनी मुंबईमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा का उभारावा असा आमच्या मनात प्रश्न निर्माण होतो आहे. काही व्यक्ती कोणाच्या तरी दबावाने इतिहास बदलत आहेत. दादोजी कोंडदेव त्यांचे गुरुच नव्हते. कोणाच्या तरी सांगण्याने इतिहासात काही तरी घुसविण्याचा प्रयत्न केला जातो आहे. छत्रपती शिवरायांच्या जीवनाची अशी निर्भत्सना या राज्यात केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्यांना सन्मान नाही त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचा कोणताही अधिकार नाही, असे मी या ठिकाणी खेदाने नमूद करतो.

झोपडपट्टीच्या विळख्यातून, फेरीवाल्याच्या विळख्यातून तसेच परप्रांतीयांच्या लोंढयातून मुंबई शहराला वाचविले तरच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी या ठिकाणी जे सांगितले त्या गोष्टी करणे शक्य आहे. अन्यथा या गोष्टी करणे अशक्य आहे. मुंबई स्वतंत्र करण्याचे जे कारस्थान आहे ते या शहरापासून सुरु झालेले आहे. आज वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. "विरार ते अलिबाग" एक तासात जाणारा आठ पदरी मार्ग होतो आहे. गेट ऑफ इंडिया ते उरण असा 1400 कोटी रुपयांचा सागरी पूल मंजूर झालेला आहे. एम.एम.आर.डी.ए.चे एम.डी. श्री. रत्नाकर गायकवाड यांनी घोषणा केली आहे की, अलिबाग पर्यंत आम्ही विकास केला नव्हता. आता आम्ही कोटयावधी रुपये खर्च करुन अलिबागपर्यंत विकासाची कामे करु. मी ठामपणे सांगतो की, 25 वर्षानंतर मुंबई शहर देशातील स्वतंत्र आर्थिक राज्य म्हणून निर्माण होईल. या आर्थिक राज्यात शेती नसेल. लोकांसाठी काहीही नसेल. म्हणून कोकणातील जमीन सेझसाठी घेण्यात येत आहे. बंदर किना-याचा एक पट्टा रिलायन्सने विकत घेतला आहे. या संपूर्ण भागामध्ये वेगळे व्यापारीकरण सेझ च्या माध्यमातून निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. एक गुंठा देखील शेती नसलेले, 125 आमदार असलेले एक वेगळे आर्थिक राज्य निर्माण करण्याचे कारस्थान रचले जात आहे. त्याचाच हा एक भाग आहे. मुंबई स्वतंत्र करणाच्या कारस्थान रचणाऱ्यांना मदत करणाऱ्या सरकारचा मी आतापासूनच त्रिवार धिक्कार करुन ठेवतो. भविष्यात कोणी वाचले तर त्यांना ही परिस्थिती बघावयास मिळेल. व्हीजनचा प्रश्न यांनीच काढला आहे. असे व्हीजन आम्हाला नको आहे. आमच्या डोक्यावर वरवंटा फिरविणारे व्हीजन तुम्ही आणले आहे. सन्माननीय सदस्य

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

श्री. नितीन गडकरी यांना एवढेच सांगू इच्छितो की, ही मुंबई मराठी माणसाची आहे. ही मुंबई मराठयांची आहे. कोण धोबी-खोबी आले असतील, त्यांना सांगतो की, या ठिकाणी सुखाने रहा. मराठी माणसाना संपविण्याचा कोणी प्रयत्न करु नये. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी भाषणाच्या शेवटी मुंबईतील संस्कृतीचा ठसा या ठिकाणी सांगितला, तो मला आवडला. 105 हुतात्मे देऊन मिळविलेली मुंबई मराठयांची राहणार नसेल तर मराठा मात्र आपले खरे स्वरुप बाहेर काढेल तेव्हा तुम्हाला या ठिकाणी थांबणे कठीण होऊन बसेल असा इशारा देऊन ठेवतो. मराठीचा ठसा कोणी पुसू नये. या सदनामध्ये अगदी आग्रहाने, मुद्दाम, जाणीवपूर्वक, अपमान करण्याकरिता मराठी भाषेचा वापर केला जात नाही. हे मराठी माणसाचे सदन आहे. मराठी राजभाषेचे हे सदन आहे. हम बोलेंगे, हम बोलेंगे या विरुध्द आम्हाला मराठी भाषेसाठी जीप आसडावी लागेल असे मी जाहीररित्या सांगतो आहे. या सदनामध्ये बसावयाचे असेल, मग तो कोणीही असो. परंतु या सदनात मराठीतूनच बोलले पाहिजे असे सभापती महोदय, आपणाकडूनही आग्रहाने सांगितले गेले पाहिजे. राष्ट्रभाषा हिंदी नाही. ती संपर्क भाषा आहे. राष्ट्रभाषेच्या मिजाशीमध्ये कोणी मराठी भाषेची गळचेपी करण्याचा प्रयत्न या महाराष्ट्रात कधीच करु नये. मराठी भाषेचा अवमान होतो आहे असा दुर्देवाने प्रसंग कृपया कोणी आमच्या समोर आणू नये, अशी मी हात जोडून विनंती करतो. या सदनामध्ये सर्व सन्मानीत आहात. तुम्ही आमच्या बरोबर आहात याचा आम्हाला आनंद आहे. परंतु मात्रृभाषेमध्ये बोलावयाची कोणाला लाज वाटत असेल तर त्यांचा रस्ता या सदनाच्या बाहेर आहे असे सांगण्यास मी कचरत नाही. परंतु मराठी भाषेची अवहेलना राज्य सरकारकडून सातत्याने होते आहे मी अतिशय दु:खद अंत:करणाने सांगतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने या सदनातील दोन ज्येष्ठ सदस्यांची भाषणे ऐकण्याचा मला योग आला. या ठिकाणी निरनिराळे राजकीय प्रभाव असलेल्या दोन ज्येष्ठ सदस्यांनी आपल्या व्यथा या प्रस्तावाच्या अनुषंगाने मांडलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या प्रस्तावातील विषयाच्या अनुषंगाने मुद्देसूद भाषण केले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ SBT/ 17:05

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी........

पण प्रस्ताव त्यांच्याकडूनच आलेला आहे. विरोधी पक्षाकडून हा प्रस्ताव आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे भाषण केले, प्रस्तावाच्या अनुषंगाने भाषण करीत असताना त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्यावर कोणतेही मार्गदर्शन केले नाही. मुंबईतील झोपडपट्टयांचा प्रश्न असेल, मुंबईत येणाऱ्या परप्रांतीयांच्या लोंढयाचा प्रश्न असेल, मुंबईची जी दुरावस्था झाली आहे त्याला जबाबदार हे शासन आणि सत्ताधारी पक्षातील मंडळी जबाबदार आहेत असा त्यांच्या भाषणाचा टोन आणि टेन्युअर होता. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या भाषणाचा ॲप्रोच हा पॉझिटिव्ह होता. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याबाबत समर्पकपणे माझी आणि माझ्या पक्षाची भूमिका मांडणे आवश्यक वाटते.

सभापती महोदय, मी या सभागृहात 7-8 वर्षापासून असलो तरी गेली 40 वर्षे राजकीय जीवनामध्ये वावरत आहे. संपूर्ण मुंबई शहराच्या जडणघडणीमध्ये मी आहे. 1968 मध्ये शिवसेना कशी वाढली, कसे राजकारण झाले हेही मी जवळून पाहिले आहे. 1973 ची महानगरपालिकेची निवडणूक झाली ती सुध्दा मी जवळून पाहिली आहे. बॅ.रजनी पटेल हे त्यावेळी मुंबई कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. सुदैवाने मी त्यावेळी युवक कॉंग्रेसचा सदस्य असल्यामुळे बॅ.रजनी पटेल यांच्याकडे तिकिट वाटपाचे काम होते त्याला देखील मी साक्षीदार आहे. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीमुळे कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला आणि 1973 मध्ये शिवसेना पक्ष मुंबई महापालिकेमध्ये सत्तारुढ झाला. कॉंग्रेस पक्षाला त्या निवडणुकीत 70 जागा मिळाल्या होत्या. शिवसेनेला त्यापेक्षा जास्त जागा मिळाल्यामुळे सत्ता मिळाली. कॉंग्रेस आणि शिवसेनेचा 1968 पासून मी जवळून प्रवास पाहिलेला आहे. आज याठिकाणी जे मुद्दे उपस्थित केले, प्रश्न उपस्थित केले या प्रश्नांचे उत्तर सर्वांनी एकत्रितपणे शोधणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ज्या सूचना केल्या त्या सूचनांचे मी पूर्णपणे समर्थन करतो. मुंबई शहराच्या दृष्टीकोनातून सुधारणा करीत असताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्वाचे आहे. शेवटी या शहराच्या विकासाला मर्यादा आहेत. दिल्ली शहराचा म्हणता म्हणता एवढा विस्तार झाला की आज मुंबईपेक्षाही दिल्ली शहराची लोकसंख्या वाढली आहे. मुबई शहराची देखील लोकसंख्या वाढली आहे. दर कि.मी. लोकसंख्येची घनता जगामध्ये सगळ्या कमी कुठे असेल तर ती दर कि.मी. मागे मुंबई शहरामये आहे. मुंबईची एकूण जागा मर्यादित असल्यामुळे मुंबईच्या विकासाला मर्यादा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी........

आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, मुंबईच्या झोपडपट्टीचा प्रश्न आहे. कै.वसंतराव नाईक हे या राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी एक नियम तयार केला होता. 1976 ची ही गोष्ट आहे. त्यावेळी आजच्या प्रमाणे मुंबईत वॉर्ड पध्दती अस्तित्वात नव्हती. 1976 पर्यंत संपूर्ण मुंबई शहराची विभागणी 12 वॉर्डमध्ये झालेली होती. त्यांनी सक्त ताकीद दिली होती.

3पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .......

आणि त्यांनी ताकीद दिली होती. अशा प्रत्येक वॉर्डमध्ये वॉर्ड अधिकारी आणि पोलीस स्टेशन यांना वॉर्निंग दिली होती की, त्यांच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत झोपड्या निर्माण झाल्या तर त्याचे स्पष्टीकरण त्या दोन अधिकाऱ्यांना द्यावे लागेल, असे आदेश सुध्दा त्यावेळेस काढले होते. संपूर्ण मुंबईत ही परिस्थिती त्यावेळेस होती परंतु अपवाद फक्त धारावी झोपडपट्टीचा होता आणि त्यावेळेस धारावीमध्ये मोठ्या प्रमाणात झोपड्यांचे प्रस्थ वाढले. सन 1974 मध्ये श्री. प्रभाकर कुंटे हे गृह निर्माण राज्यमंत्री होते त्यावेळेस मुंबईतील झोपड्यांमध्ये प्रत्येकाला फोटो पास दिला होता. मधल्या काळात ज्या झोपड्या वाढल्या त्याला आपण आणि आम्ही देखील जबाबदार आहोत, कोणाही एकाला जबाबदार धरता येणार नाही तर ही जबाबदारी शेअर करावी लागेल. नंतरच्या काळात झोपड्यांमध्ये वाढ झाली त्यावेळेस तो पूर्वीचा नियम नव्हता असे नाही तरी देखील झोपड्यांची संख्या वाढत गेली. त्यानंतरच्या काळात सुरुवातीला सन 1980 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्याचा निर्णय घेतला आणि आता ती मर्यादा पाच पाच वर्षांनी वाढवून आता आपण 1995 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्यांना शासनाने संरक्षण दिले. सन 1995 मध्ये आमचे सरकार सत्तेत नव्हते. त्यामुळे सत्तेवर असलेल्या माणसाला राजकारणकरीत असताना काय करावे लागते हे सांगण्याची गरज नाही. असे असताना जो कांगावा केला की, मुंबई शहरातील 27 लाख लोकांना मोफत घरे देण्यात येतील असे कोणी म्हटले हे देखील सर्वांना माहीत आहेच. कारण आपल्याला सत्ता टिकवावयाची होती. परंतु त्याचे पुढे काय झाले हे देखील तुम्हा-आम्हाला माहीत आहे. मुंबई शहर वाढले त्याला आपण देखील जबाबदार आहात, तुमचे सुध्दा डिस्ट्रीब्युशन तयात आहे. असे असताना देखील अशा प्रकारे केवळ राजकारण करावयाचे असेल तर ते कधीही संपणार नाही. त्यातून मार्ग काढावयाचा असेल तर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ज्या सूचना केल्या त्यांचा विचार शासनाला करावा लागले. त्या अनुषंगाने या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. ठरावात म्हटले आहे की, आज मुंबईत अशी परिस्थिती आहे त्यामध्ये म्हटले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांनी, एमएमआरडीए आणि महापौर यांच्याकडून वेळोवेळी बैठका बोलविल्या जातात व लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही त्या बैठकीसाठी जात असतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदय, लोकप्रतिनिधी एकमेकांशी भांडतात हे मी समजू शकतो परंतु कार्पोरेशन आणि एमएमआरडीए मधील अधिकारी एकमेकाशी भांडत असतील तर विकासाची कामे कशी काय होणार ? कोण कोणापेक्षा मोठा आहे, कोणापेक्षा पॉवर मला जास्त आहे यासाठी हे अधिकारी एकमेकात भांडत असतात.

सभापती महोदय, म्हाडाची निर्मिती आपण कशासाठी केली आहे ? 1972-74 मध्ये श्री. होमी तल्हयार खान हे हौसींगचे मिनिस्टर होते त्यावेळी माननीय वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी शास्त्रीनगर, वरळी, चेंबूर , नेहरु नगर या ठिकाणी म्हाडाची घरे बांधण्यात आली होती. ही घरे मुंबईत राहणा-या मध्यमवर्गीय लोकांसाठी, कामगारांसाठी बांधण्यात आली होती. त्यावेळी 200 ते 250 रुपये डिपॉझीट भरुन घरे मिळत होती. परंतु आज म्हाडाची काय अवस्था झालेली आहे ? आता खाजगी बिल्डर आणि म्हाडा यामध्ये काहीही फरक राहिलेला नाही. जो उद्देश घेऊन म्हाडाने घरे बांधावयास पाहिजे होती त्या उद्देशाने आता म्हाडा घरे बांधत नाही ही वस्तुस्थिती आहे. खाजगी बिल्डर सारखे काम आज म्हाडा करीत आहे. म्हाडाचे 700-750 तसेच 1000 चौरस फुटाचे घर घ्यावयाचे म्हटले तरी त्याला 40 ते 50 लाख रुपये लागतात. 40-50 लाख रुपये सर्वसामान्य माणूस म्हाडाच्या घरासाठी भरु शकतो काय ? याचाही विचार करण्याची वेळ आता आपल्यावर आलेली आहे. आता म्हाडाची घरे सर्वसामान्य माणूस, झोपडपट्टीत राहणारा माणूस घेऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला घर मिळण्याच्या संदर्भात विचार होण्याची गरज आहे. आज मुंबई शहरात, कार्पोरेशन, म्हाडा, एमएमआडीए, हौसींग बोर्ड, रेल्वे बोर्ड, तसेच एअरपोर्ट ॲथोरीटी आहे परंतु यांचा एकमेकांशी काहीही समन्वय नाही. जो तो आपापल्या पध्दतीने काम करीत सुटला आहे. राज्यशासनामध्ये सुध्दा समन्वय राहिलेला नाही. राज्यशासनामध्ये समन्वय रहावा यासाठी खाते तयार करण्यात आलेले नाही. मंत्रीमंडळात समन्वय असणे फार गरजेचे आहे. समन्वय ठेवला तरच मुंबईचा विकास होऊ शकेल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. मुंबईत काल-परवा पर्यंत करोडो रुपये खर्च करुन सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधण्यात आले परंतु कोणाला काय वाटेल त्या प्रमाणे अधिकारी काम करीत सुटले आहेत. वडाळयाजवळ सुमन नगर येथे 200-250 कोटी रुपये खर्च

...2..

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

करुन सिमेंट काँक्रीटचा रोड तयार करण्यात आला परंतु मोनो रेलसाठी आता हा रोड खोदण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. एवढया मोठया प्रमाणात खर्च करुन नंतर खर्च करण्यात आलेला पैसा असाच नासवायचा हे योग्य आहे काय ? शासनाचे पैसे तुम्ही असे मातीमोल खर्च करीत सुटलेला आहात. एकमेकांचा एकमेकांशी समन्वय नसल्यामुळे हे प्रकार होत आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या संदर्भात ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे शासनाला फायदा होणार आहे व यातून आपल्याला मार्ग काढता येईल.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मुंबई शहराच्या विकासासाठी जे निरनिराळे खाते आहेत त्यामध्ये समन्वय असणे फार जरुरीचे आहे तसेच राज्य शासनामध्ये सुध्दा समन्वय असणे फार गरजेचे आहे. त्यामुळे मुंबईच्या विकासासाठी एक स्वतंत्र कॅबिनेट दर्जाचा मंत्री असणे फार आवश्यक आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ...

मुंबईच्या विकासासाठी एक कॅबिनेट दर्जाचा स्वतंत्र मंत्री दिला तरच तो मुंबईतील विविध प्रकल्पाच्या कामामध्ये योग्य पध्दतीने समन्वय राखून मुंबईतील विकासाची कामे वेगाने मार्गी लावू शकेल तेव्हा मुंबईसाठी कॅबिनेट दर्जाचा मंत्री देण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. मुंबईतील गिरण्या बंद पडल्या असून या जागांवर मोठया प्रमाणावर मॉल्स उभे आहेत. या गिरण्यांमध्ये काम करणा-या कामगारांच्या मुलांना मात्र मॉल्समध्ये नोक-या दिल्या गेल्या नाहीत. त्यांना नोक-या मिळाव्यात यासाठी अनेकदा सभागृहात मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर कामगार सुध्दा ही मागणी मान्य व्हावी यासाठी आंदोलने करीत आहेत. श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असतांना या विषयावर जेव्हा सभागृहात चर्चा झाली होती त्यावेळी त्यांनी असे आश्वासन होते की, या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांना घरे देण्यात येतील परंतु त्या आश्वासनांची पूर्तता अजूनही झालेली नाही. त्यामुळे अनेक गिरणी कामगारांची फसवणूक झालेली आहे. 1992 साली मुंबईतील गिरणी कामगारांचा संप झाला होता त्यावेळी जवळजवळ अडीच लाख कामगार या गिरण्यांमध्ये काम करीत होते परंतु आता मात्र फक्त 35 हजार कामगार या गिरण्यांमधून काम करीत आहेत. बाकीचे सर्व कामगार देशोधडीला लागले आहेत ही वस्तुस्थिती आहे.गिरणी कामगारांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे त्या संदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव येथे मांडण्यात आलेला आहे त्याचे समर्थन करीत असतांना आणि हा प्रश्न अत्यंत पोटतिडकीने मांडत असतांना शासनाकडून ज्या काही चूका झालेल्या आहेत त्यामध्ये सुधारणा केल्या पाहिजेत अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, यानंतर मला यु.एल.सी.ॲक्ट संबंधी येथे बोलावयाचे आहे हा कायदा आता रद्द करण्यात आला आहे. यामुळे मुंबई शहरामध्ये घरे बांधली गेली नाहीत ही वस्तुस्थिती आहे.मुंबईमध्ये जर घरे बांधावयाची असतील तर जागा कमी असल्यामुळे ती व्हर्टीकल स्वरुपाची बांधावी लागतील. सभापती महोदय, कै. इंदिरा गांधी यांनी 1975 साली यु.एल.सी.चा कायदा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी

केला होता. मुंबईतील गरीब आणि मध्यमवर्गीय व्यक्तिंना माफक दरात घरे उपलब्ध करुन देणे शक्य व्हावे हा त्या कायद्याचा हेतू होता. परंतु तो हेतू फारसा साध्य झालेला नाही. त्यानंतर हा कायदा शासनाला रद्द करावा लागला होता. हा कायदा रद्द करण्याच्या अगोदर या कायद्याच्या अंतर्गत राज्य शासनाने जमिनी ताब्यात घेतल्या नाहीत व त्या जमिनीवर बांधकामही केलेले नाही. गोदरेज कंपनीकडे 5 हजार एकर जमीन असतांनासुध्दा या कायद्याच्या कचाटयातून ती जमीन सुटली आहे. त्यातील काही जमिनीवर आता खाजगी व्यक्तिकडून, बिल्डर्सकडून घरे बांधली जात आहेत मध्यमवर्गीय आणि गरीब व्यक्तिना ही घरे परवडणारी नसल्यामुळे त्यांना ती घेता येणार नाहीत.आता पाच लाख घरे बांधण्यात येतील असे आता सांगण्यात येत आहे परंतु त्याकरिता पुरेशी जमीन उपलब्ध नाही असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी कोणीही राजकीय अभिनिवेशाने बोलता कामा नये परंतु मला एवढेच सांगावयाचे आहे की, मुंबई शहराच्या विविध विकासाच्या कामासंबंधी व्यवस्थितपणे कामे केली असती तर अधिक बरे झाले असते. आपणसुध्दा कशा प्रकारे कामकाज केले होते हे आमच्या डोळयासमोर आहे.कामाचे व्हॅल्युएशन करण्यासाठी निवडणुका हे महत्वाचे माध्यम आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत याना मी एक गोष्ट सांगितली तर वाईट वाटेल. राज्यामध्ये आघाडीचे सरकार असून त्यामध्ये प्रामुख्याने दोन पक्ष आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये आम्ही जर एकत्रित निवडणुका लढविल्या असत्या तर तुम्ही तेथे सत्तेवर आलाच नसता..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

दोन पक्ष निवडणुकीमध्ये भांडत बसल्यामुळे तुम्ही सत्तेवर आला. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये दोन पक्ष एकत्र आले तर काही लोक म्हणतात की, मनसेमुळे कॉंग्रेसचा फायदा झाला. हे म्हणणे खरे नाही. मागील निवडणुकीच्या वेळी मनसे तुमच्याबरोबर होती त्यावेळी मुंबईमध्ये सहा पैकी पाच जागा कॉंग्रेसला मिळाल्या. आज या जागा 70 ते 80 हजारांनी गेल्या. आज आपण मुंबई महानगरपालिकेमध्ये काम करीत आहात त्याठिकाणी करीत असलेले काम लोकांसमोर आहे. या सरकारमुळे मुंबईमध्ये देश पहावयास मिळत आहे, याला हे सरकार जबाबदार आहे अशी भूमिका माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडली. उद्या मुंबईमधील लोकांनी ठरविले की, या देशाचा कारभार माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग ज्या पध्दतीने करीत आहेत, आणि माननीय श्रीमती सोनिया गांधी या ज्या संयमाने देशाचे राजकारण करीत आहेत त्यामुळे संपूर्ण देशामध्ये परिवर्तन घडले आहे. त्याचे परिणाम मुंबईमध्ये पहावयास मिळाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आणि म्हणून कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता या ठरावामध्ये जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याचे चांगले दृश्य स्वरुपात परिणाम आपल्याला दिसले पाहिजेत. सरकारने या प्रश्नामध्ये लक्ष घालावे आणि मुंबईच्या विकासाच्या संदर्भात स्पष्ट भूमिका जाहीर करावी अशी विनंती करुन व या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी त्यांच्याऐवजी मला याठिकाणी बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: त्यांचे आभार मानतो. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी याठिकाणी बरोबर सांगितले. मुंबई हे एक बेट आहे, ज्या बेटावर आज आपण सर्वजण रहात आहोत. त्या बेटासाठी काही नियम असतात. केंद्र सरकारकडून बेटासाठी एक वेगळी आचारसंहिता तयार झाली आहे, पण ती मुंबई या बेटासाठी लागू नाही. अंदमान, निकोबार बेटे पाहिली तर त्याठिकाणी वेगळी आचारसंहिता लागू आहे. त्या बेटावर किती वस्ती असावी, किती वाहने असावीत, किती इमारती असाव्यात अशाप्रकारची आचारसंहिता आहे. परंतु ही आचारसंहिता मुंबई शहराला लागू नाही . आपल्या या मुंबई बेटावर अतिक्रमणे वाढत चालली आहेत, लोकवस्ती वाढत चालली आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा वाढविण्याची गरज आहे. दहा वर्षापूर्वी असलेल्या पायाभूत सुविधा आपण आता वाढवीत आहोत. परंतु मुळातच जेवढे सफाई कामगार किंवा इतर कर्मचारी असले पाहिजेत, रस्ते पाहिजेत ते पूर्वी इतकेच आहेत. त्यामध्ये फार कमी प्रमाणामध्ये वाढ झाली आहे. पहिली गोष्ट अशी की, मुंबई या शहराला जोपर्यंत आपण बेट म्हणून मान्यता देत नाही, तसे नोटिफाय करीत नाही तोपर्यंत या मुंबईत असेच होत राहणार. आणि या सभागृहामध्ये आपण दु:ख, खेद प्रकट करीत राहणार त्यापेक्षा प्रगती करु शकणार नाही.

सभापती महोदय, सन 2007 मध्ये मुंबईचा विकास करण्यासाठी मुंबई वहातूक नागरी प्रकल्प टप्पा क्रमांक 1 आणि 2 केला होता. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकारने जागतिक बँकेच्या सहकार्याने 4526 कोटी रुपयांचा नागरी परिवहन प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पाचे काय झाले? सन 2007 च्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये सांगितले होते की, त्या प्रकल्पामध्ये किती टक्के प्रगती झाली आणि तो प्रकल्प किती वर्षामध्ये पूर्ण होणार होता? रेल्वे प्रकल्प, रस्ते वहातूक प्रकल्प याबरोबर या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न होता. आपण मेट्रो रेलबाबत ऐकत आहोत. परंतु मेट्रो रेल्वे सुरु होण्यास अजून वेळ लागणार आहे याबद्दल दुमत नाही. परंतु आज इन्फ्रास्ट्रक्चर तयार होत असल्याचे कमी ठिकाणी दिसत आहे. 146 कि.मी. लांबीचा आणि 20 हजार कोटींचा हा मेट्रो प्रकल्प आहे. वर्सोवा, अंधेरी, घाटकोपर पर्यंत पहिला टप्पा शासनाने घेतला होता.

(यानंतर सौ. रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

यामध्ये काय प्रगती झाली आहे ? याअंतर्गत ज्या इमारती येत आहेत, त्यातील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य शासनाने कुठेही तजवीज केलेली नाही. हा प्रकल्प किती कोटी रुपयांचा आहे? तर हा प्रकल्प जवळजवळ 2356 कोटी रुपयांचा असून, त्याच्या कामाला सुरुवात झाली असली तरी सुध्दा गेल्या दोन वर्षामध्ये याचे दहा टक्के काम सुध्दा झालेले नाही. आता 2009 हे वर्ष अर्धे संपलेले आहे.चारकोप-बांद्रा-मानखूर्द या कामाला मान्यता दिली होती. परंतु ते काम देखील सुरु झालेले नाही. तेव्हा आपण जर नुसती घोषणा करणार असलो आणि त्याबाबतीत काही करणार नसलो तर या घोषणांचा काय फायदा आहे ? आज मुंबईमध्ये जवळजवळ 35 हजार प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत घोळ निर्माण झालेला आहे. एम.यु.टी.पी. अंतर्गत मिठी नदी, ब्रीमस्टोवॅड (BRIMSTOWAD), जल वाहिन्यांवरील झोपडपट्टयांचा प्रश्न आहे. ब्रीमस्टोवॅड प्रकल्पामुळे एक हजार झोपडया बाधित होणार आहेत. याबाबतीत आपले असे म्हणणे आहे की, हा मुंबई महानगरपालिकेचा प्रश्न आहे. आज जवळजवळ पालिकेने 1423 सदनिका देखील तयार केलेल्या आहेत असे सांगितले जात आहे.

सभापती महोदय, आपण बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी भाडेतत्वावर जागा देण्याचे ठरविलेले आहे. याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण आपल्या भाषणामध्ये बोलतीलच. पण मी सांगू इच्छितो की, आपण असे करुन आपल्या पायावर कुऱ्हाड मारुन घेणार आहोत. आज मुंबईमध्ये पाण्याची भीषण समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे आज ना उद्या येथे पाण्यासाठी युध्द होईल अशी स्थिती आहे. मुंबईमध्ये एकंदर 15 तलाव आहेत आणि जवळजवळ अडीच हजार विहिरी आहेत. परंतु आज या तलावांचे डंपिंग ग्राऊंड झालेले आहे. हे तलाव कुठे-कुठे आहेत ? तर शीव, आरे, भूजाले, मालाड, कांदरपाडा, कांदिवली व्हिलेज, चारकोप, शिंपोली, बोरीवली, एक्सर रोड, वजिरा नाका, आर.सी.एफ, चरई, भांडूप, घाटला व्हिलेज इ.ठिकाणी तलाव आहेत. मुंबई शहराला साधारणपणे 910 दशलक्ष लि.पाणी लागते. परंतु आपण तेवढे पाणी पुरवू शकत नाही. त्यामुळे काही भागामध्ये पाणी येते आणि काही भागामध्ये येत नाही. या शहरामध्ये मोठ-मोठे टॉवर बांधलेले असून तेथे 6 इंच, 9 इंच पाईप लाईन टाकण्यात आल्या आहेत. त्यामुळे तेथे पाणी खेचून घेतले जाते आणि बाकीच्या ठिकाणी पाणी मिळत नाही. त्यामुळे आपण मुंबई शहरातील तलाव पुनर्जिवित करणार आहात काय ? असे केले तर त्या तलावांचे सुशोभिकरण होईल आणि मुंबईच्या



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सौंदर्यामध्ये देखील भर पडेल. त्याचबरोबर मुंबइच्या पाणी पुरवठयाचा प्रश्न देखील सुटू शकतो. मुंबईला पवई तलावातून देखील पाणी पुरवठा होत असतो. परंतु आज पवई तलावाच्या पाण्याचा वापर हा बेकायदेशीर बांधकामांसाठी होत आहे, आपण याकडे लक्ष देणार आहात की नाही ? हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मला याची कल्पना आहे की, वेळ मर्यादित आहे, त्यामुळे मी केवळ मुद्यांना स्पर्श करणार आहे. मुंबई आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून काय केले ? मुंबईमध्ये 24 तास पाणी, आरोग्याच्या सुविधा, मोकळी मैदाने इ.कामे पुढच्या दहा वर्षामध्ये हाती घेणार आहात आणि त्यासाठी 2 लाख 2 हजार 20 कोटी रुपयांचा खर्च आहे. परंतु आपण ही कामे कशी करणार आहात ? मुंबई आर्थिक विकास महामंडळाने आपल्याला अहवाल दिला. पण याबाबतीत काय करणार आहात ? एम.यु.टी.पी.,एम.यू.आय.पी. अंतर्गत जे प्रकल्प घेण्यात आले आहेत, त्यामध्ये किती प्रकल्पबाधित आहेत ? अजूनही रेल्वेच्या बाजूला असलेल्या झोपडया, जल वाहिन्यांवरील झ ोपडया हटविणे शक्य झालेले नाही. याबाबतीत केवळ घोषणा केल्या जातात, परंतु त्याबाबतीत काही होत नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, जवळजवळ 13 लाख परप्रांतीय लोक रोजगाराच्या संधीसाठी मुंबईत येत आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/ प्रथम सौ. रणदिवे... 17:35

डॉ. दीपक सावंत..

काय करणार आहात. मुंबईमध्ये अगोदरच रोजगार नाही. हे जे 13 लाख लोक बाहेरुन येणार आहेत त्यांचे काय करणार आहात? मी या बाबतीत मागे एकदा मागणी केली होती. मुंबईमध्ये काही वर्षांनी व्हिसा सिस्टिम करणे आवश्यक आहे. कोण कुठून येतात याबाबतीत मी सांगू इच्छितो. 28.5 टक्के लोक उत्तर प्रदेशातून येतात. 14.7 कर्नाटक राज्यातून येतात तर 8.5 मध्यप्रदेशातून येतात. 7.6 गुजरातमधून येतात. 7.1 बिहारमधून येतात आणि 6 टक्के लोक आंध्र प्रदेशातून येतात. रोजगार मिळविण्यासाठी कोणीही कोठेही जाऊ शकतो. केंद्र शासनाचा तसा कायदाच आहे. पण मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, मुंबई हे एक बेट आहे. यावर आपण किती ताण सहन करणार? साधारणपणे साडे तेरा लाख परप्रातीय लोक मुंबईत येत आहेत आणि मुंबईतील मराठी माणसाची टक्का कमी होत आहे. सभापती महोदय, हा टकका किती कमी होत आहे? सन 2001 या मुंबईत मराठी माणसे 68.8 टक्के होती. त्यापूर्वी 73.3 होती. म्हणजे मुंबईतील मराठी माणसे कमी होत आहेत. हिंदी भाषिक 7.8 टक्के होते. ते किती वाढले आहेत. साधारणपणे 11 टक्के वाढलेले आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. मुंबईतील लोकांना रोजगार मिळत नाही, तर मुंबईच्या बाहेरच्या लोकांना रोजगार कोठून देणार हा प्रश्न आहे. सभापती महोदय, मुंबईतील स्काय वॉकचा एक मोठा विषय आहे. यासंबंधात प्रस्तावामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. सन्माननीय नितीन गडकरीसाबांनी अतिशय चांगले उड्डाण पूल बांधले आहेत. युतीच्या काळातील ती नोटेबल गोष्ट होती. फिशरमॅन ॲण्ड प्रभू या कंपनीला स्कायवॉक बांधण्याचे काम दिले. त्यांनी एक सर्व्हे केला. त्यांना 19 रेल्वेस्थानकांमध्ये लोकांची वर्दळ दिसली आणि त्यांनी त्याठिकाणी स्कायवॉक बांधले. यांच्या हातात आयते कोलीत मिळाले. पैसे आले होते. मग बांध स्कायवॉक. जिकडे मिळेल तिकडे स्कायवॉक बांधले. उपनगरात स्कायवॉक बांधले. पूर्वउपनगरात स्कायवॉक बांधले. पश्चिम उपनगरात स्कायवॉक बांधले. एवढेच नाही तर त्यासंबंधीचा पूर्ण अहवाल धाब्यावर बसविला. आज मुंबईत हे सगळे स्कायवॉक दिसत आहेत. याची डेड-लाईन होती. सभापती महोदय, मी जवळून पहात असलेल्या सांताक्रुझ येथील स्कायवॉकचे उदाहरण देतो. या ठिकाणी 22 कोटी रुपये किंमतीचा स्कायवॉक बांधण्यात येत आहे. मुंबईमध्ये अशाच प्रकारे करोडो रुपयांचे स्कायवॉक बांधण्यात आले आहेत. या स्कायवॉकच्या डिझाईनसाठी दोन कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि ते बांधण्यासाठी 20 कोटी रुपये खर्च करण्यात आले

..2..

SMT/ SBT/ ST/

डॉ. दीपक सावंत...

आहेत. शेवटी आज सांताक्रुज येथील स्कायवॉक पूर्ण झालेला नाही. आता त्याचे काय करणार? पावसाळा आला. खड्डे खोदलेले आहेत. त्या खड्डयांमध्ये पणी भरणार, त्यामुळे तेथून लोक कसे जाणार? एकतर साताक्रुझला मिलन सब-वेचा प्रश्न आहे. त्याठिकाणी दरवर्षी पाणी जमा होते. दरवर्षी माननीय मुख्यमंत्री या वर्षी ब्रीज होणार असे सांगतात आणि त्यादिवशी त्या ब्रिजचे भूमिपूजन देखील झालेले आहे. पण त्या ब्रिजचे बांधकाम सुरु होत नाही. तिकडचे लोकच हटत नाहीत. पण स्कायवॉक बांधताना मात्र शासनाने घाई केली आणि रस्ते बंद केले, ट्राफिकचे कंन्जेश्चन केले. लोकांची परवा केली नाही. फेरीवाल्यांची परवा केली नाही. फेरीवाल्यांना आणखी जागा दिली आणि हे स्कायवॉक बांधले. सभापती महोदय, या स्कायवॉकबाबत एक उच्चस्तरीय समिती नेमून हे अनावश्यक 64 स्कायवॉक कां बांधले, यासबंधिची माहिती या सभागृहाला देण्यात यावी. यातील किती तरी स्कायवॉक बंद पडले आहेत. याबाबतीत सांताक्रुझचे काही लोक श्री. रत्नाकर गायकवाड यांना भेटायला गेले होते तेव्हा त्यांना दोन दिवस जेलमध्ये टाकले कां तर त्यांनी उच्च आवाजात त्यांच्याशी चर्चा केली. ते व्यापारी होते. त्यांचे धदे बुडत होते. म्हणून त्यांनी त्यांच्याकडे रिप्रेन्झेटेशन दिले होते. या राज्यामध्ये एखद्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे रिप्रेझेन्टेशन देणे हा गुन्हा आहे काय? त्यांना दोन दिवस व एक रात्र पोलीस कोठडीत काढावी लागली.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

या स्कायवॉकची आपण चौकशी करणार काय ? याची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर हॉस्पिटल्स आहेत. माननीय मंत्रिमहोदय सुध्दा या विषयामध्ये फार रस घेतात. मुंबईमध्ये जी हॉस्पिटल्स आहेत त्या ठिकाणी ट्रिटमेंटसाठी कोण येतात ? त्यामध्ये आपला मराठी माणूस कोणी दिसत नाही सगळे उत्तर प्रदेशचे लोक दिसतात. ते सुध्दा मुंबईतील नसतात तर मुंबईच्या बाहेरुन आलेले उत्तरभारतीय उपचारासाठी आलेले दिसतात. मी आपल्याला थोडक्यात आकडेवारी देतो. हे फक्त हॉस्पिटलमध्ये ट्रिटमेंट घेण्यासाठी नाही तर आपल्या परीक्षा पध्दतीमध्ये सिट्स मिळविण्याच्या बाबतीत परप्रांतीयांनी कसे आक्रमण केले आहे हे यावरुन दिसते. यामध्ये अनुक्रमे 228, 328, 330 अशा आपल्याकडील जागा अखिल भारतीय स्तरावरुन भरल्या जातात. सन 2001-02 पासूनच्या अखिल भारतीय स्तरावर ज्या परीक्षा घेतल्या त्या माध्यमातून राजस्थानमधून 562, बिहारमधून 472, दिल्लीमधून 248, उत्तर प्रदेशमधून 495, हरियाणामधून 301 इतके विद्यार्थी निवडले गेले. जर आपल्या मेडिकलच्या विद्यार्थ्यांना या ठिकाणी प्रवेश मिळणार नसेल तर त्यांनी कोठे जावयाचे ? आपण सांगाल की, अखिल भारतीय पातळीवरील जागा आहेत त्यामुळे त्यांना घ्यावे लागते. परंतु याबाबतीत राज्य शासनाने केंद्र सरकारकडे कधी तरी कळविले पाहिजे की, आमचे विद्यार्थी कोठे जाणार ? केंद्र शासनाचा नियम असला तरी दक्षिणेकडील राज्यांमध्ये इतर राज्यातील विद्यार्थ्यांना घेत नाहीत. श्री. जयराज फाटक यांनी एक संकल्पना मांडली होती. मुंबई महानगरपालिकेच्या तसेच शासकीय हॉस्पिटलमध्ये जे ट्रिटमेंट घेण्यासाठी येतील त्यांना रेशन कार्ड आवश्यक करावे. परंतु त्याला प्रचंड विरोध झाला. आरोग्याच्या सुविधा सगळ्यांना मिळाल्या पाहिजेत याबद्दल दुमत नाही. परंतु या मुंबईमधील माणसाला ट्रिटमेंट मिळणार नसेल, औषध मिळणार नसेल आणि बाहेरचे लोक येऊन ट्रिटमेंट घेणार असतील तर आपण काय करणार ? यावर कोठे तरी अंकुश आणणे आवश्यक आहे. त्याला कायद्याच्या कक्षेत कसे बसवावयाचे हे आपले काम आहे. माननीय मंत्रिमहोदयांकडे विधी व न्याय खाते सुध्दा आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट मुंबईला झपाटणाऱ्या ग्लोबल वार्मिन्गच्या संदर्भात आहे. ग्लोबल वॉर्मिन्गच्या बाबतीत आपल्या मुंबईला इशारा दिला गेला आहे की, आपल्याकडे जे समुद्रकिनारे आहेत त्या ठिकाणी येणाऱ्या पंधरा वर्षामध्ये कोठेही कोणत्याही पध्दतीने प्रश्न निर्माण होऊ शकतो. यासंदर्भात सभागृहात चर्चा करुनही नगरविकास विभागाने कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली नाही. आपण सीआरझेडचे नियम धाब्यावर बसवतो. अहवाल असा आहे की, एक दिवस गेट वे ऑफ इंडिया पाण्याखाली जाईल. बांद्रा येथील बँड स्टँड पाण्याखाली जाईल. अशी अनेक स्थळे पाण्याखाली जातील. कारण समुद्राच्या लाटांची उंची वाढत आहे. इतकी वर्षे ग्लोबल वॉर्मिन्गपासून मुंबईला वाचविण्यासाठी कोणतेही धोरण घेतलेले नाही. यासाठी शासनाने जी उच्चस्तरीय समिती नेमली त्या समितीच्या बैठका होत नाहीत. ग्राऊंड लेव्हलचे प्रश्न सांगतील अशा कोणत्याही लोकप्रतिनिधींचा त्यात समावेश नाही. सगळे हायफाय लोक आणि तंत्रज्ञ त्या समितीमध्ये आहेत. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिन्गच्या दृष्टीने विचार करण्याची वेळ आली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मॉल संस्कृती मोठ्याप्रमाणावर आली आहे. शासनाने मिराणी समिती नेमली. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. परंतु एकाही मॉलवर शासनाने कारवाई केलेली नाही. मॉलमध्ये दरवाजा कोठे असावा, किचन कोठे असावे, थिएटर कोठे असावे याबाबतीत नॉर्म्स आहेत. परंतु ते नॉर्म्स पाळले जात नाहीत. या ठिकाणी 56 मॉल्स आहेत आणि आणखी 60 ते 70 मॉल्स होतील. या मॉल्सपैकी साधारणपणे 13 मॉल्सनी दस्तऐवजाचे पैसे भरलेले नाहीत. त्यांच्याकडे 1 कोटी 52 लाख रुपये बाकी आहेत. अशा मॉल्सवर अजून कारवाई करावयाची आहे. ही कारवाई करु अशी घोषणा कालच्या अर्थसंकल्पामध्ये केली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

शासनाने सांगितले आहे की, औरंगाबाद शहरामध्ये कॅन्सरचे हॉस्पिटल बांधणार आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, या मुंबईत सर्व भागातून कॅन्सरवर उपचार करण्यासाठी लोक येतात. सध्या केवळ टाटा हॉस्पिटलमध्ये या रोगावर उपचार होतात. सध्या जे.जे.रुग्णालयाच्या परिसरामध्ये खूप मोठी जागा उपलब्ध आहे. त्या जागेवर एक नवीन कॅन्सर रुग्णालय निर्माण करावे. त्याची आज घोषणा करावी. प्रत्येक महसुली विभागात कॅन्सरसाठी रुग्णालय निर्माण कराल तेव्हा करावे, पण आज जे.जे.रुग्णालयात 48 एकर जमीन आहे. तेथे रुग्णालय करणार काय हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आज मुंबईतील मराठी माणूस हरवत चालला आहे. मुंबईत कॉस्मोपॉलिटन संस्कृती आहे. त्याचा हव्यास सगळयांना लागला आहे. सध्या मुंबईत जे चाले आहे त्याचा हा परिणाम आहे. सभापती महोदय, एमसीआरटीच्या पुस्तकात शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ एका परिच्छेदामध्ये मांडला आहे. शिवाजी महारांजाचा इतिहास अशाप्रकारे संक्षिप्त स्वरुपात पुस्तकातून मांडला गेला तर या पिढीला शिवाजी महाराज कसे कळणार ? त्यासाठी शासनाने वेळीच डोळे उघडले पाहिजेत.

सभापती महोदय, या राज्यात परप्रांतियांचे येणारे लोंढे कसे थांबविणार आहे हा खरा प्रश्न आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केले आहे की, परप्रांतियांचे लोंढे वाढत असल्यामुळे शासनाला म्हाडाची घरे बांधावी लागत आहेत. त्यांनी ही धोक्याची सूचना दिली आहे. त्याबाबत काळजी घेऊन ही मुंबई वाचवावी एवढेच मी या प्रस्तावाच्या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ SBT/

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मुंबईच्या समस्यांवर या सभागृहात चर्चा होत आहे. या चर्चेमध्ये भाग घेत असताना मी मुद्यांचा पुनरुच्चार करणार आहे. मुंबईच्या बेटाचे संरक्षण करण्याची शासनाकडे सक्षम यंत्रणा आहे काय ? माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी आपल्या वक्तव्यात अनेक मुद्दे मांडले आहेत. या बेटाचे संरक्षण करण्याची योजना एमएमआरडीएकडे आहे काय ? या बेटाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून दक्षता घेतली पाहिजे होती ती घेतली जात नाही म्हणून 26 नोव्हेंबरचा प्रकार घडला आहे. 50-60 कि.मी.चे हे बेट आहे. या बेटाचा 75 टक्के भाग दगडी आहे. त्यामुळे रस्त्याने जलद वाहतूक होऊ शकत नाही. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी बोरीवली ते नरीमन पॉईन्टपर्यंत जल जलवाहतूक येत्या सहा महिन्यामध्ये चालू करण्यात येईल असे सांगितले होते. परंतु त्याचा आजपर्यंत अभ्यास करण्यात आलेला नाही. त्यावेळी मी असे म्हटले होते की, ओपन सीमध्ये जल वाहतूक करता येणार नाही. कारण सध्या तेथे जेट्टी किंवा धक्के बरोबर नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. त्यांनी भरपूर अभ्यास केला आहे. मी देखील जगातील काही देशांमध्ये जाऊन आलो आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील....)

मी चार दिवसापूर्वी हॉंगकॉंगला गेलो आणि तेथून चीनला गेला. हॉंगकॉंग हे 100 कि.मी.चे बेट आहे. या बेटामध्ये 250 ते 300 टनेल्स आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मुंबईतही टनेल करायला पाहिजे असे सांगितले. परंतु मुंबईमध्ये टनेल करणे प्रॅक्टीकल नाही. कारण समुद्रसपाटीपासून मुंबईखाली आहे आणि समुद्रवर आहे. याचा अभ्यास आपण केलेला आहे काय ? या ठिकाणी टनेल करताना वेगळया त-हेचे समुद्र मार्ग आपणाला करावे लागतील. इंडोनेशिया,मलेशिया, सिंगापूर या शेजारच्या राज्यामध्ये एमएमआरडीअेच्या अधिका-यांना पाठवून तेथील प्रकल्पाचा अभ्यास करायला सांगा. त्याठिकाणी 2-2 मीटर उंचीच्या 100 कि.मी. लाबींच्या ब्रेकवॉटर वॉल बांधलेल्या आहेत. त्यामुळे किनारा संरक्षित राहातो. एक ते दीड हजार कोटीचा हा प्रकल्प आहे. आपल्याकडेही अशा प्रकारे ब्रेकवॉटर वॉल बांधली तर संपूर्ण किनारा शांत होईल आणि समुद्रमार्गे मुंबईत कोणीही येऊ शकणार नाही. त्यामुळे आपोआपच किनारा सुरक्षित होईल.

सभापती महोदय, ज्यावेळी एमएमआरडीअे प्राधिकरण केले त्यावेळी त्यास मी विरोध केला होता. कारण या ठिकाणी महापालिका असून महापालिकेला वेगळे अधिकार आहेत. आपण लोकशाहीकडून नोकरशाहीकडे अधिकार द्यायला लागला आहात. या शहरामध्ये महापालिका अस्तित्वात असताना एमएमआरडीए करण्याबाबतची तुमची भूमिका काय होती हे मला माहीत नाही. परंतु त्या भूमिकेला मी विरोधी केला होता. मुंबई शहर हे मुंबई पोर्टमुळे वाढले. हे पोर्ट बंद करुन न्हावाशेवा येथे नवीन पोर्ट उभे केले. हे मुंबई पोर्ट बंद करण्याच्यादृष्टीने आपण कोणता विचार केला ? आज जग पुढे चालले आहे. जगामध्ये टनेलच्या माध्यमातून वाहतुकीची व्यवस्था केली जात आहे. आज "लोकसत्ता" या वर्तमानपत्रातून आलेले वृत्त मी वाचलेले आहे. एमएमआरडीअेचे आयुक्त श्री. गायकवाड यांनी सांगितले की, मुंबई पोर्ट बंद पडेल. ते टप्प्या टप्प्याने न्हावाशेवाला नेण्यात येईल. पण आज उलट गंगा वहात आहे. यामध्ये सगळा बदल करण्याचे आश्वासन या चर्चेच्या माध्यमातून मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. मुंबई बंदरामध्ये वेगवेगळया प्रकारची नवीन वाहतूक व्यवस्था करण्याचा प्रयत्न आपण करीत आहात. आणखी एक टर्मिनल बांधत आहात. सभापती महोदय, मुंबई बेटाच्या या 50 कि.मी.च्या परिसरातील किनारा सुरक्षित नाही. त्या संदर्भात कोणतेही नियोजन नाही. आपण विरारहून अलिबागला एका तासात पोहोचण्यासाठी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

विरार-पनवेल-अलिबाग हा मल्टी मोडल कॉरिडॉर करु इच्छित आहात. अशा प्रकारचे नियोजन शासनाकडून अपेक्षित आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे की, अशा पध्दतीचे नियोजन आणि आराखडा तयार केलेला आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ SBT/ ST/ प्रथम श्री.शिगम 17:55

श्री.जयंत प्र.पाटील...

कालच अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना माननीय गृहमंत्र्यांनी या सभागृहात आश्वासन दिले की, आम्ही संरक्षणासाठी 20 बोटी खरेदी करण्याची ऑर्डर दिली आहे. महाराष्ट्रात समुद्र किनारा 720 कि.मी.एवढा आहे. या किना-याचे संरक्षण करण्यासाठी 50 ते 60 बोटींची आवश्यकता आहे. 50 ते 60 बोटी खरेदी केल्या तरच समुद्र किना-याचे संरक्षण शासन करु शकते. एम.एम.आर.डी.ए.ने या गोष्टीचा कधी विचार केला आहे काय ? या संदर्भात गृह खात्याशी चर्चा केली आहे काय ? या संदर्भात कोणतीही चर्चा झाल्याचे माझ्या ऐकण्यात नाही. या चर्चेच्या निमित्ताने मंबई शहराचे संरक्षण, मुंबई शहरातील वाहतूक, मुंबईतील जल वाहतूक यासंदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारचे नियोजन केलेले नाही. यासंदर्भात शासनाने कशा प्रकारचे नियोजन केलेले आहे वा करणार आहे यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ( विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मुंबई शहराच्या बाबतीत पहिल्या दोन, चार भाषणात स्ट्रेसफुली विषय मांडले पाहिजेत ते आमच्या सन्माननीय नेत्यांनी मांडले आहेत. परंतु काही मुद्यांच्या बाबतीत मला आवर्जून उल्लेख केला पाहिजे. परवाच्या दिवशी विधानसभेच्या कामकाजामध्ये सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांनी जलस्त्रोतासंबंधी माहिती देताना मुंबईतील जनतेच्या पाण्याच्या प्रश्न सन 2011 पर्यन्त संपेल असे घोषित केले. मुंबई पाणी पुरवठा श्वेतपत्रिका 2009 प्रकाशित केली आहे. त्यात असे म्हटले आहे की, 2021 साली मुंबईतील पाणी टंचाई 100 टक्के दूर होईल. माननीय जलसंपदा मंत्री अतिरिक्त पाणी कोठून देणार आहे याची मला कल्पना नाही. ही श्वेतपत्रिका आपण सर्वांनी निटपणे वाचण्याची आवश्यकता आहे. या श्वेतपत्रिकेत अभ्यासपूर्ण असे म्हटले आहे की, मुंबई शहरात पाण्याची टंचाई निर्माण होण्याचे कारण एफ.एस.आय.चे वाटप गेल्या आठ,दहा वर्षात मोठया प्रमाणात झालेले असल्यामुळे या समस्येला मुंबईकरांना तोंड द्यावे लागत आहे. या श्वेतपत्रिकेत एफ.एस.आय.च्या वाटपा बाबतची माहिती वर्षवाईज नमूद केलेली आहे. महानगरपालिकेच्या झोनवाईज माहिती दिलेली आहे. शासनाने खिरापती सारखा एफ.एस.आय. वाटला आहे. टी.डी.आर. असेल, स्लमचा एफ.एस.आय.असेल, या सर्व गोष्टीचे बर्डन मुंबई शहरावर आल्याने पाण्याच्या समस्येला मुंबईकरांना तोंड द्यावे लागत आहे. आता तर चाळीस वर्षा पूर्वीच्या इमरतीच्या पुर्नविकासाला आपण 6 एवढा एफ.एस.आय.दिला आहे. कोणीही यावे आणि टिकली मारुन जावे अशी परिस्थिती आज एफ.एस.आय.च्या बाबतीत निर्माण झालेली आहे. कोणीही यावयाचे, त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटावयाचे आणि काही तरी कारणे पुढे करुन आपला एफ.एस.आय.वाढवून घ्यावयाचा असे प्रकार मोठया प्रमाणात झाले आहेत व होत आहेत. परंतु एफ.एस.आय.वाढवून देताना मुंबईतील इन्फ्रास्टक्चरचे काय होणार याचा कधी गांभीर्याने विचारच शासनाकडून केला जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. या श्वेतपत्रिकेत म्हटले आहे की, डी.सी.रुल आणि अतिरिक्त एफ.एस.आय.चा फेर आढावा घेण्याची स्थिती निर्माण झालेली आहे. खरोखर इतका एफ.एस.आय.आपण देऊ शकतो काय ? मुंबई शहरात पाण्याचे नियोजन करण्यासाठी 35 वर्षापूर्वीचा जो कर्मचारीवर्ग होता. पाण्याच्या पाईप लाईन्स तीन ते चार पटीने

3...



ABG/ MAP/ SBT/ ST/ प्रथम श्री.शिगम 17:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

झाल्या आहेत. परंतु कर्मचारीवर्ग तेवढाच आहे. आपण संगणकाचा वापर करीत आहात. परंतु पाहिजे तेवढया प्रमाणात संगणकाच्या वापर होत नाही असे श्वेतपत्रिका म्हणते आहे. श्वेतपत्रिकेतील मुद्दे सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात आणून मुंबईकर जनतेला न्याय द्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. दरवर्षी 70 कि.मी.च्या पाण्याच्या पाईप लाईन्स मुंबईमध्ये पडतात असे श्वेतपत्रिका सांगते आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्यामुळे या सगळ्या समस्यांना आपण कसे तोंड देणार आहोत, यावर कसा मार्ग काढणार आहोत हा खरा प्रश्न आहे. श्वेतपत्रिकेमध्ये उल्लेख केला आहे. सन्माननीय मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या बंगल्यावर 24 तास पाणीपुरवठा होत असेल. परंतु 1951 पासून पाण्याची मागणी आणि पुरवठा याची रुपरेषा याठिकाणी दिली आहे. 2007 पासून 2011 पर्यंत 80 टक्के पाणी उपलब्ध होणार आहे. त्यानंतर ते 86 टक्के उपलब्ध होईल. हे सुध्दा दरडोई पाण्याची उपलब्ध काढली आहे तसा वापर केला तरच शक्य आहे. टॉवर्समध्ये शॉवर आणि टब वाढत आहेत. त्यामुळे त्याठिकाणी यापेक्षा जास्त वापर वाढेल. त्यामुळे पाण्याची मागणी आणि पुरवठा 2021 पर्यंत योग्य प्रमाणात होणार नाही. मध्य वैतरणा प्रकल्प, पर्यावरण मंत्रालय यांची परवानगी ही कामे वेळेत झाली, तितका निधी तिकडे दिला गेला तर मुंबईला त्या त्यावेळी नियमित पाणी मिळू शकते असा मुद्दा आहे. सध्या मुंबईमध्ये एमएमआरडीए आणि महानगरपालिका यांच्यातील भांडणे रोज वृत्तपत्रात वाचावयास मिळत आहेत. चाळीतील दोन बायका जशा आपापसात भांडतात तशी या दोन संस्थांची भांडणे जोरात सुरु आहेत. मुंबई महानगरपालिका आणि त्या महानगरपालिकेचे अधिकारी या विषयाबाबत बोलत असताना महानगरपालिकेत आम्ही सत्तेत आहोत म्हणून बोलतो असे नाही. कै.राजीव गांधी यांनी पंचायत राज बळकट करण्याचा प्रयत्न केला. त्याचा आम्ही उदो उदो केला. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्याच्या विषयाचे सर्वांनीच स्वागत केले. परंतु 0.33 टक्के एफएसआय महानगरपालिका क्षेत्रात देत असताना रेडी रेकनरच्या 20 ते 60 टक्के रेटप्रमाणे द्यायचा आणि एमएमआरडीए क्षेत्रात 200 टक्के रेटने द्यायचा. महानगरपालिका क्षेत्रात एफएसआय खरेदी करुन वाढला तरी त्याची चिंता एमएमआरडीएला नाही. कारण एमएमआरडीए क्षेत्रात 200 टक्के रेटनपे तो इतका वाढणार नाही. ही जी डिस्क्रिपन्सी आहे त्यामुळे महानगरपालिकेची चिंता करावीशी वाटते. एमएमआरडीए जी कामे करीत आहे ती चांगली की वाईट याची चर्चा नंतर करु. परंतु आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर एक पूल पाडला. एका पुलाचे काम सुरु आहे. पी.डिमेलो व किडवाई मार्गावर काम चालू आहे. सेनापती बापट मार्गावर कल्वर्टचे काम सुरु आहे. एस.व्ही.रोडवर स्कायवॉकचे काम सुरु आहे. चारही पॅरालल रस्त्यांवर एमएमआरडीए मार्फत एकाच वेळी कामे हाती धेण्यात आली. त्यामुळे मुंबईतील रहदारीचे कसे होणार? मग टेंडर फ्लोट करा, वर्क ऑर्डर द्या. जय हो हा नारा गुंजवायचा. तो

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

असा गुंजत नाही. मुंबई शहराचा विकास करताना तो टप्प्याटप्प्याने केला पाहिजे. मुंबईची ट्रॅफिक कशी सरकेल? ट्रॅफिक कशी सरकेल यापेक्षा जय हो कसे सरकेल याकडे अधिक लक्ष आहे. सध्या नवीन मुख्यमंत्री आल्यानंतर जयंत जोरात चालले आहेत. जयंत शहा कोण आहेत मला माहिती नाही. पुण्यातील आहे असे म्हणतात. या जयंत शहाची दादागिरी चालली आहे. मी नाव घेऊन बोलत आहे. मी कधी खोटे बोलत नाही. कोणाच्या दबावाखाली एकाच वेळी इतक्या मोठया प्रमाणावर मुंबई शहरात कामे हाती घेण्यात आली? मुंबई शहरात विकास कामे झाली पाहिजेत. नियोजनबध्दरित्या ती हाती घेण्यात आली तर आम्ही कौतुक करु, स्वागत करु. हे सगळे केल्यानंतर मुंबईतील ट्रॅफिकच्या अडचणींचा विचार कोण करतो?

4ए1.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. भोगले..... 18:05

श्री. विनोद तावडे .....

432 चौरस किलोमीटरच्या संपूर्ण मुंबईत 103 चौरस किलोमीटर मध्ये मेट्रो रेल्वे, 60 चौरस किलोमीटरमध्ये मोनो रेल आणि 30 किलोमीटरमध्ये स्काय वॉक त्यांच्या अस्तासह 50 फुटाची जागा एमएमआरडीएची राहील. म्हणून एवढा सगळा एरिया जो आहे त्यातील 50 फुटाची जागा मुंबई महानगरपालिकेकडून एमएमआरडीए कडे गेली. एमएमआरडीए या भागातील डेव्हलपमेंट मग त्यात पाण्याची सुविधा असेल अथवा वॉटर लाईन किंवा सिव्हरेज लाईन असेल हे सर्व अधिकार एमएमआरडीए कडे घेतले. मला वाटते की आता केवळ मुंबई महापालिका बरखास्त करण्याचेच शिल्लक आहे, तेही करुन टाका म्हणजे "जयंत हो" असे हे सर्व चालू आहे. घटनेतील 74 व्या कलमामध्ये दुरुस्ती केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांना जे अधिकार घटनेने दिलेले आहेत परंतु वास्तविक हे अधिकार अधिकाऱ्यांकडेच जास्त आहेत, लोकप्रतिनिधींना काहीच अधिकार नाहीत आणि शासनाचे अधिकारी व महापालिकेचे अधिकारी अशा अधिकाऱ्यांमध्येच भांडण चालू आहे. त्यांना फक्त मुंबई महापालिकेत जायचे असते, आता तर एमएमआरडीए कडे प्रथम जाण्याची तयारी असते नंतर महानगरपालिका असे हे चालू आहे. असे एक प्रकारचे प्रशासनिक अधिकाऱ्यांमधील वॉर सध्या सुरु आहे. त्यात आयएएस अधिकारी असतील अथवा अन्य कुठले अधिकारी असतील. मोनो रेलच्या संदर्भात एमएमआरडीएचा जो कन्सल्टंट आहे त्यांने सांगितले की, मोनो रेलमध्ये जवळपास 200 कोटीचे नुकसान आहे आणि ते भरुन काढण्यासाठी तिकिटावर आकारणी करावी लागणार आहे. ज्यावेळेस कोकण रेल्वे सुरु झाली होती त्यावेळेस केंद्रशासनाला पैसे खर्च करावे लागले होते. दररोजच्या प्रवासातून रेल्वेला काही फायदा होत नव्हता. कॅपिटल इन्व्हेस्टमेंट बाजूला काढले तर वर्किंगवर भार पडतो. कारण कॅपिटल इन्व्हेस्टमेंटमधील दऱ्या आणि डोंगरात खर्च झालेला पैसा यातून निघू शकत नाही. त्याप्रमाणे मोनो रेलमध्ये सरकार पैसा घालणार काय ? मग मोनो रेलसाठी खर्च झालेला पैसा हा तिकिटातून वसूल करणार काय ? तो देखील चेंबूर आणि रमाबाई आंबेडकर नगरसारख्या भागातून, ज्या ठिकाणी माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे यांचे मोठमोठे होर्डिंग्ज लागलेले आहेत अशा भागातून हा पैसा वसूल होणार आहे काय ? त्या तिकिटात प्रवास करणे अशा भागातील लोकांना, गरिबांना परवडणार आहे काय ? मग यासंदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे याचेही स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या बाबतीत बोलावयाचे झाले आणि मागच्या स्मृतिंना उजाळा द्यावायाचा असेल तर सन 1980 मध्ये 2.50 लाख एवढे गिरणी कामगार मुंबईत होते. त्यानंतर गिरणी कामगारांचा संप दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली झाला तो सन 1983 मध्ये व तो मिटल्यानंतर शासनाने पुन्हा या कामगारांना कामावर घेण्याचे ठरविले त्यातील काहींना कामावर घेण्यात आले नाही. मागील वेळेस याच संदर्भात माननीय विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री म्हणून बोलत असताना घोषणा केली होती की, गिरणी कामगारांपैकी प्रत्येक कामगाराला 60 दिवसांचा पगार देऊ आणि 225 चौरस फुटाची जागा विनामूल्य देऊ. अशी घोषणा प्रत्येक अधिवेशनात त्यांनी वेगवेगळ्या शब्दांमध्ये तर कधी स्मित हास्य करुन त्यांच्या खुबीप्रमाणे केली होती. त्यांनी असेही सांगितले होते की, मुंबईतील 55 हजार गिरणी कामगारांना घरे बांधून देणार. त्यावर ही घरे कधी बांधणार असे विचारले असता, ही घरे बांधू, युएलसीची जमीन मिळाल्यानंतर प्रश्न मिटणार आहे अशा प्रकारे त्या जमिनीवर घरे बांधण्यात येतील असेही ते बोलले होते. या गिरणी कामगारांमध्ये कोकणातील व पश्चिम महाराष्ट्र तसेच कोल्हापूर मधील सुध्दा अनेक कामगार होते हे मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो. परंतु आजपर्यंत अशी घरे बांधण्यात आली नाहीत. मग अशा भूलथापा कशासाठी मारावयाच्या हेच मला समजत नाही. तसेच गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या देऊ, त्यांच्यासाठी ट्रेनिंग सेंटर्स काढू परंतु अद्यापही त्या गिरणी कामगारांचे आणि त्यांच्य कुटुंबियांचे हाल चालू आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय, कॉम्पेनसेशनचा विषयच काढत नाही परंतु आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले ते प्रत्यक्षात येणे महत्वाचे आहे. याच्या डिटेलमध्ये मी जात नाही. कन्व्हेयन्स डिडचे बील 3 अधिवेशन रखडत रखडत एकदाचे पास झाले. शेवटी कन्व्हेयन्स डिडचे बील धक्क्याला लागले आणि मुंबई आणि आसपासचे जे मध्यमवर्गीय होते, जे बिल्डरच्या तावडीत सापडले होते खूश झाले आणि त्यांना वाटू लागले की, आता आमच्या इमारतीच्या जमिनींचे आम्ही मालक होणार. कन्व्हेयन्स डिड बील पास झाल्यानंतर आम्ही पाठपुरावा केला कशी तरी या बिलावर माननीय राज्यपाल महोदयांची सही झाली. परंतु आता कन्व्हेयन्स डिडचे नियम तयार करावयाचे आहेत पण ते नियम सव्वा दीड वर्षापासून तयार केले जात नाहीत. कन्व्हेयन्स डिडचे रुल्स का फ्रेम होत नाही तर बिल्डरच्या ताब्यात ज्या जमिनी आहेत त्यांना त्याचे एक्सपांशन करावयाचे आहे, तेच या इ ारीतील शुक्राचार्य आहेत. कन्व्हेयन्स डिड मध्ये रुल्स रेग्युलेशन करु नये म्हणून 5000 कोटी रुपये चारले गेले आहेत. मी छातीठोकपणे सांगातो, कुठल्या बिल्डरने किती जमिनीसाठी किती रुपये दिले हे सांगतो. म्हणजे आम्ही बिल्डरच्या जोखाडातून बाहेर येऊ नये, आम्ही बिल्डरच्या तावडीतच रहावे असे सरकारला वाटते काय ? ज्यांचे प्रायव्हेट प्लॉटवर घरे आहेत त्यांचे आज काय हाल चालू आहेत ते जरा बघा. असेसमेंट किती पट भरावे लागते, पाण्याचा रेट काय द्यावा लागतो याचा कधी आपण विचार करणार आहात की, नाही ? राजकारणाच्या पलिकडे जाऊन कन्व्हेयन्स डिडचे रुल्स कधी फ्रेम होतील, त्याची अंमलबजावणी कधी होईल याची माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. कन्व्हेयन्स डिड रुल्स फ्रेम करण्याच्या संदर्भात आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत, या विभागाचे अधिकारी चांगले आहेत ते सुध्दा मदत करीत आहेत.

सभापती महोदय, मुंबईतील रेल्वे, मुंबईतील पोर्ट ट्रस्ट, मुंबईतील सॉल्ट पॅनच्या संदर्भातील मालकी केंद्रसरकारकडे आहे ती महाराष्ट्र सरकारकडे आली पाहिजे. आज रेल्वेखात्यातील 55 टक्के नफा लोकल ट्रेनच्या प्रवाशांच्या भाड्यातून येतो. 55 टक्के नफा मिळवून देणा-या रेल्वेचा जनरल मॅनेजर मुंबईत कधी राहिला नाही, लोकल ट्रेनने कधी फिरत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

नाही केवळ येथे येऊन बसतो आणि येथील पैशांचा उपयोग उत्तर भारतातील आणि दक्षिण भारतातील विकासाच्या कामांसाठी करतो. मुंबईच्या लोकलची कधीही सुधारणा केली नाही. श्रीमती ममता बॅनर्जी हया आमच्या वेळी रेल्वे मंत्री होत्या. त्यावेळी यासंदर्भात चर्चा सुरु करण्यात आली होती परंतु तो विषय तसाच राहिला. मला वाटते की, आपण सगळयांनी मिळून मागणी केली पाहिजे की, मुंबईची रेल्वे महाराष्ट्र सरकारच्या ताब्यात द्या, रेल्वे, मेट्रो, बस ट्रान्स्पोर्ट हे सगळे राज्यशासनाच्या ताब्यात आले पाहिजे. मुंबईच्या एमएमआरडीए रीजन मध्ये इंटीग्रेटेड ट्रान्स्पोर्ट सर्व्हीस महाराष्ट्र सरकार आपल्या ताकदीवर उभे करेल आम्हाला केंद्रसरकारची मेहरबानी नको आम्ही ही सर्व्हीस अधिक किफायतशीर, अधिक दर्जेदार चालवू शकतो असा मला विश्वास आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

सभापती महोदय, मुबई शहरामध्ये पोर्ट ट्रस्टची जमीन आहे. ती जमीन शासनाने ताब्यात घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मघाशी असे सांगितले होते की, आपल्याकडे पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन आहे. लाल दिव्याची गाडी मिळते म्हणून त्याचे अध्यक्षपद नाराजीने कोणी तरी स्वीकारत असतो. श्री. चंदू राणे हे त्या महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्या महामंडळाला काहीही अधिकार नाहीत. गुजराथ सरकारने त्यांच्या पेट्रोकेमिकल महामंडळाला बरेच अधिकार दिलेले आहेत. समुद्रामध्ये जो गॅस सापडतो त्याचे टेन्डर गुजराथ मधील पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशनने भरले होते आणि गुजराथ सरकार या महामंडळाच्या माध्यमातून कोटयावधी रुपयांचे मालक झालेले आहे.तेव्हा आपणसुध्दा पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशनमध्ये त्याप्रमाणे केले पाहिजे. आपल्याकडील पोर्ट ट्रस्ट आपल्यालाच चालविण्यासाठी मिळाले पाहिजे.त्यातून राज्य सरकारला कोटयावधी रुपये मिळू शकतील. पोर्ट ट्रस्टची जमीन ही आपली आहे. केन्द्र सरकारची ही जमीन नाही. केव्हा तरी या गोष्टीचा मुलभूत विचार करावयास पाहिजे. सॉल्ट पॅन असो, पोर्ट ट्रस्ट असो, रेल्वे असो ते सर्व महाराष्ट्राच्या ताब्यात दिले गेले पाहिजे. राज्य सरकार ते चांगल्या प्रकारे चालवू शकेल. अशा प्रकारचा विश्वास सरकारने जनतेला दिला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मुंबईचा विकास करीत असतांना या सर्व मुद्यांचा विचार करण्याची आज गरज आहे.ते मुद्दे मी या ठिकाणी मांडलेले आहेत. मुंबईच्या हितासाठी काही प्रश्नांची उत्तरे राजकारणाच्या पलीकडे जाऊन माननीय मंत्री श्री हसन मुश्रीफ यांनी दिली पाहिजेत. मुंबई ही दुभती गाय आहे म्हणून केवळ एफ,एस.आय वाढवावयाचा आणि फंड गोळा करावयाचा असे होता कामा नये. जेवढा फंड तुम्ही गोळा करता तेवढा फंड जरी मुंबईच्या मुलभूत सुविधासाठी दिला तरी मुंबईचे भले होईल. तेव्हा या सर्व गोष्टींचा विचार करुन माननीय मंत्री महोदयांनी मोकळपणाने उत्तर द्यावे आणि पुढचा निर्धार व्यक्त करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती** : अजूनही अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात बोलावे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : अजून किती सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, किरण पावसकर डॉ.नीलम गो-हे ,अनिल परब,संजय केळकर आणि मधुकर चव्हाण इत्यादी सन्माननीय सदस्य बोलणार आहेत आता सन्माननीय सदस्य श्री.मधुक र चव्हाण यांनी भाषण सुरु करावे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,माननीय मंत्री महोदय थातुरमातूर उत्तर देऊन मुंबईचा विषय संपविणार आहेत असे मला वाटते. या ठिकाणी अधिका-यांची गॅलरी जरी इनव्हिजीबल असली तरी मुंबईच्या संदर्भात या ठिकाणी अत्यंत महत्वाची चर्चा सुरु असल्यामुळे अधिका-यांच्या गॅलरीमध्ये मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. फाटक आणि एमएसआरडीसीचे मॅनेजिग डायरेक्टर यांनी ही चर्चा ऐकण्यासाठी उपस्थित रहावयास पाहिजे होते. परतु हे अधिकारी येथे उपस्थित नाहीत. मुंबईतील लोकांनी सत्ताधारी पक्षाचे पाच खासदार निवडून दिलेले असल्यामुळे सत्ताधारी पक्षाला एवढी मिजास चढलेली आहे. मुंबई शहरामध्ये 1 कोटी 19 लाख लोक राहत असून महाराष्ट्राच्या 1/10 टक्के लोक मुंबई शहरात राहतात . या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत आणि अन्य काही सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. या प्रस्तावाच्या निमित्ताने कोणत्याही विषयावर जेव्हा अडीच तास चर्चा होते तेव्हा त्या चर्चेतून सरकारला दिशा देणारे बोलले गेले नाही असे कधीही होत नाही. सभापती महोदय, मघाशी या ठिकाणी कनव्हीएन्सच्या बिलाचा उल्लेख केलेला आहे. त्याबाबतीत मी नंतर सविस्तर बोलणार आहेच. सन्माननीय सदस्य येथे त्याबाबतीत बोलले असल्यामुळे त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही . नियमांमध्ये बसत नाही म्हणून कनव्हीएन्सच्या संदर्भात लक्षवेधी सूचना या ठिकाणी येत नाही. मुंबईच्या लोकांनी तुम्हाला निवडून दिलेले आहे ना ? गोर गरीब लोकांच्या घरावर बिल्डर गाढावाचा नांगर फिरवत आहेत याची शासनाला लाज वाटावयास पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/ 18:20

श्री. मधुकर चव्हाण...

आम्ही या सभागृहामध्ये एकेक तास बोलत रहावयाचे, तुम्ही नियम पाळले पाहिजेत आणि आम्ही नियमाने चालले पाहिजे म्हणून पाच-पाच मिनिटांनी बेल वाजविली पाहिजे. आमचे म्हणणे ऐकण्यासाठी याठिकाणी आयुक्त आले आहेत काय? बेकायदेशीररित्या, वाममार्गाने, सरकारच्या दबावाखाली मुंबईच्या स्थायी समितीमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणारे प्रस्ताव आणता. तुम्ही मुंबई महानगरपालिकेची स्वायत्तता काढून घेतली. 1984 साली मुंबई महानगरपालिका बरखास्त केली. त्यावेळी कायद्यामध्ये मुंबई महानगरपालिका बरखास्त करण्याचे कधीही कलम नव्हते. परंतु माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांनी शिवसेनेची बाजू घेतली म्हणून कांगावा केला गेला. त्यांच्या पायात पाय घालण्यासाठी कै. रामराव आदिक यांच्याकडे नगरविकास खाते देऊन त्यांना उप मुख्यमंत्री करण्यात आले. आणि मुंबई महानगर पालिका बरखास्त करण्याचे कलम कायद्यामध्ये समाविष्ट केले. म्हणजे स्वीट वील बी गव्हर्नमेंट असे तुम्ही चालणार? मुळात या मुंबई शहराचा विकास कुणी करावयाचा हे ठरलेले नाही. तुम्ही एमएमआरडीए निर्माण केल्यामुळे ते मुबई महानगरपालिकेच्या तंगडीत ंतंगडी घालीत आहे. म्हणजे मुंबई शहरामध्ये तुम्ही एफ.एस.आय. वाढवायचा, तुम्ही वाढविलेल्या एफ.एस.आय. मुळे मुंबईत उभ्या राहणाऱ्या इमारतींना पायाभूत सुविधा मुंबई महानगरपालिकेने पुरवावयाच्या? या ठिकाणी श्वेतपत्रिकेमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, सरकारच्या धोरणामुळे मुंबई शहरामध्ये टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. तसेच, परप्रांतियांच्या बेसुमार लोंढयामुळेच मुंबईकरांच्या तोंडचे पाणी पळाले. अशातऱ्हेचा श्वेतपत्रिका अहवाल दिला आहे. त्या श्वेतपत्रिकेमध्ये काय म्हटले आहे? आपण एकेक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आपण टीडीआर वाढविणार आहात. आज मुंबईतील 20-25 लोक कोटयावधी रुपयांचा टीडीआर खिश्यामध्ये घेऊन बसले आहेत. पूर्वी मुंबईच्या उपनगरामध्ये 1 एफएसआय होता, तो शहरामध्ये 1.33 झाला. केवळ गोरगरीबांसाठी घरे बांधावयाची आहेत म्हणून म्हाडासाठी 3.99 एफएसआय देण्यात आला. एखाद्या नॅरो प्लॉटवर छोटी इमारत असेल, आणि त्याठिकाणी शंभर-एक लोक रहात असतील तर त्यांचे पुनर्वसन त्याच जागेवर करता येत नाही. त्यासाठी 4 एफएसआय करण्यात आला. तिथल्या तिथेच त्यांचे पुनर्वसन करता यावे म्हणून हा एफएसआय वाढविण्यात आला. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी म्हणाले की आम्ही मुंबईचे वाटोळे केले. आम्ही पाच वर्षे सत्तेवर होतो त्यावेळी आमच्या काही चुका झाल्या असतील. माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, आमच्या चुका झाल्यामुळे लोकांनी आम्हाला घरी

DGS/ MAP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण...

बसविले. आमच्या नेत्यांनी सांगितले आहे की, लोकसभेच्या निवडणुकीमध्ये लोकांनी आम्हाला पराभूत केले हे आम्ही मान्य करतो. सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये एफएसआय किती वाढविला? अडीच, तीन, चार, पाच पर्यंत वाढविला? एफएसआय वाढवितांना तुम्ही याठिकाणी शांघायचे उदाहरण देऊ नका. सभापती महोदय, श्वेतपत्रिकेमध्ये म्हटल्याप्रमाणे मुंबई शहरामध्ये सन 2009 साली पाण्याची मागणी 4200 लिटर इतकी होती आणि पुरवठा 3350 लिटर इतका होत आहे. सन 2011 मध्ये पाण्याची मागणी 4400 लिटर इतकी राहणार आहे, तर 3700 लिटर इतका पुरवठा असणार आहे. मुंबई शहराची लोकसंख्या त्यांनी गृहीत धरल्याप्रमाणे 1 कोटी 56 लाख इतकी होणार आहे. तुमचे नगरविकास खाते फक्त एफएसआय वाढवीत आहे, टीडीआर वाढवीत आहे. कै. बॅ. रजनी पटेल हे मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. त्या प्रत्येक वेळी 1975, 1980 व 1985 पर्यंतच्या झोपडया तुम्ही अधिकृत करीत गेलात. सभापती महोदय, आपण याठिकाणी किती लोकांना बनविता? काल माननीय सदस्य श्री. किरण पावस्कर यांचा एक प्रश्न होता. त्यांनी असा प्रश्न विचारला होता की, "मुंबईतील सन 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देऊन त्या नियमित करण्यात येणार आहेत हे खरे आहे काय?" त्याचे त्यांनी होय किंवा नाही असे उत्तर दिले पाहिजे. तुम्ही राजकीय अर्थाने बनेलगिरीचे उत्तर दिले. ते असे की, "झोपडपट्टीधारकांच्या पात्रता दिनांकाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली आहे व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे".

(यांनततर सौ. रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 18:25

श्री.मधुकर चव्हाण . . . .

त्यांनी प्रश्न विचारला होता की, 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देऊन त्या नियमित करण्यात येणार आहेत हे खरे आहे काय ? आता याचे उत्तर "होय किंवा नाही" असे दिले पाहिजे. पण तुम्ही याचे उत्तर बनेलगिरीने दिले आहे की, मी हे राजकीय बोलत आहे. झोपडपट्टीच्या संदर्भात सर्वोच्य न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली आहे व सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही होईल. 2000 पर्यंतच्या झोपडयांना नियमित करण्यात येईल असे अमिष दाखवून तुम्ही लोकांची मते घेतली. पण या याचिकेबरोबर जे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे, त्या मध्ये असे म्हटलेले आहे की, 1995 नंतर आम्ही मुंबईच्या झोपडयांना मान्यता दिलेली नाही. मघाशी सन्माननीय सदस्यांनी माननीय श्री.ए.आर.अंतुलेसाहेबांचे बरोबर उदाहरण दिले. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री.जयराज फाटक यांनी तुळशी पाईपरोडवरील सर्व झोपडया एकाच वेळी उठविल्या. लगेच व्होल्गा टेरेस नावाच्या पत्रकार होत्या. सर्व पत्रकार चांगलेच असतात. समाजाचा उद्धार करीत लोकांना दिशा देतात. आणीबाणीनंतर जे सत्तांतर झाले, त्याचे कारण लेखक आणि त्यांची पत्रकारीताच होती. त्यामुळे जेलमधून बाहेर आलेल्या लोकांना असे वाटलेही नव्हते की, देशामध्ये सत्तांतर होईल. परंतु व्होल्गा टेरेस सगळया जगाचे कल्याण करण्यासाठी निघाल्या होत्या. त्यांनी 15 पैशाच्या पोस्ट कार्डवर मुंबई हाय कोटाच्या न्यायाधिशांना एक पत्र लिहीले. मला असे वाटते की, त्यावेळी श्री.लेन्टीनसाहेब हे न्यायाधीश असतील किंवा दुसरे कोणी असतील. माझ्या मनामध्ये त्यांच्याबद्दल अनादर नाही. मला त्यांच्याबद्दल काही बोलावयाचे नाही. त्यांनी ती याचिका म्हणून लगेच दाखल करुन घेतली आणि या कारवाईला स्टे दिला. त्यावेळी माननीय श्री.ए.आर.अंतुलेसाहेबांनी एक गोष्ट केली की, न्यायाधीशांच्या बंगल्याच्या बाहेरील फुटपाथवर एक बेकायदेशीर झोपडी बांधावयास सांगितले. अशा प्रकारे फुटपाथवर झोपडी बांधल्याचे निदर्शनास आल्यानंतर न्यायाधिशांनी लगेच मुंबईच्या पोलीस कमिशनरनां पत्र लिहीले की, माझ्या बंगल्याच्या बाहेर किंवा कॉलनीच्या बाहेर, मी जेथून बाहेर पडतो तेथील बेकायदेशीर झोपडी उद्याच्या उद्या उठविली गेली पाहिजे. वा रे वा, वा रे वा, स्वत:च्या घरासमोर झोपडी झ ाल्यावर ती बेकायदेशीर होते. याबाबतीत श्री.अंतुले यांनी निर्णय घेतल्यानंतर श्रीमती व्होल्गा टेरेस यांची याचिका रिट पिटीशन समजून त्याला स्टे दिला गेला. आव-जाव घर तुम्हारा. मुंबई म्हणजे एक धर्मशाळा केलेली आहे. मला कुठेही जाण्याचा अधिकार आहे, पण मला दुसऱ्याच्या ...

. . . .4 ई-2

श्री.मधुकर चव्हाण . . . .

अधिकारावर गदा आणण्याचा अधिकार नाही. मला हा अधिकार घटनेने दिलेला नाही. 2004 मध्ये माननीय श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री झाले. त्यांनी झोपडपट्टयांवर बुलडोझर फिरवला. चांगली कामगिरी केली. त्यानंतर लगेच सन्माननीय श्री.गुरुदास कामत आणि सन्माननीय श्री.कृपाशंकर सिंह हे माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे गेले आणि व्होट बँक गेली, व्होट बँक गेली अशी ओरड केली. मग माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी स्टे दिला. तुम्ही या देशाकडे व्होट बँक म्हणून पहाणार आहात काय ? आईच्या पोटातून जन्माला येताना सत्तेचा मुकूट डोक्यावर घेऊन कोणी आलेले नाही. सत्ता येईल आणि जाईल. जर ही सत्ता जनतेच्या भल्यासाठी वापरणार नसाल तर ते बरोबर नाही. आज तुम्ही मुंबईचे गटार करुन टाकलेले आहे. लोकांना चालण्यासाठी रस्ते नाहीत वगैरे बाबींवर बोलून मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बरोबर सांगितले की, मानखूर्द, चेंबूर, वडाळया इ.हार्बर लाईनच्या मार्गावर 350 झोपड्या होत्या. या झ ोपडया 7-8 महिन्यापूर्वी बांधलेल्या होत्या. ज्यावेळी त्या भागामध्ये रेल्वेसाठी रुळ वाढविण्याचा प्रश्न आला, तेव्हा आमच्या काळात पी.ए.पी.च्या नावाखाली मानखूर्दला घरे बांधण्यात आली. कोर्टाने असे आदेश दिले की, त्यांना तेथे पर्यायी जागा द्यावी. 350 झोपड्यांमध्ये 211 बांगलादेशीय नागरीक आहेत. याबाबतीत ऑर्डर दिल्यानंतर याबाबतीत ती केस मेन्शन देखील केली नाही किंवा दुसऱ्या दिवशी रेफर देखील केली नाही किंवा कोर्टाकडे अर्ज देखील केला नाही की, याबाबतीत आदेश दिलेला असला तरी आम्ही हाय कोर्टाचा आदेश धुडकावून लावू शकत नाही. यासाठी सुप्रीम कोर्टामध्ये जाण्यासाठी वेळ लागेल. परंतु या ज्या बेकायदेशीर झोपडया आहेत, त्यांना तुम्ही लगेच 225 चौ.फू.जागा देऊन मोकळे झाला आहात. तुम्ही काय चालविले आहे ? मुंबईमध्ये सर्व ठिकाणी सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत सर्वांनी सांगितले आहे म्हणून मी अधिक बोलत नाही. झोपडपट्टी म्हणजे कॅन्सर आहे. तुम्ही आमची टिंगल करु नका. परंतु शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी 40 हजार घरे देण्यासाठी शिवशाही प्रकल्पाची कल्पना साकारली आणि आमच्या सरकारच्या कालावधीमध्ये 18 हजार घरे बांधली आहेत. त्यावेळी मी म्हाडाचा चेअरमन होतो. तुम्ही 160 चौ.फू.च्या कोंबडीच्या खुराडयात लोकांना ठेवले होते. 1996 मध्ये नागपूर येथील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि

. . . .4 ई-3



APR/ KGS/ MAP/ 18:25

श्री.मधुकर चव्हाण . . . .

नंतर त्याबाबतचा कायदा मंजूर करण्यात आला. त्यानुसार 225 चौ.फू.जागा दिली. याठिकाणी कोणीही यावे असे आम्ही कोणाला आमंत्रण दिले नव्हते. पण वर्षानुवर्षे तुम्ही मतांसाठी पाप करुन ठेवले होते. जसे एखाद्या घरामध्ये किंवा गॅलरीमध्ये चिमणीला घरटे बांधावयाचे असेल तर ती काटक्या-कुटक्या आणते. अशा वेळी जर तुम्हाला घरामध्ये चिमणीचे घरटे नको असेल तर तिला सुरुवातीलाच हाकलून लावावयास पाहिजे. परंतु जर एकदा चिमणीने घरे तयार केले,अंडी घातली, पिले बाहेर आली तर त्या पिल्लांसकट घटरे बाहेर फेकून देण्याचा तुम्हाला अधिकार नाही. तसेच बाहेरुन येणारे लोक बेकायदेशीर झोपडया बांधणार, ते लोक वर्षानुवर्षे तेथे रहाणार, तेथे त्यांची मुले मोठी होणार. ती अजुबाजूच्या म्युनसिपालटीच्या शाळेमध्ये जाणार आणि एक दिवस तुम्ही तेथे बुलडोझर फिरविणार. मघाशी सांगितल्याप्रमाणे शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई शहरातील माणसांसाठी योजना आणली. ती काय होती ? तर जो एफ.एस.आय.तेथील लोकांना देणार, तेवढा सेलेबल एफ.एस.आय.दिला.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

एक चांगल्या प्रकारची योजना सुर झाली. त्याबाबत अधिकाऱ्यांनी काय केले? एखाद्या झोपडपट्टीमध्ये 70 झोपडया असतील आणि त्याठिकाणी एस.आर.ए.योजना जाहीर झाली तर तो बिल्डर तेथे 80 ते 150 झोपडया उभ्या करायचा, कारण तेवढया खोल्या त्याला जास्त मिळायच्या. या पापाचे धनी हे शासन आहे. म्हाडा हे एक भष्टाचाराचे कुरणच आहे. मराठी माणसाचे हाल कुत्रा खात नाही, अशा तऱ्हेची स्थिती आहे.मुंबईत 52 ट्रँझिट कॅम्पस् बांधलेले आहेत. मुंबईच्या विकासासाठी कोणकोणत्या योजना सरकारने घेतल्या आहेत त्या बाबत शासनाने या चर्चेला उत्तर देताना सागितले तर ते आम्हाला आवडेल. या मुंबईच्या जनतेने कॉन्ग्रेसला पाच लोकसभेच्या जागा जिंकून दिल्या आहेत म्हणून या मुंबई शहरात या गोष्टी करण्याबाबतचे निर्णय शासनाने घेतले आहेत. पण अशा प्रकारचे उत्तर दिले जाणार नाही. कारण या मुंबईतील जनतेला पाच वर्षे झुलत ठेवावयाचे आहे. एखादा माणूस गरीब असेल, भिकारी असेल तर तो शासनाकडे भिक मागायला येईल आणि मग त्याच्या ताटात काही तरी टाकून, त्याच्या मोबदल्यात, त्याचे मत घेण्यात येईल्. कॉंग्रेसने नेहमी माणसांची आगतिकता, गरज विकत घेतलेली आहे. माणसांची गरिबी विकत घेतली आहे. माणसांचे अज्ञान विकत घेतले आहे. माणसाचे दारिद्रय विकत घेतले आणि अशा तऱ्हेने त्याला अज्ञानात ठेवून मते विकत घेतली आहेत. या मुंबई शहरातील लोकांना काही देण्यात येणार आहे काय? या मुंबई शहरात एमएमआरडीएतर्फे पाच लाख घरे बांधण्यात येणार आहेत ती कोणाला देण्यात येणार आहेत? काल मला एका अधिकाऱ्याने सांगितले की, मुंबईच्या बाहेरुन जे लोक येतात तेव्हा ते एकटे असतात. मुंबईत येताना त्यांच्याबरोबर कुटुंब नसते, ती माणसे या मुंबई शहरात राहतील. मुंबईतील मूळ रहिवासी माणूस, या पाच लाख घरांमध्ये रहायला जाणार नाही. बाहेरचेच लोक या ठिकाणी रहायला येणार आहेत. या ठिक्‌णी माननीय मंत्रिमहोदय म्हणाले की, या मुंबई शहरात मोफत घरे बांधण्याचे जाहीर केल्याबरोबर ती घरे मिळण्याच्या अभिलाषेने बाहेरील लोक या मुंबईत येत आहेत. वाद होऊ नये म्हणून एक वेळे हे खरे नाही असे गृहीत धरु. पण ही पाच लाख घरे कोणाला देण्यात येणार आहेत? ही घरे एमएमआरडीए बांधणार असेल तर हाऊसिंग बोर्ड काय काम करणार आहे? मुंबई शहरात कुठल्याही प्रकारचा समन्वय ठेवण्यात आलेला नाही. मुंबई शहरात वेगवेगळया ऑथॉरिटीज तयार करण्यात आलेल्या आहेत. मुंबई विकास प्राधिकरण वेगळे आहे. एम.एस.आर.टी.सी. वेगळे आहे. म्हणजे फ्लाय ओव्हर

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

बांधण्याचे काम शासनाने करावयाचे आणि तेथे अनधिकृत फेरीवाले आले की त्याना महानगरपालिकेने हटवायचे. शासनाने झोपडपट्टया वाढवायच्या आणि मुंबई महानगरपालिकेने त्यांना पाणी द्यावयचे. पाणी मिळत नाही म्हणून पुन्हा मोर्चे काढायचे कारण महानगरपलिकेत शिवसेना-भाजप या पक्षाचे राज्य आहे.हे काय चालले आहे हे मला कळत नाही. एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. गायकवाड, महानगरपालिकेचे आयुक्त श्री. जयराज फाटक आणि एमएसआरडीसी ची माणसे या तिन्ही अधिकाऱ्यांची एकत्रिकरण करण्यात यावे. ही तिन्ही माणसे दर महिन्याला एकत्र बसतात काय? याठिणी वडाळा लिंकरोडचे उदाहरण देण्यात आले. या लिंकरोडसाठी 55 कोटी रुपये खर्च केले आहेत. ते काम पाच ते सात वर्षे चालले. ज्या दिवशी ते काम संपल्याचा नारळ फोडून पेढे वाटण्यात आले त्याच्या दुसऱ्यच दिवशी मोनोरेलसाठी सिमेंटचा रस्ता खोदायला सुरुवात केली. काय तुघलकी काम चालले आहे? आम्ही येथे पोटतिडकिने चर्चा करु , शासन त्या चर्चेला उत्तर देईल आणि सभागृहाचे आजचे कामकाज संपवून उद्या सकाळी 11.00 वाजता भेटू अशा प्रकारची घोषणा करण्यात आली की काम संपले काय? आपण जनतेला उत्तरदायी आहोत. आपल्याला लोकांनी त्यांचे प्रश्न सोडवायला निवडून दिले आहे. आज मुंबईमध्ये या ठिकाणच्या मराठी माणसालाच भिकारी करण्यात येणार आहे.लालबाग-परळमध्ये टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्याबद्दल आम्हाला काही म्हणायचे नाही. पण त्याच्या बाजूला टेकू लागलेल्या जुन्या चाळी उभ्या आहेत. एखादी इमारत पडल्यानंतर ती जमीन मिळवायची असते. शासनाचा "स्पेशल लॅण्ड ॲक्विजिशन ऑफिसर" म्हाडाच्या बिल्डिंगमध्ये बसत नाही. तो ओल्ड कस्टम हाऊसमध्ये बसतो. लॅण्डलॉर्ड प्रत्येक महिन्याला त्याला 500रुपये देतो मग ती जमीनच ॲक्वायर होत नाही. 25-25, 30-30 वर्षे लोक ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये खितपत पडलेले आहेत. युतीच्या शासनाच्या काळात श्रीमती वंदना खुल्लर नावाच्या मुख्य अधिकरी होत्या त्या काळी आम्ही एक योजना बनविली होती. उदाहरणार्थ युतीच्या काळात त्याठिकाणी शिवशाही प्रकल्पाच्या माध्यमातून एक योजना बनविली. समजा कुल्याब्याच्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये 500 सदनिका आहेत. त्याठिकाणी सगळया बैठया चाळी आहेत. त्या ठिकाणचा सगळा एफ.एस.आय. फुकट गेलेला आहे.

(वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात आली )

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या चर्चेचा वेळ वाढविण्यात यावा आणि येथे चर्चा होऊ द्यावा. एवढेच नाही तर माझी अशी सूचना आहे की, उत्तर देण्यासाठी सगळया माननीय मंत्र्यांना सभागृहात बोलावण्यात यावे. या ठिकाणी रस्त्याच्या प्रश्नासंबंधिचे उत्तर मिळाले पाहिजे. झ ोपडपट्टीच्या प्रश्नासंबंधिचे उत्तर मिळाले पाहिजे. पाण्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. आम्ही या ठिकाणी 'हरिदासाची कथा' ऐकायला आलेलो आहोत काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

आपण आम्हाला सर्व बाबतीत उत्तरे दिली पाहिजेत. आपण आयुक्तांना बोलवून घ्यावयास पाहिजे होते. मुंबई शहरावर चर्चा आहे, आपण या ठिकाणी आले पाहिजे असे त्यांना सांगावयास पाहिजे होते. श्री. गायकवाड यांना बोलवून घ्यावयास पाहिजे. आपले अधिकारी श्री. गायकवाड हे कॉर्पोरेशनला जुमानत नाहीत. आपण मुंबई शहराच्या विकासाच्या संदर्भात तीन ॲथॉरिटीज तयार करुन ठेवलेल्या आहेत. कोणाचा कोणाला पायपोस नाही. म्हणून म्हाडामध्ये आम्ही असे ठरविले की, जर 500 टान्झिट अकोमोडेशन असतील तर उंच इमारती बांधून त्या ठिकाणी त्यांना अकोमोडेट करावयाचे आणि तेथील सर्व ग्राऊंड कंस्ट्रक्शन तोडून तेथे सेलेबल एफएसआयच्या इमारती बांधावयाच्या. आम्ही असे ठरविले की, मध्यमवर्गीयांसाठीच म्हाडाने घरे बांधली पाहिजे. म्हाडाने श्रीमंतांसाठी घरे बांधावयाची नाहीत. श्रीमंत लोक बाजारात आपल्या खिशातील पैसे फेकून स्वर्गातील सुख आपल्या पदरी पाडून घेऊ शकतो. गरीब ते घेऊ शकत नाही. म्हणून आम्ही असे ठरविले की, कमीतकमी 350 चौरस फुटाचे आणि जास्तीत जास्त 450 चौरस फुटाचे वन बेडरुम किचन किंवा टू बेडरुम किचनची घरे बांधावयाची आणि 8 लाखात, 10 लाखात, 11 लाखात सर्वसामान्य माणसांना मिळतील अशा प्रकारची घरे बांधावयाची. आज आपल्या योजनेप्रमाणे या ठिकाण्ी आपल्या आजूबाजूला बसलेले कारकून, पत्रकार, कंडक्टर, ड्रायव्हर, रिक्षा चालविणारा, डबेवाला, पोस्टमन, वायरमन, फायरमन, लिफ्टमन हे आपल्या कोणत्या योजनेतील पैसे घेऊ शकतो ? आपण परप्रांतीयांसाठी पाच लाख घरे बांधणार आहात काय ? मंत्रालयातील क्लार्क जर सेवानिवृत्त झाला, त्याला दोन मुले असतील आणि त्याला जर असे वाटले की, आपल्या दोन मुलांचा संसार नीट उभा करुन द्यावा, दोन मुलांना हॉल आणि वन रुम किचन असलेल्या दोन जागा मुंबई शहरात घेऊन द्याव्यात तर सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याची ग्रॅच्युईटी असेल, पेन्शन असेल, प्राव्हीडंट फंड असेल, विम्याचे पैसे असतील त्यातील अर्धे पैसे मुलीच्या लग्नात गेलेले असतात, आईवडिलांच्या आजारपणात गेलेले असतात. त्याचे सगळे पैसे संसारात गेलेले असतात. त्याला 1 तारखेला पगार मिळाला की, त्याची बायको त्याच्या हातात यादी ठेवते आणि सांगते की, हे रेशनचे पैसे, हे भाडे, हे विजेचे बिल, ही मुलाची फी. त्याच्याकडे पाच रुपये सुध्दा साठत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

नाही. तो सेवानिवृत्त झाल्यानंतर जागा घेणार आहे काय ? माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ज्या भागात राहतात तेथील बांद्रा कॉलनीतील लोक भिकाऱ्यासारखे आपल्याकडे येतात आणि ती कॉलनी आमच्या नावावर करा अशी मागणी करतात. त्या ठिकाणी काय अवस्था झालेली आहे हे आपण पाहिले आहे काय ? या ठिकाणी 52 टान्झिट कॅम्प आहेत. आपल्याकडे 11 हजार घुसखोर आहेत. आमच्या काळात आम्ही एक योजना आणली होती. एक साधा फॉर्म केला होता. समजा आपण त्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये घुसला असाल तर सरळ विचारावयाचे. ट्रान्झिट कॅम्प कोणाला मिळतो ? ज्याची जुनी चाळ आहे आणि ज्याला व्हॅकेशन नोटीस देतो त्याला टान्झिट कॅम्पमध्ये पाठवतो. ट्रान्झिट कॅम्पमध्ये गेल्यानंतर दलाल पाच-पाच, दहा-दहा हजार रुपये घेऊन त्या जागा दुसऱ्याच माणसाला देतात. साडेतीन ते चार हजार बारबाला आपल्या जोगेश्वरीच्या टान्झिट कॅम्पमध्ये राहतात. मालवणीच्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये कोण राहतात ? मालाड मार्वे रोडवर असलेल्या आपल्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये सगळे बांगलादेशीय लोक राहतात. बोरिवलीला कोण राहतात ? मागाठाणेला कोण राहतात ? मुलुंड पूर्व येथे असलेल्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये कोण राहतात ? 9 हजार लोक त्या ठिकाणी राहतात. आपण त्यांना बाहेर काढू शकत नाही. आम्ही एक कायदा केला होता. त्यावेळी साडेसात हजार लोकांना बाहेर काढले आणि डेप्युटी चिफ ऑफिसरसह 43 लोकांना जेलची हवा खायला लावली होती. आम्ही सौदा केला नाही. गरिबांच्या ताटात माती घालून आमच्या घरावर सोन्याची कौले चढविण्याकरिता आम्ही दोन नंबरचा धंदा आमच्या काळात केला नाही. पण आपण ते त्या ठिकाणी करता. त्यामुळे आपण लोकांना बाहेर काढू शकत नाही. परवा म्हाडाच्या संदर्भात मी एक प्रश्न विचारला होता. त्याबाबत थातुरमातुर उत्तर देण्यात आले. आम्ही सरळ प्रश्न विचारला. समजा एखादी 100 खोल्या असलेली इमारत तयार झाली आणि त्या ठिकाणी 70 मूळ लोक असतील तर 30 गाळे अतिरिक्त होतात. ते 30 अतिरिक्त गाळे कोणाला द्यावयाचे असतात ? डेव्हलपमेंट प्लॅनमुळे किंवा रस्ता रुंदीकरणामुळे किंवा रिझर्वेशनमध्ये ज्यांची पडलेली इमारत पुन्हा तयार होत नाही आणि जे ट्रान्झिट कॅम्पमध्ये आहेत त्यांची एक मास्टर लिस्ट तयार केली जाते. मग हे अतिरिक्त गाळे त्यांना दिले जातात. हे

...3...

श्री. मधुकर चव्हाण .....

आपले सगळे दलालांच्या वेढ्यामध्ये बसलेले 90 टक्के हरामखोर लोक असत्य व्हॅकेशन नोटीस आणि इतर कागदपत्रे तयार करतात. चार-चार, पाच-पाच लाख रुपयांना गाळे देतात आणि लोक ट्रान्झिट कॅम्पमध्ये पडलेले आहेत. आपला जवाहरसिंग नावाचा अधिकारी व्हिजिलंस ऑफिसर आहे. भ्रष्टाचाराच्या सगळ्या केसेस त्यांच्याकडे जातात. तोच हरामखोर सौदा करीत बसतो. तुझी केस आहे, पाच लाख रुपये दे असे सांगितले जाते. मी जाहीर आरोप करतो. बाहेरही आरोप करीन. हिंमत असेल तर त्यांनी केस टाकावी. जो भ्रष्टाचारी आहे त्याला आपण व्हिजिलंस ऑफिसर म्हणून ठेवले आहे. त्या ठिकाणी 40 रुम्स होत्या. फोटो तुमचा, नाव माझे आणि अलॉटमेंट याला आणि मूळ मालक अरविंद असतो. मी उदाहरण म्हणून सांगितले. आम्ही या ठिकाणी प्रश्न विचारला. प्रश्न विचारल्यानंतर तेथील अधिकारी माझ्याकडे येतो आणि म्हणतो की, मला आपल्याशी बोलावयाचे आहे. मी त्याला कालपर्यंत बोलावयास दिले नाही.

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ यापूर्वी श्री.बरवड 18:40

श्री.मधुकर चव्हाण....

मुंबईतील मंडळाच्या इमारतींच्या दुरुस्त्या पूर्ण झाल्या आहेत काय असा मी प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला अगदी थातूरमातूर उत्तर दिले आहे. 40 पैकी 18 गाळयांचे वितरण केले आणि ते सर्वच्या सर्व बोगस आहेत. त्याबाबत मी श्री.कुंटे यांना पत्र लिहून याबाबत एक महिन्याच्या आत चौकशी करण्याची मागणी केली होती. पण त्या मुख्याधिका-यांनी श्री.कुंटे यांनाच थुंकी लावली आहे. म्हाडाच्या कार्यालयामध्ये कोणत्या तरी अधिका-यांना तेथे लोकांना कशी वागणूक मिळते हे पाहण्यासाठी पाठवावे म्हणजे कळेल. एखाद्या गटाराच्या बाजूला उभे राहणे शक्य आहे. पण म्हाडामध्ये गेल्यानंतर तेथे गरिबांना कुत्र्यासारखे वागवितात ते पाहून त्यांची कीव येते. मी राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही, पण अशाप्रकारे कारभार करता ? 'काँग्रेस का हाथ आम आदमी के साथ.' कोणाच्या बरोबर काँग्रेसचा हात आहे ? म्हाडाच्या इमारतींमध्ये कोण राहतात, म्हाडाची कोण घरे बांधतात ? परवा म्हाडाने 3500 घरांची लॉटरी काढली होती. त्यासाठी लाखो लोकांनी अर्ज केले होते. त्या लॉटरीत नंबर काढून देण्यासाठी दलालांनी 3 ते 6 लाख रुपये घेतले होते. त्यासंबंधी मी एक लक्षवेधी सूचना दिली होती. तेथील 11 दलालांनी साडेतीन कोटी रुपये घेतले आहेत, खेरवाडी पोलीस स्टेशनमध्ये त्यांची तक्रार केल्यानंतर पोलिसांनी हलगर्जीपणा दाखवून त्यांच्याविरुध्द चार्जशीटही दाखल केलेले नाही. कोर्टात त्यांना सोडून दिले. त्याबाबतची लक्षवेधी सूचना लावण्यासाठी मी अधिका-यांकडे भिका-यासारखा जात आहे. ती लक्षवेधी सूचना आमच्यासाठी लावणार आहात काय, या चर्चा आम्ही आमच्यासाठी करतो काय ? ते दलाल तुमच्या अधिका-यांना पोसतात म्हणून दखल घेतली जात नाही की काय ? शासनाने सर्वसामान्यांसाठी गृहनिर्माण योजना जाहीर केली होती. त्यावेळी श्री.स्वाधिन क्षत्रिय गृहनिर्माण सचिव होते. त्या योजनेसंबंधी आम्हा सगळयांना एक पुस्तक दिले होते. पण या सभागृहात तत्संबंधी एक तासही चर्चा झालेली नाही. महाराष्ट्र शासनाची गृहनिर्माण योजना काय आहे ? शासनाने मुंबईच्या लोकांच्या कोणत्या समस्या सोडविल्या आहेत ते सांगावे. उलट लोकांकडून मते घेता ? सामान्य माणसांचे कुत्रा हाल खात नाही. मुंबईच्या रेल्वेतून लोक कसे प्रवास करतात त्यावर मी बोलत नाही. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी ट्रेनचे उदाहरण दिले. महिलांनी गरोदरपणाची जादा रजा उगाच मागितलेली नाही. बाळंतपणानंतर जास्त दिवस बाळाबरोबर राहता यावे म्हणून शेवटच्या क्षणापर्यंत त्या कामावर येतात, पण लवकर रजेवर जात नाहीत. त्या महिला कसा प्रवास

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

करतात ते बघावे. बोरीबंदर स्टेशनवर मुंबईच्या लोकांचे हाल कसे आहेत ते पहावे. त्याचप्रमाणे ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये जावे, बस स्टॉपवर उभे रहावे, फूटपाथवरुन चाला, रेल्वे स्टेशनवर उभे रहावे, चाळीत जावे. सर्वसामान्य माणसांचे हाल कसे चालू आहेत ते लक्षात येईल. म्हाडा या विषयावर विस्ताराने चर्चा झाली पाहिजे. शासनाकडून अधिवेशन गुंडाळले जाते. पण एखाद्या अधिवेशनामध्ये एक दिवस किंवा दोन दिवस गृहनिर्माण या विषयावर विरोधी पक्षांनी चर्चा उपस्थित केल्यावर शासनाकडून त्याला उत्तर दिले जाईल, असे ठरविता येणार नाही काय ? महसूल विभागावर चर्चा करण्यासाठी बसण्याचे ठरविले आहे.

सभापती महोदय, परवा फेरीवाल्यांचा प्रश्न घेऊन आम्ही एका ठिकाणी गेलो होतो. श्री.मनुकुमार श्रीवास्तव नावाचे अधिकारी आहेत. या अधिका-यांचे काय अजब डोके आहे ते मला समजत नाही. फेरीवाला झोन करण्याचे हायकोर्टाने आदेश दिले आहेत. त्यांनी एक बैठक बोलविली होती. त्यांनी या फेरीवाल्यांना एफएसआय देण्यास भाग पाडले. आमच्या डोक्यात भुसा भरलेला आहे, आम्हाला काही कळत नसेल. चर्चगेटपासून जवळच असलेल्या रस्त्याला फॅशन स्ट्रीट म्हणतात तो रस्ता जाऊन पहावा. या शासनाचे आणि अधिका-यांचे डोळे फुटले आहेत काय ? तेथे एक फुटपाथ शिल्लक ठेवलेली नाही. मग मुंबईतील लोक कसे चालणार ? मुंबईतील उड्डाणपुलाचे काम दोन वर्षात करण्याचे निश्चित केले असेल तर त्या कालावधीतच पूर्ण झाले पाहिजे. पण या कालावधीत पूर्ण झाले नाही तर त्याला दंड ठोकला जाईल. पण तो कंत्राटदार व्हेरिएशन घेऊन येतो, स्टीलचे भाव वाढले आहेत, मजुरीचे भाव वाढले आहेत, सिमेंटचे भाव वाढले आहेत, पाण्याचे भाव वाढले आहेत असे सांगतो आणि वाढीव बिल घेतो. आज पाण्यासंबंधी श्वेतपत्रिका काढण्यात आली आहे ती तर शासनाला घरचा अहेर आहे. सभागृहात श्वेतपत्रिका सादर झाल्यानंतर नगरविकास खात्याचे राज्यमंत्री म्हणून आपण महापालिका आयुक्तांकडे त्याबाबत विचारणा केली आहे काय ? मुंबईत लोंढेच्या लोंढे येत आहेत त्याबाबत शासनाने काय केले पाहिजे असा प्रश्न त्यांना विचारला आहे काय ? बाहेरुन येणा-या लोकांना मुंबई शहरामध्ये कोठे ठेवणार आहात ? म्हणून म्हाडाबद्दल श्वेतपत्रिका काढली पाहिजे अशी मी मागणी करतो. श्री.गुरुदास कामत आणि श्री.कृपाशंकर सिंह यांनी 2004 साली त्याला स्टे आणला होता. आता मुंबईच्या जनतेला पाणी कोठून व कसे द्यावयाचे, झोपडपट्टीत रस्ते कसे द्यावयाचे याची त्यांच्याकडेच विचारणा करावी.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

स्लमडॉग मिल्यनेअर या सिनेमामध्ये आपल्या राज्याची आणि देशाची इज्जत काय आहे हे दिसून येते. स्लमडॉग मिलेनिअर या सिनेमापेक्षा चांगले चांगले सिनेमे ऑस्कर ॲवॉर्डसाठी गेलेले आहेत. या परदेशी लोकांनी भारताची अबू काढली आहे. सगळया जगामध्ये भारत किती दरिद्री आहे हे त्या सिनेमामध्ये दाखविले गेले आहे. त्यामध्ये काम करणा-या दोन मुलांना म्हाडाने गाळे दिले. ते त्यांना दिले पाहिजेत. पण अशी हजारो माणसे आज आहेत. त्यांना आपण काय देणार ? केवळ स्लमडॉगमध्ये काम केल्यामुळे म्हाडाचे गाळे देऊन तुम्ही फोटो काढून घेता ! मुंबई शहरातील दारिद्र्याचे चित्र आज जगासमोर गेले आहे, ती अवस्था आम्ही बदलून टाकू असे जर तुम्ही घरे देताना म्हटले असते तर तुम्ही संवेदनशील आहात असे तुम्हाला म्हणता आले असते. सभापती महोदय, आपण लालबाग, परळमध्ये जाऊन पहा. तेथील आमचे अस्तित्व संपणार आहे. परंतु आम्ही ते संपवू देणार नाही. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, म्हाडातील सर्व अधिका-यांची सर्व प्रकरणी सीआयडी चौकशी केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी किती वॉर्ड ऑफिसर्सना शिक्षा झाली अशी विचारणा केली होती. परंतु त्याचे उत्तर दिले गेले नाही. माझी विनंती आहे की, मुंबई शहरावरील चर्चा ही चटावरचे श्राध्द म्हणून उरकू नका. जवाहर सिंग यांची ताबडतोब बदली केली पाहिजे. तेच भ्रष्टाचारी आहेत. म्हाडातील किती अधिका-यांची चौकशी केली, किती अधिका-यांना बडतर्फ केले याची मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.सभापती महोदय, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी 105 हुतात्मे झाले.हे हुतात्मे महाराष्ट्रातील गेले. घटनेप्रमाणे भाषावार प्रांत रचना झाली ती यासाठी की त्या त्या राज्यातील लोकांनी तेथे राहून आपला विकास करावा. आमच्याकडे दोन-तीन दिवस पाहुणाम्हणून कोणी येऊन राहू शकतो. परंतु घरात आलेला पाहुणा नंतर आपल्याच घराचा ताबा घेतो आणि मला पुन्हा माझ्याच घराच्या बाहेर राहून घरात येण्यासाठी टकटक करावी लागते, अशा प्रकारची स्थिती आज मुंबईतील माणसावर आलेली आहे. या मुंबईच्या प्रश्नावर आपण खरोखर गंभीर असाल तर संबंधित सर्व अधिका-यांना एकत्र आणून मुंबईच्या सर्व प्रश्नासाठी एक श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये मुंबईतील समस्यांच्या संदर्भात मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

मुंबई शहर हे कष्ट करणा-या, स्वत:ची स्वप्ने मूर्त स्वरुपात आणण्यासाठी राबणा-या जनतेचे शहर आहे. मुंबई शहर हे आपल्या राज्याची राजधानी असली तरी आपल्या देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई शहराचा विकास हा संपूर्ण देशाच्या आर्थिक राजधानीचा विकास म्हणून याकडे पाहिले जाते. मुंबई शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने वेगवेगळया योजना राबविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी वाहतुकीच्या आणि पाण्याच्या समस्या सांगितल्या. पण आज मुंबईची लोकसंख्या ही मोठी चिंतेची बाब बनत असून सुध्दा, लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना सुध्दा महाराष्ट्र शासनाने वेगवेगळया योजना राबविण्याचे काम केलेले आहे. वांद्रे-वरळी हा सागरी मार्ग बांधून पूर्ण झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले की, या सागरी मार्ग प्रकल्पाची किंमत साडेचारशे कोटी रुपये होती ती आता 1680 पर्यन्त गेली. ही एवढी किंमत वाढलेली असताना देखील शासनाने हे काम अर्धवट ठेवले नाही मुंबईच्या प्रश्नाची निकड लक्षात घेऊन 1680 कोटी रुपयाचे प्रयोजन राज्य सरकारने केलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 18:50

श्री. रमेश शेंडगे...

आणि तो प्रकल्प आज पूर्णत्वास गेलेला आहे. कदाचित एखाद्या प्रकल्पाचे काम विलंबाने होत असेल तर त्या प्रकल्पाचा खर्च वाढतो ही गोष्ट माननीय श्री. गडकरी साहेब यांनी देखील मान्य केली आहे. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आज या मुंबई शहराकडे देशातील एक मोठे शहर आहे म्हणून पाहिले जात नाही. परंतु जगाचे लक्ष या मुंबई शहरामध्ये आहे. या मुंबई शहरात देशातील, इतर देशातील, इतर राज्यातील आणि राज्यातील उद्योगधंद्याच्या दृष्टीकोनातून येणे जाणे नेहमी असते. या मुंबई नगरीतून 33 हजार कोटी रुपये कराच्या रुपाने केंद्र शासनाकडे जात आहेत. एवढया मोठया प्रमाणात आर्थिक उत्पन्न देणारी ही मुंबई नगरी आहे. परंतु या मुंबई नगरीत राहणा-या लोकांसाठी चांगल्या प्रकारचे इन्फ्रास्टचर उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीमध्ये काहीही उपाययोजना केल्या जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. गेल्या अनेक वर्षापासून मुंबई महानगरपालिकेत शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे. त्यांच्या पक्षाचे सदस्य महापौर म्हणून काम आहेत. तसेच अनेक नगरसेवकही त्यांच्या पक्षाचे त्या ठिकाणी कार्यरत आहेत. मुंबई शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, परंतु या लोकसंख्या वाढीच्या बाबतीत महापालिकेच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही अशी परिस्थिती पाहिल्या नंतर शासनाने अतिशय अभ्यास पूर्वक एम.एम.आर.डी.ए., एम.यू.टी.पी. अशी प्राधिकरणे निर्माण केली आहेत, त्यांच्या माध्यमातून या शहरात वेगवेगळे प्रोजेक्ट राबविण्यात येत आहेत. मुंबई शहरात हजारो, कोटी रुपयांची कामे या प्राधिकरणाच्या माध्यमातून होत आहेत. मला या ठिकाणी सांगण्यास अभिमान वाटेल की, मुंबईचे शांघाय करावयाचे असे मत प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात व्यक्त केले आहे. मी शांघाय बघितले आणि मला खूपच समाधान वाटले. मुंबईचे खरोखरच शांघाय करावयाचे असेल तर त्यासाठी मुंबई सारखे नवीन शहर आपल्याला वसवावे लागेल. कारण शांघायमध्ये जी व्यवस्था आहे, त्या ठिकाणचे रोड, त्या ठिकाणच्या इमारती, तेथील परिवहनाची व्यवस्था अतिशय चांगली आहे. शांघाय प्रमाणे मुंबई शहराचे सुशोभिकरण, मुंबई शहराची प्रगती आणि मुंबईचा विकास करावयाचा करण्याच्या अनुषंगाने नवीन नवीन योजना केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून या शहरात राबविल्या जात आहेत. आज मुंबई शहरात राहणारा कामगारवर्ग असेल, छोटे मोठे उद्योगधंदे करणारे व्यावसायिक असतील

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

यांच्यासाठी सोयी-सुविधा पुरविणे हे महापालिकेच्या प्रशासनाचे आणि राज्य सरकारचे काम आहे. आपण बघतो आहोत की, या शहरातील मोठमोठे उद्योग, कारखाने, गिरण्या नेस्तनाबूत होत आहे. या शहरात मॉल असतील, वेगवेगळया प्रकारची सर्व्हीस इंडस्ट्रीज् असतील यांच्या माध्यमातून व्यवसाय वाढीस लागलेले आहेत. मुंबई शहरातील कष्ट करणारा कामगार वर्ग कमी होत असला तरी ज्या पध्दतीची रोजंदारी उपलब्ध व्हावयास लागली आहे, रोजगार उपलब्ध व्हावयास लागला आहे, त्याप्रकारचे ट्रेनिंग, त्या प्रकारचे शिक्षण, त्या प्रकारचे कौशल्य कामगार वर्गात असले पाहिजे आणि त्या दृष्टीकोनातून शासनाने एखादी योजना सरकारने कार्यान्वित करावी असे मला वाटते. आज मेट्रो रेल्वेचे काम सुरु आहे, मोनो रेल्वेचे काम सुरु आहे, फ्लॉय ओव्हरची कामे सुरु आहेत. अशा प्रकारच्या वेगवेगळया योजना आणून या मुंबई शहरामध्ये राज्य शासन आणि केंद्र शासन एक प्रकारचा विकास आणू पहात आहे या बाबी मी स्वत: पाहिलेल्या आहेत. मला शासनाला सांगावयाचे आहे की, केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून, राज्य सरकारची सुध्दा जास्तीत जास्त मदत घेऊन या मुंबई शहराचा विकास आपल्याला मोठया प्रमाणात करावा लागणार आहे. मुंबई शहरात पाण्याच्या प्रश्न मोठया प्रमाणात भेडसावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवी मुंबई सारखी महानगरपालिका, जी नव्याने स्थापन झालेली आहे, त्यांनी सुध्दा स्वत:चा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वत:च्या मालकीचा एक डॅम तयार केला.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MAP/ ST/ KGS/ पूर्वी श्री. गिते... 18:55

श्री.रमेश शेंडगे .....

तशाच प्रकारे मुंबई महापालिकेने आपल्या समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी विचार करण्याची आवश्यक आहे, असे मला वाटते. आज मुंबईत झोपडपट्टीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. जसे उद्योगधंद्याच्या बाबतीत मुंबईचे नाव मोठी आहे तसेच आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी मुंबई शहरातच आहे अशा प्रकारे कलंकित करणारे प्रश्न देखील मुंबईशी संबंधित आहेत. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, म्हाडा किंवा एसआरए च्या माध्यमातून अशा झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी चांगल्या प्रकारच्या योजना आणून त्यांना चांगले वास्तव्य देण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे. म्हाडा अथवा एसआरएच्या माध्यमातून खरे लाभार्थी सोडून इतरांनाच त्यचा लाभ मिळतांना दिसतो कारण त्यामध्ये भ्रष्टाचार होत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. या अनुषंगाने मी अशी सूचना करणार आहे की, मुंबईत ज्या ज्या ठिकाणी जागा शिल्लक आहेत त्यात मग वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील जागा असेल, बीडीडी चाळीची जागा असेल किंवा पोलिसांची वसाहत असेल अशा ठिकाणी इमारती बांधून त्या त्या लोकांना प्राधान्य दिले पाहिजे. ज्याप्रमाणे वरळी आणि नरिमन पॉइंट, वरळी-वांद्रे सारखे पूल होत आहे त्याचप्रमाणे मध्यंतरी शिवडी-न्हावा-शेवा पुलाचाही विचार समोर आला होता परंतु ते काम कुठे आणि कसे रखडले हे माहीत नाही. तो पूल झाला असता तर मुंबई जे खच्चून भरले आहे त्याचा ताण कमी झाला असता आणि जवळपासचा अलिबाग अथवा बाजूचा परिसर असेल तेथे जाणाऱ्यांना फायदा झाला असता. जाता जाता एवढेच सांगू इच्छितो की, मुंबईकडे संपूर्ण जगाचे लक्ष आहे म्हणून मुंब ही जशी राज्याची व देशाची शान आहे तशी महाराष्ट्रातील जनतेची ती जान सुध्दा आहे. ज्या 105 हुतात्म्यांच्या बलिदानातून ही मुंबई आपल्याला मिळाली, ज्या मुंबईचा वापर पूर्वी आपल्या स्वार्थासाठी होत होता त्या मुंबईत सरकारने हजारो कोटी रुपये खर्च करुन मुंबईच्या समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. कारण या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची सुरक्षितता जशी महत्वाची आहे तसेच येथे राहणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता महत्वाची आहे व तेवढाच विकासही महत्वाचा आहे. म्हणून हजारो कोटी रुपये खर्च करुन आपण आज मुंबईचा विकास साधत आहोत त्याप्रमाणे मुंबईत राहणाऱ्या जनतेसाठी जास्तीत जास्त निधी देऊन मुंबईचा विकास व प्रगती साधावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MAP/ ST/ KGS/

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, देशाची आर्थिक राजधानी व राज्याची राजधानी असलेल्या मुंबईतील वेगवेगळ्या समस्यांच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सभागृहात येत असताना तळमजल्यावर उभे असताना उद्‌वाहनात आपण प्रवेश केल्यानंतर एका हिंदी संगीताची धून ऐकायला मिळते. ती म्हणजे "ए दिल है मुश्किल जीना यहॉ, जरा हट के, जरा बच के, यह है मुम्बई मेरी जान". ही धून आपल्या इमारतीच्या उद्‌वाहनात वाजविली जाते. त्यात असे सांगत आहे की, "जीना मुश्किल है यहाँ" म्हणजे मराठी माणसाच्या राजधानीत मराठी माणसासाठी उभ्या राहिलेल्या महाराष्ट्राच्या विधिमंडळात असलेल्या उद्‌वाहनामध्ये संगीताची धून कायमस्वरुपी वाजते....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

"ए दिल मुश्किल है जीना यहाँ,
जरा हँस के, जरा बच के
यह मुंबई है मेरी जान "

ही हिंदी धून आपल्याला बदलता आली नाही यातच राज्यकर्त्यांच्या मनामध्ये मराठीबद्दलची असलेली आस्था, मुंबई बद्दलची असलेली आस्था प्रदर्शित होते. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. मी परवा सुध्दा भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात ओझरता उल्लेख केला होता की, ही भाषावार प्रांत रचना भारत देश स्वतंत्र झाल्यावर आली असे नाही, तर 1917 साली काँग्रेसचे अधिवेशन होते परंतु तत्पूर्वी लोकमान्य टिळकांनी हा विषय इंग्रजांसमोर सातत्याने मांडला की, भाषावार प्रांत रचनेची गरज आहे कारण प्रशासन त्याशिवाय व्यवस्थित चालत नाही. केरळपासून ते सिंध पर्यंतचा भाग हा एक वेगळा भाग समजला जात होता. त्यांना भाषा नव्हती म्हणून कारभार व्यवस्थित करता येत नव्हता त्यासाठी लोकमान्य टिळकांनी भाषावार प्रांत रचनेचा आग्रह धरला.

**तालिका सभापती ( श्री. हेमंत टकले )** : या प्रस्तावावर 3 वाजून 15 मिनिटांपासून चर्चा सुरु झाली असून आतापर्यंत जवळ जवळ 4 तास चर्चा झालेली आहे. नियमाप्रमाणे या प्रस्तावावर अडीच तास चर्चा करता येते. आजच या चर्चेवरील उत्तर पूर्ण करावयाचे आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले भाषण थोडक्यात करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी जेव्हा भाषण करण्यासाठी उभा राहतो तेव्हाच अशा प्रकारचे सर्व काही सूचते. मला अशा प्रकारचा नेहमीच अनुभव येत असतो. मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीसच सांगितले की, विधानमंडळाच्या उद्वाहनाध्ये "ए दिल है मुश्किल जीना यहाँ, जरा हट के, जरा बच के यह मुंबई है मेरी जान "ही धून हिंदीतून आमच्या विधानमंडळातील उद्वाहनामध्ये वाजवली जाते आणि पुन्हा पुन्हा आम्हाला जाणीव करुन दिली जाते की, जीवन हे

...2

श्री. अरविंद सावंत ...

मुश्कील आहे. मी आताच विचार मांडण्यासाठी उभा राहिलो आणि तुम्ही सांगितले की, आपले विचार थोडक्यात मांडावेत. मराठी माणसाचे हाल असेच होत आहेत. मुंबईचे हाल सुध्दा असेच आहे.

सभापती महोदय, 1957 साली हे राज्य द्विभाषिक राज्य म्हणून जाहीर करण्यात आले. भाषावार रचनेचा जो राज्य आयोग आला होता त्यामुळे मुंबईसाठी महाराष्ट्रातील मराठी माणसांनी संघर्ष केला त्या संघर्षात गिरणी कामगार अग्रणी होते. याचे नेतृत्व आचार्य अत्रे, कॉ.डांगे, प्रबोधनकार ठाकरे यां सर्वांनी केले परंतु लढाई लढले फक्त गिरणी कामगारच. गिरणी कामगार कोकणातील असतील, मुंबईतील असतील, पश्चिम महाराष्ट्रातील असतील ते लढले आणि 1 मे, 1960 रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. सुवर्ण महोत्सवी वर्षात आम्ही सदनात असा प्रस्ताव आणीत आहोत की, 50 वर्षात आमच्या मुंबईचे काय हाल झाले. राज्य कर्त्यांनी मुंबईचे कसे हाल केले, कशी मुंबईची विपन्नावसथा आणली. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी चीनचा उल्लेख केलेला आहे. मी तर असे म्हणेन की, आपण चीनला कशासाठी जाता ? दिल्लीत मेट्रो रेल्वे झाली त्यावेळेस तेथील जनतेला काडीचाही त्रास झाला नाही. भुगर्भातील रेल्वे झाली लोकांना त्रास झाला नाही. आता मेट्रो रेल्वे थेट विमानतळापर्यंत येत आहे त्यावेळी सुध्दा ट्रॅफिकला काही सुध्दा त्रास झाला नाही. इतके उत्तमरित्या आयोजन दिल्लीमध्ये झालेले आहे. आपण दिल्लीतील विमानतळ पाहून या. आता मुंबईत जीव्हीके हे काम करीत आहे. ज्या मुंबईने 105 हुतात्मे दिले त्या मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रात मराठीची काय अवस्था आहे ?

.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

सभापती महोदय, मातृभाषेनुसार मुंबईतील लोकांची टक्केवारी महाराष्ट्राची आर्थिक पहाणी या पुस्तकात देण्यात आलेली आहे. त्यानुसार मराठीची टक्केवारी 1971 साली 76.5 टक्के होती, 1981 साली 72.8 टक्के होती, 1991 साली 73.3 टक्के होती ,2003 साली 68.8 टक्के होती. अशा प्रकारे मुंबईतील मराठी लोकाची संख्या कमी झाली असून मुंबईत 12 लाखाने पर राज्यातून लोक आलेले आहेत.मुंबई शहरात जे 12 लाख् लोक आले आहेत त्यामुळे मुंबईमध्ये किमान तीन लाख झोपडया उभ्या राहिल्या आहेत. त्यासंबंधी मला येथे बोलावयाचे आहे. मुंबईतील मराठी माणसांची संख्या कमी झालेली आहे एवढाच एक मुद्दा नसून मुंबईत पर राज्यातून जे बारा लाख लोक आलेले आहेत ते कोठे राहिले आहेत ? हा महत्वाचा मुद्दा आहे. ही सर्व मंडळी

झोपडपट्टयांमध्येच राहिली आहेत. त्यामुळे मुंबई शहराची विल्हेवाट लागलेली आहे. मुंबईच्या बाबतीत राज्य शासन कशा प्रकारे वागत आहे हे आपण पहावे. मुबईसाठी एमएमआरडीए नावाची एक सवत शासनाने आणली आहे.सभापती महोदय, शासनाने 1996 साली कायदा केला होता आणि 1995 पूर्वीच्या सगळया झोपडया नियमित केल्या होत्या त्याचवेळी एमएमआरडीएला असे सांगण्यात आले होते की, एमएमआरडीए मार्फत किंवा एमयुटीपी मार्फत जे प्रकल्प घेण्यात येतील तेव्हा त्या सर्वेक्षणाच्या वेळी ज्या ज्या झोपडया अस्तित्वात असतील त्या झोपडयांचे पुनर्वसन करण्यात यावे. म्हणजे एमएमआरडीएने किंवा एमयुटीपीने एखादा पूल बांधावयाचा ठरविला तर त्या जागेवर एखादी झोपडी अस्तित्वात असेल किंवा 2008 साली त्या ठिकाणी चार काठया लावण्यात आलेल्या असतील तर त्या व्यक्तिला घर मिळेल. मूळ कायद्याला छेद देणारा व अनधिकृत बांधकामाला संरक्षण देणारा कायदा एमएमआरडीएच्या माध्यमातून आणला गेला आहे. या बाबतीत शासनाने कधी गंभीरपणाने विचार केला आहे काय ? आम्ही येथे जी भाष्ंणे करतो ती हवेत जातात काय ? हे मला माहीत नाही. सभापती महोदय, हा मुद्दा मी आता प्रथमच मांडत आहे अशातला भाग नाही तर यापूर्वी मी दहा वेळा हा मुद्दा मांडलेला होता. ज्यावेळी नवीन प्रकल्प आणला जातो त्यावेळी तो प्रकल्प जेथे उभा करावयाचा आहे त्या ठिकाणी ज्या काही झोपडया अस्तित्वात असेल त्यांचे पुनर्वसन केले जाते आणि हे पुनर्वसन करीत असतांना या झोपडया किती साली बांधण्यात आलेल्या आहेत हे मात्र पाहिले जात नाही. अनेक ठिकाणचे झोपडपट्टी दादा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

शासनातील काही व्यक्ती ,मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी, पोलीस हे सर्वजण संगनमत करतात म्हणूनच झोपडया उभ्या राहतात. खाडीच्या जागेतसुध्दा अनेकदा झोपडया उभ्या केल्या गेल्या आहेत. मानखूर्द येथील झोपडयांचे उदाहरण मी अनेकदा दिले आहे. नवीन मुंबईला जात असतांना मानखूर्दचा पूल ओलाडल्यानंतर डाव्या बाजूला खाडीमध्ये झोपडया उभ्या राहिल्या आहेत. त्या ठिकाणी झेंडे उभे केलेले आहेत आणि मशिद उभी केलेली आहे. पुण्याला जाताना आपल्याला या गोष्टी पहावयास मिळेल. त्या झोपडयांना सरक्षण दिले जाते. पामबीच रोडवर खाडीमध्ये एक मशिद उभी राहिली होती पंरतु त्याची माहिती शासनाला मिळाली नाही. या झोपडयांना संरक्षण देणा-यावर कारवाई करण्यात यावी यासंबंधी परवा प्रश्न विचारल्यानंतर दहा पंधरा अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याविरुध्द कारवाई केली वा त्यांना निलंबित केले म्हणजे प्रश्न संपला काय ? अधिका-यांना निलंबित केले परंतु ज्या झोपडया बांधण्यात आल्या होत्या त्याचे काय झाले ? त्या अजूनही पाडण्यात आल्या आहेत काय ?

सभापती महोदय, या ठिकाणी मी दोन तीन उदाहरणे नावासहित देणार असून त्याबाबतीत माननीय मंत्र्यांनी काय कारवाई केली याचे उत्तर मला हवे आहे. 1996 साली मी आमदार झाल्यानंतर मला मनोरा इमारतीमध्ये निवासी कक्ष देण्यात आला होता त्या इमारतीच्या भितींला लगून 2-3 झोपडया होत्या. त्याबाबतीत मी सभागृहात प्रश्न मांडला होता व या झोपडया अनधिकृत आहेत त्या पाडण्यात याव्यात असे सांगितले होते. त्यानंतर श्रीमती शबानी आझमी त्या ठिकाणी गेल्या. कै. सुनील दत्त सुध्दा बांद्रा येथील झोपडयांना संरक्षण देण्यासाठी गेले होते. अशा प्रकारे या झोपडयांना संरक्षण देणारी मंडळी तुमचीच होती. कायद्याचा भंग करणारी मंडळी सुध्दा तुमचीच आहे. आता मनोरा इमारतीच्या जवळ मोठया प्रमाणावर झोपडया झालेल्या आहेत आता तेथे इमारत बांधण्यात येत आहे. तेव्हा दक्षिण मुंबईतील महानगरपालिकेच्या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे, तसेच दक्षिण मुंबईतील पोलीस अधिका-या विरुध्द कोणती कारवाई केली आहे ? ज्या ठिकाणी अनधिकृत झोपडया बांधण्यात आल्या होत्या त्याच भागातून कसाब आणि इतर दहशतवादी मुंबईत घुसले होते .शासनाच्या नाकावर टिच्चुन या झोपडया उभ्या

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत......

राहतात . सन्माननीय सदस्यांनी मघाशी असा उल्लेख केला होता की ,या चर्चेच्या वेळी श्री.जयराज फाटक यांनी अधिका-यांच्या गॅलरीत उपस्थित रहारवयास पाहिजे होते तसेच एमएमआरडीएच्या अधिका-यांनीसुध्दा उपस्थित रहावयास पाहिजे होते. ते जर उपस्थित राहिले असे तर दोघांचे प्रेम आम्हाला येथून पहावयास मिळाले असते. हे दोघेही जण एकमेकावर कसे प्रेम करतात हे पहावयाला मिळाले असते. पडद्याआड काय चालते हेही आम्हीला समजले असते. त्यांची गॅलरी इनव्हिजीबल असल्यामुळे त्यांच्या आणि आमच्यामध्ये पडदा आहे असे आम्ही समजतो..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

पडद्याआड काय चालले आहे ते आम्हाला बघता आले असते. आपण एकदा झोपडी पाडली की पुन्हा त्याठिकाणी पक्के घर बांधण्यात येते. परवा सायनची झोपडी कोसळल्यामुळे त्यामध्ये एक माणूस मेला. आपण झोपडयांवर झोपडया बांधावयाच्या? तीन-तीन मजल्यांच्या झोपडया कुणाच्या आशिर्वादाने उभ्या राहतात. त्यांच्यावर आपण काय कारवाई करता? आपल्या अधिकाऱ्यांना दूरदर्शनवरील बातम्या दिसत नाहीत काय? वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्या दिसत नाहीत काय? याबाबत कुणी तक्रार केली तरी कारवाई होत नाही. मी नेहमी मुंबईच्या महानगरपालिकेच्या आयुक्तांना एसएमएस करतो. सुदैवाने त्यांच्याकडून माझ्या एसएमएसची तात्काळ नोंद घेण्यात येऊन उत्तर पाठविण्यात येते. त्यांच्याकडून कारवाई होते परंतु ती तात्पुरती असते. नेहमी रस्त्याने जात असतांना मला काही गैर दिसले तर मी तात्काळ एसएमएस करुन त्यांना कळवितो. मी विक्रोळी येथे राहवयास गेलो असतांना त्याठिकाणी किती तरी कच्च्या स्वरुपातील अनधिकृत बांधकामे झालेली होती परंतु नंतर ती माझ्या डोळयासमोर पक्की बांधकामे करण्यात आली. इतकेच नव्हेतर त्यावर एक मजला चढवून त्यामध्ये लोक रहात होते. परंतु त्याठिकाणी रहात असलेले लोक कुठे गेले समजत नाही आज त्याठिकाणी गॅरेजेस झालेले आहेत. तरी कुणीही याची नोंद घेतली जात नाही. सभापती महोदय, मागच्या महिन्यामध्ये वांद्रे येथील झोपडपट्टी जळाली, त्यामध्ये त्यांचे नुकसान झाल्याबद्दल आपण त्यांना पुन्हा घरे बांधून दिली. आता पुन्हा रंगशारदाच्या मैदानापर्यंत झोपडपट्टया जाऊन पोहोचल्या आहेत. मी याठिकाणी मुद्दाम आपणास नावे देत नाही. त्याबाबत आपणाकडून कारवाईची अपेक्षा करतो. त्याचप्रमाणे दहिसरच्या गणपत पाटील नगरमध्ये अनधिकृत बांधकामांना ऊत आला आहे. त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये महानगरपालिकेच्या आयुक्तांना सांगितले की, तेथील झोपडया चार-पाच वेळा तोडल्यानंतर सुध्दा पुन्हा त्याच ठिकाणी झोपडया बांधल्या जात आहेत. अशा झोपडयांना आपण नागरी सुविधा दिल्या पाहिजेत, त्यांना वीज व पाणी इत्यादी सुविधा दिल्या पाहिजेत म्हणून आपण मागणी करीत असतो.

सभापती महोदय, बोगस रेशन कार्ड कसे तयार केले जातात याचे उदाहरण सांगता येईल. अनधिकृत झोपडी बांधावयाची आणि त्यामध्ये तात्पुरते लाईटचे कनेक्शन घ्यावयाचे. लाईटचे बिल आल्यानंतर व ते रेशनिंग ऑफिसमध्ये दाखविल्यानंतर त्यांना रेशन कार्ड मिळते, एकदा रेशनकार्ड मिळाल्यानंतर त्या व्यक्तीचे नाव मतदार यादीमध्ये येते. एकदा मतदार यादीमध्ये नाव आल्यानंतर ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घर देखील मालकीचे होते. माझी आपणास विनंती आहे की, माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी ज्या प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतींचे उद्‌घाटन केले. त्यामधील घरे प्रकल्पग्रस्तांसाठी

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

देण्यात आल्यानंतर ते लोक घरांमध्ये रहावयास गेले आहेत काय? याचे सर्व्हेक्षण करा. त्यामधील किती लोकांनी आपली घरे दुस-यांना विकली याचे आपण सर्व्हेक्षण करावे. म्हणजे आपल्याला खरी माहिती मिळेल. सभापती महोदय, वडाळयाच्या भक्तीपार्क, आयनॉक्स थिएटरच्या बाजूने चेंबूरच्या प्रियदर्शनी पार्क येथून बीपीटीकडे रस्ता जातो. त्या रस्त्यासमोर आरसीएफ आहे आणि पलिकडे बीएआरसी आहे, त्याच्या बाजूला असलेल्या मिठागरामध्ये अनधिकृत बांधकामांना ऊत आला आहे. अतिशय अडगळीच्या जागी ही बांधकामे होत आहेत. त्याचप्रमाण् मानखुर्दहून वाशीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला बांधण्यात आलेल्या झोपडया कुणीही तोडत नाही. आणि मग पावसाळा सुरु झाल्यानंतर मिडियावाल्यांचे प्रेम ऊफाळून येते. आपण त्यांच्यावर कारवाई करावयास गेलो तर त्यांना पान्हा फुटतो. सभापती महोदय, त्याचप्रमाणे कर्नाक बंदर पासून रे-रोड, वडाळयापर्यंत रस्त्याच्या फूटपाथवर, पूलावर झोपडपट्टया उभ्या राहिल्या होत्या. आपण हार्बर लाईन रेल्वेने गेलो तर गेल्या 20 वर्षापासून एका रांगेमध्ये उभ्या राहिलेल्या झोपडया आपल्याला दिसायच्या, त्या झ ोपडया तोडण्यात आल्या. त्याबद्दल मी महानगरपालिकेच्या आयुक्तांचे अभिनंदन केले, त्यांचे कौतुक केले. त्यांना मी म्हटले की,आपण हे एक चांगले काम करु शकता याचा अर्थ आपण सर्व कामे चांगली करु शकता. त्यावेळी ते म्हणाले की, कोर्टाच्या आदेशावरुन आपण ही कारवाई केली. बाकीच्या ठिकाणी राजकारण आडवे येत असल्यामुळे आपण याबाबतीत कठोरपणे कारवाई केली पाहिजे. सभापती महोदय, त्यानंतर रेल्वे ट्रॅकच्या बाजूला बांधण्यात आलेल्या झोपडया तोडल्यानंतर आपण त्यांनी पक्की घरे दिली. ही मुंबई म्हणजे धर्मशाळा झाली आहे, गेट वे ऑफ इंडियासारखे दरवाजा नसलेले हे शहर झाले आहे, कुणीही या शहरामध्ये यावे आणि झोपडी बांधावी, कितीही वर्षे रहावे. काल आलेल्या लोकांना आपण पक्की घरे दिली. परंतु या शहरामध्ये जुन्या चाळीमधील माणसांना किती वर्षापासून पक्के घर मिळत नाही, ते पिढयान् पिढया चाळीत रहात आहेत. त्या माणसाला आज घरासाठी भीक मागावी लागत आहे. त्यांच्या पिढयान् पिढया चाळीमध्ये गेल्या, आपण त्यांना 269 चौ.मी. चे घर देणार होता. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर जोगेश्वरी पूर्व येथील गुंफेच्या परिसरामधील 13 हजार स्क्वेअर मीटरमधील अंदाजे 516 रहिवाश्यांची बांधकामे काढून टाकून ती जागा मोकळी करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नगर विकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली. आता त्या लोकांचे पुनर्वसन आपण कुठे करणार आहात?

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . ..

मग त्यासाठी त्यांनी नवीन मार्ग शोधला. हा मार्ग कोणता ? तर मालकाला टीडीआर देऊ. पण अगोदर मालक शोधा. तेथे 1977 पासून ही माणसे रहात आहेत. सर्व मराठी माणसे आहेत. त्यांना तुम्ही असा उपाय सांगितला की, आम्ही मालकाला टीडीआर देऊ, मग मालक तुम्हाला जिकडे जागा देईल, तिकडे जा. आता महानगरपालिकेने सर्व बाधित रहिवाशांना, मुंबई महानगर कायदा कलम 351 नुसार दि.28 एप्रिल 2009 ते दि.5 जून 2009 पर्यंत प्रत्येक घराघरामध्ये जाऊन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे व आता मुंबई महानगर कायदा कलम 488 नुसार त्यांना निष्कासित करण्याचे ठरले आहे. आपण या 516 लोकांचे पुनर्वसन कसे करणार आहात ? याचे मला उत्तर अपेक्षित आहे. ही माणसे मूळामध्ये मुंबईतील आहेत. तेथील गुंफेजवळ 1977 पासून रहात आहेत. तुम्ही काल-परवा येथे आलेल्या लोकांचे पुनर्वसन करीत आहात. आपण मजासवाडी जवळ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एल ॲण्ड टी च्या बाजूला इमारती बांधल्या आहेत, त्यातील जागा या लोकांना द्याव्यात. पण तसे न करता या लोकांना मुंबईच्या बाहेर जावयास सांगणार. तेथे बाजूला आरे कॉलनी आहे, तेथे वखारियाला जागा दिली. नो डेव्हल्पमेंट झ ोनमधील जागा काढून डेव्हल्पमेंट करण्यासाठी दिली. आरे कॉलनीमध्ये तर रॉयल पाम्स्, यांच्या घराचा. तो तर वन खात्याच्या जमिनीमध्ये घुसून सप्ततारांकित हॉटेल बांधत आहे. कोण बोलणार आहे ? मी सातत्याने विषय मांडण्याचा प्रयत्न करीत आहे, पण लागत नाही. जर विषय उपस्थित झाला तर त्यावर थातूरमातूर उत्तरे दिली जातात. कोणीही पत्राचे उत्तर देत नाही. रॉयल पॉम्स्ने गोरेगावच्या आरे कॉलनीमध्ये घुसून आरे कॉलनीच्या जागेवर, वन खात्याच्या जागेवर बांधकाम केले. आम्ही सुरुवातीला त्याला गोल्फ क्लबसाठी जागा दिली होती. पण आता त्यांनी हिल स्टेशन डेव्हल्पमेंट नावाखाली आतमध्ये बंगले बांधले. ते झाल्यावर आता टोलेजंग इमारत बांधली. आता सप्ततारांकित हॉटेल बांधले. पवईला बाजूला जाऊन पहावे. त्याला कोणी बोलत नाही. परंतु गरीबांचे मात्र हाल होत आहेत. त्यांनी एखादी गोष्ट चुकीची केली तर ताबडतोब कारवाईला सुरुवात होते. म्हणून मी जोगेश्वरी गुंफा रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या संबंधात एक पत्र माननीय मंत्री महोदयांना देऊ इच्छितो. आपण संवेदनाशील आहात आणि "असूनी खास मालक घरचा, म्हणती चोर त्याला" अशी अवस्था मराठी माणसांची झालेली आहे आणि ती आपण सुधारावी अशी यानिमित्ताने विनंती करतो.

. . . .4ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . ..

सभापती महोदय, आपण उड्डाण पूल बांधले आहेत. आमच्या काळामध्ये जेव्हा उड्डाण पूल बांधले, तेव्हा "नको तेथे पूल" अशी टीका करण्यात आली. आता विक्रोळी-जोगेश्वरीचा लिंक रोडचे काम कित्येक वर्षे सुरु आहे. मी एम.एम.आर.डी.ए.च्या बैठकीमध्ये विचारले की, हा पूल कधी बांधणार आहात ? पण आता या पूलाचे काम होण्याच्या मार्गावर आहे. परंतु काम सुरु करताना पूर्णपणे विचार करीतच नाहीत. मी वांद्रे-वरळी सी-लिंकच्या पुलावर गेलो होतो, तेव्हा मी विचारले की, या पूलावरुन येणारा सर्व ट्रॅफीक वरळी येथे वेगाने येणार आहे आणि तेथे आल्यावर असलेला रस्ता क्रॉस करुन उजव्या बाजूला वळण घेऊन मग दक्षिणेकडे जाणार आहे. पण मध्ये क्रॉस करताना सर्व ट्रॅफीक जाम होणार आहे. त्याबाबतीत काय करणार ? परंतु या प्रश्नाचे एकाही इंजिनिअरला उत्तर देता आले नाही, म्हणजे एखादे काम सुरु करताना विचारच करीत नाहीत की पुढे या पुलावरुन येणारे ट्रॅफीक वरळी नाक्यावर जाणार आहे आणि तेथे समोरुन येणारा जो आडवा ट्रॅफीक आहे, त्याला क्रॉस करुन जावयाचे आहे आणि ज्या वेगाने गाडया पुलावरुन येणार आहेत, त्याच वेगाने ते पुढे गेले पाहिजे. पेडरच्या पूलाची देखील तशीच अवस्था आहे. अजून तो पूल नरिमन पॉईंटपर्यंत यावयाचा आहे. या पूलाच्या कामासाठी किती खर्च झाला आहे ? या विषयामध्ये जात नाही. अजूनही त्या पूलाचे उद्‌घाटन व्हावयाचे आहे. तुम्ही टुरिझमचा विचार करीत आहात, पण यामध्ये लोकाच्या सोयीचा विचार झाला आहे काय ? आय.आय.टी.कडे जाताना त्याची दोन महाव्दारे आहेत आणि दोन्ही बाजूला वस्ती आहे. अशा वेळी तेथे क्रॉस करुन जात असताना सर्व ट्रॅफीक मुंबईच्या पूर्व द्रुतगती मार्गावरुन येतो आणि आय.आय.टी.जवळ येऊन थांबतो. पुन्हा आय.आय.टी.चा दुसरा सिग्नल लागतो, तेथेही ट्रॅफीक थांबतो, पुन्हा हिरानंदनी जवळ सिग्नल आहे तेथे थांबतो. म्हणजे एवढा खर्च करुन पूल बांधला, पण त्यामुळे काही सुविधा निर्माण झाली काय ? याचा आपण विचार करावा. सायनच्या पूलाच्या बाबतीत तसेच आहे. सायनचा पूल एक दिशा मार्ग ठेवला. त्यामुळे पुन्हा तेथे ट्रॅफीक जाम होतो. प्रियदर्शनी पार्क जवळ पूलाचे काम सुरु आहे, पण माझ्याबरोबर जर ट्रॅफीक विभागातील माणसे आली तर मी त्यांना दाखवून देईन की, पुन्हा तेथे ट्रॅफीक जाम होणारच आहे. यादृष्टीने कोणते प्रयत्न करण्यात आले. आज वाहनांची संख्या बेसुमार वाढली आहे. 1 जानेवारी 2009 मुंबईमध्येच 2.99 लाख हलकी वाहनांची संख्या ही 1990-91 मध्ये होती. त्यानंतर 18 वर्षाच्या कालावधीमध्ये यामध्ये 84 टक्क्याने वाढ झाली. दुचाकी वाहनांची वाढ 255 टक्क्यांनी झाली.

अधिकृत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

रस्ते तेवढेच. चार महामार्ग तेवढेच आणि वाहनांची संख्या मात्र वाढत आहे. या सगळया विषयात गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाचा विषय महत्वाचा आहे. या गिरणी कामगारांचे पुनर्वसन माननीय मुख्यमंत्र्यांनी वारंवार सांगूनही, ना त्यांना घरे दिली ना त्यांना नोकऱ्या दिल्या. बी.डी.डी.चाळीची अवस्था त्याच्यापेक्षा वाईट आहे. मुंबईतील बी.डी.डी.चाळीत आज कोण रहातात? या चाळीत मध्यमवर्गीय लोक रहातात. या बी.डी.डी.चाळीत आज स्वच्छक नाहीत. या स्वच्छकांच्या जागा शासन भरु शकत नाहीत. मराठी माणसाने नरकात रहावे आणि श्रीमंतानी टॉवरमध्ये रहावे. मी मागे एक कविता या ठिकाणी संगितली होती.

"उभे भोवती प्रासाद गगनभेदी, कधी लोकांची होय दाट गर्दी
प्रभा दिपांची फुले अंतराळी, दौलतीची नीत चालते दिवाळी
कोपऱ्यात गुणगुणतांना अभंग, उभा केव्हाचा एक तो अपंग
भोवतीचा अंधार जो निमाला, हृदयी त्याच्या जाता आश्रयाला"

तशी त्या गिरणी कामगारांची अवस्था आहे. सगळा अंधार त्यांच्या हृदयात आहे. टॉवरमध्ये इतके पाणी आहे की ते त्यांच्या तळघरातील टाक्यांमध्ये साचते. हजारो लिटर पाणी टॉवरमध्ये मिळते पण चाळीतील तिसऱ्या मजल्या वरील माणसाला खालच्या मजल्यावरुन बादली भरुन पाणी घेऊन वर जावे लागते. ही मराठी माणसाची अवस्था आहे. सभापती महोदय, पाण्याचा विषय या ठिकाणी विस्ताराने मांडलेला असल्यामुळे मी त्यावर अधिक बोलत नाही. गिरणी कामगारांचे पुनर्वसन कधी करण्यात येणार आहे? एवढेच मला या ठिकाणी विचारावयाचे आहे. गिरण्या बंद पडल्या, त्या जागेवर मॉल उभे राहिले. या गिरीण कामगारांना या मॉलमध्ये नोकरी मिळत नाही. प्रिमियर ॲटो लिमिटेड कंपनीसुध्दा बंद पडलेली आहे. कामगारांची देणी प्रलंबित आहेत ती देणी आजही देण्यात आलेली नाहीत. सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराखाली मला अशी माहिती मिळाली आहे की,राज्यातील बंद पडलेल्या गिरण्यांमधील कामगारांना किंवा त्यांच्या मुलांना नोकऱ्या व प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी नगरविकास विभागाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 2001 मध्ये दुरुस्त केली असून त्याबाबतची कार्यवाही नगरविकास विभागामार्फत करण्यात येत आहे. गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी देण्याबाबतची कार्यवाही नगरविविकास विभागामार्फत करण्यात येत आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे. सुरुवातीला माननीय मुख्यमंत्र्यांनी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

अपमानास्पद वाक्य वापरली होती. गिरणी कामगारांची मुले शिकलेली नाहीत. त्यावर आम्ही सांगितले की, पदवीधरांची यादी आम्ही तुम्हाला देऊ. ती यादी दिल्यानंतर सुध्दा गिरणी कामगारांच्या मुलांना शासन आजतागायत नोकरी देऊ शकलेले नाही. म्हणून सभापती महोदय, माझ ो हे रुदन संपवताना दोनच गोष्टी सांगून संपवितो. एम.एम.आर.डी.ए. आणि मुंबईची महापालिका यांचे वाद आहेत. मुंबई महापालिका ही पतीवृता तिच्या गळयात धोंडा. पतीव्रतेच्या गळयात धोंडा त्यापुढचे शब्द मी या ठिकाणी उच्चारणार नाही. एम.एम.आर.डी.ए.ला मात्र हार अशी अवस्था मुंबईची आहे. यातून या मुंबईला वाचविण्यासाठी हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्यावर समर्पक असे उत्तर शासनाने द्यावे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, फक्त एक पारंपरिक ऊर्जा मंत्री या सभागृहात बसलेले आहेत. पण दुसरे कोणतेच मंत्री उपस्थित नाहीत. पारंपरिक ऊर्जा राज्य मंत्री खालच्या सभागृहातील आहेत. त्यांचा या सभागृहाशी काही संबंध नाही, काही देणे-घेणे नाही. दुसरे कोणतेच मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. चटावरचे श्राध्द उरकण्याचे काम करणाऱ्या शासनाचा निषेध करण्या करिता सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज ताबडतोब तहकूब करण्यात यावे. सभापती महोदय, या ठिकाणी काय चालले आहे?ग्रामीण भागातील अमदारांना मुंबईत म्हाडाची घरे कशासाठी पाहिजेत? मुंबईत पाच जागा निवडून आल्यामुळे येथे शेखी मिरवत फिरत आहात. सभागृहात एक आमदार बसलेले दिसत नाहीत. असे असेल तर या आमदारांना मुंबईत म्हाडाची घरे कशासाठी पाहिजेत. त्यांना मुंबईशी काही देणे घेणे नाही. सभापती महोदय, हे काय चाललेले आहे. हे सरकार आहे काय? आम्ही आता सभागृहातून बाहेर गेलो तर काय होईल हे सांगा. अशा प्रकारे सभागृहात उपस्थित न रहाण्याची पध्दती नाही. सभागृहात उपस्थित रहाण्याबाबत एकाही आमदाराला जाणीव नाही. आमदार बनण्याकरिता जीवाची बाजी याच्यासाठीच लावण्यात येते काय? आता सभागृहात असलेली सदस्यांची उपस्थिती ही अर्धा-तास चचेपेक्षा वाईट आहे. विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर याठिकाणी चर्चा सुरु आहे. सत्ताधारी पक्षातील सदस्यंनी व मंत्र्यांनी या ठिकाणी उपस्थित असले पाहिजे. सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज ताबडतोब थांबवावे, अशी माझी विनंती आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मुंबई महाराष्ट्रात आणण्यासाठी जो लढा उभारण्यात आला आहे त्याच्याशी यांची जरासुध्दा नाळ जोडलेली नाही.

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

त्यांना मुंबई काय चिज आहे हे माहीत नाही. त्यांना सुख नाही, दु:ख नाही. सत्ताधारी पक्षाकडून फक्त सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली उपस्थित आहेत. ते सुध्दा त्यांची अर्धा-तास चर्चा असल्यामुळे उपस्थित आहेत.

श्री. नितीन गडकरी : हा आयात केलेला माल आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून आमचे एवढे अवमूल्यन करु नका.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या जनतेने त्यांचे पाच खासदार निवडून दिले त्यांची अवहेलना करु नका.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेळ वाया न घालविता या चर्चेला न्याय द्यावा.

श्री. नितीन गडकरी : आपण कोल्हापूर महोत्सव घेऊन मुंबईला न्याय दिला.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, तो आजच्या चर्चेचा विषय नाही. या ठिकाणी विरोधी पक्षातर्फे इतक्या महत्वाच्या विषयावर ठराव आणलेला असताना त्या विषयाला न्याय मिळवावयाचा असेल तर सन्माननीय सदस्यांनी वेळ न घालविता आपल्या भावना व्यक्त कराव्यात. सरकारतर्फे त्यांनी समर्पक आणि सकारात्मक उत्तर मिळवावे. अशा प्रकारच्या चर्चेने विषयाचे महत्व कमी होईल. सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाचे सातत्याने अवमूल्यन चालले आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली सोडून बाकीचे माननीय राज्यपालांकडून नामनियुक्त झालेले फुकटचे आमदार कोठे आहेत ?

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब हे घटनेने दिलेल्या अधिकारानुसार नियुक्त झालेल्या माननीय राज्यपाल महोदयांनी ज्यांना नामनियुक्त केलेले आहे अशा सन्माननीय सदस्यांना फुकटचे आमदार म्हणून संबोधत आहेत. मला विनंती करावयाची आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस किंवा कॉंग्रेस पक्षाकडून आलेले आमदार हे फुकटचे आमदार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

आहेत हे मान्य करता पण आपण तिकडे जर पैसे देऊन विकतचे आमदार आणले असतील तर जेव्हा मी माझे विचार व्यक्त करीत होतो त्यावेळी ते आमदार हजर नव्हते. ज्यांनी प्रस्ताव मांडलेला आहे त्यांच्यापैकी सुध्दा कोणीही सदस्य या ठिकाणी उपस्थित नव्हते तरीही आम्ही चर्चा चालू ठेवलेली आहे. आता माननीय मंत्रिमहोदय आलेले आहेत त्यामुळे ही चर्चा पुढे चालू ठेवावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दुपारी 3.15 वाजेपासून या प्रस्तावावरील चर्चा सुरु आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांबद्दल आमची तक्रार नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आता दोन-तीन सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. त्यांची भाषणे झाल्यानंतर मी उत्तराच्या भाषणास सुरुवात करणार आहे.

**तालिका सभापती** ( श्री. हेमंत टकले ) : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आलेला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या संदर्भात आपले विचार मांडलेले आहेत. मी मागच्या महिन्यामध्ये उत्तर भारतामध्ये गेलो होतो. वाटेमध्ये एका धाब्यावर मी थांबलो. त्या धाब्यावर काम करणारा जो माणूस होता त्याच्याशी ज्यावेळी गप्पा मारत होतो त्यावेळी त्याने सांगितले की, मला मुंबईला घेऊन चला. मी विचारले की, आपण मुंबईला कशाकरिता येऊ इच्छिता ? त्यांनी सांगितले की, मला ऐश्वर्या रायला बघावयाचे आहे. त्याला मुंबई बघावयाची नव्हती. त्याला मुंबईमध्ये असलेल्या ऐश्वर्या रायला बघावयाचे होते. मी त्याला विचारले की, इकडे निसर्गसौंदर्य आहे, चांगली हवा आहे मग मुंबईला कशाला यावयाचे आहे ? तो म्हणाला की, मला भांडी घासावी लागली तरी चालतील पण मला ऐश्वर्या रायला बघावयाचे आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

मी त्याला विचारले की तुला मुंबई पहावयाची नाही काय, तर तो मला म्हणाला की मला ऐश्वर्या रायला बघायचे आहे. मी मुंबईत कसाही राहीन पण मला तिला बघायचे आहे. मुंबईत बघण्यासारखे काही नाही हे धाब्यावर काम करणा-याला सुध्दा कळले आहे. मुंबईच्या समस्यांबाबत पुरेशी आर्थिक तरतूद होत नसल्यामुळे पुढील 10 वर्षात मुंबई बकाल होईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मुंबईचे मूळ निवासी हरवत चालले आहेत. मुंबईची लोकसंख्या 1.50 कोटी पर्यंत पोहोचली आहे. मुंबईच्या बाजूला ठाणे जिल्हा आहे, या ठाणे जिल्हयाची लोकसंख्या सुध्दा 1 कोटीपर्यंत पोहोचली आहे. मुंबईत जागा मिळाली नाही की लोक ठाण्यात येतात. त्यामुळे ठाणे जिल्हयाची लोकसंख्या वाढली आहे. पूर्वी गिरगावचे लोक डोंबिवलीमध्ये आले. पण डोंबिवलीत गर्दी झाल्यावर लोक बदलापूरला गेले. पार्ल्याचे लोक सुध्दा आता या उपनगरामध्ये येऊ लागले आहेत. त्यामुळे मुंबईचा मूळ रहिवासी, भूमिपुत्र शोधावा लागेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, बांगलादेशीय नागरिकांविरुध्द शासनाने ठोस कारवाई करण्याची आवश्यकता आहे, पण त्याबाबत शासनाला सांगता येणार नाही. बोगस शिधापत्रिकाधारक किती आहेत ते सांगता येणार नाही. हा लोंढा बांगलादेशीय नागरिकांचा आहे तो आता ठाणे जिल्हयामध्ये आलेला आहे. बांगलादेशीय नागरिकांमुळे मुंबईत व ठाणे जिल्हयात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. यानिमित्ताने मी उदाहरण सांगू इच्छितो की, एका ठिकाणी अणू ऊर्जा प्रकल्पाचे काम चालू होते त्या कामासाठी कंत्राटदाराने बांगलादेशीय नागरिकांना मस्टरवर घेतले होते. ही बाब पोलिसांच्या लक्षात आणून दिल्यावर पोलिसांनी त्या बांगलादेशीय नागरिकांना देशाच्या सीमेवर नेऊन सोडले आहे. म्हणजे या लोकांना नेऊन सोडण्यासाठी पोलिसांनाच खर्च करावा लागतो. परंतु त्यानंतरही बांगलादेशीय नागरिक मुंबईत येत असतात. शासनाने या घुसखोरीबाबत कठोर कारवाई केली पाहिजे, अन्यथा या शहरांची धर्मशाळा होईल. आता धर्मशाळा झालेलीच आहे पण त्यात अधिक भर पडेल असे मला सांगावयाचे आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, अनधिकृत बांधकामांबाबत बोलावे तेवढे थोडेच आहे. मुंबई जवळ असलेल्या ठाणे जिल्हयामध्ये होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत शासनाने निरनिराळया समित्या गठित केल्या होत्या. मागील वर्षीही शासनाने अगरवाल समिती नेमली होती. त्या समितीने या अनधिकृत बांधकामाबाबत काय निष्कर्ष काढले आहेत ते आम्हाला समजलेले नाही. एका बाजूला ही समिती चौकशी करीत होती आणि दुस-या बाजूला अनधिकृत बांधकामे चालू होती. म्हणून अशा समित्या नेमून उपयोग होतो किंवा नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, मुंबई आणि ठाणे जिल्हयातील समस्या सोडविण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करता येईल या भूमिकेतून एमएमआरडीएची स्थापना झाली. परंतु ही संस्था नियोजनशून्य काम करीत आहे. या संस्थेमार्फत मुंबईबरोबरच मुंबईच्या आजुबाजूच्या परिसराचा विकास करावयास पाहिजे होता. ठाणे जिल्हा हा मुंबईचा दरवाजा आहे. या ठाणे जिल्हयातच कोंडी झाली तर मुंबईत येणार कसे ? युतीच्या काळामध्ये तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.नितीन गडकरी यांनी एक आश्चर्य करुन दाखविले आहे. त्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि मुंबईत 55 उड्डाण पूल बांधून दाखविले आहेत. महाराष्ट्रात अर्धशतक कॉंग्रेसचे राज्य होते पण या काळात इतके काम झाले नव्हते. पण राजकीय इच्छाशक्ती असेल तर काय होऊ शकते ते त्यांनी दाखवून दिले आहे. या मुंबईत मागील 10 वर्षात नवीन एकही उड्डाणपूल निर्माण झालेला नाही. ठाणे जिल्हयातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी एमएमआरडीएने 5 नवीन उड्डाणपूल बांधण्याची आवश्यकता आहे, तशी त्यांनी घोषणा केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

एमएमआरडीअेने जाहीर केले परंतु कामला सुरुवात केली नाही. या विधिमंडळामध्ये शासनाने आश्वासने दिली, बाहेरही सांगितले. परंतु प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. एमएमआरडीअेच्या माध्यमातून मोनोरेल, मेट्रोरेल, स्कायवॉक असे निरनिराळे प्रकल्प राबविण्याचे ठरविलेले आहे. परंतु या सर्व कामांचे योग्य यप्रकारे नियोजन झाले नाही तर मुंबई शहर हे शांघाय होण्याऐवजी बकाल शहर होईल.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये प्रचंड प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. ठाण्यामध्ये देखील फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. ठाणे हे वाहतुकीचे महाद्वार आहे. एमएमआरडीअेने वाहतूक प्रकल्प योग्यरित्या राबविले नाही तर ठाण्याहून मुंबईला येण्यासाठी तीन-तीन तास लागतील. त्यामुळे पुढच्या 25-30 वर्षातील परिस्थिती डोळयासमोर ठेवून वाहतूक कोंडी नाहिशी करणारे प्रकल्प तयार झाले पाहिजे. स्कायवॉक संबंधी या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. मुंबई प्रमाणे ठाण्यामध्ये 45 स्कायवॉक करण्याचा प्रस्ताव आहे. ज्या ठिकणी गरज नाही अशा ठिकाणी देखील स्कायवॉक केले जात आहेत. एकेका स्कायवॉकची किंमत 20-25 कोटी रु. आहे. रहिवाशांनी जोरदार विरोध दर्शविल्यानंतर मुंबईतील तीन स्कायवॉक रद्द करण्यात आले. ठाणे-पूर्वेला खाडी आहे. तेथे देखील स्कायवॉकची गरज नाही अशी तेथील रहिवाशांची मागणी आहे. या स्कायवॉकच्या बाबतीत एक लॉबी काम करीत आहे. कारण जेवढे जास्त स्कायवॉक केले जातील तेवढा जास्त पैसे त्यांना मिळतील. म्हणून जेथे गरज नाही अशा ठिकाणी देखील स्कायवॉक बांधले जात आहे. म्हणून माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे की, जेथे गरज नसेल तेथे अजिबात स्कायवॉक करता कामा नये.

सभापती महोदय, मुंबईतील रेल्वेने दररोज 65 लाख लोक प्रवास करतात. परंतु रेल्वेच्या माध्यमातून रेल्वे मंत्रालयाला जेवढे उत्पन्न मिळते तेवढया प्रमाणात रेल्वे वाहतुकीमध्ये सुधारणा करण्यासाठी खर्च होत नाही. रेल्वेट्रॅकची, रेल्वेपुलांची कामे प्रलंबित आहेत. या कामासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध होत नाही. या आधी रल्वे हे प्रवासाचे चांगले साधन होते. परंतु गेल्या 5-10 वर्षामध्ये रेल्वेने प्रवास करणे अतिशय कष्टप्रद आणि जिकिरीचे झालेले आहे. एमएमआरडीअेच्या माध्यमातून अंडर ग्राऊंड तसेच मल्टिस्टोरीज पार्किंगची व्यवस्था होणे आवश्यक

..2..

(श्री. संजय केळकर....)

आहे. ही व्यवस्था केली नाही तर मुंबई ही वाहनांनी जाम होईल. ठाणे शहर देखील आज असेच जाम झालेले आहे. येणा-या पुढच्या काळात ते आणखी जाम होईल.

सभापती महोदय, सागरी किना-याच्या संरक्षणाचा प्रश्न देखील अतिशय महत्वाचा आहे. मुंबईला लागून 720 कि.मी.चा सागरी किनारा आहे. अलिकडेच 26 नोव्हेंबरला मुंबईवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. हे दहशतवादी सागरीमार्गेच आले. तेव्हा सागरी किना-याच्या संरक्षणाच्या बाबतीत दुर्लक्ष केले तर सागरीमार्गे कोठूनही अतिरेकी येतील आणि या राज्यालाच नाही तर संपूर्ण देशाला वेठीस धरतील. सागरी किना-याच्या संरक्षणासाठी भाड्याने बोटी घेण्यात आलेल्या आहेत. या बोटींना स्पीड नसतो. तसेच त्या तुटक्या मोडक्या असतात. म्हणून शासनाने स्वत:च्या बोटी तयार कराव्यात अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मुंबईचा विकास करण्यासाठी जबरदस्त इच्छा शक्तीची आवश्यकता आहे आणि ती असली तरच मुंबईचा विकास होऊ शकेल. मुंबई शहराच्या विकासाची कामे होऊ शकली नाही तर मुंबई शहर हे सांघाय होण्याऐवजी बकाल असे शहर निर्माण होईल. तेव्हा या मुंबई शहराचा नियोजनबध्द विकास करावा अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय मुंबईच्या वाढत्या समस्या दूर करुन जनसामान्यांसाठी काय सुखसोई निर्माण करता येऊ शकतील यासंबंधीच्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबईतील विविध समस्यांबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार मांडलेले असून शासनाला उपयुक्त सूचनाही केलेल्या आहेत. या ठिकाणी मांडलेल्या कोणत्याही मुद्याची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेऊन मी एकाच परंतु महत्वाच्या मुद्यावर बोलणार आहे.

....नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ SBT/ प्रथम श्री. शिगम 19:40

श्री. किरण पावसकर.....

महोदय,मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई ही औद्योगिक नगरी आहे. औद्योगिक नगरीचा दर्जा या मुंबई शहराला कोणी दिला ? औद्योगिक नगरी म्हणून संबोधितांना शब्द फार चांगले वाटतात. हे शब्द मिळविण्यासाठी मुंबईच्या शिरपेचात ख-या अर्थाने आपल्या घामाने, आपल्या रक्ताने या शहराला एक वलय प्राप्त झालेले आहे. ख-या अर्थाने मुंबईचा कामगारास सेफ म्हणता येणार नाही. पण मुंबईचा कामगार हा आता कामगारच राहिलेला नाही. कारण मुंबईमध्ये 1980 पासून वा त्याही अगोदर अशी परिस्थिती होती की, येणा-या प्रत्येक कामगाराला रोजगार मिळत असे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. केळकर यांनी मघाशी त्यांच्या भाषणात सांगितले की, मुंबई शहरात येणा-यांना पूर्वी फार आकर्षण होते. मुंबईत आल्यानंतर मला कायमची नोकरी मिळेल. कायम नोकरी मिळाल्यानंतर माझ्या व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे होऊ शकेल. मला चांगल्या प्रकारच्या सुखसोयी या ठिकाणी मिळतील. म्हणून महाराष्ट्रातील कानाकोप-यातील लोक येत होते. परंतु या लोकांची जागा आता परप्रांतीयांनी घेतलेली आहे. मुंबईत यापूर्वी येणारे लोक का येत होते ? मुंबईत येणारा प्रत्येक माणूस विचार करुन येत होता. मुंबईत आल्यानंतर टपाल खात्यात नोकरी लागेल. मुंबईत आल्यानंतर पोलीस म्हणून नोकरी लागेल. एस.टी.महामंडळात नोकरी लागेल. शासकीय रुग्णालयांमध्ये नोकरी लागेल या विचाराने प्रभावित होऊन येत होती. परंतु त्या लोकांचा पूर्णपणे भ्रमनिरास झालेला आहे. सरकारकडून कामगारा विषयीचे नियम बनविले जात आहेत. त्या कामगार मंत्रालयाकडे वा कामगार आयुक्तांकडे प्रत्येक सबबीसाठी कंपन्यांना सुनावणीसाठी बोलाविले जाते. हे सरकार स्वत:च्या अधिपत्याखाली असलेले कारभार चांगले चालवू शकलेले नाही. त्याचे कारण पोलीस म्हणून नोकरी कराणारा खरोखर खूश असता तर मला वाटत नाही की, प्रायव्हेट सिक्युरेटी चालू झाल्या असत्या. ज्या लोकांना पोलीस संरक्षण आहे, त्यांनी देखील प्रायव्हेट सिक्युरेटीचे रक्षक संरक्षणासाठी आपल्याकडे ठेवले आहेत ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ट्रिक सारख्या प्रायव्हेट सिक्युरेटी कंपन्या जन्माला आल्या, त्यांच्याकडे आज दहा ते 15 हजार कर्मचारी काम करीत आहेत. सरकारकडून पोलीस यंत्रणा ज्या पध्दतीने राबवावयास पाहिजे होती, तशी ती राबविली गेली नाही व आजही राबविली जात नाही. यासंदर्भात या सभागृहात ब-याच वेळा विचार विनियम

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

झालेला आहे. आज टपाल आणि तार खात्याची जागा कुरिअर कंपन्यांनी घेतली आहे. टपाल आणि तार खात्यात नोकरी करण्यासाठी जाण्यास लोक प्रभावित असतील असे मला तरी वाटत नाही. टपाल आणि तार यांच्या जागेवर कुरिअर कंपन्या आल्या आहेत. डी.एच.एल. कुरिअर असेल, ब्ल्यू डार्ट कुरिअर असेल, फस्ट फ्लॉईट कुरिअर असेल, अशा असंख्य कुरिअर कंपन्या या शहरात व राज्यात आलेल्या आहेत. आज या कंपन्यांमध्ये जवळ जवळ 45 हजार कर्मचारी काम करीत आहेत. टपाल आणि तार विभागाची जागा या कुरिअर कंपन्यांनी घेतली आहे.

महोदय,स्टेट ट्रान्सपोर्टचा विचार केला तर हा व्यवसाय प्रायव्हेट बसेसने घेतला आहे.एस.टी.मध्ये काम करणा-या कर्मचा-यांना मिळणारा पगार, त्यांना मिळणारे भत्ते व बोनस वेळेवर मिळत नाहीत. त्यांची व्ययसाय करण्याची जागा प्रायव्हेट बसेसने घेतलेली आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याची आहे. ज्या ज्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर देऊ इच्छित आहे. सरकार बी.ओ.टी.तत्वावर काम देत आहे, त्या कंपन्या तरी तुमचे कामगार धोरण राबविते आहे काय ही गोट कधी बघितली जो काय ? एखाद्या कंपनीमध्ये कोणी काम करीत असेल आणि त्या कंपनीने दुस-याला कॉन्ट्रक्ट दिले, त्या ठिकाणीच्या कामगाराचा अपघात झाला वा त्याचा मृत्यू झाला तर आपण प्रिन्सीपल एम्प्लॉयर म्हणून त्या कंपनीला पकडतो. परंतु मला सांगण्यास खेद वाटतो की, सरकारच्या अधिपत्याखाली जेवढी कामे चालली आहेत. त्या लोकांची कामे पूर्णत्वाला जाण्या अगोदर कामगार धोरणासंबंधीचा नियम लावता काय ? तेथील कामगारांना अपघात होऊ नये, तेथील कामगार वयाच्या 58 वर्षापर्यंत काम करतील यासंबंधीची कधी शासनाने काळजी घेतली आहे काय ? कर्मचा-याचे सध्याचे आयुष्य असे आहे की, एका कंपनीत काम करावयाचे. ती कंपनी तीन ते चार वर्षे त्या कर्मचा-याला वेगवेगळया आस्थापनेवर पाठवित असते. ट्रान्सपोर्ट कंपनी असो, एअरपोर्टवरील रिक्रुटमेंट संबंधातील कंपन्या असो, हॉटेल व्यवसाय असो. कॉन्ट्रक्ट पध्दतीवर तो कामगार तेथे कामावर असतो. तो कर्मचारी एखाद्या कंपनीत तीन ते चार वर्षे काम करतो. त्यांनतर कंपनी मालक कामगारास सांगतो की, माझे कॉन्ट्रक्ट गेले आहे, त्यामुळे मला कर्मचारी काढून टाकावयाचे आहेत. दुस-याला कोणाला कॉन्ट्रक्ट दिले जाते, तेथेही अशाच पध्दतीने कर्मचारी तीन ते चार वर्षे काम करतात. त्यानंतर त्या कर्मचा-यांना कंपन्यांकडून सांगितले जाते की, तुमची या कंपनीत पाच वर्षे सतत सेवा झाली नसल्याने...

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ ST/ 19:45

श्री.किरण पावसकर........

तुम्हाला ग्रॅच्युईटी मिळणार नाही. असे ब्रेकअप होत होत सेवेची 15-20 वर्षे उलटून जातात. मंत्रीमहोदय याठिकाणी बसले आहेत. इतर खाजगी कंपन्यांना आपण सुनावणी देता. कामगार मंत्रालय त्यांना बोलावून घेते. कामगार आयुक्त त्यांना बोलावून घेतात. परंतु आपल्या आस्थापनातर्फे, सरकारतर्फे जी कामे बाहेर दिली जातात त्या संदर्भात मी वरळी-वांद्रे पुलाचे उदाहरण देत आहे. अद्याप त्या पुलाचे उद्‌घाटन झालेले नाही. 400 कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प असताना 1800 कोटी रुपयांवर खर्च गेला आहे. तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची युनियन बनविली होती. महाराष्ट्र शासनासाठी ही लाजिरवाणी गोष्ट आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्पावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दीड दोन वर्षात ज्या मुलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत त्या मिळाल्या नाहीत. ग्रॅच्युईटी, बोनस हे शब्द केवळ शब्दकोषात चांगले दिसतील. बीओटी तत्वावर ज्या ज्या ठिकाणी प्रकल्प सुरु आहेत तेथील कॉन्ट्रॅक्ट पध्दतीच्या कर्मचाऱ्यांवर प्रिन्सिपल एम्प्लॉयर म्हणून देखरेख करणार आहात का? त्यांना आवश्यक त्या मुलभूत सुविधा देणार आहात का? देणार नसाल तर दुसऱ्यांना कामाचे कॉन्ट्रॅक्ट का देता?

सभापती महोदय, आज मल्टिनॅशनल कंपन्या आहेत त्यांनी स्पष्ट शब्दात आपले विचार मांडले. आमच्याकडे सेफ्टी, सिक्युरिटीसाठी जे इन्स्पेक्शन होते त्या संदर्भात आम्ही कोणत्याही नियमाचा भंग केलेला नाही. परंतु सरकारने चालविलेल्या आस्थापनांमध्ये त्यांनीच त्यांचे नियम तोडले आहेत. हे समोरुन आपल्याला पहावयास मिळते.

सभापती महोदय, सरकारी रुग्णालयांची देखील हीच स्थिती आहे. सरकारी रुग्णालयात काम करण्यापेक्षा खाजगी रुग्णालयात नोकरी कशी मिळेल यासाठी सगळयांचे प्रयत्न सुरु आहेत. सरकारकडून चालणारे प्रकल्प जवळजवळ बंद पडत आले आहेत आणि खाजगी प्रकल्पांची कामे जोरात सुरु आहेत. ती का जोरात सुरु आहेत? कॉन्ट्रॅक्ट पध्दत ही मुळात कोणासाठी जन्माला घातली असेल तर ती सरकारसाठी जन्माला घातली आहे. कॉन्ट्रॅक्टरना दोष देऊन उपयोग नाही. महाराष्ट्र राज्याचा कारभार चालविणारे मंत्रालय हे मुंबईमध्ये आहे. मी आवर्जून विचारु इच्छितो की, खरोखरच मंत्रालयातील कारभार चालण्यासाठी मंत्रालय दलालमुक्त केले का? काही खात्यातील टेंडर ठराविक लोकांतर्फे त्यांच्याच मार्फत खाली पोहोचली जातात. सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ ST/ 19:45

श्री.किरण पावसकर........

श्री.मधुकर चव्हाण यांनी म्हाडातील भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणांचा उल्लेख केला आहे. मुंबई शहरातील रेल्वेविषयी, पाण्याविषयी, वाहतुकीविषयी चर्चा झाली. या चर्चेमधून मुंबई शहरातील जनसामान्यांना चांगल्या सुविधा द्यावयाच्या असतील तर मुंबई शहराला भ्रष्टाचारमुक्त करावे लागेल, दलालमुक्त करावे लागेल. तरच या सर्व यंत्रणा चांगल्या तऱ्हेने चालू शकतील असे मला सांगावयाचे आहे. निवडणुका डोळयासमोर ठेवून सांगितले जाते की, मुंबई शहराचे सिंगापूर करणार आहोत, शांघाय करणार आहोत. त्यादृष्टीने आवश्यक त्या पायाभूत सुविधांचा विकास करीत आहोत. दुसरीकडे चार वर्षाचा प्रकल्प पूर्ण होण्यास 10 वर्षांचा कालावधी लागतो. 400 कोटी खर्चाचा प्रकल्प 1800 कोटी रुपयांवर जातो. त्यामुळे मुंबई शहराचे सिंगापूर किंवा शांघाय होईल असे वाटत नाही. मुंबईकरांची स्थिती पहा. मी मुंबईत राहतो. ट्रेड युनियनमध्ये काम करतो. आम्हाला शांघाय किंवा सिंगापूर नको. परंतु आम्ही जे मूळ मुंबईकर होतो ते देखील आमचे अस्तित्व आज उरलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. दलालमुक्त करण्याबाबत मी एक नमुना सांगतो. आरटीओ कार्यालय हे एक भ्रष्टाचाराचे मोठे केंद्र आहे. मुंबई शहरात बाहेरुन आलेल्या कोणत्याही माणसाकडे त्याचे कोणतेही डॉक्यूमेंट नसले तरी आरटीओ कार्यालयात गेल्यानंतर त्याला ड्रायव्हिंग लायसन्स मिळू शकते. अशा व्यक्तीला मुंबईच्या रस्त्यांची माहिती नसेल परंतु वाहन चालविण्याचा परवाना दिला जाऊ शकतो. या सभागृहात वारंवार हा विषय चर्चेला येतो. मंत्रालय, म्हाडा व आरटीओ ही कार्यालये देखील दलालमुक्त करावी लागतील. त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे काही संस्थांमध्ये आजही सहावा वेतन आयोग कधी लागू करणार यासाठी आरडाओरड केली जात आहे. परंतु काही संस्थांमध्ये अद्यापही पाचवा वेतन आयोग लागू झालेला नाही.

4व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ ST/ SBT/ 19:50

श्री. किरण पावसकर ...

सभापती महोदय, शिक्षकांच्या समस्या तर अजून वेगळया आहेत. एखादी शिक्षिका जर प्रेग्नंट असेल आणि तिला जर रजेवर जावयाचे असेल तर त्या शिक्षिकेलाच रिप्लेसमेंट द्यावी लागते, दुसरी शिक्षिका तिलाच शोधून आणावी लागते आणि तिला पगार सुध्दा तिच्या पगारातून द्यावा लागतो, अशी परिस्थिती आहे. आपण मात्र अभिमानाने सांगतो की, हीच मुले आमचे उद्याचे भविष्य ठरविणार आहे. खरोखर ही मुले उद्याचे भविष्य ठरवू शकणार आहेत काय हो ? आज खाजगी संस्थामधून पायलट होण्यासाठी 10 लक्ष रुपये फी घेतली जाते, एअर होस्टेस होण्यासाठी एक लाख फी घेतली जाते. जे विद्यार्थी अशा प्रकारचे खाजगी कोर्सेस करतात त्यांना नोकरी मिळत नाही. त्यांनी जे लाखो रुपये भरलेले असतात ते सर्व वाया जातात. त्याचा काही एक उपयोग होत नाही. या मुलांना कोणत्याही प्रकारची नोकरी मिळत नाही. त्यामुळे सरकार आणि कामगार मंत्रालय या मुलांना न्याय देऊ शकेल, असे वाटत नाही. महाराष्ट्रात, मुंबईत ज्या कंपन्या होत्या त्या कंपन्या आता हिमाचल प्रदेश, गोवा, सूरत, दमण या राज्यात गेलेल्या आहेत. कुशल आणि अतिकुशल कामगार फक्त मुंबई शहरातच होते. या मुंबई शहरामध्येच फक्त वर्क कल्चर होते. त्या ठिकाणी वर्क कल्चर मिळत नसेल तरी हे कारखाने मुंबई बाहेर निघून गेलेले आहेत. मुंबईचा कामगार मात्र बेकार झालेला आहे. वडिलांच्या जागेवर मुलाला नोकरी मिळण्याची पध्दत होती परंतु आता वडिलांची आणि मुलाची नोकरी सेफ राहिलेली नाही.

सभापती महोदय, खाजगी कंपन्याना आपण कोणता न्याय देणार आहात ? नवीन प्रकल्प आल्यानंतर 3 लाख लोकांना रोजगार मिळणार अशा प्रकारचे शासनाने गाजर दाखविले परंतु सरकारी अधिपत्याखाली काम करीत असलेल्या वेगवेगळया आस्थापनातील कामगारांना तरी न्याय देणार आहात काय, जे मुंबईत काम करतात त्यांना तरी न्याय देणार आहात काय ? हा प्रश्न आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या बाबतीतील वास्तव या ठिकाणी मांडलेले आहे. या मुंबईचे पुढचे भवितव्य काय राहणार आहे, याबाबतीतील विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, मुंबईवर 26/11 ला जो हल्ला झाला त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय गृहमंत्र्यांनी विधानसभेत, विधान परिषदेत मुंबईसाठी आम्ही काय काय करणार आहोत, मुंबईसाठी काय काय योजना आखलेल्या आहेत, याच्यापुढे अशा प्रकारचा हल्ला करण्याची कोणी हिंमत करणार नाही, अशी वेगवेगळी वक्तव्ये आम्ही यासभागृहात ऐकली आहेत. आपण ज्या उपाययोजना केलेल्या आहे त्यामध्ये रेल्वेतून येणारा माणूस आज सुरक्षित राहणार आहे काय ? मी काल चर्चगेट स्टेशनवरुन आलो तेव्हा चर्चगेट स्टेशनच्या बाहेर पडण्याचा जो मार्ग आहे त्या ठिकाणी मेटल डिटेक्टर लावलेले आहेत. या मेटल डिटेक्टरमधून जी माणसे बाहेर जातात त्यांना कशा प्रकारे कोण चेक करतो हे पाहण्यासाठी मी थोडावेळ तेथे थांबलो परंतु नंतर लक्षात आले की, हे मेटल डिटेक्टरचे फक्त चौकोन लावून ठेवलेले असून त्यामध्ये मेटल डिटेक्टरचे मशिनच लावलेले नव्हते. जातांना मी दादर स्टेशनवरुन बाहेर पडलो त्यावेळेस तेथे जे चार दरवाजे आहेत त्या चार दरवाजांपैकी मधील दोन दरवाजांना मेटल डिटेक्टर लावलेले होते व बाकीचे दरवाजे तसेच होते. याचा अर्थ तुम्ही नेमके काय केलेले आहे ? 26/11 च्या हल्ल्यानंतर सुरक्षिततेसाठी शासनाने कोणते उपाय योजले आहेत ? आम्हाला येथे वाचून दाखवले की, आम्ही टेंडर काढली आहेत, काही शस्त्रास्त्रे मागवलेली आहेत, ट्रेनिंग सेंटर्स उघडली आहेत, फोर्सवन नावाचा फोर्स तयार केलेला आहे.ज्या काही भूलथापा मारावयाच्या होत्या त्या सर्व भूलथापा तुम्ही मारलेल्या आहेत. मुंबईवर हल्ला होऊन 8 महिने झाले परंतु प्रत्यक्षात अजून कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी झालेली नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ SBT/ MAP/ 19=55

ॲड.अनिल परब ...

सभापती महोदया,समुद्र गस्तीच्या संदर्भात मला बोलावयाचे आहे. या पूर्वीच मी असे सांगितले होते की, बारा नॉटिकल माईल्सपर्यंत मुंबई पोलिसांची हद्द असून त्या पुढची हद्द कोस्टल गार्डची आहे. आपल्या हद्दीमध्ये जे 5 पोलीस गस्त घालण्यासाठी जात होते त्याना 75 रुपये भत्ता देण्यात येतो परंतु या पाचही पोलिसांना पोहता येत नव्हते. समुद्रामध्ये गस्त घालण्याच्या संदर्भात अधिक उपाययोजना करण्यात येतील असेही शासनाकडून सांगण्यात आले होते.परंतु त्यासाठी त्यांच्याकडे एकही बोट गस्तीसाठी देण्यात आलेली नाही त्या भागात जे कोळी बांधव मच्छिमारी करतात त्यांच्या बोटीतून पोलीस गस्त घालत असतात. कुलाबा ते माहूल पर्यन्तच जी किनारपट्टी आहे त्या परिसरात पेट्रोकेमिकल्सचे प्लॉन्टस उभे आहेत. त्याच्या मागच्या बाजूला जाऊन जर आपण पाहिले तर तो भाग संपूर्णपणे उघडा आहेअसे आपल्याला दिसून येईल. त्या समुद्राच्या बाजूला जाऊन पोलीस पहाणी करीत असतील असे मला वाटत नाही. त्या भागावर अगदी सहजपणे अतिरेकी हल्ला होऊ शकतो त्या ठिकाणी जर अतिरेक्यांनी हल्ला केला तर संपूर्ण मुंबई उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही

सभापती महोदय, एअरपोर्टच्या बाजूलासुध्दा मोठया प्रमाणावर झोपडपट्टी असून तेथून रॉकेट लॉचरच्या सहाय्याने विमानावर हल्ला करता येऊ शकतो अशा प्रकारे अनेक ठिकाणी धोक्याची स्थिती निर्माण झालेली आहे. मुबई ही केवळ देवाच्या भरवश्यावरच सोडलेली आहे. मुंबईच्या सुरक्षिततेसाठी शासनाने काही प्रयत्न केलेले आहेत असे दिसून येत नाही.

सभापती महोदय, मुंबईची लोकसंख्या वाढत चालली आहे. नुकतीच राज्याची आर्थिक पहाणी झाली असून त्याचे पुस्तक प्रसिध्द करण्यात आले आहे त्या पुस्तकात असा उल्लेख करण्यात आला आहे की, मुंबईतील मराठी लोकांची टक्केवारी कमी झालेली आहे.मुंबईचे उत्पादन कमी झालेले आहे. मुंबईतील मराठी लोकांची टक्केवारी कमी झाली याचा अर्थ मुंबईतील लोक बाहेर गेले असे नसून पर राज्यातील लोक मुबईमध्ये आले आहेत.परराज्यातून जे लोक मुंबईत येतात त्यांची प्रत्येक सोय शासनाने केलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मघाशी सांगितले की, बाहेरुन येणा-या माणसांना ड्रायव्हींग लायसेन्स मिळते, बोगस रेशन कार्ड मिळते. बाहेरच्या राज्यातून आलेल्या माणसांना मुंबईमध्ये कशाही पध्दतीने रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. मुंबईमध्ये सुलभ शौचालयाची सोय करण्यात आलेली आहे.त्यामुळे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुबईमध्ये परराज्यातून येणा-या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.शासनाने सुलभ शौचालयाच्या संदर्भात अनेक नवीन नवीन सोयी केल्या आहेत. दोन रुपये टॉयलेटसाठी आणि तीन रुपये स्नानासाठी अशा प्रकारे दिवसाला पाच रुपये खर्च परराज्यातून मुंबईत आलेल्या व्यक्तिंना करावा लागतो त्या व्यतिरिक्त त्यांना राहण्यासाठी घर घ्यावे लागत नाही. अशा प्रकारे मुंबई बकाल करण्याचे काम या शासनाकडून करण्यात येत आहे. एका बाजूला मुंबई अधिक सुरक्षित करावी अशी जनतेची अपेक्षा आहे परंतु ती अपेक्षा पूर्ण होत नाही मात्र दुस-या बाजूला मुंबई बकाल करण्याचे काम केले जात आहे. मध्यंतरी शासनाकडून असे सांगण्यात आले होते की मुंबईचे शांघाय करावयाचे आहे . मुंबईचे शांघाय किंवा सिंगापूर होईल किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु मुंबईचे ढाका मात्र नक्की होईल अशा प्रकारचे चित्र शासनाच्या कृतीमुळे स्पष्टपणे दिसते .

सभापती महोदय, पर्जन्यजल वाहिन्या प्रकल्पासाठी 1,200 कोटी रुपये मंजूर करुन ठेवण्यात आलेले आहेत परंतु त्यापैकी फक्त 500 कोटी रुपये देण्यात आले असून उरलेले 700 कोटी रुपये मिळावेत यासाठी शासनाकडे सतत मागणी करावी लागत आहे. पूर्ण पैसे न मिळाल्यामुळे हे प्रकल्प केव्हा पूर्ण होणार आहेत.? मुंबईसाठी ज्यावेळी मूळ योजना तयार करण्यात आली होती त्या वेळी मुंबईची लोकसंख्या 20 लाख होती .त्यावेळी भविष्याचा विचार करुन मुंबईतील 80 लाख लोकांसाठी ब्रिटीशांनी पर्जन्य जल वाहिनी तसेच मल वाहिनी इत्यादी व्यवस्था करुन ठेवली होती आता मुंबईची लोकसंख्या दीड कोटीच्या आसपास गेलेली आहे मल वहिनी योजना , पर्जन्य जल वहिनी योजना या देवाच्या भरवशावर चालू आहेत. ही यंत्रणा जर फेल झाली तर काय होईल याचा विचार माननीय मंत्री महोदयांनी करावा असे मला त्यांना सांगावयाचे आहे. दिनांक 26 जुले रोजी मुंबईतील पाणी समुद्रात जाण्याची योजना फेल झाली होती त्यावेळी मुंबईमध्ये प्रलय झाला होता. शासनाची जरी मुंबईवर अवकृपा असली तरी
मुंबईवर देवाची कृपा आहे म्हणूनच मुंबई वाचली आहे. प्रत्येक वेळी शासनाकडून मुंबईवर अन्याय केला जातो मुंबईमधून मोठया प्रकाणावर कर गोळा केला जातो व त्यातील मोठा हिस्सा केन्द्र सरकारकडे जातो मात्र त्याच्या बदल्यात मुंबईसाठी पैसे दिले जात नाही. जी अविकसीत



11-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4W 3

VTG/ KGS/ ST/ SBT/ MAP/ 19=55

ॲड.अनिल परब ...

राज्ये आहेत त्याचा विकास व्हावा यासाठी हे पैसे केन्द्र सरकार खर्च करीत असते गेल्यावर्षी एक लाख कोटी रुपये मुंबईतून केन्द्र सरकारकडे गेले होते. त्यापैकी राज्याच्या वाटयाला किती पैसे मिळाले आहेत ? . मी याठिकाणी सांगू इच्छिठतो की, आपल्या राज्यातून केन्द्र सरकारला जे पैसे जातात त्यातील बरेचसे पैसे जी अविकसीत राज्ये आहेत त्यांचा विकास करण्यासाठी दिले जातात त्याचबरोबर त्या अविकसीत राज्यातील माणसेसुध्दा मुंबईमध्ये बोलावून घेतले जातात. एका बाजूला त्या राज्याच्या विकासासाठी मुंबईहून पैसा पाठवावयाचा आणि दुस-या बाजूला त्या माणसांचा आर्थिक बोजासुध्दा मुंबईनेच सहन करावयाच्या अशा विचित्र कात्रीमध्ये मुंबई सापडलेली आहे. शासनाच्या धोरणामुळे मुंबई या कात्रीत सापडलेली आहे तेव्हा शासनाच्या धोरणामध्ये बदल करणे गरजेचे आहे जोपर्यत धोरणात बदल होत नाही जोपर्यत मुंबईचे भले होईल असे मला वाटत नाही .

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण यांनी मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचारासंबंधी अनेक गोष्टी याठिकाणी भाषण करतांना सांगितल्या. परंतु आज आपल्याला लहान गोष्टी वाटत असल्या तरी मुंबईतील मराठी माणूस बाहेर चालला आहे. आणि बाहेरुन मुंबईत येणारा माणूस या शहरामध्ये झोपडी बांधल्यानंतर त्याठिकाणी स्वत:चे पक्के घर बांधतो. परंतु गेल्या 25 ते 50 वर्षापासून शासनाची सेवा करुन सेवानिवृत्त झाल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्यांना पोलीस कर्मचाऱ्यांना मुंबईच्या बाहेर ठाणे जिल्हयामध्ये किंवा दुसऱ्या जिल्हयामध्ये जाऊन स्वत:चे झोपडे बांधून रहावे लागत आहे. कालपरवा मुंबई शहरामध्ये आलेले कचरा वेचणारे लोक त्याच भागामध्ये शासनाचे भूखंड गिळून स्वत:च्या इमारती उभ्या करीत आहेत. त्यांना एसआरए योजनेमधून घर मिळते. परंतु सरकारी कर्मचाऱ्यांना आणि पोलिसांना देण्यासाठी आपल्याजवळ जागा नाही. मुंबईच्या शिवडी येथील प्रतिक्षानगरमध्ये पोलिसांकरिता 426 सदनिका बांधून तयार आहेत. ज्या पोलिसांना ती घरे द्यावयाची आहेत त्यांची यादी आपणाकडे आहे. त्यांना सदनिका देण्याबाबत मी अनेक वेळा या सभागृहात लक्षवेधी सूचना उपस्थित केली. ही बाब मी शासनासमोर अनेक वेळा मांडली आहे. परंतु तुमच्या गृहनिर्माण विभागाच्या मंत्रिमहोदयांना त्या सदनिकांच्या फाईलवर सही करण्यास वेळ मिळत नाही. जे पोलीस स्वत:च्या जीवाची पर्वा न करता आपले रक्षण करतात त्यांचे हाल कशासाठी करीत आहात? त्यांचे तयार असलेले घर किमान त्यांना देण्यात आले पाहिजे. या ठिकाणी बसलेले सत्ताधारी मंत्री यांना मुंबईबद्दल अजिबात आस्था नाही. मुंबईमध्ये काही संकट आले तर प्रत्येक जण आपल्या गावामध्ये घरी जाऊन बसेल. परंतु जे मूळ मुंबईकर आहेत ते या संकटापासून बचाव करण्यासाठी कुठे जाणार आहेत? सभापती महोदय, मुंबईमध्ये एसआरएच्या हजारो फाईल प्रलंबित आहेत. शासनाने चटई क्षेत्रामध्ये वाढ करुन तो 225 वरुन 269 पर्यंत वाढविला. त्या फाईलवरील 225 ऐवजी 269 एवढा एरिया करेक्शन करण्यासाठी ती फाईल पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात येते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीकरिता हजारो फाईल पडून आहेत. पावसाळा तोंडावर असतांना आणि लोकांची घरे बांधून तयार असतांना एरिया करेक्शन झाल्याशिवाय त्या घरांची लॉटरी काढण्यात येत नाही आणि त्यामुळे हे लोक आपल्या हक्काच्या घरामध्ये जाऊ शकत नाहीत. याबाबतीत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. परंतु शिवजयंतीच्या सुट्टीच्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी शासकीय भूखंड बीओटी तत्वावर प्राथमिक सुविधा विकसित करण्यासाठी बिल्डरला देण्याकरिता तातडीने

DGS/ MAP/ KGS/ SBT/ ST/

ॲड. अनिल परब...

बैठक घेतली. परंतु हजारो लोक आज झोपडपट्ट्यांमध्ये रहात आहेत व ज्यांची घरे तयार आहेत त्यांच्या फाईलवर सही करण्यास या शासनाला वेळ नाही. अशाप्रकारे मुंबईची गळचेपी शासनाच्या बाजूने सुरु आहे. त्याबाबत शासनाने गंभीरपणे लक्ष देणे गरजेचे आहे. दिवसें दिवस मुंबईची दुरावस्था होत चालली आहे. पोलीस यंत्रणेकडे लक्ष नाही, मुंबईच्या सुरक्षिततेकडे लक्ष नाही. म्हाडाच्या योजनेच्या बाबतीत आपली अनास्था आहे. एमएमआरडीए, एमआरडीसी या सर्व यंत्रणा पैसे खाण्यामध्ये आणि स्वत:ची खुषमस्करी करण्यामध्ये मश्गुल आहेत. ज्या हेतूसाठी या यंत्रणांची स्थापना झाली आहे, त्या मूळ हेतूपासून हे शासन बाजूला जात आहे. आणि म्हणून या सर्व गोष्टींकडे ताबडतोबीने बघण्याची गरज आहे. खरे म्हणजे हा विषय विस्तृत असल्यामुळे त्यावर पूर्ण दिवसभर चर्चा होणे आवश्यक होती. या ठरावामधील प्रत्येक विषयासंबंधी जे संबंधित मंत्रिमहोदय उत्तर देणार आहेत त्यांची उपस्थिती आवश्यक होती. याठिकाणी माननीय नगरविकास राज्यमंत्री उपस्थित आहेत. परंतु ते आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांची कशी उत्तरे देणार आहेत? हे आम्हाला माहीत नाही. म्हणून मुंबईतील उपस्थित केलेले सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी एक स्वतंत्र बैठक घेतली पाहिजे. येऊ घातलेल्या पावसाळयामध्ये मुंबईकरांचे किती हाल होणार आहेत? आज एमएमआरडीएकडे पुरेसा कर्मचारी नसल्यामुळे त्यांची कामे अर्धवट पडलेली आहेत. त्याचे खापर उद्या मुंबई महानगरपालिकेवर फोडले जाणार आहे. या सर्व गोष्टींची आपल्याला उकल करावयाची असेल तर मंत्रिमहोदय आपणास मुंबईबद्दल जिव्हाळा वाढवावा लागेल. या शासनाने आस्था दाखविली तरच मुंबईचे भले होईल. अन्यथा मुंबईला श्रध्दांजली वाहण्यासाठी पुढील वेळेस या सभागृहामध्ये आम्हाला उपस्थित रहावे लागेल. याबाबत आपण गांभीर्याने लक्ष घालून यावर उपाय योजना करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 20:05 डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मुंबईतील समस्यांच्या संदर्भात नियम 260 अन्वये सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी आणि आमचे सर्व सहकारी यांनी मांडलेला आहे. त्यासंदर्भात मी विचार मांडण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, मी सर्वांची भाषणे ऐकली, पण मला प्रकर्षाने आज स्व.प्रमोद नवलकर यांची आठवण येते आणि मुंबईसंबंधात चर्चा होत असताना जर आज स्व.प्रमोद नवलकरजी असते तर मी माननीय मंत्री महोदय श्री.हसनजी मुश्रीफ यांना सांगू इच्छिते की, यावर एवढी गंभीरपणे चर्चा झालीच नसती. ते तुम्हाला म्हणाले असते की, ही चर्चा वगैरे सोडा आणि माझ्याबरोबर चला. मी तुम्हाला भटक्याची भ्रमंती करुन दाखवितो. जेणेकरुन तुम्हाला बऱ्याचशा गोष्टींची माहिती मिळेल. आज दुर्दैवाने स्व.प्रमोद नवलकर आपल्यामध्ये नाहीत. भटक्याची भ्रमंती त्यांच्याबरोबरच थांबलेली आहे. पण मराठी माणूस मात्र भटक्या परिस्थितीत येईल अशा प्रकारची मुंबईतील स्थिती झाली असल्याचे दिसत आहे. म्हणून कै.प्रमोद नवलकरांनी या सदनामध्ये अनेक वेळा अनेक पध्दतीने भूमिका मांडल्या. आमच्या अगोदर जे सन्माननीय सदस्य होते आणि जे आज आम्हाला विचारीत आहेत की, आम्ही काय केले ? त्या सन्माननीय सदस्यांनी देखील येथे भूमिका मांडल्या, परंतु त्यावर अंमलबजावणी झालेली नसल्याने आज मुंबईसमोर अनेक आव्हाने निर्माण झाल्याचे दिसत आहे. 1 जून रोजी शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धवजी ठाकरे यांनी महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री.अशोकजी चव्हाण यांची भेट घेतली. त्यावेळी मुंबईच्या महापौर डॉ. शुभा राऊळ या देखील सोबत होत्या. त्यावेळी मुंबई महानगरपालिकेकडून विशेषत: प्रदेश विकास प्राधिकरणाकडे कोणकोणती कामे अर्धवट आहेत याचे निवेदन दिलेले आहे. त्याची प्रत सन्माननीय आमचे सहकारी श्री.अरविंद सावंत यांनी आपल्याकडे दिलेली आहे. परंतु रेकॉर्डवर काही मुद्दे येणे गरजेचे आहे. कारण यावेळेला 30 टक्के पाऊस जास्त पडेल अशा प्रकारचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, त्यांनी केलेल्या घाटकोपर-विक्रोळी-लिंक रोड हा रस्ता गंगावाडी नाल्यापेक्षा 10 फूट उंच आहे आणि 10 फूट उंचीची संरक्षण भिंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे बांधली जात आहे. त्यामुळे या वसाहतीमध्ये नाल्याचे पाणी शिरणार आहे. म्हणून हा रस्ता बांधताना एम.एम.आर.डी.ए.ने विचार करणे गरजेचे होते.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा सर्व ॲथॉरिटीज् एकत्र असण्याबाबत आहे. तेथे असे दिसते की, अनेक ॲथॉरिटीज एकत्र करुन, बिंबिसार नगर गोरेगाव (पूर्व) येथील जो नाला वालभट नदी-

. . . .4 वाय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

मध्ये सोडणे गरजेचे होते. हा नाला न बांधल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर पावसाळयामध्ये पूर परिस्थिती निर्माण होणार आहे. म्हणून वरील यंत्रणांना एकत्र करुन उपाययोजना करणे अतिशय आवश्यक आहे.

सभापती महोदय, विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीखालून येणारी मिठी नदी 120 फूट रुंद करणे आवश्यक आहे. यासाठी अग्रक्रम देणे आवश्यक आहे. तसेच विमानतळ प्राधिकरणाच्या हद्दीतून जाणारा विलेपार्ले (पूर्व) येथील श्रध्दानंद नाला समाधानकारकरित्या साफ करण्यात आलेला नाही. मी शब्दश: यामध्ये जात नाही. परंतु महत्वाचे मुद्दे मांडत आहे. कारण आज सदनामध्ये सन्माननीय सदस्य कमी प्रमाणात उपस्थित असले तरी सदनामध्ये काय चालले आहे ? याकडे मुंबईतील जनतेचे लक्ष आहे. 7 जूनला पाऊस सुरु होणार होता, परंतु 10 जूनपर्यंत तरी पाऊस सुरु झालेला नाही. परंतु ज्याक्षणी काही क्षणामध्ये, काही दिवसांमध्ये येऊन पोहोचेल अशा वेळी आपल्याला दिसते की, मोनो रेल, मेट्रो रेल च्या कामाच्या संदर्भातील मातीचे ढिगारे मुंबईमध्ये ठिकठिकाणी तसेच पडून आहेत. आपण बी.पी.टी.रस्त्याने किंवा दादर-सायन रस्त्याने गेलो तरी प्रत्येक ठिकाणी मातीचे ढिगारे पडून आहेत. खरेतर आतापर्यंत उचलणे आवश्यक होते. परंतु ते 12 तासाच्या आत उचलले गेले पाहिजेत. जर आता पाऊस सुरु झाला तर काय परिस्थिती निर्माण होईल याचा आपण विचार करावा.उद्या या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत. या शहरातील लोकांच्या दृष्टीने हे मातीचे ढिगारे आहेत आणि हे विषय फार महत्वाचे आहेत. पण सदनाच्या दृष्टीने काहीच महत्वाचे नाही. यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. आम्ही हे करणार, ते करणार, 10 महिन्यांनी काय करणार आहोत, तो प्रश्न नाही. परंतु उद्याच्या उद्या काय करणार आहोत हे महत्वाचे आहे. तसेच स्काय वॉकमुळे जे खड्डे पडलेले आहेत, ते बुजवण्यात आलेले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब या सदनामध्ये प्रश्न उपस्थित केला होता की, गटाराची झाकणे न बसविल्यामुळे पाणी साठल्यावर गटार आहे की नाही हे न समजल्यामुळे लोक डायरेक्ट गटारामध्ये पडतात आणि त्यांचे मृत्यू होतात. अजूनही देखील हे खड्डे बुजविले गेले नाहीत,तर यामुळे जनतेला फार मोठा धोका निर्माण होऊ शकतो. जोगेश्वरीच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारा सुभाषनगर नाला रेल्वेच्या हद्दीमध्ये सुरु असलेल्या कामामुळे अडला गेला आहे. म्हणून रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत बांधण्यात आलेल्या भिंतीमुळे पाणी रेल्वेच्या रुळांमध्ये...

. . . .4 वाय-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

साचेल आणि परत टी.व्ही.वर ब्रेकींग न्यूज येईल की, "रुळांवर पाणी साठलेले आहे." त्यामुळे एका बाजूला मुंबई महानगरपालिका खूप झगडत आहे. मग बहुमजली वाहनतळ असतील, सदनिका असतील, संयुक्त महाराष्ट्रासाठी दालन असेल, मध्य वैतरणा प्रकल्प, ट्रोमा सेंटर, सफाई कामगारांसाठी आश्रय योजना, रुग्णालयांची दर्जोन्नती देणे, महिलांसाठी 400 कोटी रुपयांची खास तरतूद यादृष्टीने मुंबई महानगरपालिकेचा एका बाजूने प्रयत्न सुरु आहे. पण आज "दैनिक सकाळ" मध्ये जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन" या संदर्भात बातमी आलेली आहे. जर ही बातमी "सामना" मध्ये आली असती, तर आमच्यावर एखाद्या वेळेस कोणीतरी आरोप केला असता की, आम्ही आम्हाला सोयीस्कर अशी बातमी दिलेली आहे की काय ? पण आपण "दैनिक सकाळ" मधील पहिल्या पानावरील बातमी जरुर पहावी. ज्याच्यामध्ये त्यांनी स्पष्ट केलेले आहे की, महाराष्ट्राला 77 प्रकल्पांसाठी 11,510 कोटी रुपये जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन यांनी देऊन सुध्दा फक्त त्यातील एकच प्रकल्प पूर्ण होऊ शकल्यामुळे, केंद्र शासनाने असा इशारा दिलेला आहे की, आम्ही तुम्हाला यापुढील पैसे का द्यावेत ?

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम सौ. रणदिवे.... 20:10

डॉ. नीलम गोऱ्हे....

प्रकल्प पूर्ण करण्यात शेजारच्या गुजरात राज्याने पहिला क्रमांक पटकवला आहे. या राज्याने 13 प्रकल्प पूर्ण केले आहेत महाराष्ट्रासाठी योजनेच्या एकूण निधी पैकी 23 टक्के निधी मिळाला असला तरी प्रत्यक्षात प्रकल्प पूर्ण का झाले नाहीत तर याचे महत्वाचे कारण म्हणजे प्रशासनाची मंद गती आणि प्रशासनाच्या मंद गतीचे महत्वाचे कारण म्हणजे शासनाकडून जेवढे सनियंत्रण पाहिले तेवढे होत नाही.बहुतेकवेळा मुंबईचे जे पालकमंत्री असतात स्वाभाविकपणे त्यांचे लक्ष गावाकडे असते. आता सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. चंद्रकांतजी हंडोरे हे मुंबईचे पालक मंत्री आहेत. पण अनेकवेळा अनेक जिल्हयामध्ये जशी सहा-सहा महिने जिल्हा नियोजन मंडळाची बैठक होत नाही त्याप्रमाणे येथे सात-सात, आठ-आठ महिने चटावरची श्रध्द उरकल्यासारख्या नियोजन मंडळाच्या बैठकी होतात आणि त्या बैठकीमध्ये लोकांना समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. नैसर्गिक आपत्तीचा आराखडा मुंबई महानगरपालिकेने कितीही तयार केला असला तरी राज्य शासन आणि बाकीच्या सर्व यंत्रणांमध्ये समन्वय नसेल तर फक्त एकमेकांवर जबाबदारी ढकलणे, मुंबई महानगरपालिकेवर जबाबदारी ढकलणे याबद्दलच सातत्याने चर्चा होत रहाते.सभापती महोदय, माझा शेवटचा पण अतिशय महत्वाचा मद्दा असा आहे की, परप्रांतीय मुंबईत येतात. या परप्रांतीयापैकी ज्यांना वैद्य नोकऱ्या आहेत. जगण्याची साधने आहेत त्यांच्या बद्दल एकवेळ ठीक आहे. पण परप्रांतीयापैक्ी बरेचसे जे बेकार या मुंबईत येत आहेत ते गुन्हेगारिची संस्कृती घेऊन येत आहेत. मुंबई शहारामध्ये सिध्दीविनायकाचे दर्शन घ्यायला जाताना रात्र 1.00 वाजता, 2.00 वाजता मुली पायी चालत जातात इतकी सुरक्षितता आहे. त्याच मुंबई शहराबाबत सन 2003 चा हयुमन डेव्हलपमेंट रिपोर्ट असे सांगतो की, मुंबई शहरात 40,000 वेश्या आहेत. त्यातील 90टक्के वेश्यांना त्या अल्पवयीन असतांना त्यांना मुंबईमध्ये आणलेले आहे. म्हणजे परप्रांतीयाबरोबर एक दलालांचे जाळे मुंबई शहरात काम करीत आहे. त्यांना कोण रोखणार? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. बऱ्याचवेळा रेल्वेमधून जाणाऱ्या महिला परप्रांतीयावर चिडलेल्या असतात त्या प्रत्यक्षपणे किती जणांशी बोलतात मला माहीत नाही पण मुंबईत जे भय्ये लोक आहेत, त्यांना अतिशयक घाणेरडी सवय आहे. या सदनातील महिला आमदार म्हणून त्यांचे दु:ख आणि व्यथा येथे नोंदवणे गरजेचे आहे. त्यातील काही भय्ये चक्क त्यांचे कपडे काढून अंधारात उभे असतात. अशा घटना वारंवार

..2..

डॉ. नीलम गोऱ्हे....

घडतात शेवटी स्त्रिया छत्र्यांनी यांना झोडपून काढतात मग तेथून संषर्घाला सुरुवता होते. स्त्रियांनी स्वत:ची किती मुस्कटदाबी करुन जगायचे याला सुध्दा मर्यादा आहे. किती तरी शाळेत जाणाऱ्या मुलींनी याबाबत शाळा संचालकांकडे तक्रारी केलेल्या आहेत. या भय्यांचे कुटुंब गावाकडे असते. हे लोक वखवखलेले असतात. त्यामुळे एड्ससारख्या आजारांचे थैमान चालू आहे. परप्रांतीय मुंबईत येताना गुन्हेगारीची संस्कृती घेऊन येतात. यमेन, मध्यपूर्व बहारीन या सारख्या देशातील परदेशी नागरिक त्यांचा विसा संपलेला असताना सुध्दा मुंबईत रहातात. दर पावसाळयात येथे येऊन तात्पुर्ती बायको घेऊन जातात, काही दिवस तेथे ठेवतात आणि पावसाळयानंतर परत त्या बाईला मानखुर्द किंवा शिवाजीनगर येथील झोपडपट्टीत आणून सोडतात. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती पोर्णिमा अडवाणी यांनी मध्यपूर्व मुंबईतून किती मुली परदेशात नेल्या गेल्या याचा महाराष्ट्र पोलिसांना सर्व्हे करावयास सांगितले होते. परंतु त्याबद्दल कुठलीही पाऊले उचलली जात नाहीत कुठलीही उपाययोजना केली जात नाही. त्यामुळे परप्रांतीयाबरोबर परत-परत ही गुन्हेगारीची संस्कृती मुंबईमध्ये जास्तीत जास्त पाय रोवत आहे. त्याची दहशतवादासारखी फळे आपण पहिली आहेत. मग अप्पू यादव सारखा लोकांनी कायदा हातात घेईपर्यंत वाट बघायची आणि नंतर त्याच लोकांना शिक्षा करायला निघायचे हा जो सगळा उफराटा कारभार चाललेला आहे याबाबतीत पॉइंट टू पॉइंट उत्तरे मिळावित अशा प्रकारची आमची अपेक्षा आहे. सन्माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना कार्याध्यक्ष श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या माध्यमातून येथील मराठी जनतेला आधार नसता तर आज मुंबईचा बिहार किंवा उत्तर पद्रेश झाला असता ही वस्तुस्थिती आहे. त्याच अनास्थेचे दर्शन या ठिकाणी होत आहे. मोजायला गेलो तर अगदी हाताचे बोटेसुध्दा उरतील एवढेच दोन-तीन आमदार सभागृहात उपस्थित आहेत. मुंबईच्या प्रश्नाबद्दल यांना काहीच आस्था नाही, याची नोंद जनता घेतल्या शिवाय राहणार नाही, असे मला वाटते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

**तालिका सभापती** ( श्री. हेमंत टकले ) या चर्चेला मंत्र्यांचे उत्तर उद्या होईल तसेच आजच्या कामकाजात दर्शविलेल्या तीन अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार दिनांक 12 जून,2009 रोजी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हः भरेल.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 14 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 12 जून,2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही